म. ग्रं. सं. ठाणें.
विषय अं-प्रवास
सं. क्र. ५८५

REFBK-0028125
REFBK-0028125

# मुलुखगिरी

द्वारकानाथ संझगिरी

REFBK-0028125

प्रभात
प्र का श न

मुलूखगिरी
Mulukhagiri

© द्वारकानाथ संझगिरी, १९९५
१०डी, हेंद्रे कॅसल, बाबरेकर मार्ग,
गोखले रोड (उत्तर), दादर,
मुंबई ४०० ०२८

म/६

**प्रथम प्रकाशन :**
एप्रिल १९९५

**मुखपृष्ठ :**
पुंडलिक वझे

**आतील चित्रे :**
प्रभाशंकर कवडी

**अक्षरजुळणी :**
ॐ प्रिंट, प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

**मुद्रक :**
ॐ प्रिंट, प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

**प्रकाशक :**
शिवा घुगे
प्रभात प्रकाशन,
द्वारा-साप्ताहिक विवेक,
१२, कामत इंडस्ट्रियल इस्टेट
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

किंमत रु. ७०/-

सौ. सुप्रिया संझगिरी
आणि
मकरंद भोंसले
यांस प्रेमपूर्वक

'सौ'ने माझे लेख स्वत:च्या दागिन्यांपेक्षा जास्त प्रेमाने जतन केले. मकरंद भोंसले या सन्मित्राने ते लेख स्वत:चे असल्याप्रमाणे जतन करायला मदत केली.

माझ्या हातावर परदेशगमनाची रेषा आहे, याचा कुठल्याच ज्योतिषाला सुगावा लागला नव्हता. ती अदृश्य होती आणि क्रिकेट नावाच्या एका अद्वितीय खेळाने ती ओढली होती. या खेळाचं बोट धरून मी थोडंफार जग फिरलो.

क्रिकेट पाहात फिरताना बरेच वेगवेगळे अनुभव आले. 'लोकसत्ता', 'सामना'सारखी दैनिकं, 'लोकप्रभा', 'श्री'सारखी साप्ताहिकं, 'दीपलक्ष्मी', 'अक्षर'सारख्या दिवाळी अंकांत मी त्या अनुभवांबद्दल लिहिलं होतं.

हे पुस्तक त्या लेखांचं संकलन आहे माझं हे पहिलं अपत्य. हे बाळंतपण काढण्यात मला अनेकांचा हातभार लागला. 'षटकार'ची मदत तशी घरचीच होती, पण त्यानंतर 'श्री', 'मध्यंतर'चे रसिकलाल भुत्ता, 'सामना'चे तरुण संपादक संजय राऊत आणि अर्थातच 'आज दिनांक'चे संपादक कपिल पाटील या मंडळींनी मला त्यांच्या कुटुंबाचा एक भागच मानलं आणि परदेश वाऱ्यांसाठी लागणारं आर्थिक पाठबळ दिलं. 'लोकसत्ता', 'सामना', 'आज दिनांक', 'लोकप्रभा', 'श्री', 'दीपलक्ष्मी', 'अक्षर' यांच्या संपादकांनी माझे अनुभव वाचकांपर्यंत पोहोचवण्यात मदत केली. त्यांचे आभार मानायलाच पाहिजेत. मी किशोर देवधर या पुण्याच्या पत्रकारचं नाव विसरलो तर तो कृतघ्नपणा ठरेल. लेखक म्हणून पहिलं पाऊल मी त्याच्याच आधाराने टाकलं.

पत्रकारितेच्या बाहेरच्या अनेक मंडळींनी मला मदत केली. विशेषत: 'स्पेस ट्रॅव्हल्स'चे योगेश आणि यतिन डोसा, 'व्ही. व्ही. लागू ट्रॅव्हल्स'चे श्री. केळकर, केतन जुवेकर आणि त्यांचा सर्वच उत्साही कर्मचारीवर्ग आणि 'क्वांटास'चे तरुण आणि कर्तबगार अधिकारी अनुप कर्णिक यांनी वेळोवेळी अत्यंत स्वस्त दरात तिकिटं उपलब्ध करून दिली.

पुस्तकाची कल्पना एकदा डोक्यात आल्यावर ती प्रत्यक्षात उतरवण्यात श्री. रमेश तेंडुलकर आणि कै. अरविंद गोखलेंनी केलेली मदत अनमोल आहे अरविंद गोखलेंनी प्रत्येक लेख न कंटाळता काळजीपूर्वक वाचला. पुस्तकाची अनुक्रमणिका त्यांनीच ठरवली. 'मुलुखगिरी' हे पुस्तकाचं नावही त्यांचंच आणि पुस्तकाबद्दल चार शब्दही त्यांनीच लिहिले. त्यांच्या लेखणीतून उमटलेले हे कौतुकाचे चार शब्द बहुधा त्यांनी लिहिलेले शेवटचेच शब्द असावेत.

प्रकाशक शिवा घुगे याने हे पुस्तक काढण्यात पुढाकार घेतला. चित्रकार प्रभाशंकर कवडी आणि पुंडलिक वझे यांनी हे पुस्तक आकर्षक करण्याचा मनापासून प्रयत्न केला.

या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

-द्वारकानाथ संझगिरी

रम्य ही स्वर्गाहून श्रीलंका ..........७
दुश्मनांच्या देशात ..................२०
साहेबावर सत्ता ...................५६
सागरा प्राण तळमळला ...........७०
यंत्राची आधुनिक दुनिया ..............७७
पृथ्वीवरचा स्वर्ग ........ ..............८४
जेथे कालवे आरसे होतात ............९०
'अजि म्या ब्रॅडमन पाहिलेऽ' ..........९६
इथे तर बालाजीचेही स्थलांतर .........१०२
व्हर्साइल्सचं विलोभनीय वैभव ...........१०७
विलायती तारुण्य ..........................११२
पर्यटकांना खुणावणारी नगरी : बँकॉक ....१२२

# रम्य ही स्वर्गाहून श्रीलंका

माझं श्रीलंकेला जाणं नक्की झालं आणि ब्रिटिशांच्या जमान्यात अंदमानला निघाल्यासारखे घरच्यांचे चेहरे झाले. त्यात निघायच्या चार दिवस अगोदर तिथं श्रीलंकेत मुडद्यांची संख्या श्रीलंकेच्या सैनिकांनी वाढवली आणि घरच्यांचे छातीचे ठोकेही वाढले. आमच्या सौ. वारंवार आरशात स्वत:च्या कुंकवाकडे पाहायला लागल्या.

अशावेळी अचानक माझ्या लक्षात आलं की आपली काळजी करणारी मंडळीही जगात खूप आहेत. कुणीही आलं की आपुलकी दाखविल्याशिवाय जायचं नाही.

''श्रीलंकेला निघालायस्? वेड लागलय? तिथं रस्तारस्ता माणसं किड्यामुंग्यासारखा मरतायत.'' स्वत:च्या पैशाने एकदाही वर्तमानपत्र विकत न घेणाऱ्याने येऊन आतली बातमी सांगितली.

अनेकांनी सल्ला दिला, ''महिनाभर घरी वर्तमानपत्रच बंद करून टाक, उगाच घरच्यांना तिथल्या बातम्या समजायला नकोत.''

थोडक्यात, क्रिकेट मॅचेस कव्हर करण्याऐवजी मी युद्धभूमीच्या बातम्या पाठवायला चाललोय असा समज घरच्यांचा झाला आणि करून देण्यात येत होता.

अर्थात मी घरच्यांना दोष देत नाही. कदाचित श्रीलंकेतले श्रीयुत गुणरत्ने किंवा रत्नायके जर भारतात यायला निघाले असते तर त्यांच्याही घरच्यांचे हेच हाल झाले असते. मिसेस गुणरत्ने किंवा मिसेस रत्नायकेंनी देव, सॉरी बुद्ध पाण्यात घालून ठेवला असता.

तिथल्या एका माझ्या मित्राला विचारलं, 'मुंबईला कधी येतोस?'' तो कावराबावरा झाला आणि म्हणाला, ''मला यायची खूप इच्छा आहे, पण मुंबईत माझ्या जिवाला धोका नाही ना?''

मी म्हटलं, ''तुझ्या जिवाला कसला धोका?''

तो म्हणाला, ''नाही, मी सिंहली आहे. आमच्याबद्दल तिथल्या मंडळींना राग असणार नाही का?'' मी मोठ्यांदा हसलो. मी त्याला म्हटलं, ''अरे वेड्या काही काळजी करू नकोस. मुंबईत प्रत्येक माणूस स्वत:च्याच प्रश्नात मश्गूल असतो. त्यांना राग येतो आपल्या घरात नसताना शेजारच्या कुळकर्ण्यांकडे कलर टीव्ही आल्यावर किंवा स्वत:च्या मुलीला अनेक नकार मिळत असताना देशमुखांच्या स्वप्नाचं लग्न जमल्यावर किंवा आपल्याला न मिळता अय्यरला प्रमोशन मिळाल्यावर! तामीळ-सिंहली प्रश्नात त्यांना काडीचा रस नाही. अगदी बिनधास्त ये. बायकापोरांसह ये!''

मुंबईकर बायकापोरांसह ये असं आमंत्रण सहसा देत नाहीत. पण मी दिलं.


असो. तर सांगायचा मुद्दा असा, की घरोघरी मातीच्या चुली. संझगिरी काय किंवा रत्नायके काय मनुष्यस्वभाव तोच!

मी मात्र दृढनिश्चयी होतो. सुनील गावस्कर मैदानात असतो तसा. मग मात्र सर्वांचा विरोध कमी झाला. थोर थोर गोलंदाजही निष्प्रभ झाले. मग वेगळाच अध्याय सुरू झाला. सौ.ने प्रेमळ सल्ला दिला, ''बाहेर वाट्टेल ते खाऊ नकोस. रात्री उगाचच एकटा फिरू नकोस.'' (ह्यात कदाचित अनेक अर्थ दडलेले असावेत. मी मात्र एकच उचलला. प्रकृतीची काळजी, वगैरे वगैरे.)

इथेही एक खवचट सल्ला मिळालाच. कुणीतरी येऊन म्हटलंच, ''शक्य तो मुंबईच्याच खेळाडूंबरोबर राहा. श्रीकांत-शिवाच्या जास्त जवळ जाऊ नकोस. वेळ काय सांगून येते?''

अनेकांच्या शुभेच्छा, चिंता, काळज्या उरात ठेवून मी एअर लंकाच्या विमानात शिरलो तेव्हा मीही थोडा घाबरलो होतोच. कानाजवळून बंपर गेल्यावर फलंदाज घाबरावा तसा. विमानप्रवास म्हटला की हल्ली भीती वाटतेच आणि हे वर्ष तर विमान-अपघात वर्षच आहे. त्यातही घातपात जास्तच! बारीक नजरेने मी इतर प्रवासी न्याहाळत होतो. तामीळ 'टायगर्स' माझ्या डोक्यात होते. पण विमानात शिरताना एका सुंदर हवाईसुंदरीने स्वागत केलं आणि मनावरचा बराच ताण कमी झाला. सुंदर हवाईसुंदरी म्हणजे पिवळा पितांबर म्हणण्यासारखं आहे, असं अनेकांना वाटेल. हवाईसुंदरी ही सुंदर असलीच पाहिजे अशी अट इतर एअरलाइन्समध्ये नेहमीच पाळली जाते असं नाही. पण एअरलंका मात्र ही गोष्ट कसोशीने पाळतेय असं दिसतंय. इतर सोयीही फारच चांगल्या आहेत.

मुंबई-कोलंबो प्रवास फक्त दोन तासांचा आहे विमान कोलंबोच्या जवळ आल्याचं जाहीर केलं गेलं आणि मी खिडकीतून खाली डोकावलो. त्यावेळी पहिलं वाक्य जर आठवलं असेल तर ते म्हणजे 'रम्य ही स्वर्गाहून लंका!' विमानातून




मुंबई पाहताना झोपडपट्टी नजरेतून सुटत नाही. वरून कोलंबो पाहताना हिरवीगार वनश्री सर्वात जास्त मनावर ठसते.

कोलंबोचा काटुनायके विमानतळ फारसा मोठा नाही. आपला हैद्राबादचा विमानतळही फार मोठा असेल. कोलंबोत शिरताना प्रत्येकाला स्वत:जवळ असणारी विदेशी मुद्रा जाहीर करावी लागते आणि विदेशी नागरिकाला तर ही विदेशी मुद्रा जाहीर करणारं कार्ड पासपोर्टइतकंच जपावं लागतं. त्या कार्डाशिवाय कोलंबोतल्या ड्यूटी फ्री शॉपमध्ये तुम्हाला खरेदी करता येत नाही. प्रत्येक अविकसित देशात हा प्रश्न असतोच. विदेशी मुद्रा ही गोष्ट तिथे फार मौल्यवान असते. युरोपात वाण्याच्या दुकानात साबणाची वडी घ्यावी त्या सहजतेने डॉलर्सचे पौंड, पौंडचे मार्क्स, मार्क्सचे फ्रॅक्स मिळतात. अर्थात इतकं करूनही काळ्याबाजारात जसे आपल्याकडे डॉलर्स मिळतात, तसे श्रीलंकेतही उपलब्ध असतात. किंबहुना, आमच्या हॉटेलच्या रूममध्ये एक खास नोटीस होती. 'कृपया, बाहेर जास्त दर मिळाला तरी आपले डॉलर्स बँकेखेरीज किंवा अधिकृत एक्स्चेंजरशिवाय कुठेही एक्स्चेंज करू नका! तुम्ही फसले जाण्याची शक्यता आहे.' ह्याचाच अर्थ तिथेही 'काळाबाजार' जोरात होतो आणि कोलंबोत फिरताना त्याचा अनुभवही तुम्हाला येतोच.

कोलंबोतले टॅक्सीवालेही आपल्या टॅक्सीवाल्यांचे जातभाई! नवं गिऱ्हाईक मिळाल्यावर नवख्या गिऱ्हाईकाला फसवण्यात जबरदस्त हातखंडा. कारण कोलंबो एअरपोर्टवरून कोलंबो शहरात जाताना आणि पहिल्याच दिवशी शहरात फिरताना त्याचा पुरेपूर अनुभव आला. कोलंबो विमानतळ ते कोलंबो शहर हा सुमारे

तासाभराचा रस्ता. जाताना सतत जाणवत राहातं की आपण गोव्यात किंवा केरळात जातो आहोत. दोन्ही बाजूंना नारळाची झाडं, दाट वनश्री आणि नागमोडी रस्ता. रस्त्यावरची माणसं टिपिकल गोवेकरी वाटतात. मुख्य म्हणजे महिन्याभराने कोलंबो सोडेपर्यंत हे मत कायम होतं.

श्रीलंकेच्या महिन्याभराच्या वास्तव्यात बहुतेक वेळ क्रिकेट पाहण्यात गेला. पण तरीही इतर फावल्या वेळी तिथली माणसं, त्यांचे स्वभाव, त्यांची जीवनपद्धती यात डोकावता आलं.

तिथे गेल्यावर विशेषत: कोलंबोत जाणवलं, घरून निघताना उगाचंच अनेकांनी जे इथलं भयाण, भेसूर चित्र उभं केलं होतं त्याचा मागमूसही नव्हता. पंजाब पेटला असताना मुंबईत त्याचा मागमूस तरी सापडायचा का? तसाच प्रकार तिथं. कोलंबोत वर्ष--सव्वा वर्षापूर्वी मोठी दंगल होऊन गेली. मोडतोड, जाळपोळही झाली. तसे मनुष्यजातीचे सर्वत्र गुणधर्म काही सारखेच असतात. त्याचे काही अवशेषही ह्या सुंदर शहरात आजही दिसतात. मात्र माझ्या महिन्याभराच्या वास्तव्यात कोलंबोत्त किंवा कॅन्डीत, श्रीलंकेच्या उत्तरेत चाललेल्या भयानक रक्तपाताचा तसा परिणाम जाणवला नाही.

आम्ही बरेच पत्रकार खेळाडूंबरोबर ताज समुद्र ह्या पंचतारांकित हॉटेलात रहात होतो. खेळाडूंवर देखरेख ठेवायला साध्या वेषातले पोलीस असायचे. पण ते कुठेही असतात. त्यापेक्षा वेगळा असा जास्त बंदोबस्त नव्हता. मैदानावरही फार मोठा जबरदस्त बंदोबस्त कधीही नसायचा. कॅन्डीला कोलंबोपेक्षा जरा जास्त बंदोबस्त होता. विशेषत: आमच्या हॉटेल टोपाझवर! तिथे तामीळ वस्ती बरीच आहे तामीळ टायगर्स त्यांच्यात मिसळून काहीतरी प्रताप करतील अशी त्यांना भीती वाटायची.

पण कधीही कोलंबोत किंवा कॅन्डीत अपरात्री फिरतानाही मला भीती वाटली नाही.

रात्री—अपरात्री फिरताना फक्त एकाच गोष्टीचा वैताग यायचा. वेश्यांचे दलाल फार सतवायचे. इथे वेश्या व्यवसायाला कायद्याने बंदी आहे. पण बऱ्याच ठिकाणी विशेषत: हॉटेलांतून हा धंदा तेजीत चालतो आणि तिथे सरकारही कानाडोळा करतं. त्यांची अर्थव्यवस्था प्रामुख्याने रबर, चहा आणि पर्यटनावर आधारलेली आहे आणि पर्यटन म्हटलं की ह्या गोष्टी आल्याच.

अगदी पहिल्याच दिवशी मला त्याचा अनुभव आला. 'ताज समुद्र'मध्ये राहायला जाण्याअगोदरच मी एका दुसऱ्या हॉटेलात एक दिवस होतो. 'रानवान' असं त्या हॉटेलचं नाव. सकाळी आठच्या सुमारास मी तिथे पोचलो. पहाटे चारचं

विमान असल्यामुळे आणि हल्ली विमानतळावर तीन तास अगोदर जावं लागत असल्यामुळे रात्रभर झोप नव्हतीच. त्यामुळे हॉटेलात पोचल्यावर सर्वप्रथम मी दोन-तीन तास झोप काढली. साधारण बाराच्या सुमारास मी उठलो असेन. चहा मागवला. वेटरने टेबलावर चहा ठेवला आणि मोडक्या तोडक्या इंग्रजीत मला विचारलं, "मुलगी पाहिजे?"

डोळ्यावर झोप होतीच. डोळ्यासमोर निरोप देताना हलणारा बायकोचा हात अजूनही दिसत होता. आणि भरदुपारी बारा वाजता तो वेटर मला विचारत होता, "मुलगी हवी काय?"

बरं, फक्त तो विचारून थांबला नाही. माझ्या उत्तराची वाटही त्याने पाहिली नाही. दरवाजाबाहेर जाऊन एका मुलीला आत बोलावलं.. सावळ्या रंगाची सिंहली मुलगी माझ्यासमोर उभी होती. माझ्या डोळ्यावरची झोप त्या चहापेक्षा झाल्या प्रकाराने जास्त उडाली. अनोळखी शहर, अनोळखी माणसं, पुन्हा तामीळ प्रश्नाचं टेन्शन. मी वेटरवर खेकसूपण शकत नव्हतो. मी त्याला शांतपणे नकार दिला.

माझ्यातला पत्रकार एव्हाना जागा झाला होता.

थोड्या वेळाने मी वेटरला पुन्हा बोलावलं आणि विचारलं, "हा काय प्रकार आहे?"

तो म्हणाला, "इथे हे सर्रास चालतं. इथं पर्यटक येतात. बोटीवरचे खलाशी येतात. त्यांना हे सर्व हवं असतं. त्यामुळे आम्हीच इथे हॉटेलात मुली पाळल्या आहेत. बऱ्याच हॉटेल्समध्ये तुम्हाला इथे हे दिसेल."

ताजसारख्या दर्जेदार हॉटेलमध्ये अर्थात हा प्रकार नव्हता. पण हॉटेलच्या बाहेर पडल्यावर दलाल आडवे यायचे. असो, या सर्वात जुन्या व्यवसायाने कम्युनिष्ट रशियालासुद्धा सोडलेलं नाही.

श्रीलंकेत येताना आपण तामीळ-सिंहली वाद डोक्यात ठेवूनच येतो. त्यामुळे आपल्याला वाटतं की ह्या मंडळींना तामिळांबद्दल राग असेलच, पण सर्वसाधारणपणे भारतीयांवरही राग असण्याची शक्यता आहे. इथे श्रीलंकेत जवळजवळ ७४ टक्के सिंहली आहेत आणि १८ टक्के तामीळ. इतर बाकी जमातीचे. तामीळ जास्त करून श्रीलंकेच्या उत्तरेस आणि पूर्व भागात आहेत. महिन्याभराच्या काळात माझे अनेक सिंहली मित्र झाले आणि प्रकर्षाने जाणवलं की भारतीयांबद्दल त्यांना राग नाहीच, पण इतकी मैत्री करायला उत्सुक जमात जगात दुसरी नसेल. जाफना, अनुराधापुरम आणि इतर भागात तामिळी लोकांनी जो उच्छाद मांडलाय, त्यांनी ते जरूर दुखावले आहेत. ते म्हणतात, "आमचा देश प्रगतीपथावर होता. या तामिळींच्या दंगलीमुळे तो पुन्हा दहा वर्षे मागे गेलाय."

आणि ते सांगतात त्यात बरंच तथ्य आहे. गेल्या दहा वर्षांत इथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या इतकी वाढली होती, की पर्यटन हा त्यांच्या अर्थकारणाचा मोठा भाग होता. अनेक मोठी हॉटेल्स इथे उभारली गेली. इथला निसर्गरम्य समुद्रकिनारा, नववधूसारखी हिरवा शालू मिरवणारी इथली भूमी, अनुराधापुरम–कॅन्डीसारखी ऐतिहासिक आणि डौलदार शहरं त्यामुळे इकडे जगभरचे प्रवासी आकर्षित झाले होते. केवढीतरी विदेशी मुद्रा श्रीलंकेला त्यातून मिळत होती. आज दंगलीच्या छायेखाली असलेल्या श्रीलंकेत पर्यटकांची संख्या इतकी घटली आहे, की हॉटेल्स अक्षरश: ओस पडलेली दिसतात. मोठमोठ्या पंचतारांकित हॉटेल्सनी दर निम्म्याने खाली आणले आहेत. 'ताज समुद्रा'ने आम्हाला ६५ डॉलर्सची खोली २५ डॉलर्समध्ये देण्यामागे हा मोठा भाग होता.

कॅन्डीत 'हॉटेल टोपाझ'मध्ये धमाल आली. तिथे भारतीय खेळाडू उतरले होते आणि म्हणून आम्ही तिघा पत्रकारांनी तिथे उतरायचं ठरवलं. अक्षरश: भाजीवाल्याशी भाव करावेत तसे आम्हाला हॉटेल मॅनेजरशी भाव करावे लागले. जेवणखाण्यासकट दिवसाकाठी चारशे रुपये (भारतीय) वरून तो मॅनेजर १२५ रुपयांवर खाली आला आणि तरीही भारतीय संघ, आम्ही तीन पत्रकार आणि आकाशवाणीचे समालोचक सोडले तर हॉटेलमध्ये कुणीही नव्हतं. एकदा संध्याकाळी भारतीय संघ कॅन्डीच्या महापौरांकडे डीनरला गेला. आम्हाला आमंत्रण नव्हतं. त्यामुळे आमच्या सातजणांसाठी जेवण करणं त्या हॉटेलवाल्यांना जड गेलं. "आज जरा सांभाळून घ्या." असं मॅनेजरने आम्हाला काकुळतीला येऊन सांगितलं.

कॅन्डीलाच एक 'हॉटेल हानतान' म्हणून अतिशय सुंदर हॉटेल आहे. एखाद्या बाईने मुलाला कडेवर घ्यावं तसं त्या हॉटेलला डोंगराने कडेवर घेतलंय, असं आमच्या 'हॉटेल टोपाझ'मधून वाटायचं. कुणीतरी म्हटलं, तिथं जेवण फार चांगलं मिळतं. आम्ही एकदा तिथे जेवायला गेलो, तर हॉटेल मॅनेजरने सांगितलं. "इथे फक्त ड्रिंक्स मिळतील. जेवण वगैरे बंद केलंय. परवडत नाही. कारण गिऱ्हाईकंच नाहीत."

ही स्थिती कोलंबो-कॅन्डीतली आहे; तर अनुराधापुरमसारख्या ऐतिहासिक शहरात किंवा जाफनात काय परिस्थिती असेल? म्हणून इथल्या सिंहली लोकांच्या मनात तामिळलोकांबद्दल अढी आहे. माझे सिंहली मित्र मला नेहमी म्हणायचे, "तुमचं पंजाब तुम्ही खलिस्तानच्या घशात घालाल का? मग हे तसंच आहे. वेगळं तामीळ राष्ट्र झालेलं आम्हालाही आवडणार नाही."

शेवटी आपण सर्व एकाच रक्ताची माणसं आहोत आणि तरीही भांडत असतो. हे श्रीलंकेचे सिंहली लोक तरी वेगळे कुठं आहेत? तेही आपले भाऊबंद

आहेत.

अर्थात श्रीलंकेचा आणि रामायणातल्या लंकेचा काहीही संबंध नाही. इथे सोन्याच्या विटा नाहीत किंवा रावणाचे वंशजही नाहीत. दशतोंडी रावण तर कुणाला माहीतही नाही.

उत्तर भारतातला राजपुत्र विजय आणि त्याचे सातशे साथीदार तिथून पळून श्रीलंकेत आले आणि तिथूनच श्रीलंकेचा इतिहास सुरू होतो. श्रीलंकेत बुद्ध धर्म शिरला इसवीसनापूर्वी २४७ मध्ये. अशोकाचा मुलगा राजपुत्र महिंद्राने त्यांना दीक्षा दिली. हा मानवतावादी धर्म जन्मला भारतात, पण फोफावला श्रीलंकेत. श्रीलंकेतले ६९ टक्के लोक बौद्धधर्मीय आहेत. अर्थात कर्मकांडं याही धर्मात शिरली आहेत. बुद्धाचा देव झालाय. मंदिरं झाली आहेत. भटजींची जागा बुद्ध भिक्षूंनी घेतली आहे सरकारदरबारीही हा धर्म मान्यता पावला आहे. दर पौर्णिमेला संपूर्ण श्रीलंका बंद असते. तिथलेही मंत्री आपल्या मंत्र्यांप्रमाणे सार्वजनिक पूजाअर्चा, भूमिपूजन वगैरे करतात: फक्त बुद्ध धर्माप्रमाणे!

तिथे इतर धर्मही आहेत. ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदू वगैरे धर्मांची मंडळी सापडतात. देवळंही आहेत. कॅन्डीला शंकराच्या देवळात जाऊन कपिल देव आणि त्याच्या सहचारिणीने शंकराकडे साकडं घातलं. हे सर्व धर्म गुण्यागोविंदाने नांदतायत... इथे बौद्ध धर्माखालोखाल येशूचे भक्त आहेत. ही पोर्तुगीजांची श्रीलंकेला मिळालेली भेट. इथेही ते भारताप्रमाणे मसाल्यांच्या व्यापाराच्या उद्देशाने आले आणि जे आपल्याकडे त्यांनी गोव्यात केलं तेच केलं. पोर्तुगीजांनंतर डच आले आणि त्यांच्यानंतर इंग्रज. इंग्रज ४८ साली गेले. सिंहली लोक कबूल करतात, ''लढा तुम्ही भारतात दिला आणि त्याचा फायदा आम्हाला मिळाला!''

इंग्रज गेले तरी त्यांच्या संस्कृतीचा पगडा श्रीलंकेतल्या मंडळींवर फार मोठा आहे. त्यांना श्रीलंकेला सिलोन म्हटलेलं खपत नाही. पण पाश्चिमात्त्य संस्कृती सुटत नाही. तिकडचे क्लब्ज वगैरे थेट इंग्लंडच्या धर्तीवर आहेत! बार हे क्लब्जचं सर्वात मोठं आकर्षण! श्रीलंकेत कसोटी सामन्याच्यावेळी चहाचा एक स्टॉल तुम्हाला स्टेडियममध्ये सापडणार नाही. चहा पिण्याची तलफ आली तर स्टेडियमच्या बाहेर दोन कोस जावं लागतं. श्रीलंका चहा जगाला पुरवते. पण श्रीलंकेची मंडळी मात्र फॅन्टा, कोकाकोला, बीयर आणि व्हिस्कीच्या मागे! त्यांची स्वत:ची अशी व्हिस्की आहे. त्याला ॲरॅख म्हणतात. मॅच बघताना ॲरॅख किंवा बीयरचा घोट त्यांना जास्त प्रिय वाटतो. क्लबला उत्पन्न मिळते ते या बारमुळे. ते म्हणतात, ''आमच्याकडे प्रेक्षकांपासून मिळणारं उत्पन्न फार नसतं. क्लब चालतात ते बारमुळे.''

ही मंडळी चहाही कोरा पितात, साहेबाप्रमाणे! अर्थात सर्वच मंडळी तसा

पीत नाहीत. पण गरीबांना हा कोरा चहा जास्त जवळचा वाटत असावा. आपल्या रुपयात सांगायचं तर हा कोरा चहा फक्त ३५ पैशाला मिळतो आणि दूध घातलेला मात्र सव्वा रुपयापर्यंत!

कोलंबोत तरी मला फारशा मोठ्या 'चाळी' खास लालबाग-परळ धर्तीवर किंवा मोठमोठ्या हौसिंग सोसायट्या दिसल्या नाहीत. जुने ब्रिटिश पद्धतीचे बंगले. बंगल्याभोवती बागा, हा साधारण मध्यमवर्गीय आणि त्यांच्या वरच्यांचा थाट आहे. तिथेही जागेचे भाव आता कडाडलेले आहेत, पण तरीही झोपडपट्टी कुठेही दिसली नाही. हे शहर तसं स्वच्छ आहे. मुंबईसारखं मोठं नाही. पुण्याएवढंही कदाचित मोठं नसेल. पण अजूनही आकाशाकडे झेपावणाऱ्या इमारतींचं वेड तिथे नाही. एक 'फोर्ट' एरिया सोडला तर अशा फारशा इमारती तिथे दिसत नाहीत. पण शहर फिरल्यावर इथे साहेबाने राज्य केलं हे सांगायची गरज नसते.

इथले रस्ते आपल्यासारखेच. एक गॉल रोड सोडला तर बाकीचे रस्ते खाचखळग्यांनी सुशोभित! पण मुंबईप्रमाणे हे खाचखळगे शरीराला जाणवत नाहीत. कारण आपण जपानी गाड्यांनी फिरत असतो. सुझुकी, निसान, होंडा, टोयॅटो वगैरे गाड्या मुंबईत पाहिल्या किंवा एखाद्याने घेतल्या, की आपल्या भुवया उंचावतात. बॅरिस्टर अंतुलेंची टोयॅटोही फार गाजली. पण तिथे बऱ्यापैकी कमावणारा गुणतिलकं किंवा राजवर्धनं डॅटसन किंवा टोयॅटो फिरवतो. आपल्या फियाटच्या किंमतीत तिथे डॅटसन, टोयॅटो मिळतात. रेडिओ, टेप-रेकॉर्डरपासून एअर कंन्डीशनिंगपर्यंत सुविधांनी नटवलेल्या गाड्या!

आपल्याकडे एखाद्या कॉलेज कुमाराकडे होंडा असली की कॉलेजातल्या सर्व पोरी आपल्यावर (सॉरी होंडावर) मरतात असा त्याचा समज होतो. इथे ठायी ठायी होंडा दिसतात. स्कूटर नाहीच. सर्व रस्त्यांवरच जपानी गाड्यांचं राज्य चालतं. अपवाद फक्त तीन गोष्टींचा. एक ऑटो रिक्षा बजाजच्या आहेत. आपल्यासारख्या. दुसरं, इथल्या म्युनिसिपालिटीच्या बसेस आहेत लेलॅन्डच्या आणि तिसरं काही टॅक्सीज् आहेत जुन्या मॉरीस गाड्या. एरवी साम्राज्य जपानी कंपनीचं!

इथे टॅक्सीत बसणं म्हणजे स्वत:च्या खिशाला स्वत:च्या हातानं ब्लेड लावणं आहे किलोमीटरमागे १५-२० रुपये सहज जातात. हे तुम्ही तिथं रुळल्यावर! नवीन असाल तर टॅक्सीवाला गझनीच्या महमदासारखा लुटतो. किलोमीटरमागे २५-३० रुपयांपर्यंत तो सहज तुमच्याकडून उकळतो. पण एकदा शहराची थोडीफार जानपहचान झाल्यावर बसने फिरणं सगळ्यात उत्तम! तिथं सरकारी बसेसपेक्षा प्रायव्हेट बसेस मुबलक आहेत. मुख्य म्हणजे पटापट येतात. फार काळ बसस्टॉपवर रेगाळत उभं राहावं लागत नाही. बसचा थाट गोव्यासारखा. फक्त बसेस छोट्या

असतात. 'मेटॅडोर'च म्हणणं योग्य! उंच माणसाला ह्या बसमधे उभं राहायचं म्हणजे मानेचं दुखणं स्वत:हून ओढवून घेण्यासारखं आहे. बस प्रायव्हेट म्हटल्यावर करंजीत पुरण भरावं तशी माणसं त्यात भरलेली असतात; विशेषत: गर्दीच्या वेळी. बसवर नंबर असतात, पण त्यापेक्षा क्लीनर किंवा कंडक्टर म्हणा- सुरात बस कुठे जाणार त्या ठिकाणाबद्दल व्यवस्थित ओरडत असतो. कोलुपिटिया, बांबलीपिटिया, गॉल फेज, पेठा.. असं हे त्यांचं सुरात ओरडणं हे आपल्या गोव्याकडे मंगेशी, म्हारदोळ, फोंडा-मडगाव... ओरडणाऱ्या कंडक्टरप्रमाणेच कानाला गोड लागतं बस प्रवास अतिशय स्वस्त आहे. प्रश्न एव्हढाच आहे, तुमच्या इच्छीत स्थळी जायला दोन-तीन बसेस बदलाव्या लागतात आणि तेच नकोसं वाटतं. हॉटेल ताजपासून स्टेडियम फार तर मुंबईत व्हीटीपासून भायखळ्याएवढ्या अंतरावर असेल. पण तिथे जाण्यासाठी तीन बसेस बदलायला लागायच्या.

इथे बस कंडक्टरपासून टॅक्सी ड्रायव्हरपर्यंत सर्वांशी बोलताना भाषेची अडचण फारशी येत नाही. मोडकं तोडकं इंग्लिश सर्वांनाच येतं. श्रीलंकेत साक्षरता ८० टक्के आहे आणि पर्यटकांची ये-जा असल्यामुळे पोटापुरतं इंग्लिश त्यांना बोलावंच लागतं. माणसं आपल्यासारखीच, वेष आपल्यासारखा, त्यामुळे सुरवातीला अभावितपणे आम्ही हिंदीत बोलायचो. समोरचा माणूस मख्खपणे ऐकतोय हे पाहिल्यावर मग लक्षात यायचं आपण श्रीलंकेत आहोत. नाही तर एरवी फरक जाणवणंच कठीण!

इथे फक्त गाड्या किंवा बसेसच परदेशी नाहीत, तर पिन टू पियानो सर्व इंपोर्टेड गोष्टी बाहेर चक्क दुकानात मिळतात. आपल्याकडे सर्व मिळत असूनही आपल्याला इंपोर्टेड गोष्टींचं आकर्षण फार आहे. आम्हाला घरी टीव्ही 'सोनी'चाच लागतो. टू इन वन नॅशनल किवा सॅनयोचा लागतो. ''एचएमटीची घड्याळं चांगली असतात हं'' हे तोंडानं बोलत असताना हातात मात्र घड्याळ कॅसियो किंवा सिटीझनचं असतं. विलकिन्सन ब्लेडशिवाय आमची दाढी चांगली होत नाही. 'आम्ही फक्त इंपोर्टेड वस्तूच वापरतो' हे सांगताना आपला चेहरा फुललेला असतो.

तिथे ''आम्हाला इथे इंपोर्टेड वस्तूंवरच गुजराण करावी लागते'' हे सांगताना माझा सिंहली मित्र कमालीचा बापुडवाणा झाला होता. तो म्हणाला, ''तुमच्या देशात सर्व गोष्टी तयार होतात. आम्ही तेवढी प्रगती केलेली नाही. अजूनही आम्ही परदेशी कंपनीचे खिसे भरत असतो.''

श्रीलंकेत शांतता होती त्यावेळी अनेक भारतीय 'इंपोर्टेड' वस्तू घेण्यासाठी श्रीलंकेत येत. सिंगापूर-बँकॉक-हाँगकाँगची सर अर्थात श्रीलंकेला येणार नाही. पण तेव्हा ट्रेनने आणि बोटीने श्रीलंकेला जाता येत होतं. जाफना पेटल्यापासून तो मार्ग

बंद झालाय. श्रीलंकेत आपल्यासारख्या पर्यटकांना आकर्षित करणारं एक 'ड्यूटी फ्री शॉप' आहे. कोलंबोत आलेला भारतीय पहिला प्रश्न विचारतो, ''ड्यूटी फ्री शॉप कुठाय?'' तीन मजल्याच्या इमारतीत १५-२० दुकानं जरूर असतील आणि साबण, स्प्रेपासून इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंपर्यंत सर्व वस्तू इथे मिळतात. त्याही जवळपास सिंगापूर-दुबईच्या दरात. तिथे पैसे मात्र डॉलर्समध्येच द्यायचे असतात. माझा आधी कयास होता, की ह्या 'ड्यूटी फ्री शॉप'मधली सर्व दुकानं सरकारी किंवा किमान सरकारमान्य असतील. त्यामुळे सर्वत्र किमती सारख्या असतील. पण तो माझा गैरसमज होता. तिथे अगदी बिनधास्तपणे भाव करता येतो. साबणापासून टीव्हीपर्यंत सर्व गोष्टींसाठी... पण तिथे काही गोष्टींवर निर्बंध आहेत. टीव्ही--व्हिडीओसारख्या गोष्टी फक्त एकच तुम्हाला मिळू शकतात. सिगरेटचा कार्टनही एकच आणि व्हिस्कीवरही निर्बंध आहे. मुख्य म्हणजे त्या ड्यूटी फ्री शॉपमध्ये पैसे भरल्यावर दुसऱ्या दिवशी तिथून दीड-दोन किलोमीटर्सवर असलेल्या गोदीमधे जाऊन तुमचा माल घ्यावा लागतो. माल घेताना तिथे जी गर्दी असते, जी कार्यपद्धती असते ती अनुभवल्यावर वाटतं, नको तो माल! सुदैवाने भारतीय क्रिकेट संघाला आणि पत्रकारांना तिथे व्हीआयपी ट्रीटमेंट होती. तिथल्या तिथे आमची खरेदी हातात पडायची. पण पहिल्यांदा जेव्हा मी गोदीवर जाऊन सामान घेतलं तेव्हा आलेला अनुभव, घेतलेले कष्ट इतके मोठे होते, की पुन्हा ड्यूटी फ्री शॉपमधे पाय ठेवावासा वाटत नव्हता. तुमची पुडकी सांभाळत जेव्हा गोदीतून तुम्ही बाहेर येता; त्यावेळी तिथे अनेक मंडळी येऊन तुम्हाला 'चिकटतात'. त्यांचा एकच प्रश्न असतो- ''तुम्हाला माल विकायचाय का?'' हा माल तुमच्याकडून विकत घेऊन ते दुकानात विकायला ठेवतात. पण  नंतर ही ड्यूटी फ्री दुकानं बंद झाली.

श्रीलंकेत मसालेही स्वस्त मिळतात. विशेषत: लवंगा आणि वेलची! वेलची आणि लवंगांचे तिथले भाव मी सौ.ला सांगितल्यावर तिने डोळेच विस्फारले.

तिथे मसाले स्वस्त असावेत हे त्यांचं जेवण चाखल्यावरही कळतं. अगदी सढळ हाताने मसाला, मिरचीचा वापर त्यांच्या जेवणात असतो. तिथल्या एका ब्लूमफिल्ड क्रिकेट क्लबच्या पार्टीला आम्ही काही पत्रकार गेलो होतो. नाच, गाणी, मद्यपान, लकी नंबर वगैरे टिपिकल खेळ संपता-संपता घड्याळाचा काटा अकराच्या पुढे कधी गेला कळलंच नाही. जठराग्नी तर भडकला होताच. प्रत्येकाने चिकन बिर्यानी वगैरेंनी ताटं भरली. पहिला घास पोटात गेला आणि डोळ्यात पाणी उभं राहिलं. प्रत्येक घासाबरोबर पाण्याचा ग्लास पोटात जात होता. पोटात प्रचंड भूक असूनही पुढचा घास गिळायची हिंमत नव्हती इतकं जेवण तिखट होतं. तिथली मंडळी मात्र मिटक्या मारत जेवत होती. मधुमेह झालेल्याने श्रीखंड चापणाऱ्या

माणसाकडे ज्या नजरेने पाहावं त्या नजरेने आम्ही त्यांच्याकडे पाहात होतो. शेवटी स्वीटडीशचा फडशा पाडून आम्ही भूक भागवली.

राईस करी हे त्यांचं आवडतं खाणं! त्याबाबतीत त्यांच्यावर दक्षिणभारतीयांचा पगडा फार आहे. चपाती खाणं त्यांना ठाऊक नाही. साध्या हॉटेलात लंच मागवलात की भाताचा डोंगर तुमच्यासमोर आणून ठेवतात. जेवणाची पद्धत साधारण आपल्यासारखी, पण जेवणात फार वापर असतो नारळाच्या तेलाचा. त्याचा उग्र वास मस्तकात जातो, खाणं तर दूरच राहो. तिथे कटलेट, वडे वगैरे प्रकारात इतकं नारळाचं तेल असतं, की त्या वासाने ते खावेसे वाटत नाहीत.

तुम्ही रसिकतेने मासे खात असाल तर मात्र श्रीलंकेला जाच! असे मासे पाहायला मिळत नाहीत. कोलंब्या चक्क लॉबस्टरच्या आकाराच्या. खेकडे कासवाचे धाकटे बंधूच वाटावेत एवढे मोठे. बौद्ध धर्मात अहिंसा असेल, पण श्रीलंकेतले बौद्धधर्मीय खाण्याच्या बाबतीत खचितच अहिंसक नाहीत. त्यांना सकाळी नाश्त्याबरोबर मासे लागतात. दुपारी जेवतानाही लागतात आणि रात्रीही लागतात.

जेवताना इतके पदार्थ ते एकमेकांत मिसळतील की म्हशीचं आंबवण वाटावं. हाताने जेवल्याशिवाय आणि पाच बोटं भातात पूर्णपणे रुतल्याशिवाय त्यांना जेवल्यासारखं वाटतच नाही. गंमत म्हणजे हॉटेलात डोसा किंवा इडली मागितल्यावर चमचे मिळतीलच असं नाही. चटणी-सांबार एक करून त्यात डोसा 'मुरवून' खाताना माणसं पाहिली की आपल्या हातातले चमचे-काटे स्थिरावतात.

अनेकांनी मला परत आल्यावर विचारलं, "लोक लुंग्यांत फिरतात का रे?" कदाचित जयवर्धनेचा पोषाख पाहून तसं वाटलं असण्याची शक्यता आहे. पण ते म्हणजे काँग्रेसवाल्यांचा पोषाख पाहून भारतभर खादीचे कपडे घातले जातात. अशी समजूत करून घेण्यासारखं आहे. लुंगी हा त्यांचा राष्ट्रीय पोषाख आहे. आपल्याप्रमाणे तिथले राजकीय नेते हा पोशाख घराबाहेर घालतात. एरवी तिथे लुंगीचा वापर घरातच होतो.

श्रीलंकेत सर्वात चांगली गोष्ट कुठली असेल तर तिथली माणसं. 'अतिथी देवो भव' असं आपण म्हणतो. हल्ली त्याप्रमाणे वागणारी मंडळी फार थोडी असतात. पण श्रीलंकेत अतिथीला देवाप्रमाणे मानणारी देवमाणसं सापडतात. मला तरी सापडली. मला तिथे शेली विक्रमसिंघे भेटला. एक क्रिकेटवेडा माणूस. मुंबईतला कुठलाही क्रिकेटपटू त्याच्याकडे राहिला नसेल, किमान जेवला नसेल असं होणार नाही. माणूस वयाने मोठा आहे. कीर्तीनेही मोठा आहे. निष्णात इंजिनीयर आहे. आपण मुंबईहून पुण्याला जावं त्या सहजतेने तो युरोप फिरत असतो. मी त्यांच्यापेक्षा कितीतरी लहान, वयाने व कीर्तीने. जवळपास सर्वच बाबतीत.

साठीजवळ गेलेला हा माणूस माझ्याशी मित्रासारखा वागला. शेलीचं घर तर घरच्यासारखं वाटायचं. लिओ विजयसिंगे हा दुसरा तिथे भेटलेला क्रिकेटवेडा! त्यांच्या क्रिकेट कंट्रोल बोर्डातला पदाधिकारी तो श्रीलंकेच्या संघाबरोबर ऑस्ट्रेलियाला उप-व्यवस्थापक म्हणून गेला होता. सुनील गावसकरचा परमभक्त. त्याचं आदरातिथ्यही असं, की शेवटी मला त्याला सांगावं लागलं, ''लिओ, तुझ्या आदरातिथ्याचं टेन्शन मला वाटायला लागलंय. तू मुंबईला आल्यावर एका शतांशाने जरी त्याची परतफेड करता आली तरी मला आनंद होईल!''

ललिथ काळुपेरूमा हा शेलीचा जावई आणि श्रीलंकेचा ऑफ स्पिनर. हा स्वत:चा धंदा सोडून आमच्या सुखसोई पाहायचा. एअरकंडिशन्ड गाडीतून फिरण्याची एवढी चटक त्यानं लावली, की मुंबईतली फियाट त्रासदायक वाटायला लागली. त्याच्याकडे एकदा डीनरला पती नावाच्या एका फिल्म डायरेक्टरची भेट झाली. तो तिथला मणी कौल! कलात्मक चित्रपटासाठी बरीच ॲवॉर्ड वगैरे जिंकलेला. तो मूळचा कॅन्डीचा. त्याला जेव्हा कळलं, की आम्ही तिसऱ्या कसोटीसाठी कॅन्डीला जाणार, तेव्हा तो म्हणाला, ''कॅन्डीला आल्यावर माझ्याकडे जेवायला यायलाच हवं!''

वाटलं, असेल आपलं नेहमीचं औपचारिक आमंत्रण! आपण नाही कां ओळख झाल्यावर म्हणतो, ''या एकदा घरी चहापानाला. जरा गप्पाही मारता येतील!'' 'एकदा घरी या' यात आमंत्रणापेक्षा देखावाच जास्त असतो. पण हा माणूस कॅन्डीला प्रेस बॉक्समध्ये मला आणि माझ्याबरोबरच्या दोन बंगाली पत्रकारांना शोधत आला. आम्ही कितीही नाही म्हटलं तरी हॉटेलवर येऊन जेवायला घेऊन गेला. कोण होतो आम्ही? त्याच्या दृष्टीने नवखे, त्याच्या व्यवसायाशीही संबंधित नाही. तरीही एवढं आदरातिथ्य!

श्रीलंकेच्या क्रिकेटपटूंबाबतीतही हाच अनुभव आला. दुलिप मेंडीस, रॉय डायस, रुमेश रत्नायके आणि रंजन मदुगले यांची नि माझी गेल्या खूप वर्षांची मैत्री आहे असं निघताना वाटायला लागलं. रॉय डायसशी तर विशेष गट्टी जमली. फलंदाज म्हणून तो जागतिक दर्जाचा आहे. महान आहे. माणूस म्हणून तर त्याहून मोठा आहे. त्याच्या घरी खाल्लेल्या चिंबोऱ्याची चव अजूनही माझ्या जिभेवर आहे. मी एक परदेशी पत्रकार, तरीही त्याचा माझ्यावर एवढा विश्वास होता, की सर्व गोष्टी माझ्याशी तो अत्यंत मोकळेपणाने बोलायचा. क्रिकेट अजूनही त्यांच्या डोक्यात गेलेलं नाही. सर्व गोष्टी पैशांत मोजायला त्यांनी सुरुवात केली नाही, म्हणूनच माणुसकी शिल्लक आहे आणि त्यांची उन्नतीही होतेय.,

श्रीलंका सोडतानाही सिंहली लोकांच्या चांगुलपणाचा अनुभव आला.

कोलंबोहून काटूनायके विमानतळावर जाताना अर्ध्या रस्त्यात माझ्या टॅक्सीत बिघाड झाला. टॅक्सी ठप्पच झाली. ड्रायव्हरने सांगितलं की, टॅक्सी इथून पुढे जाणंच शक्य नाही. विमान सुटायला अवघा दीड तास होता. टॅक्सी अशा जागी बिघडली की जवळपास फोन नव्हता, दुसरी टॅक्सीही मिळणं शक्य नव्हतं. काय करावं मला समजेना. आजूबाजूला माणसं जमली. टॅक्सीतील तीन बॅगा सोडून मी कुठे जाऊही शकत नव्हतो. काळोख पडत चालला होता. सुदैवाने माझं इंग्लिशमधलं बोलणं जमावातल्या काही लोकांना कळलं. त्यातला एक माणूस चक्क दोन मैलांवर सायकलने जाऊन टॅक्सी घेऊन आला. तिथल्या लोकांनी मला लुटायचं ठरवलं असतं तर ते त्यांना सहज शक्य होतं. पण श्रीलंकेत त्या लोकांमध्ये वावरल्यावर मला तशी भीतीही वाटली नाही. अडलेलं गिऱ्हाईक पाहून नव्या टॅक्सीवाल्याने माझा खिसा कापू नये म्हणून तो सायकलवर गेलेला माणूस त्याच्याशी आधीच भाडं ठरवून आला होता. या धावपळीमुळे विमान सुटायच्या फक्त पाऊण तास आधी मी विमानतळावर पोहोचलो. विमानात बसल्यावर महिन्याभरातले दिवस डोळ्यापुढे सरकायला लागले. दौऱ्यावरच्या आठवणी, लाभलेले नवीन मित्र, त्यांच्या सहवासातले क्षण, आठवणींच्या कपाटात मी भरून ठेवत होतो. या लंकेत रावणाचे अवशेषच काय पण रावणवृत्तीची माणसंही आढळली नाहीत. इथे वेगवेगळे धर्म कसे गुण्यागोविंदानं नांदताहेत, एकमेकांत मिसळून गेलेत! इथे शेली विक्रमसिंघे बुद्ध असतो, तर लिओ विजयसिंघे ख्रिश्चन असतो. डिसिल्व्हाचं पहिलं नाव अरविंद असू शकतं. मग आपलेच तामीळबंधू पिढ्यान् पिढ्या या संस्कृतीत राहून या संस्कृतीत मिसळून कसे जात नाहीत? त्यांच्यावर अन्याय झाला असेल. होतही असेल. पण नवं तामीळ राष्ट्र हे त्याचं उत्तर नाही. मला माझ्या सिंहली मित्राचा प्रतिप्रश्न आठवतो, "तुम्ही खलिस्तानला मान्यता द्याल का? मग आम्ही स्वतंत्र तामीळनाडू का होऊ द्यावं?" काही राजकीय पुढाऱ्यांची महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्यासाठी ही निसर्गाचं वरदान लाभलेली रम्य लंका या युगातही जळायलाच हवी का?

*(श्रीदीपलक्ष्मी दिवाळी १९८५)*

# दुश्मनांच्या देशात

■ **सात ऑक्टोबर १९८७**

पाकिस्तान इंटरनॅशनलच्या विमानाने पंख फडफडवले आणि मी हाताला जोरात चिमटा घेतला.

कुठल्याही क्षणी वाटत होतं वडील मला गदागदा हलवत म्हणतील, "पप्पू ऊठ, किती वेळ लोळतोयस! आठ वाजून गेलेत. ऑफिसला जायचंय ना?" आणि डोळे उघडल्यावर विमानाऐवजी घरच्या गादीवरच आहोत हे कळायला वेळ लागणार नाही. बऱ्याच वेळा असं घडलं होतं.

गुलाबी गोऱ्या कांतीला अंगभर कपड्यात गुंडाळून ठेवलेल्या एका हवाईसुंदरीने गरम गरम सामोसे पुढ्यात आणून ठेवले. मग कबाब झाले. थोड्या वेळाने पोटात गरम चहा गेला. सर्व कसं अगदी खास मुस्लिम आग्रही अदबीने! आणि मग खरंच विश्वास बसायला लागला, आपण कराचीला निघालोय.

परदेशात मी काही पहिल्यांदा जात नव्हतो. थोडं फार युरोप मी पाहिलंय आणि चाखलंयसुद्धा. बँकॉक-सिंगापूरचा आस्वाद घेतलाय. दुबई-शारजाचं वाळवंटात उभारलेलं वैभव पाहिलंय. पण तरीही पाकिस्तान पाहण्याचं आकर्षण वेगळं होतं. तसं आकर्षित करण्यासारखं तिथं काही नाही हे मला इथं बसून ठाऊक होतं. माणसं सारखीच. सवयी त्याच. थोडा फार इथे-तिथे सांस्कृतिक बदल. तशा भाषा आणि चालीरीती आपल्या देशातही मैलामैलावर बदलतात. राजकीय स्वार्थासाठी उभी केलेली तटबंदी म्हणून दोन राष्ट्रं म्हणायची. एरवी फारसा वेगळेपणा काय असणार?

पण तरीही आकर्षण? कारण एकच. लाखो जिवांची आहुती देऊन



आपल्यापासून हिसकावून घेतलेला तो देश कसा असेल?

आपल्यापेक्षा समृद्ध की नरक?

एका नव्या समृद्ध देशाचं स्वप्न पाहात तिथे गेलेल्या मुसलमानांची परिस्थिती काय असेल?

त्या इस्लामी देशात अल्पसंख्याकांची अवस्था कशी असेल?

तिथल्या जनतेला भारतीयांचा द्वेष असेल? की हा फक्त राजकारण्यांचा तमाशा आहे? अनेक प्रश्न डोक्यात भिरभिरत होते. प्रामाणिकपणा दाखवायचा आणि त्यातल्या त्यात मवाळ शब्द वापरायचा तर पाकिस्तानबद्दल मनात 'किल्मिष' नक्कीच होतं. ते 'पापस्थान' आहे अशी भावना नव्हती, पण राग होता. एखादी गोष्ट ओरबाडून नेल्यावर वाटणारा राग आणि द्वेष!

मला एक गंमत वाटते. मी इंग्लंडला दोनदा गेलोय, पण तिथे जाताना द्वेषाची भावना कधीच उफाळून आली नाही. ब्रिटिशांनी आपल्यावर दीडशे वर्ष राज्य केलं, अत्याचार केले. पहिलीपासून अकरावीपर्यंत हाच इतिहास आमच्या मनावर बिंबवला गेला. पण तरीही जगावर राज्य करणारा देश पाहायला मी नुसता आसुसलेला होतो. न पाहताच ते बिगबेन, ते वेस्ट मिनिस्टर अबे, तो बकिंमहॅम पॅलेस, ते लॉर्डस्, ते विम्बल्डन - त्या वास्तूंबद्दल प्रेमाची भावना निर्माण झाली होती. त्यावेळी दीडशे वर्षांच्या गुलामीच्या बेड्यांची आठवण, जालियनवाला बाग, अंदमान वगैरे डोळ्यांपुढे का उभे राहू नये?

आणि फक्त पाकिस्तानलाच जाताना वेगळी भावना निर्माण व्हावी?

तसा मी स्वातंत्र्यानंतर तब्बल तीन वर्षांनी जन्मलो. त्यामुळे ब्रिटिशांचा अत्याचार पाहिलाच नाही. जिवंत माणसं जाळणाऱ्या फाळणीच्या चितासुद्धा तेव्हा

विझलेल्या होत्या. त्यानंतर ऐकल्या फक्त हृदय नसलेल्या माणसांनी घडवलेल्या हृदयद्रावक कथा. तसा मी काही धार्मिक माणूस नाही. सर्व धर्मांच्या दोस्तांत वावरतो. उदारमतवाद पटतो. मग तरीही हा राग? द्वेष? कदाचित ही भारत-पाक युद्धाची परिणती तर नाही? प्रचंड पाकिस्तानविरोधी प्रचाराचा हा पगडा तर नाही? किंवा इथल्या काही पाकवादी मुस्लिमांना फुटणाऱ्या पाकिस्तानबद्दलच्या उमाळ्यांचा परिणाम तर नाही? कारण काहीही असो. प्रामाणिकपणे सांगायचं झालं तर पाकिस्तानला जाताना माझं मन पाकिस्तानबद्दल पूर्ण स्वच्छ कधीच नव्हतं.

आणि ते मन स्वच्छ राहणार नाही याची जबाबदारी पाकिस्तानची दिल्लीची एम्बसी अगदी मनापासून उचलते. तसं कुठल्याही एम्बसीत लाल कारपेट घालून आणि अत्तर शिंपडून तुमचं स्वागत होत नाही. प्रत्येक एम्बसी विशिष्ट प्रमाणात प्रायव्हसी पाळत असते. पण तरीही व्हिसा मिळणं तसं कठीण जात नाही. पण पाकिस्तानचा व्हिसा मिळणं ही अत्यंत कटकटीची गोष्ट आहे. इथल्या मुसलमानांना तिथे जर त्यांचे कुणी नातेवाईक असतील तर व्हिसा मिळण्यात फार मोठी अडचण येत नाही. पण जर कोणी नातलग नसेल तर त्यांच्याकडे संशयाने पाहिलं जातं. निव्वळ पाकिस्तान फिरून यायचंय या सबबीखाली मुस्लिमेतरांना तर व्हिसा मिळतच नाही. लेखक, साहित्यिक, पत्रकार यांच्या बाबतीत ते कमालीचे चिकित्सक असतात. १९८२ साली जेव्हा पाकिस्तानात भारतीय संघ गेला त्यावेळी पाकिस्तानचा व्हिसा मिळवण्यासाठी मी आटोकाट प्रयत्न केला, पण माझं इंजिनिअरिंग प्रोफेशन आड आलं. त्यामुळे रिलायन्स कपच्या वेळी व्हिसा मिळेल की नाही ह्याबद्दल शेवटपर्यंत साशंक होतो. पण यावेळी एम्बसीने दगा दिला नाही.

## ■ दहा ऑक्टोबर १९८७

बारा तासांच्या झोपेनंतर आज कसं मस्त वाटतंय. गेले तीन दिवस अक्षरशः घड्याळाच्या काट्याबरोबर मी पळतोय. अगदी दिवस-रात्र. काल पहाटे पाचला लाहोरला आलो आणि लगेच सात वाजता गुजरानवालाला मॅचसाठी पळालो. रात्री नऊ वाजता गादीवर अंग टाकायची खोटी होती, निद्रादेवी अशीर्वादाचा हात उभारून तयारच होती.

आता मात्र थकवा पूर्णपणे पळालाय. शालिमार हॉटेलमधून समोरच फुललेलं लाहोर दिसतंय. समोरच्या शॉपिंग सेंटरवर गर्दी वाढायला लागलीय. अर्धा तास मी खिडकीतून समोरचा रस्ता न्याहाळतोय. एकही बुरखा दिसला नाही. एकही कुरूप स्त्री दिसली नाही किंवा कपाळाला आठ्या घालून 'बरी आहे' म्हणावं अशीही स्त्री दिसली नाही. दिसलं ते अस्सल पंजाबी सौंदर्य. वासनारहित डोळ्याने घटाघटा

प्यावं असं. शिल्प पाहताना कधी डोळ्यात वासना येतात? हाडामांसाचं शिल्पच तर मी पहात होतो.

पाकिस्तानात जाताना एक मित्र म्हणाला होता, "आहे काय पाकिस्तानात? आपल्या महंमद अली रोडसारखं तर असणार. दाढ्या, बुरखे आणि घाण."

गावच्या तांदळाच्या शितावरून बासमतीची परीक्षा करता येत नाही हे मी त्याला गेल्यावर सांगणार आहे.

कराचीत पाय मी परकेपणाने ठेवला तरी उतरल्यापासून आपलेपणा दाखवणारी माणसं भेटायला लागली होती. दिल्ली एम्बसीतल्या काहीशा मुजोर अनुभवानंतर कराचीला इमिग्रेशन आणि कस्टम्सवाले किती छळणार त्याचा अंदाज मी घेत असतानाच मला चंदू सरवटे दिसले. भारताचे एक माजी क्रिकेटपटू, वर्ल्डकपसाठी त्यांची ॲडज्युडिकेटर म्हणून नेमणूक झाली होती. मी नि:श्वास सोडला. 'व्ही.आय.पी.' असल्याचे नेहमीच फायदे असतात. पोराने वडिलांचं बोट धरून गर्दीतून वाट काढावी तसा मी चंदू सरवटेचं बोट धरून अक्षरश: दहा मिनिटांत सामानासकट इमिग्रेशन कस्टम्सच्या भिंती पार करून बाहेर आलो आणि अवघ्या पाऊण तासात कराचीच्या शेरेटन हॉटेलात शिरलो.

पाकिस्तानसारख्या देशात इतकं चटकन बाहेर पडणं भारतीयांच्या दृष्टीचे सोपं नसतं. एरवी व्हिसा देताना पासपोर्टवर फक्त त्या देशाची एम्बसी स्टॅंप मारते. इथे पाकिस्तानात त्या स्टॅम्पबरोबर काही फॉर्म्सही असतात. बरं, पाकिस्तानचा व्हिसा मिळाला म्हणजे पाकिस्तानात कुठेही मुक्त संचार नव्हे. व्हिसावर जी शहरं लिहिलेली असतात त्या पलीकडे जाता येत नाही. सामान्य प्रवाशाला तर पोलीस रिपोर्टिंग करावं लागतं. पत्रकारांना ते माफ करण्यात आलं होतं.

कराचीचं ते पाऊण तासाचं दर्शन तसं लोभसवाणं होतं. स्वच्छ रस्ता, सुझुकी, डॅटसन, होंडासारख्या गाड्यांचा सुळसुळाट आणि एक प्रकारची ऐषारामी समृद्धी! शेरेटनही इतर शेरेटनसारखंच होतं. त्याचं पूर्ण इस्लामीकरण झालं नव्हतं. ह्या पंचतारांकित श्रीमंतीत धर्म नसतोच. ती हिंदू नसते, ख्रिश्चन नसते किंवा मुस्लिम नसते. तिचा स्वत:चाच धर्म असतो. स्वत:चीच संस्कृती असते. तिथे बुरखा नव्हता, दाढी नव्हती, ती मुस्लिम टोपीही नव्हती. होतं ते सर्व 'मॉडर्न'! बायकांची तर फॅशनपरेड आहे असं वाटावं पथ्य फक्त एकच होतं. त्यांचे कपडे पायघोळ होते. तेवढं झियाचं फर्मान पाळलं जात होतं. बायकांनी सिगरेट ओढणं इस्लाममध्ये बसत नसेल, पण त्या संस्कृतीत बसतं. एका बाईने लायटर मागितल्यावर तो पेटवताना माझा हात थरथरला. पण आभाराचं एक गोड स्मित, सिगरेटचा धूर आणि उंची सेंटचा वास एकाच वेळी माझ्या नाकात कोंबत ती लचकत आरामात सौनाबाथ

घ्यायला निघून गेली.

मला लगेच मॅचसाठी हैद्राबादला जायचं होतं. म्हणून पुढच्या प्रवासाची चौकशी करायला शेरेटनच्या बाहेर पडणार इतक्यात पिलू रिपोर्टर भेटला. आपला सुप्रसिद्ध क्रिकेटपंच! त्याने कडकडून मिठी मारली. त्याची कराचीची ही दुसरी ट्रिप. खुशीत दिसत होता. म्हणाला, ''काल आलो, आपले पारशी इथे बरेच आहेत. कोण तरी येऊन घरी घेऊन जातं. मस्तपैकी धनसाक मिळतं!'' आणि मग डोळे मिचकावत म्हणाला, ''ब्लॅकलेबल पण!''

''हळू बोल. तू भारतात नाहीस, पाकिस्तानात आहेस,'' माझा आपला धोक्याचा भोंगा!

''सोडून दे रे, इथे छूपछूपके सगळं चालतं आणि आपून तर पारसी आहे.'' आणि एकदम आठवण झाल्यासारखं म्हणाला, ''तू पयला टाइमला आलाय ना? सिंधू पायली? अरे बघ, हैद्राबादला जाताना बघ. बघितल्याबिगर राहू नको.''

मी चमकलो. एका पारशाला सिंधू नदीबद्दल प्रेम वाटलं? माझ्या डोळ्यांसमोर स्वातंत्र्यवीर सावरकर उभे राहिले आणि त्यांचा तो आक्रोश कानात घुमायला लागला. ''सिंधूस आम्ही विसरू? सिंधूवाचून हिंदू! अर्थावाचून शब्द! प्राणावाचून कुडी! अशक्य, अशक्य! जोवर एक तरी हिंदू जिवंत आहे तोवर तो सिंधूस विसरणं शक्य नाही.''

मी हिंदुत्ववादी नसलो तरी सावरकरांबद्दल मला विलक्षण प्रेम आहे. हिंदू म्हणून मी तट्ट छाती फुगवणाऱ्यांपैकी नाही. पण मी धार्मिक नसलो तरी कुणी मला हिंदू म्हटलं म्हणून अंगावर विष्ठा टाकल्यासारखी वाटत नाही. पाकिस्तानच्या एम्बसीत शिरल्यापासून आजपर्यंत अशी एकही व्यक्ती मला भेटली नाही जिने मला नाव कळल्यावर 'आप हिंदू है' असं विचारलं नाही. 'हो' म्हटल्यावर त्यांच्या डोळ्यात मला कधी नफरत दिसली नाही किंवा काफरपणाचीही भावना नव्हती. पण बोलणं वाढलं की तो सावध व्हायचा. आणि मग हळूच प्रश्न यायचा, ''आमच्या मुस्लिमभाईची तिथली परिस्थिती कशी आहे? आम्ही हिंदू-मुस्लिम दंग्याबद्दल इथे बरंच ऐकतो!''

शेवटी एक गोष्ट खरी आहे. तुम्ही धर्म माना अगर मानू नका. जो धर्म तुम्हाला जन्माने चिकटलाय तो अंगावरच्या कपड्यांच्या सहजतेने काढून फेकता येत नाही. तो आपल्या कातडीसारखा आपल्याला चिकटलेला असतो. तुम्ही एक वेळ तो काढून फेकाल, पण धर्मावर आधारलेल्या राष्ट्रात तुम्ही गेलात की तो बळजबरीने तुमच्या अंगावर चढवला जातोच.

अगदी कालचीच गोष्ट. काल गुजरानवालाला मॅचच्या वेळी जे लंचबॉक्स

दिलं त्यात एक पॅटिससारखा प्रकार होता. मी तोंडात टाकला आणि माझ्या शेजारचा पत्रकार ओरडला, ''तोबा तोबा! आपने ये क्या किया?''

मला काही कळेना. मी म्हटलं, ''काय झालं?''

डोळे मोठ्ठे करत तो म्हणाला, ''अरे तू तर गोमांस खाल्लंस!''

मी एकदम निश्वास सोडला आणि म्हटलं, ''अरे एवढंच ना! ठीक आहे. मला सर्व चालतं.''

त्याचे डोळे फक्त फाटायचेच शिल्लक होते.

''तोबा! तू तुझा धर्म पाळत नाहीस. तू योग्य करत नाहीस. तू खुदाशी प्रतारणा करतोयस आणि तिरस्काराने म्हणाला, ''तू कम्युनिस्ट दिसतोयस?'' आजच्या युगात शाप द्यायचा स्कोप असता तर त्याने तो क्षणात देऊन टाकला असता.

''अरे, ज्याला तुम्ही राष्ट्रपिता मानता तो कायदेआझम जीना आवडीने पोर्क खायचा,'' हे ओठावर आलेले शब्द मी त्या पॅटिसच्या तुकड्याप्रमाणेच गिळले. कारण मला वाद घालायची खुमखुमी असली तरी त्या भाबड्या पत्रकाराला दुखवायचं नव्हतं. तो निष्पाप होता. एका हिंदूने गोमांस खाल्ल्याने त्याला 'हिंदू बाटल्याचा' आनंद झाला नव्हता. उलट माझा धर्म बुडतोय याची त्याला चिंता होती. धार्मिकताही अशी कधी कधी निष्पाप असू शकते, अगदी पाकिस्तानातही!

सिंधमधल्या हैद्राबादलाही एक असाच अनुभव आला. मी ज्या हॉटेलात उतरलो होतो ते एका सिंध्याचं होतं. त्याच्याशी काऊंटरवर उभं राहून गप्पा मारताना सहज माझं लक्ष तिथे लावलेल्या तसबिरीकडे गेलं. नेहमीप्रमाणे एक मक्केची तसबीर होतीच.

मी त्याला दुसऱ्या तसबिरीबद्दल म्हटलं, ''ही कुणाची तसबीर?''

''ती दाहीरची'', तो म्हणाला.

''म्हणजे राजा दाहीर?''

''हो!''

''पण तो तर...'' मी थोडा थांबलो, किंचित अडखळलो आणि म्हणालो, ''हिंदू होता.''

''असेना का! पण तो सिंधी होता. इथले सर्व सिंधी त्याला मानतात'' आणि समोरचा माणूस परका आहे हे विसरून त्याने पंजाब्यांचं आणि उर्दू भाषिकांचं पितर वरून उतरवलं. सिंधी भाषेला आणि सिंध्यांना मिळणारी सावत्रपणाची वागणूक त्यांना चीड आणते. आपल्याकडे निर्वासित म्हणून आलेल्या सिंध्यांपुढे आपण आज निर्वासित वाटतो आणि इथे सिंधमध्ये राहिलेल्या सिंध्यांना स्वत:च्या जन्मभूमीत

निर्वासित झाल्यासारखं वाटतं.

आणि त्या इस्लामीकरणाच्या अफूचं काय? ती कितीही दिली तरी संस्कृती आणि भाषेशी बांधलेली निरगाठ नाही तुटत! नाही तर बांगला देश झाला नसता. आणि इथल्या सिंध्यांना हिंदू राजा दाहीर अल्लाइतका जवळचा वाटला नसता.

इथल्या सामान्य माणसाच्या खातिरदारीचा अनुभव येण्याचा मोका अजून आला नसला तरी सरकारी खातिरदारी मात्र अगदी खानदानी आहे हैद्राबादला पहिल्या मॅचच्या आदल्या दिवशी पास आणायला मी सकाळी आठ वाजताच स्टेडियमवर पोहोचलो. एका अवामी-ड्रेसमधल्या माणसाला (त्यांच्या पद्धतीच्या झब्बा-लेंग्याला अवामी ड्रेस म्हणतात) मी ताहीर मेमन या तिथल्या ऑर्गनायझरचं ऑफिस विचारलं. त्याने एकदा थोडं न्याहाळलं आणि मलाच प्रश्न केला, ''तुझं नाव काय?'' आवाजात किंचित जरब होती. मीही वैतागून लहान पोरं सांगतात तसं पूर्ण नाव सांगितलं, 'द्वारकानाथ सदानंद संझगिरी!' आणि त्याने धाडधाड माझी माहिती मलाच ऐकवली, ''तू काल रात्री रिट्झ हॉटेलात उतरलास. तू तिथे कुठेतरी दादरला राहतोस'' काही क्षण मला असं वाटलं की तो मला बहुधा ह्या रेटने माझा कुलवृत्तांत ऐकवूनच थांबणार. मी आ वासणार एवढ्यात त्यानेच माझा सस्पेन्स संपवला. ''मी सी. आय. डी.चा माणूस आहे. ताहीर मेमन तुला इथेच आणखी काही वेळात भेटेल.'' एवढं म्हटलं आणि तो निघून गेला.

पण माझ्या सावलीपेक्षा जास्त प्रामाणिकपणे तो मला साथ देत होता. संध्याकाळी जेवताना एका खांबामागून त्याचे डोळे आपल्यावर रोखले आहेत हे दिसत होतं. मी सरळ उठून त्याच्याजवळ गेलो आणि त्याला जेवणाचं आमंत्रण दिलं. तो हसला.

''तुम्ही जेवून घ्या. मी ड्युटीवर आहे. तुमच्यासारखे बरेच पत्रकार इथे आहेत.''

''एखादं सरबत तरी. जेवता जेवता चार गप्पा मारायला तरी हरकत नाही ना?'' तो आला. थोड्या हवापाण्याच्या गप्पा झाल्यावर मी हळूच विचारलं, ''इंडिया पाहिलाय?'' तो थोडा गंभीर झाला. म्हणाला, ''तिथे यायची इच्छा खूप आहे माझा सख्खा मामू तिथे आहे बरेच नातेवाईक तुमच्या मुंबईत डोंगरी की कुठल्या एरियात राहतात. पण ह्या जन्मात त्यांना भेटता येईल असं वाटत नाही.''

''का?''

''मला तिथे जायला व्हिसा कोण देणार? मी सी. आय. डी.त आहे. निवृत्त झाल्यावर मिळणं कठीण आहे आणि माझ्या अशा नोकरीमुळे त्यांनाही इथे येण्यात अडचण होते. चमत्कार झाला तरच मला ते भेटू शकतील. नाही तर फक्त पत्राने.''

आयुष्यात पहिला सी. आय. डी. हळवा होताना मी पाहात होतो.

पण ड्युटीच्या बाबतीत तो चोख होता. हैद्राबाद सोडताना तो विमानतळापर्यंत आला नाही. पण विमानतळावर जायला रिक्षात बसेपर्यंत त्याने साथ दिली. मला माझ्या व्हिसाचा स्टॅप आठवला, 'पोलीस रिपोर्टिंग रिक्वायर्ड.' त्या वाक्याचं हसू यायला लागलं.

हैद्राबादहून कराचीला जाताना विमानातून खाली सिंधू नदी दिसली. सिंधू नदी दुरावली तर आपण भावनाविवश होतो. ज्यांची कुटूंबंच दुरावली आहेत त्यांची काय अवस्था असेल?

## ■ ऑक्टोबर १९८८

गेल्या दोन दिवसात लाहोरने मला आपलंसं केलंय. लाहोर पाकिस्तानात जाणार ह्या कल्पनेने म्हणे पंडित नेहरू रडले होते. नेहरूंचं लाहोरवर प्रेम होतं. रसिकतेने काठोकाठ भरलेल्या माणसाचं ते तसं असायलाच हवं. त्यावेळी ते धनिकांचं शहर होतं. त्याला नवाबी थाट होता. गाणं, नाच, गझल, कव्वाली यांचं हे शहर. नुरजहाँ, शमशाद इथलीच! साहिर लुधियानवीही सुरुवातीच्या काळात कविता करत लाहोरच्या रस्त्यावर वणवण फिरायचा. आज रसिकतेचं एक अंग मात्र लुळं पडलंय. सामाजिकदृष्ट्या महंमदाच्या काळात पाकिस्तानला घेऊन जाण्याच्या झिया उल हकच्या हट्टापायी ह्या शहराचा आत्माच हरवलाय असं इथले बुजुर्ग डोळ्यात पाणी आणून सांगतात. इथली 'अनारकली' विधवा झालीय.

अनारकली आता फक्त बाजारपेठ राहिली आहे. तिथल्या कोठीतल्या सूरांनी कधीच अलविदा म्हटलंय. तिथली ठुमरी, तिथले घुंगरू मूक झाले आहेत. तिथले सूर जर झियाला इस्लामीकरणाच्या भिंतीत चिरायचे होते, तर निदान अनारकली हे प्रेम, संगीत आणि सौंदर्याशी निगडित असलेलं नाव तरी बदलायचं. लियाकत अली किंवा कुणी महंमद खान मार्केट वगैरे नाव चाललं असतं.

परवा आमच्या एका बंगाली पत्रकाराने आम्हाला येऊन रुबाबात सांगितलं, "काल झहीर अब्बासबरोबर अनारकलीत मैफलीला गेलो होतो. काय मझा आला. गोड गळा आणि गाणारी तर सौदर्याची खाण."

दुसऱ्या दिवशी आम्हा दोन-तीन पत्रकारांचे पाय अनारकलीकडे वळलेच. तिथली खरी जान निघून गेलीय म्हणून काय झालं? लाहोरला जाऊन अनारकली पाहिलीच पाहिजे. आग्र्याला गेल्यावर मृतवत् पडलेल्या अकबराच्या फत्तेपूर सिक्रीकडे पाय वळतातच ना?

तिथे एकाला मी अंगातील सर्व हिंमत एकवटून विचारलं, "वो किधर

होताय?'' 'वो' हा शब्द त्याला कळला नाही की माझ्या हिंदीने त्याचा खातमा केला माहीत नाही. पण त्याचा चेहरा प्रदीपकुमारपेक्षाही कोरा राहिला. हैद्राबादपासून सी. आय. डी. आसपास फिरतात ही भीती मनाच्या एका कोपऱ्यात होतीच. पण पुन्हा एकदा हिंमत केली आणि हातवाऱ्यांचा उपयोग करून विचारलं, ''नाच, गाना मैफल?'' त्याचा चेहरा एकदम बोलका झाला. त्याने आमची भेदरलेली रसिकता चटकन ओळखली. पण म्हणाला, ''तो जमाना संपला. छुपके छुपके थोडंफार चालतं. पण त्यात अर्थ नाही आणि जाणंही धोक्याचं.''

''मग काय सगळ्या तवायफनी गळयाला कुलपं आणि पायात बेड्या अडकवून घेतल्या?'' मी विचारलं.

''छे, छे! श्रीमंतांचे बंगले कशासाठी आहेत? त्यांच्या दरवाजापुढे 'मार्शल लॉ'सुद्धा लिन होतो. इतरांसाठी सारं संपलंय.''

तिथे आमची रसिकता अनारचा ज्युस घेण्याइतपतच फुलली. हॉटेलवर परतलो तेंव्हा दादरच्या कीर्तीकर मार्केटला फेरी मारून आल्यापलीकडे काही वाटलं नाही. लाहोर आता La-whore राहिलेलं नाही.

पण तरीही लाहोरला एक वेगळं सौंदर्य आहे. नवाबी थाटाचे अवशेष तिथे शिल्लक आहेत. दिल्लीची ऐतिहासिक छटा ह्या शहराला आहे. कॉंक्रीट जंगल इथे नाही. पण आधुनिकतेतही नजाकत असते हे सुध्दा इथले काही भाग दाखवतात. आणि टिपिकल उत्तर प्रदेशातल्या शहरांचा बकालपणाही दिसतो. गुलाबाच्या ताटव्यांच्या बागांनी आणि विविध रंगांच्या बोगनवेलींनी या शहराला टवटवीतपणा आणलाय. इथला 'माल रोड' हे ह्या शहराचं हृदय आहे आणि आज इतक्या वर्षांनीही ते ठणठणीत आहे उंच झाडांच्या सावलीत ह्या रस्त्याचा बराच भाग विसावलाय. गव्हर्नमेंट हाऊस, गोल्फ क्लब, रेस कोर्स, तारांकित हॉटेल्स ह्या रस्त्याच्या काठावर ऐसपैस पसरलेली आहेत. पुढे दुकानं आणि ऑफिसेसनी हा रस्ता नटलाय. आजकाल ह्या रस्त्याला शरार-इ-कायदे आझम म्हणतात. पण राष्ट्रपित्याच्या नावाचा उपयोग फक्त म्युनिसिपालिटी किंवा पोस्टापुरताच असावा. अजूनही जनता त्याला 'माल रोड'च म्हणते.

लाहोर हे आता पक्क पंजाबी शहर आहे आणि पंजाबची संपन्नता इथे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसते. इथला अनारचा रस पोटात जाताना त्याची लाली बहुधा पंजाबी स्त्री-पुरुषांच्या चेहऱ्यावर चढते. इथल्या रोट्या आणि अस्सल तुपाने त्यांना कणखर बनवलंय. पण एक प्रकारची मुजोरी आणि बेदरकारपणा त्यांच्या रक्तात भिनलाय. त्याचा अनुभव आम्हाला पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन्सच्या ऑफिसात आला. तिकिटाचं साधं कन्फर्मेशन करताना त्यांनी दिलेली वागणूक

आपल्याकडला खडूस कारकूनही देणार नाही.

पण त्यानंतर आलेले काही अनुभव मात्र मनाला चटका लावून जाणारे होते. विशेषत: परवाच्या रविवार सकाळचा. मॅचला पुस्तकं, वही, दुर्बिण वगैरे साहित्य घेऊन जाण्यासाठी एक छोटी हँडबॅग हवी होती म्हणून एका दुकानात शिरलो. मी बॅगा बघत होतो आणि दुकानदार किंमत सांगत होता. इतक्यात चक्क रामायणाचे संवाद माझ्या कानावर पडले. मी चपापलो. मी त्याला विचारले, ''रामायणाचे संवाद कुठून ऐकायला येतायत?'' माझ्या हिंदी-उर्दूच्या खिचडीतून माझं भारतीयपण लपलं नव्हतंच. त्यामुळे त्याने चटकन मला विचारलं, ''तू हिंदुस्थानातून आलायस?'' आपला देश आपल्यासाठी भारत असेल, पण इथल्या लोकांसाठी तो अजून हिंदुस्थानच आहे. ते इंडिया म्हणतील किंवा हिंदुस्थान! त्यांच्या जिभेला भारत ह्या शब्दाची सवय नाही. असो! आणि तो सांगायला लागला, ''अरे, इथे रामायण लोकप्रिय आहे. आज लाहोरमध्ये प्रत्येकाच्या घरात रामायण लागलं असेल. तुमच्या जालंदर केंद्राचे कार्यक्रम इथे आरामात पाहता येतात.''

''पण रामायणात तुम्हाला रस कसा?'' मी त्या चाळिशीच्या आसपासच्या दुकानदाराला विचारलं. ''आणि आजच्या पिढीलाही रस?'' माझी उत्सुकता शिगेला पोहोचली. कारण झियाने स्वत: येऊन माझ्या कानात सांगितलं असतं की मी पोरांच्या अभ्यासक्रमात रामायण - महाभारताचा समावेश केलाय तरी मी विश्वास ठेवला नसता.

त्यानेच माझी जबानी घ्यायला सुरुवात केली...

''तुला पैगंबर माहीत आहे?''

''होय.''

''येशू ख्रिस्त?''

''नक्कीच!''

''झरतृष्ट?''

''होय, तो सुद्धा!''

''मग आम्हाला राम-कृष्ण माहीत असले तर तुला आश्चर्य का वाटतं? अरे, आमच्या आई-वडिलांचं अर्धं आयुष्य तर तुमच्या हिंदुस्थानातच गेलंय. ते काय मन तिकडून पूर्णपणे कोरं करून इथे आले आहेत असं वाटलं काय?''

तेवढ्यात त्याने आतल्या खोलीतून आलेला चहाचा कप हातात कोंबला. पंजाब्यांच्या देहाप्रमाणे त्यांचे कपही गलेलठ्ठ असतात. ''काय घेणार? थंड की गरम?'' वगैरे विचारण्याचा औपचारिकपणा त्याने दाखवला नाही. आमचं बोलणं ऐकून त्याची साठीच्या पुढे झुकलेली वालिदिन (आई) बाहेर आली. माहेरच्या

माणसाला पाहिल्यावर सासरी गेलेल्या मुलीच्या डोळ्यात उमटतात ते भाव तिच्या डोळ्यात होते. 'कुठून आलास?' तिनं विचारलं.

"बॉम्बेहून."

आणि ती क्षणात चाळीस वर्षे मागे गेली. "मुंबई मला आठवत नाही. ती म्हणाली. कधी तरी लहानपणी पाहिली. पण दिल्लीतल्या जुमा मशिदीजवळच्या आमच्या घराची याद मात्र अजून येते. तुला ठाऊक आहे, निव्वळ ते आमचं घर बघायला मी दरवर्षी दिल्लीला जाते. ते घर आज दुसऱ्या कुणाच्या तरी ताब्यात आहे. दिल्लीला आमचे रिश्तेदार आहेत. त्यांच्याकडे राहते. पण घरावरून एक फेरी मारून जुन्या आठवणी चाळवल्याशिवाय मला चैन पडत नाही."

"मग दिल्ली सोडलं कशाला?"

"क्या करेंगा बेटा, मोहल्ल्यातली सर्वच माणसं पाकिस्तानात जायला निघाली. कुणाला जिवाची भीती होती. कुणाला नव्या देशाचं आकर्षण होतं. कधी दंगा होईल सांगता यायचं नाही. जीव मुठीत धरून आम्ही लाहोर गाठलं. आज लाहोरला आम्ही तसे सुखात आहोत. पण दिल्लीत अडकलेला जीव अजून सुटलेला नाही आणि तो कबरीत जाईपर्यंत सुटणार नाही."

भावनाविवश झालेल्या त्या अम्माजानने बॅगचे पैसे घ्यायला नकार दिला. मला विचित्र वाटलं. शेवटी हो; नाही करत काही पैसे मी तिच्या मुलाच्या हातात टेकवले आणि बाहेर पडलो.

हॉटेलवर गेल्यावर ही गोष्ट मी माझ्या इतर पत्रकार मित्रांना सांगितली. त्यातला एक व्यवहारचतुर दोस्त चटकन म्हणाला, "सापडला मंत्र. खुल जा सिम सिम, अलिबाबाच्या गुहेचा मंत्र सापडला. संध्याकाळी माल रोडवर खरेदीला जाताना सुरुवात दोन वाक्यांनी करायची, "हिंदुस्थानातून आलोय, दिल्लीहून आलोय, भाव उतरतो की नाही पाहा."

आणि अक्षरशः तसं घडलं. एखादा अपवाद सोडला तर आमची खातिरदारी भारावून टाकणारी होती. कुठे अनार ज्युस, कुठे चहा; कुठे पंधरा टक्के सूट. शत्रूराष्ट्राकडून आलेल्या काफिरांची एवढी खातिरदारी? डोळ्यावर आणि कानावर माझा विश्वास बसत नव्हता.

रात्री पलंगावर पडल्यावर डोक्यात सहज विचार आला. मुंबईत माझं एखादं दुकान असतं आणि एखादा पाकिस्तानी खरेदीसाठी शिरला असता तर माझी काय प्रतिक्रिया झाली असती? खातिरदारीचा सुविचार नक्कीच डोक्यात आला नसता. भावना उचंबळणं वगैरे सोडून द्या. आलीच तर नफरतच उसळून आली असती. का मी भावनाविवश व्हावं? कोण आहे माझं पाकिस्तानात? भाऊ-बहीण, काका-

मामा? कुणीच नाही. उलट मनावर ठसत गेलंय ते शत्रुत्व! कराचीहून भारतात येऊन दुकान थाटलेला सिंधी कदाचित दारात पाकिस्तानी पाहून भावनाविवश होईल, पण तेही कदाचितच! कारण तेसुद्धा तिथून भारतात येताना मनावर आणि शरीरावर जखमेचे इतके व्रण घेऊन आले आहेत की नुसत्या आठवणीनेही त्याची खपली निघते आणि जखम भळभळा वाहू लागते. पण अशा जखमा भारतातून तिथे गेलेल्या मुसलमानांनाही झाल्या असतीलच. त्यांना काही आपण डोलीत बसवून पाकिस्तानात नेऊन सोडलं नाही मग तरीही हे आदरातिथ्य का? ते नकली नक्कीच नव्हतं. कारण जेवढी मुसलमान कुटुंबं विभक्त झाली, तेवढी हिंदू झाली नाहीत. आज आपल्या देशातल्या मुसलमानांची संख्या पाकिस्तानच्या मुस्लिम लोकसंख्येपक्षा जास्त आहे. पाकिस्तानात हिंदू किती आहेत? फार तर पाच लाख. तेही कराची, सिंधमध्ये. लाहोरमध्ये औषधालाही सापडणं कठीण आहे. त्यामुळे आपल्याला त्यांच्याबद्दल आत्मियता काय वाटणार? त्यांच्या जुन्या पिढीची नाळ आपल्या इथे शिल्लक आहे. भावनेचे दोर इतके घट्ट आहेत, की पाकिस्तान वेगळं झालं, युद्ध झाली तरी ते कापून टाकू शकत नाहीत. पण दोन पिढ्यांनंतरची परिस्थिती काय असेल? अजून पंचवीस वर्षांनी पाकिस्तानात आलो तर लाहोरला अशीच एखादी अम्माजान भेटेल? दुकानादुकानात अशीच सरबराई होईल की एखाद्या मुजोर पंजाब्याची नफरतभरी नजर माझं काळीज कापत जाईल? मन अस्वस्थ करणारा विचार होता.

## ■ १२ ऑक्टोबर १९८७

लाहोरचं तेच शालिमार हॉटेल. तीच खोली. फक्त वेळ मात्र संध्याकाळची. इतर पत्रकार दोस्त शॉपिंगला गेले आहेत. मी मात्र निमूटपणे डायरी लिहीत बसलोय. मघाशी पी. टी. आय.च्या अशोक शर्माचा फोन येऊन गेला. निळ्या लेबलातल्या सोमरसाचं आणि तंगडी कबाबाचं आमंत्रण होतं. पण नाकारलं. दोन दिवस इस्लामाबादला त्याच्या पाहुणचाराचा तुडुंब आस्वाद घेतला होता.

पाकिस्तानात डायरी लिहायचा माझा निश्चय का ढळला नाही हे सांगणं सोपं आहे इथे सोशल लाईफ, नाईट लाईफ वगैरे प्रकार नाही. ('नाईट लाईफ' फक्त वाईटच अर्थानं घ्यायला पाहिजे असं नाही!) परक्या माणसाला इथे काम नसेल तर संध्याकाळी काय करावं हा प्रश्न सतावत राहतोच. परके राहोत, इथली तरुण पिढी संध्याकाळी काय काय करते ह्याचाही मला शोध घ्यावासा वाटतो.

इंग्लंडच्या इयान बॉथमने मागे एकदा म्हटलं होतं, "पाकिस्तान म्हणजे सासूबाईची रवानगी करण्यासारखा देश आहे." केवढा गदारोळ झाला होता.

पाकिस्तानला निघण्यापूर्वी रवी शास्त्रीही मला म्हणाला होता, ''कुठे, पाकिस्तानला चाललायस? तिथे फक्त चांगलं खाणं मिळतं, बाकी लाईफ शून्य!'' बॉथम - शास्त्रीच्या लाईफची अपेक्षा आणि मध्यमवर्गीय संस्कारात बरबटून काढलेल्या माझ्यासारख्या माणसाच्या 'लाईफ'ची अपेक्षा यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. 'त्या' लाईफचं स्वप्न पडलं तरी शेजारी झोपलेल्या बायकोची भीती वाटणारी आम्ही माणसं. पण आमच्यापेक्षाही इथलं मध्यमवर्गीय जीवन गुदमरलेलं वाटतं.

तरुण-तरुणी एका घोळक्यात फिरताहेत, हॉटेलात बसून हास्यविनोदाला उधाण आलंय असं दृश्य सापडणं मुश्कील. कमरेला विळखा घालून आपल्यातच हरवलेलं एखादं प्रेमी युगुल फिरतंय? अशक्य! निदान मला तरी दिसलं नाही. नैसर्गिक प्रेमाला व्यभिचार ठरवलं गेलं तर वेगळं काय होणार? मुली बहुसंख्येने पडद्यात फिरत नसतील. पण तरुण-तरुणींमध्ये अदृश्य असा पोलादी पडदा इस्लामीकरणाच्या अतिरेकाने उभा केलाय. झियाच्या राज्यात मुलामुलींचं एकत्रित शिक्षण हळुहळू बंद व्हायला लागलंय. मेडिकल कॉलेजंही फक्त मुलींसाठी उघडली आहेत. 'मुस्लिम स्त्री' ह्या विषयावर कराचीला गेल्यावर मला माझ्या तिथल्या मुस्लिम दोस्तांशी बोलायचंय. बरंच बोलायचंय!

हे तर काय सांगत होतो? पाकिस्तानात सध्याकाळ कशी घालवायची त्याबद्दल. टी. व्ही. पाहायचा म्हटलं तरी वैताग. टी. व्ही. वरच्या सीरियल्स खरंच फार चांगल्या आहेत. एका डॉक्टरच्या जीवनावर सध्या सीरियल सुरू आहे. दोन भाग मी पाहिले. अप्रतिम होते. पण पुढचे पाहायला मिळतील का? शंका आहे. कारण आम्ही सतरा पिंपळावरचे मुंजे. मॅच, लिखाण यात गुरफटलो की संपलं. पण या सीरियलमध्येही प्रेम मात्र लांबूनच! परवाच पी. टी. आय.चा अशोक शर्मा एक धमाल सांगत होता. एका सीरियलमध्ये खरेखुरे नवरा-बायको नवरा-बायकोचीच भूमिका करत होते. त्या कथेत नवरा बायकोला तलाक देतो वगैरे काही तरी होतं. त्या सीरियलमध्ये नवऱ्याने त्याच्या बायकोला तलाक दिल्याबरोबर झियाने माजवलेल्या मुल्लामौलवीने फतवा काढला, ''त्या दोघांनी प्रत्यक्ष तलाक घेतला पाहिजे. नाटकात तलाक दिला म्हणून काय झालं? इस्लामप्रमाणे त्यांनी तलाक दिलाच पाहिजे.'' अशा परिस्थितीत चांगली सीरियल काढणाऱ्याला आपण साष्टांग दंडवत ठोकायलाच पाहिजे. टी. व्ही.वरचं आणखी एक आकर्षण म्हणजे 'उर्दू खबरें'. बातम्यांसाठी नाही. तिथे तिरळ्या डोळ्यांचा झिया आणि त्याचे पाळीव पाठीराखे ह्यापलीकडे फारसं काही नसतं. फक्त त्या उर्दूसाठी. वझिरे आझम, बिस्मिल्ला अर्रर रहिम वगैरे शब्द कानाला भलतेच गोड लागतात. आणि सर्वात गोड लागतं ते रात्रीचं 'शब्बा खैर!' म्हणणं. अमृताते पैजा जिंकणाऱ्या आपल्या

मातृभाषेतलं 'शुभ रजनी' काय किंवा साहेबाचं 'गुड नाईट' काय. ह्यापेक्षा 'शब्बा खैर'चा गोडवा अवीट आहे. हे पाकिस्तानी अमेरिकेतून माल इथे आयात करतात. अमेरिकन डॉलर्सवर जगतात. पण त्या साहेबाची संस्कृती आयात करण्याच्या भानगडीत पडत नाहीत. केलीच तर गरजेपुरती. लाहोर-कराचीसारख्या शहरात निम्म्यापेक्षा जास्त माणसं त्यांच्या अवामी ड्रेसमध्ये फिरताना दिसतात. तिथल्या अमेरिकन एक्स्प्रेसमधल्या एका बड्या ऑफिसरला मी त्याच्या पॉश केबिनमध्ये अवामी ड्रेसमध्ये पाहून चाट पडलो होतो. देव आनंदला धोतरात पाहताना जेवढा मी हबकेन तेवढा मी हबकलो. अर्थात लाहोरला थंडी अजून पडलेली नाही. आमच्याकडे अजूनही फोर्टातल्या एका कोनाड्यातल्या दहा बाय दहाच्या केबिनमध्ये बसलेल्या प्रायव्हेट हापिसातल्या बॉसला टायचा नॉट बांधता नाही आला तरी चालेल, पण टाय लागतो. अगदी उन्हाळ्यातसुद्धा!

आणखी एक गोष्ट! तुम्ही फोन करा. कुठेही! ऑफिसात, घरात, विमान तळावर. 'हॅलो', 'हलाऽव' वगैरे सूर समोरून ऐकायला येत नाही. समोरून 'सलाम आलेकूम'च येतं. तुम्ही 'हॅलो' म्हटलं तरी समोरून 'सलाम आलेकूम'च येणार त्यांच्या जिभेत ते मुरलंय.

पुन्हा लिहिता लिहिता थोडा भरकटलो, संध्याकाळकडून संस्कृतीकडे. पण डायरी लिहिताना त्याचा नाइलाज होतोय. अचानक हे अनुभव डोक्यात कधी उसळी मारून येतात ते कळत नाही.

तर पुन्हा तोच प्रश्न. संध्याकाळ कशी घालवायची. हा तसा ग्रासला जास्त रावळपिंडीला. तसं रावळपिंडी हे जुनाट शहर आहे. धुळीने माखलेलं, बुरखा संस्कृतीत रमणारं. त्यात इस्लामाबाद हे राजधानीचं शहर तिथून हाकेच्या अंतरावर. त्यामुळे शहरात मिलिटरीचा तळ पडला होता. त्यात पहिल्या दिवशी मॅचवर पाणी पडल्यावर रावळपिंडीत मुक्काम एक दिवस वाढवावा लागणार हे नक्की झालं. इतक्यात डोक्यात कल्पना आली. इस्लामाबादला चक्कर मारली तर... एका टॅक्सीवाल्याला विचारलं इस्लामाबाद फिरवून आणायचं काय घेणार? त्याने सांगितलेलं भाडं ऐकून डोळे फिरले. तरी किती भारतीय पत्रकार पैसे शेअर करायला तयार आहेत हे विचारायला मैदानावरच्या टेलेक्स रूममध्ये गेलो. वाटेत कमर सैद झैदी हा पाकिस्तानी पत्रकार भेटला. मी त्याला सहज म्हटलं, ''इस्लामाबादला जायला इथे टॅक्सीवाले काय वाट्टेल ते पैसे मागतायत?''

''तुम्हाला सर्वांना इस्लामाबादला जायचंय, मग मला नाही सांगायचं? दोन तासात तुमची सोय करतो. तू इतर भारतीय पत्रकारांना सांग. अरे, तुम्ही आमचे मेहमान आहात. टॅक्सीने कुठे चालला आहात?''

अक्षरश: दोन तासात त्याने छोटी मॅटॅडोर आमच्या हॉटेलच्या दारात उभी केली. बरोबर चक्क एक गाईड होता. आणि तीन तास हे हिरवंगार शहर त्याने आम्हाला फिरवलं. इस्लामाबाद ही पाकिस्तानची राजधानी. १९६० साली तिचा जन्म झाला. आज ह्या राजधानीच्या यौवनाचा बहर प्रकर्षाने जाणवतो. सर्व कसं आखीव. विशेषत: सिंगापूरप्रमाणे. मोठ्या रस्त्यांच्या बाजूला मातीचे कृत्रिम उंचवटे तयार करून त्यावर रोवलेल्या हिरव्यागार वेलींनी विस्तृत रस्त्यांचं सौंदर्य आणखीनच खुलवलंय. तो गाईड आम्हाला उंच टेकडीवरच्या बागेत घेऊन गेला. तिथून ती राजधानी नववधूसारखी दिसत होती. फैसल मस्जिद हा तिचा सर्वात मौल्यवान दागिना. ह्या मशिदीचं सौंदर्य शब्दात पकडता येत नाही. पण ते मनावर ठसतं. आताही डोळे मिटले की त्या मशिदीची पांढरी स्वच्छ संगमरवरी, नितळ कांती डोळ्यांसमोर उभी राहते. राजधानी म्हटल्यावर इतर राजधानींच्या गोष्टी तिथे अर्थातच आहेत. प्रेसिडेन्टचा प्रासाद (त्यासाठी घर, बंगला वगैरे शब्द ठेंगणे वाटतात) सरकारी कचेऱ्या वगैरे वगैरे. पण गजबजाट नाही की कोलाहल नाही. एखाद्या प्रचंड बागेतून फेरफटका मारून आल्यासारखं वाटतं.

तिथेच पी.टी.आय.चा अशोक शर्मा भेटला. मूळचा दिल्लीचा. गेली तीन वर्ष विशेष प्रतिनिधी म्हणून इस्लामाबादला आहे. आमच्यातल्या येतील त्यांना घेऊन घरी गेला आणि पहिली गोष्ट काय केली असेल तर 'बार'चा दरवाजा सताड उघडला दुष्काळातल्या माणसासमोर पंचपक्वान्नं ठेवल्यावर जे भाव त्याच्या चेहऱ्यावर उमटतील, ते आमच्यातल्या बहुतेकांच्या चेहऱ्यावर उमटले. आमच्यातले एक-दोघं तर हाडाचे तळीराम. अगदी सनातनी मद्यपी. मद्याचं आचमन करून मद्याची चित्राहुती घातल्याशिवाय न जेवणारे. पाकिस्तानात शिरल्यापासून त्यांचा धर्म बुडत होता. कारण इथे मद्यावर बंदी आहे. परदेशी माणसाला ते मिळू शकतं. पण बड्या हॉटेलात लायसन्स काढल्यावर. पण तेही परदेशी माणूस मुस्लिम असेल तर तो तिथे अधिकृतपणे मद्यपान करू शकत नाही. आणि किमती काय आहेत ठाऊक आहे? स्कॉच हजारच्या खाली नाही. साधी 'मरी' बियरची बाटली आपल्या बियरच्या बाटलीच्या कमरेलासुद्धा लागणार नाही अशी. चक्क साठ रुपये! ही सनातनी मद्यप्यांच्या खिशाला परवडणारी गोष्ट नव्हती.

सर्वांचं व्यवस्थित उदरभरण झाल्यावर वगैरे सर्वांच्या मनातला प्रश्न एकाने अशोकला विचारला, ''मद्याचा खजिना ठेवणं ह्या देशात तुला परवडतं कसं?'' दिलदार अशोक म्हणाला, ''त्याची काळजी तुम्ही करू नका. आम्हाला विशेष कोट्यातून मिळते.'' मद्याची आणि जेवणाची चव जिभेवर रेंगाळत असतानाच तिथे 'टाइम्स'चे जोशी आले. तेही गेले काही महिने इथेच राहतात. त्यांनी दुसऱ्या दिवशी

जेवणाचं आमंत्रण आम्हाला दिलं. आम्ही 'कसचं कसचं' वगैरे भाव चेहऱ्यावर आणले. मनातून मात्र कोरसमध्ये 'हो' म्हणालो. 'वन्स मोअर' कुणाला नको होता?

कालची संध्याकाळ जोशींकडे मजेत गेली. त्यांनीही त्यांना सुरुवातीला सी. आय.डी.चा झालेला त्रास सांगितला. पण सरकारी पातळीवर हे व्हायचंच. इथे इस्लामाबादेत नवीन भारतीय एम्बसीची इमारत बांधली जातेय. पण साध्या मजुरापासून प्रत्येक माणूस भारतातून आलेला आहे. इतकी दक्षता घेतली जाते. ते चालायचंच. बोलता बोलता जोशी म्हणाले, "उद्या वेळ असेल तर टॅक्शीलाला का जाऊन येत नाही. टॅक्शीला म्हणजे आपली तक्षशीला. लाहोरला तुम्ही उद्या दुपारच्या फ्लाईटने जाणार ना? मला उद्या काम आहे म्हणून, नाहीतर मीच तुम्हाला घेऊन गेलो असतो."

मी हळहळलो. निदान जोशींनी आठवण तरी करायला नको होती. स्ट्रॅटफोर्ड अपॉन हेवनच्या जवळ जाऊन शेक्सपियरचं घर न बघण्यासारखं ते मला वाटलं. लाहोरचं विमान चुकवणंही शक्य नव्हतं. कारण तिथे मॅच होती.

एक शेवटचा प्रयत्न म्हणून हॉटेलवर परतल्यावर मी एका पाकिस्तानी पत्रकाराला विचारलं, "उद्या सकाळी तीन-चार तासात टॅक्शीलाला जाऊन येणं जमेल?"

कपाळाला आठ्या घालून त्याने मला विचारलं, "काय आहे तिथे? रिफायनरी आणि हायड्रोइलेक्ट्रिक प्लान्ट आहेत तिथे. आणखी काय आहे?"

"अरे, एके काळी विद्येचं आणि कलेचं माहेरघर होतं. खरं तर भारतातलं पहिलं विद्यापीठ. पाणिनी, कौटिल्य ह्यांनी तिथे ज्ञानकण जमवले." हे मी त्याला झेपेल तेवढ्या सोप्या इंग्रजीत सांगितलं. पण मी ग्रीक भाषेत बोलतोय असा त्याने चेहरा केला.

'पाणिनी, क्रौटिल्य' तो स्वत:शीच पुटपुटला. चेहऱ्यावरचा मख्ख्यपणा तीळभरही कमी झाला नव्हता. इ. स. ८०० च्या पलीकडे तो पोहचलाच नव्हता. इंडोनेशिया हा मुस्लिम देश आहे. पण तिथे इस्लामपूर्व संस्कृतीला तिलांजली दिलेली नाही. इथे मात्र इस्लामीकरणाच्या वरवंट्याखाली इस्लामपूर्व संस्कृती फक्त इतिहासात आणि उरलेल्या दगडी भिंतीतल्या अवशेषात शिल्लक राहणार आणि फार तर इथे टुरिस्ट म्हणून फिरणाऱ्या गोऱ्या साहेबाच्या कॅमेऱ्यात.

## ■ १८ ऑक्टोबर १९८७

पेशावर मी नुकतंच सोडलंय. इथून विमानातून खाली हिंदुकुश पर्वताची

शिखरं दिसतायत. काही वेळाने वायव्य सरहद्द प्रांत ओलांडून हे विमान कराचीच्या मार्गाला लागेल. पण अतृप्त मनाने मी पेशावर सोडलंय. एवढं महत्त्वाचं ऐतिहासिक शहर आणि फक्त एक संध्याकाळ आणि सकाळ एवढीच वाट्याला आली. त्यात खैबरखिंडीने दगा दिला. अखख्या जगाचं हात पसरून तिने स्वागत केलं. अगदी आमच्या 'अतिथी देवो भव' स्वभावाला अनुसरून! अनेक अतिथी तिकडून आले. आर्य, शक, हूण, पर्शियन, मोगल, सिकंदरचं सैन्य! काही इथल्या मातीत मिसळले. काही फक्त लुटण्यासाठीच आले होते. ते लुटून गेले. आता तिथून अफगाण निर्वासित येतात, स्मगलर्स येतात, अफू, गांजा घेऊन जगाची तरुण पिढी उद्ध्वस्त करण्यासाठी. पण ही खिंड त्यांचंही स्वागत करते. तिने कुणाला विन्मुख पाठवलं नाही आणि फक्त आम्हाला विन्मुख पाठवावं?

इथल्या म्युझियमबद्दलही बरंच ऐकलं होतं. आजचा वायव्य सरहद्द प्रांत म्हणजे एकेकाळचा ब्रह्मावर्त आणि गांधार. त्या गांधार-युगाची संस्कृती ह्या म्युझियममध्ये जपून ठेवलेली आहे. बुद्धाचं संपूर्ण आयुष्य शिल्पामध्ये चितारलेलं त्या म्युझियममध्ये ठेवलंय असं ऐकलं होतं. ते पाहायला मी आसुसलेलो होतो, पण ते पाहणंही नशिबात नव्हतं.

पेशावरला पाय लागले हेच खूप होतं. कारण परवा लाहोरच्या विमानतळावर पी. आय. ए.च्या ऑफिसरने खांदे उडवून सांगितलं, ''सॉरी जंटलमन! विमान पूर्ण भरलेलं आहे. तुम्हाला जागा देऊ शकत नाही.'' मी मटकन खाली बसलो. निराश झालो. इतक्यात तिथल्याच कुणीतरी आशेचा किरण दाखवला. ''बसने का जात नाही? नऊ तासात पेशावरला पोहोचाल. साधारण पहाटेपर्यंत. मॅच दहाला आहे.''

नऊ तासाचा प्रवास म्हटल्यावर आमच्यातल्या अर्ध्याजणांनी माना टाकल्या. ''इंग्लंड-श्रीलंका तर मॅच आहे. काय अर्थ उगाच रात्रभर प्रवास करण्यात? उलट लाहोरमध्ये मस्त एअरकंडिशन्ड रूममधून टी.व्ही.वर मॅच पाहता येईल.'' माना टाकणाऱ्यांनी कुंपणावरच्या मंडळींना आपल्यात खेचण्याचा प्रयत्न केला.

मी सरळ सावरकरी भूमिका घेतली. ''आलात तर तुमच्यासह नाही तर तुमच्याशिवाय. वेळ पडली तर एकटासुद्धा. पण पेशावर गाठणार. पाकिस्तानात येऊन पेशावर पाहायचं नाही?'' आमच्या 'टाइम्स'च्या श्रीवत्स आणि बंगालचा मुदर पथेरियाला माझं म्हणणं पटलं असावं. आम्ही तिघांनी थेट बस स्टॅण्ड गाठला.

'रावळपिंडी-पेशाऽऽर' अशा प्रायव्हेट बसवाल्यांच्या हाळ्या तिथे सुरूच होत्या. पेशावर असा बाळबोध, मृदू उच्चार पंजाबी राकटपणात बसत नसावा. इथल्या छोट्या मॅटॅडोरसारख्या गाडीला 'दुल्हन' म्हणतात. खरंच ती दुल्हनसारखी

वेगवेगळ्या रंगांनी आणि छोट्या रंगीत दिव्यांनी सजलेली असते. पण तिच्याबरोबरची 'वरात' तशी सुखकारक नव्हती. दोष तिचा नव्हता. एक तर आम्ही शेवटच्या सीटवर होतो. त्यात पाकिस्तानचे रस्ते आणि आपले रस्ते ह्यांचा ब्लड ग्रुप. सॉरी डांबरग्रुप एकच! खड्ड्यांचा सगळीकडे सुकाळ होता. 'क्षणोक्षणी उडे, बसे परी बळे' अशी आमची अवस्था होती. पण त्यात एकच सुख होतं. ड्रायव्हरने अप्रतिम हिंदी गाणी लावली होती. मुकेश, तलत, लता, रफी करत तो नूरजहाँवर आला. 'मेरे बचपन के साथी मुझे भूल न जाना', 'दिया जलाकर आप बुझाया,' 'आवाज दे कहाँ है'... वगैरे नूरजहाँची गाणी ऐकता ऐकता लक्षात आलं, की पाकिस्तानातली नूरजहाँ ऐकायची इथे येऊनही राहून गेलीय. बाकीची पाकिस्तानची गाणीही ऐकायची इच्छा होती.

कुठल्याशा एका हॉटेलात चहासाठी गाडी थांबवल्यावर मी ड्रायव्हरला म्हटलं, ''मी हिंदुस्थानातून आलोय. तुमचे मेहंदीहसन, गुलामअली ऐकले आहेत. मला तुमचं चित्रपटसंगीत ऐकायचंय. इथली नूरजहाँ ऐकायचीय. आहे कॅसेट?'' त्याने कपाळावर हात मारला आणि तिडीक आल्यासारखा म्हणाला, ''स्वत: नूरजहाँ तरी ती ऐकते की नाही ह्याची मला शंका आहे. तिच्याकडे जे होतं ते तिनं तुम्हाला दिलं. इथे जास्त तिने इष्कबाजीच केली. तुला पाहिजे तर ऐकवतो मी.''

त्याने कुठलीशी कॅसेट ऐकवली. त्यात नूरजहाँ होती आणि नव्हतीही. गळा बराचसा तोच होता. पण सुरांशी नातं सावत्र वाटत होतं. एकरूपता नव्हतीच. इतर पाकिस्तानी सिनेमातली गाणी ऐकवली. त्यातले काही सूर आपले चोरलेले. बाकी सामान्य, शब्द ओशाळावा अशी.

इतक्यात एक पॅसेंजर जांभया देत उठला आणि ड्रायव्हरला खास पंजाबीतून शिवी हासडून म्हणाला, ''ही काय बकवास गाणी लावली आहेत, बंद कर. निदान सुखाने झोपू तरी दे.'' त्या क्षणी माझंही मत वेगळं नव्हतं.

इथल्या चित्रपटसृष्टीला शेवटची घरघर लागली आहे. अजून तरी थिएटरमध्ये येणाऱ्यांचं गुलाबपाणी शिंपडून स्वागत होत नाही, पण ती वेळ जवळ आली आहे. अजून काही वर्षांनी तिचे अवशेष म्युझियममध्ये जाऊन बघावे लागतील. व्हिडीओचा सुळसुळाट इथे वाढला आणि पाकिस्तानी चित्रपटसृष्टीला सुरुंग लागला. व्हिडीओ कॅसेटस्च्या लायब्ऱ्या भारतीय चित्रपटाने भरल्या आणि इथल्या लोकांनी पाकिस्तानी चित्रपटसृष्टीला तलाक दिला.

एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं. फाळणीनंतर भारतातले बरेच सितारे पाकिस्तानात धावले. नूरजहाँ, खुर्शिद, गुलाम हैदरसारखा संगीतकार, 'लारेलप्पा, लारेलप्पा' म्हणणारी मीना शोरी, 'तस्वीर बनाता हूँ'सारखं गाणं देणारा नाशाद,

फैज अहमद फैज, झिया सरहदी वगैरे. त्या काळची ही मोठी माणसं. आपल्या चित्रपटसृष्टीतले हे त्या काळचे मोठे कलावंत. प्रतिभेचे पंख घेऊन त्या मायासृष्टीत उंच भरारी मारणारे. पाकिस्तान झाल्यावर त्यांचे पंख गेले कुठे? कुणी कापले? आणि ह्या मातीला झालंय काय? ज्या पेशावरला मी चाललो होतो त्या मातीत वाढलेल्या राज कपूर आणि दिलीपकुमारने आमच्या चित्रपटसृष्टीवर राज्य केलं. भारताबाहेरच्याही करोडो लोकांना वेड लावलं, त्या मातीत पुन्हा वटवृक्ष लागलेच नाहीत? फक्त खुरटं गवत आणि निवडुंगंच उभी राहिली? की गुणवत्ता जोखणारी, त्याला आकार देणारी माणसंच त्या चित्रपटसृष्टीत नव्हती? अमेरिकेने पाकिस्तानला पॅटन टॅक दिले, आपण ते कचकड्याचे ठरवले. दोष पॅटन टँकचा नव्हता, वापरणाऱ्यांचा होता. असंच तर काही घडलं नसेल?

बाबरने बांधलेल्या बालहिसार किल्ल्याचे पडके बुरुज धूसर वातावरणात दिसले आणि आम्ही नि:श्वास सोडला. अखेर पेशावर आलं होतं.

पण पेंगुळलेल्या डोळ्याने पेशावरच्या स्टेडियममध्ये शिरताना जेवढं संशयाने पाहिलं गेलं, तेवढं क्रेमलिनमध्ये शिरणाऱ्या अमेरिकन माणसाकडेही पाहिलं जाणार नाही. प्रेस पास, पासपोर्ट, पेशावरचा स्टँप दाखवून आमची पूर्ण चाचणी झाल्यावरही ती दारावरची खाकी डोक्याची माणसं आम्हाला स्टेडियममध्ये सोडायला तयार होईनात. शेवटी त्याने कहर केला. ''आमच्याकडे स्फोटक काही नाही असं लिहून द्या,'' असं फर्मान काढलं. पठाणाशी बोलताना डोक्यावर बर्फ ठेवूनच बोलावं लागतं. पण तोसुद्धा एव्हाना वितळला होता. मला नको तेव्हा टिळक - आगरकरांचा ताठ कणा आठवला आणि मी लिहिलं, ''माझ्याकडे लेखणी सोडून स्फोटक काहीच नाही.'' माझं सुदैव असं की त्या पठाणाने माझा कणा वाकवायच्या आत दुसरा भारतीय पत्रकार एका वरच्या ऑफिसरला घेऊन आला आणि आमची सुटका झाली.

प्रेसबॉक्समध्ये शिरल्यावर नेहमीचे पाकिस्तानी पत्रकार दिसेनात. त्यांना त्या सामन्यात रस नव्हता. एक ओळखीचा चेहरा दिसला. 'खुल जा सिम सिम'चा लाहोरला सापडलेला मंत्र मी म्हटला. त्याची मेहमाननवाझी उचंबळायला लागली. हळूच खैबरखिंडीचा विषय काढला आणि त्याने हात जोडले. ''तिथे जाणं शक्य नाही. अतिशय धोक्याचं आहे. हे शहर म्हणजे एक ज्वालामुखी आहे. कुठल्याही क्षणी काय होईल हे सांगता येत नाही. स्टेडियममध्ये किती माणसं आहेत? हजार, दीडहजार? त्याच्या दुप्पट बाहेर पोलीस आहेत. मिलिटरी आहे. इथे संध्याकाळी फिरतानाही जपून फिरा.''

त्याचं म्हणणं खरं होतं. पेशावरमध्ये दिवाळीतल्या फटाक्यांप्रमाणे बॉम्ब

फुटतात. आधीच पख्तुनिस्तानच्या प्रश्नाने खदखदणारा हा प्रांत. त्यात अफगाणिस्तानात रशियाने पाय रोवल्यावर अफगाण मुजाहिरांचा प्रश्न निर्माण झाला आणि तो हाताबाहेर जायला लागला. निर्वासितांचा प्रश्न फोफावला की काय होतं याची आपल्याला कल्पना आहे. त्यात हे निर्वासित म्हणजे जळते निखारे आहेत. ब्रह्मदेवाने त्यांना घडवताना अगदी ठेवणीतलं सौंदर्य दोन्ही हातांनी उधळलंय, पण त्याचबरोबर त्यांच्या रक्तात एक कर्ण आणि दुर्वासही भिनवला. निखारेच ते. कधी दिलदारपणाची, प्रेमाची ऊब देतात, तर कधी क्रोधाने भाजून काढणारी आग!

मुंबईत पठाणांचा 'दंडुका' आपल्याला परिचित आहे. पेशावरला त्याची जागा पिस्तूल आणि रायफलने घेतली आहे. तिथे रस्त्यावर खेळणी विकावी तशी पिस्तुलं आणि रायफली विकल्या जातात. लग्नाच्या वरातीत आपण फटाके लावतो. ते चक्क रायफलीतून गोळ्या झाडतात. पुरुषांच्या चेहऱ्यावर करारीपणा दिसतो, पण त्यांच्या स्त्रिया? त्यांचा चेहरा दिसणं हा कपिलाषष्ठीचा योगच. कारण त्या तशा पर्दानशिनच असतात. पण तिथल्या तरुणी पायघोळ पांढरा ड्रेस घालतात आणि घुंघट घ्यावा तशी पांढऱ्या तलम कपड्याची ओढणी चेहऱ्यावरून घेतात. तो अर्धवट झाकला गेलेला चेहरा चंद्रकोरीसारखा वाटतो. तसाच शीतल. पण 'चंद्रकोर' सतत पाहायची नसते. मोह आवरायचा असतो. हे सनातनी शहर आहे. त्या 'मोहा'चा मार्ग बंदुकीच्या नळीतून जातो हे डोक्यात ठेवायला लागतं.

पेशावरच्या मार्केटमधून फिरलं की त्यांच्या सौंदर्याला, निसर्गनिही कसा हातभार लावलाय हे कळतं. आपल्याकडे वाण्याच्या दुकानात जशी गहू, तांदळाची पोती भरून ठेवलेली असतात, तशी तिथे बदाम, पिस्ते, अक्रोड, बेदाण्यांनी पोती भरलेली असतात. हे खाणं जाऊ दे, बदाम-पिस्ते बरण्यांतून बघायची आपली सवयही सुटलेली आहे. तिथून तुम्ही चण्यादाण्याच्या भावात घेतलेला सुकामेवा खात फळांच्या मार्केटमध्ये जाता. तिथले अनार, संत्री, चेरी, सफरचंद, त्यांचे आकार आणि रंग बघून तुम्हाला 'फलाहार' करावासा वाटतो. तेवढ्यात कुठल्यातरी कोपऱ्यातून येणारा कबाब आणि तंदुरीचा वास तुम्हाला तिथे खेचतो. लहानपणी शिकवलेलं हायजिन वगैरे विसरलं जातं आणि लक्षात राहते ती फक्त चव... तृप्त जिभेने मार्केटात फिरताना अस्सल पठाणी बुटाची दुकानं दिसतात. बस, तिथेच 'स्वदेशी' मार्केट संपते आणि मग रांगच रांग लागते ती इंपोर्टेड मालाच्या दुकानांची. टी.व्ही.पासून नेल पॉलिशपर्यंत काहीही विकणारी. आणि तिथे दिसतं पाकिस्तानचं दारिद्र्य आणि स्वत:च्या उद्योगधंद्यांना दिलेली मूठमाती.

रात्री हॉटेलवाल्याला विचारलं, "उद्या म्युझियम बघायचाय. कुणाला तरी तो कुठाय ते दाखवण्यासाठी पाठवशील?" तो तयार होता. सकाळी सात वाजता

चहा घेऊन येणाऱ्याने सांगितलं, ''तिथे जाता येणार नाही. काल तिथे जवळच बॉम्ब फुटलाय. पोलिसांनी तो विभाग ताब्यात घेतलाय. त्याचा तपास चालू आहे. तिथे रिक्षा यायला तयार नाही.''

तिकडे बॉम्बमुळे कुणाच्या ठिकऱ्या उडाल्या माहीत नाही. पण माझ्या इच्छा-आकांक्षांच्या नक्कीच उडाल्या.

एक गोष्ट मात्र नक्की, त्या सुरुंग पेरलेल्या पेशावरपेक्षा सध्या अधांतरी तरंगणारं हे विमान मला जास्त सुरक्षित वाटतंय.

## ■ २० ऑक्टोबर १९८७

कराचीत तीन दिवस अगदी मजेत गेले आहेत. अगदी आईच्या नाही तर मावशीच्या घरी आल्यासारखं नक्की वाटलं. खरंच कराची मुंबईची पाकिस्तानात दिलेली सख्खी बहीण वाटते. तशीच मॉडर्न, नखरेल, धार्मिक वृत्तीच्या कुटुंबात राहूनही सोवळेपणात न गुंतलेली आणि मुंबईसारखीच मायाळू, सर्वांना मायेनं कुशीत घेणारी.

इथे फक्त 'अल्ला हो अकबर'च्या घोषणाच ऐकायला येत नाहीत. अस्पष्ट का होईना शंकराच्या मंदिरातला घंटानादही ऐकू येतो. सदर बझारातल्या अग्यारीत पारश्यांची ये-जा असते. लाहोरप्रमाणे चर्च भग्न, भकास वाटत नाहीत.

आणि हे 'अल्ला हो अकबर'वाले कोण आहेत? भारतातून आलेले मुहाजीर! आपल्या भाषेत सांगायचं तर भारतातून आलेले निर्वासित. ह्यांना मायेची ऊब तिने दिलीय. आणि तेही तिची स्वत:ची लेकरं उद्ध्वस्त होऊन, तिला सोडून गेल्यावर. पन्नाशी ओलांडलेला मूळचा मुस्लिम कराचीवाला सापडणं तिथे कठीण झालंय. कुणी भोपाळचा, कुणी जामनगरचा, कुणी मुंबईचा, कुणी अहमदाबादचा! कराचीच्या एखाद्या कपड्याच्या दुकानात 'तमे सू जोए छे।' असं कुणी विचारलं तर आश्चर्य वाटण्याचं कारण नसतं. तिथे गुजराथी वर्तमानपत्रही निघतं.

मला धक्का फक्त एकदाच बसला. कराचीत प्रेसबॉक्समध्ये जेवणावरून नेहमी कुरकुर करणारा आमचा बंगाली दोस्त लोकेंद्रप्रताप साही मला शांत चित्ताने जेवताना दिसला. व्यवस्थित दक्षिणा दिल्यावर समाधानी दिसणारा भटजी आणि चांगलं जेवण देऊनही समाधानाने जेवणारा साही तोपर्यंत मी पाहिला नव्हता. जवळ जाऊन पाहिलं तर तो चक्क मसाला डोसा खात होता. पाकिस्तानात डोसा असेल असं मला स्वप्न पडणंही कठीण वाटत होतं. नॅशनल स्टेडियमच्या समोरच डोश्याचं हॉटेल होतं. बॉन्डरोस रेस्टॉरंट! ज्या उत्साहाने मी इम्रानची मुलाखत घ्यायचो त्या

उत्साहात मी त्या उडप्याची मुलाखत घेतली. तो शंभर नंबरी उडपी होता. फक्त धर्माने मुसलमान होता. फाळणीनंतर तो पाकिस्तानात आला. एका हॉटेलात कामाला लागला. थोडा पैसा गाठीला आल्यावर त्याने सरळ उडपी हॉटेल काढलं. फक्त त्याला स्पेशल मुस्लिम टच दिला. चिकन डोसा, खिमा डोसा, चिकन मसाला, इडली. ह्या त्या स्पेशल डिशेस... डोश्यात बटाट्याच्या भाजीऐवजी चिकन किंवा खिमा हा मुस्लिम टच. "पाकिस्तानात मी एकमेव उडपी आहे," त्याने अभिमानाने सांगितलं. हसत हसत हळूच चिमटा काढण्यासाठी मी त्याला म्हटलं, "तुम्ही उडपी मंडळी थोर आहात. उद्या एस्किमोच्या देशात गेलात तरी त्यांना डोसा खायला शिकवाल." त्याला ते कौतुक वाटलं. पुष्पगुच्छ स्वीकारावा तसं त्याने कौतुक स्वीकारलं.

तर अशी ही नगरी सर्वांना पोटात सामावणारी. पण तरीही तिथे असंतोषाचा स्फोट अधुनमधून होतोच. पेशावरप्रमाणे इथे सुरुंगातून चालल्यासारखं वाटत नसेल, पण माणसांच्या रक्ताची चटक याही शहराला लागली आहे. इथे मुहाजीर कौमी मुव्हमेंट नावाची संघटना सध्या धुमाकूळ घालतेय. भारत सोडून इथे आलेल्या मुसलमानांनी ही संघटना स्थापन केली. पाकिस्तानातलं पंजाब्यांचं राजकीय, सामाजिक, आर्थिक वर्चस्व त्यांना मोडून काढायचंय. त्यांचा नेता अस्ताक हुसेन हा कैदेत असल्यामुळे त्याला सोडवण्यासाठी ते सध्या कराचीला वेठीस धरताहेत. काल त्या मंडळींनी क्रिकेटमॅचमध्येही धुमाकूळ घातला. घोषणाबाजी सुरू होतीच. पण नंतर त्यांनी इस्ट स्टॅण्डजवळ उभ्या असलेल्या स्वतःच्या संघातल्या क्षेत्ररक्षकांना दगड आणि तत्सम वस्तू फेकून मारायला सुरुवात केली. तिथे सलीम मलिक क्षेत्ररक्षण करत होता. तो लाहोरचा, पंजाबी. मुहाजीरांनी त्याच्यावर राग काढला. शेवटी इम्रान खानने कंटाळून तिकडे जावेद मियाँदादला क्षेत्ररक्षणाला पाठवलं आणि जादूची कांडी फिरली. त्यांच्या हातातले दगड गळून पडले. का? उत्तर सोपं होतं. जावेद मियाँदाद हा मुहाजीर. तो पाकिस्तानात जन्मला असला तरी त्याचे वडील गुजराथमधून पाकिस्तानात गेलेले. त्यांना तो आपला वाटला.

इथे शिया-सुन्नीमधूनही विस्तव जात नाही. विस्तवाचा वापर जाळपोळीसाठी मात्र वारंवार होतो. पाकिस्तानात बहुसंख्य मुसलमान सुन्नी आहेत. आपल्याकडे उच्चवर्णीय एखाद्या महाराचा तो 'म्हारड्या' म्हणून ज्या तिरस्काराने उच्चार करतात त्या तिरस्काराने सुन्नी शियांबद्दल बोलतात.

कालच मी इथला माझा खास दोस्त एहसान कुरेशीबरोबर दलपत सोनावारियाकडे गेलो होतो. पाकिस्तानचा एकमेव हिंदू क्रिकेटपटू अनिल दलपतचे ते वडील. पण तिथे अनिलला दलपतमुळे ओळखतात, अनिलमुळे दलपतला नाही.

किंबहुना, दलपत ह्या नावाला किंमत असल्यामुळे अनिल 'सोनावारिया' हे आडनाव सहसा नावापुढे जोडत नाही. ते तिथल्या अल्पसंख्यांक आयोगाचे चेअरमन आहेत. राजदरबारी त्यांचं वजन आहे. घरात त्यांचे झिया-उल-हक आणि पंतप्रधान जुनेजोंबरोबरचे फोटो लटकवले होते. त्यांच्या घरासमोर एक शिया मुसलमानांची मशीद आहे. शियांची वेगळी मशीद असते हे मला त्या दिवशी कळलं. ते सांगत होते, की सुन्नी-शियांच्या दंगलीच्या वेळी बऱ्याच वेळा शिया लोक आमच्या घरात लपले आहेत. एका कट्टर मुस्लिम राष्ट्रात मुस्लिम माणसांना स्वत:च्या धर्मबंधूंपेक्षा 'हिंदू काफराचं' घर सुरक्षित वाटावं हा धार्मिक राष्ट्राचा पराभव नाही?

बोलताना साहजिकच विषय इथल्या हिंदूंकडे वळला आणि ते चटकन म्हणाले, "गेल्यावर्षी एक मध्य प्रदेशातून कुणी महिला पत्रकार आली होती. मी तिला स्पष्ट सांगितले, "तुमच्या देशातल्या मुसलमानांपेक्षा इथे हिंदू जास्त सुरक्षित आणि सुखी आहेत." तिने ते छापल्यावर तिचं ते मॅगेझिन जाळण्यात आलं होतं म्हणे. दलपतांतून एक नटसम्राट डोकावला असं मला वाटलं. हिंदूंच्या इथल्या परिस्थितीबद्दल मी त्यांना नीटसं विचारलंही नव्हतं. देवळं कुठे आहेत? हिंदू किती आहेत? वगैरे जुजबी बोलणंच चाललं होतं. 'त्या' प्रश्नावर मी येणार होतोच. ताकाला जाऊन भांडं लपवणार नव्हतो. पण 'पाकिस्तानात हिंदूंना छळतातच' अशी मनाची ठाम समजूत करून घेऊन मी बोलत नव्हतो. पण दलपतना तो विषय एका झटक्यात संपवायचा होता. कदाचित माझ्याबरोबरच्या एहसान कुरेशीसमोर त्यांना हा विषय टाळायचा असावा. त्यांनी न विसरता माझ्या हॉटेलचा फोन नंबर मात्र घेतला.

त्यांच्या घरून निघताना त्यांनी एहसानला सांगितलं, "क्लिफ्टनवरचं शंकराचं देऊळ दाखवून आण त्यांना." एहसानच्या मोटरसायकलवरून थेट आम्ही क्लिफ्टनला पोहोचलो. समोर समुद्र, बाजूला गोमांस विकणारं मोठं रेस्टॉरंट. एका बाजूला मिनी डिस्नेलॅन्ड उभारण्याचा प्रयत्न आणि त्या सर्वांच्या मध्ये ते जमिनीत तोंड लपवून बसलेलं शंकराचं देऊळ. असा तो देखावा होता.

मी आणि एहसान पायऱ्या उतरून त्या मंदिरात शिरत असतानाच वाळलेल्या काडीसारखा दिसणारा काठेवाडी ब्राह्मण हातातल्या विडीची राख झटकत, बसल्या जागेवरून ओरडला, "हे फक्त हिंदूंसाठी आहे." शरीराच्या मानाने आवाज कितीतरी धारदार होता. तो सुकलेला नव्हता. मी पायरीवर थबकलो. आश्चर्याने! एका अधिकृत इस्लामी राष्ट्रात एका मूर्तिभंजक यवनाला काडीएवढा माणूस इथे येऊ नको म्हणून दरडावून सांगू शकतो? मी राजधानीतली फैसल मशीद बघतानाही कुणी आम्हाला दरडावलं नव्हतं. मी सरळ खाली उतरलो. बूट काढले आणि त्या

पुजाऱ्याला माझी कानाची पाळी दाखवली. तो वरमला. एहसान वर पायरीवरच घुटमळत होता. मी त्याला खाली बोलावलं. ''तो कोण आहे,'' पुजाऱ्याने विचारलं, ''माझा दोस्त, मुस्लिम आहे! पण तो आला म्हणून काय मंदिराचं पावित्र्य बुडणार आहे? आमच्या गोव्यात मंगेशीच्या देवळात ख्रिश्चन मंडळी देवाला कौल लावायला येतात. त्यांना कोण हटकत नाही.'' नको तिथे माझ्यातलं तथाकथित पुरोगामित्व जागं होतंय असा मला संशय यायला लागला. ''तसं नाही साहेब,'' तो पुजारी म्हणाला. एव्हाना मी साहेब झालो होतो. ''काही वेळा ही मंडळी घुसतात आणि उगाच दंगा करतात.''

''असं किती वेळा झालंय?''

''काही वेळा. १९६५ आणि १९७१ च्या युद्धाच्या वेळी मोठ्या प्रमाणावर झालं होतं. कसंबसं पोलीसला बोलवायला आम्ही पळालो.''

''पोलीस आले?''

''हो!''

''म्हणजे इथल्या सरकारने अगदीच दुर्लक्ष केलेलं नाही...'' त्याने मान डोलवली. मग त्याने त्याचा कुलवृत्तांत ऐकवला. किती देवळं भुईसपाट झाली, किती उरली. पंजाबात कशी देवळं तोडली आणि काठेवाडी ब्राह्मणांनी हिंदू धर्माची ज्योत प्रत्येक देवळात कशी तेवत ठेवली इथपर्यंत येऊन थांबला. सर्व सांगताना त्याच्या हातात विडी 'तेवतच' होती. भोळ्या शंकराला उदबत्तीच्या धुराएवढाच विडीचा धूर प्रिय आहे अशी त्याची समजूत असावी.

तिथून शहरातल्या आणखी एका देवळात गेलो. ते जास्त सुदृढ वाटलं. गर्दी जास्त होती. गुजराथीत अंबेमातेची आरती जोरात चालली होती. कराची-सिंधमध्ये जीर्ण वृक्षासारखी काही देवळं उभी आहेत. पण ती जगवण्यासाठी पैशाचं खतपाणी घालायला कुणी हिंदू पुढे येतायत असं दिसत नाही. मुसलमानांनी पाडलेल्या देवळाचेच फक्त हिशेब आम्ही ठेवणार का? आहेत त्याकडे लक्ष कोण देणार?

## ■ २४ ऑक्टोबर १९८७

परवा सकाळी डोळे चोळत उठलो. हातात वर्तमानपत्र घेतलं आणि पुन्हा डोळे चोळले. 'डॉन' ह्या सुप्रसिद्ध पाकिस्तानी वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर दिवाळी साजरी करणाऱ्या पाक-हिंदूंचा फोटो होता. झिया आणि जुनेजोने हिंदूंना शुभेच्छा दिल्या होत्या. अगदी आपल्या धर्मातीत राष्ट्रात ईदला चालतं तसं. त्यादिवशी आर. एस. एस. चे बाळासाहेब देवरससुद्धा मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

देतात. जगातल्या सर्व राजकारणी मंडळींत एक गुण सारखा असतो, नाटकीपणा.

पाकिस्तानात प्रत्येक अल्पसंख्य जमातीभोवती एक वर्तुळ आखून दिलंय. त्या वर्तुळात राहून त्यांनी त्यांच्या धर्माचं पालन करावं. पण वर्तुळाबाहेर पाय पडला की तो निर्दयपणे तोडला जातो. दुय्यम नागरिकत्व लादल्यावर ते व्हायचंच. बंधन लादूनही अल्पसंख्याक जमातीकडे संशयाने पाहिलं जातंच. कालच पेपरात मी बातमी वाचली. कुठल्या तरी एका मुस्लिम लीगच्या नेत्याने पारशी जमातीवर आरोप केला होता, की ते इथल्या काही आदिवासी जमातीतल्या माणसांचं धर्मांतर करताहेत. हा मूर्खपणाचा कळस होता. इस्लाममध्ये धर्मांतराला बंदी आहे हे म्हणण्याएवढं ते मूर्खपणाचं आहे. पारशी इतरांना आपल्यात डोकावू देत नाहीत म्हणून उलट त्यांची जमात दिवसेंदिवस कमी व्हायला लागली आहे आणि त्यांच्यावर हा आरोप?

त्या दिवशी दलपतांकडून आल्यावर दुसऱ्या दिवशी रात्री त्यांचा फोन आला. रात्री अकराचा सुमार होता. ''मी येतोय. दहा-पंधरा मिनिटात लॉबीमध्ये येऊन उभा राहा.'' डोळ्यावर झोप होती, पण नाही म्हणणं जिवावर आलं.

''खरंच पंधरा मिनिटात त्यांची लाल डॅटसन हॉटेलच्या पोर्चमध्ये उभी राहिली. तुम्हाला त्रास दिला, पण रात्री अकराखेरीज मोकळेपणाने गप्पा मारायला वेळच मिळत नाही.'' त्यांचं म्हणणं खरं होतं. पेशाने ते आयुर्वेदिक डॉक्टर. त्यात अख्ख्या कराचीची कावीळ बरी करण्याचा ठेका त्यांनी घेतलाय. पुन्हा त्यात राजकीय, सामाजिक उद्योग. स्वत:च्या पाक-हिंदू क्रिकेट क्लबची धुरा वाहायची. अनेक उद्योग त्यांनी स्वत:ला चिकटवून घेतलेले. क्लिफ्टनच्या समुद्रकिनाऱ्याला चिकटून उभ्या असलेल्या एका हॉटेलात अनारज्युस घेता घेता मी सरळ मुद्द्याला हात घातला.

''तुम्ही काल 'हिंदू'बद्दलच्या विषयाला बगल दिली असं वाटलं.''

''खरंय ते! एहसान कुरेशीसमोर मला त्या विषयावर बोलणं टाळायचं होतं. तो आमचा चांगला दोस्त आहे.''

मग ते बोलले. ''पण मला ते बोलणं अल्लाउद्दीन खिलजीला पद्मिनीचं सौंदर्य आरशातून दाखवण्यासारखा प्रकार वाटला. त्यांचं पूर्ण मन त्यांनी उघड केलंच नाही. मनातल्याचं थोडंबहुत प्रतिबिंब पाहायला मिळालं. साहजिक होतं ते. मी भारतीय असलो म्हणून काय झालं? पत्रकार होतो. तसा अजनबीच. परत त्यांचं सरकार दरबारी वजन. त्यांनी जे सांगितलं त्यातून फारशी ज्ञानात भर पडत नव्हती.

एकदा दुय्यम नागरिकत्व लादलं की काही सुखदु:खं हात धरून येतातच. मतदानाचा हक्क नाही. रस्त्यावर येऊन मोर्चा काढणं आणि अन्याय वेशीवर टांगणं तर नाहीच नाही. तसं करायला कुणी धजतच नाही. कारण ढेकणासारखे चिरडले

जाणार हे त्यांना ठाऊक आहे. अल्पसंख्यांकांचा एक आयोग आहे. जे काय मागायचं असेल ते त्यातर्फे इस्लामाबादच्या बादशहाच्या चरणी ठेवायचं. तो मेहरबान झाला तर सवलतीची एखादी सोनेरी मोहर तो भिरकावणार. ह्यांनी ती झेलायची आणि बादशहाच्या औदार्याला दाद द्यायची.

"तुम्हाला फाळणीच्या वेळी भारतात यावंसं वाटलं नाही?"

"माझ्या वडिलांनी इथेच राहण्याचा निर्णय घेतला. कारण एक तर आमचा व्यवसाय इथे व्यवस्थित वसला होता. स्वत:चं घर होतं. माझं पूर्ण बालपण इथे मुसलमानांतच गेलंय."

"पण त्यावेळी हिंदूंवर हल्ले तर होत असतीलच?"

"पण खरं सांगू, इथल्या मुसलमानांनी आम्हाला चांगलं संरक्षण दिलं. जावेद मियाँदादचे वडील, जावेदचा कोच मेहमूद आणि मी अक्षरश: लहानपणापासून भावासारखे राहत होतो."

महमद अली जीनांची आणि माझ्या वडिलांची चांगली ओळख होती. त्यावेळी कायदेआझमनीही आम्हाला वचन दिलं होतं, "तुम्ही इथेच राहा. पाकिस्तान जरी निर्माण केलं असलं तरी अल्पसंख्यांकांना आम्ही बरोबरीने वागवू." तरीही १९४८ पर्यंत थोडी धाकधूक वाटायची. त्यानंतर भीती निघून गेली. आज तुमचे जसे तुमच्या शेजाऱ्यांशी संबंध आहेत तसे माझे माझ्या मुस्लिम शेजाऱ्यांशी संबंध आहेत."

"युद्धाच्या वेळी त्रास झाला?"

"काही हिंदूंना थोडाफार झाला. हेरगिरीच्या आरोपाखाली काहींना पकडण्यात आलं होतं. पण पाक-हिंदू कोण हे ओळखण्याची जबाबदारी सरकारने कराचीपुरती तरी माझ्यावर टाकली होती. बऱ्याच निरपराध हिंदूंना त्यावेळी वाचवलं."

"इथे हिंदूंमध्ये गुजराथी जास्त दिसतात."

"खरंय! पण सिंधी आहेत. मेहतर आहेत. ते वेगळेच राहतात. तुमचे मराठीही आहेत."

"एखाद्या मराठी माणसाला भेटता येईल?"

"उद्या मोहन गायकवाडला पाठवून देतो हॉटेलवर."

मोहन गायकवाडला ओळखायला मला वेळ लागला नाही. टिपिकल मराठी माणूस होता. काटक, गरीब, सावळा, सायकलवरून आल्यामुळे पँटीला क्लिप लावून ती वर घेतलेली. मी त्याला घेऊन जेवायला गेलो. पुन्हा नेहमीची मुलाखत झाली. प्रश्न तेच होते. उत्तरंही तीच होती. पण तपशीलात थोडा फरक. थोडंसं जास्त भडक. कारण तो सरकार दरबारी नव्हता. फाळणीच्या वेळचं कराचीतलं

अग्निकुंड त्यानं सविस्तर सांगितलं. धर्मांतराच्या कथाही सांगितल्या. जवळपास सत्तर मराठी कुटुंबं तिथे राहतात. स्वत: मोहन गायकवाड एका सिंधी माणसाच्या ॲडव्हर्टायझिंग कंपनीत आहेत. पण तिथल्या हिंदूंच्या आर्थिक परिस्थितीत विषमता फार मोठी आहे. काही सिंधी-गुजराथी बिझनेसवाले सोडले तर बरेच खाजगी कंपनीत चाकरी करतात. काही बंदरावर आहेत. हिंदूंमध्ये चौथ्या श्रेणीच्या कामगारांची संख्या फार मोठी आहे. प्रमोशन मिळताना किंवा नोकरी मिळताना धर्म बऱ्याच वेळा आडवा येतो.

पण मोहन गायकवाडने काही गोष्टी फार इंटरेस्टिंग सांगितल्या. त्यांना मिळणाऱ्या मर्यादित धर्मस्वातंत्र्यात ते दिवाळी साजरी करतातच, पण गणपतीची मूर्ती बसवून गणपतीउत्सवही साजरे करतात. मराठी कुटुंबांतली बरीच मंडळी 'मराठा' जमातीतली आहेत.

मी त्यांना म्हटलं, ''तुम्ही मुलामुलींच्या लग्नाचं काय करता? इथल्या जवळपासच्या कुटुंबातच सोयरिक जुळवता?''

''छे, छे! आमच्या इथे काही पुण्याहून आलेल्या सुना आहेत. पुण्याला खडकीजवळ आमचे बरेच नातेवाईक राहतात.''

''पण तिथल्या मुली पाकिस्तानात यायला तयार होतात?''

''निदान आजपर्यंतचा तरी अनुभव आहे.'' मला हा धक्का होता.

पण त्यांना एक फार मोठी भीती वाटते ती मातृभाषेच्या उच्चाटनाची. नव्या पिढीचं शिक्षण उर्दूत होतं. त्यांच्या आईवडिलांनी त्यांना लिहायला मराठी शिकवलं तरच त्यांचा मराठीशी व्यवस्थित संबंध राहणार आणि हे पिढ्यान्‌पिढ्या पुढे चालायला लागेल.

मोहन गायकवाडला निरोप देऊन हॉटेलवर परत येतो तर हॉटेलच्या रिसेप्शनिस्टने एक चिठ्ठी दिली. तिथल्या भारतीय वकिलातीच्या श्री. शर्मांनी दिवाळी साजरी करायला घरी बोलावलं होतं. शर्मा स्वत: येऊन मला आणि अमृत माथूर ह्या माझ्या पार्टनरला त्यांच्या घरी घेऊन गेले. तिथून ते 'शिवाजी कोर्ट' ला घेऊन गेले. कराचीत चक्क 'शिवाजी'च्या नावाने वसाहत? हा दुसरा धक्का होता. भारतीय कॉन्स्युलेटमध्ये काम करणाऱ्यांची ती वसाहत होती. कुणी शर्मा, कुणी वर्मा आणखी कुणाकुणाच्या ओळखी झाल्या. हिरवळीवर चक्क फटाके लावून दिवाळी साजरी झाली. वीस-पंचवीस कुटुंबं नटूनथटून तिथे जमली होती. विषय पुन्हा तेच क्रिकेट, अल्पसंख्यांक, इस्लामी राष्ट्र, धर्मांतर वगैरे. पाकिस्तानसारख्या देशात सुरुवातीला हे विषय चघळायला बरे वाटतात. पण नंतर त्याचा कंटाळा यायला लागतो. कारण शेवटी इस्लामिक राष्ट्र म्हटल्यावर टीचभर इतर धर्मीयांना ते नंदनवनात ठेवणार

नाहीत ही काळ्या दगडावरची रेष आहे.

पण मला मजा वाटते हिंदूंचीसुद्धा! हिंदू धर्माच्या बाबतीत कडवे नसतील. पण संस्कृतीची आणि धर्माची नाळ त्यांनाही जगाच्या पाठीवर कुठेही तोडता येत नाही. देश सोडताना ते बॅगेत इतर सामानाबरोबर आपली संस्कृती, आपला धर्म, आपला प्रांतीयवाद, आपला जातीयवादही बॅगेत भरतात. जिथे जातात तिथे छोटासा स्वत:पुरता हिंदुस्थान तयार करतात. जिथे गेलोय त्यांच्यात आपण पूर्णपणे मिसळलोय असं दृश्य ना इंग्लंडमध्ये दिसलंय, ना जर्मनीत, ना बँकॉकला, ना सिंगापुरात. ठीक आहे, संस्कृती आणि रोजच्या व्यवहारापुरता लाभणारा हा धर्म तोडणं कठीण असतं. किंबहुना, पृथ्वीच्या पाठीवर कुठेही गेलो तरी आपला वारसा जपून ठेवणं हा सद्‌गुण मानला जातो. इतर धर्माचे लोकही काही वेगळं करत नाहीत. पण त्याबाहेर तयार केलेल्या हिंदुस्थानात पुन्हा छोटा गुजराथ, छोटा सिंध, छोटा महाराष्ट्र आणि गावकुसाबाहेर मेहतरांचा महारवाडा वसवण्याची खरंच काय गरज असते का? तो 'उच्च' तो 'हलका' ही भावना अंगावरच्या केसांसारखी आपल्या शरीरात रुतलेली आहे, ती बहुधा सरणावरच संपते.

आणखी एक किस्सा! एका 'हिंदू'च्या दुकानात गेलो. क्रिकेटवरून बोलताना तो म्हणाला, ''हिंदुस्थान आणि पाकिस्तान जर फायनलला आले तर कलकत्त्याला ह्या लांड्यांना जोरदार चोप द्या. माजले आहेत.'' मी म्हटलं, ''आमच्याकडे पाकिस्तान जिंकल्यावर जर मुस्लिम वस्तीत फटाके उडवले तर आमच्या तळपायाची आग मस्तकात जाते. अजूनही ते राष्ट्रीय प्रवाहात येत नाहीत म्हणून आम्ही त्यांना लाखोली वाहतो. अराष्ट्रीय म्हणतो आणि तोच निकष तुम्हाला लावला तर...?''

विजेचा शॉक बसावा तसा तो उडाला. स्वत:ला सावरलं. एका तराजूजवळ मला घेऊन गेला आणि म्हणाला, ''मी सांगतो ते नीट ऐक! हा देश पहिल्यापासून माझा आहे. ह्यांनी त्याचा पाकिस्तान केला.'' आणि तराजू दाखवत म्हणाला, ''तुमच्याकडे हिंदू असो, मुसलमान असो, ख्रिश्चन असो की शीख, एकाच तराजूत त्याला तोललं जातं. तराजूचा काटा स्थिर असतो. तो सुईभरही इथे तिथे सरकत नाही. आमच्याकडे ती परिस्थिती नाही. एका पारड्यात शंभर किलोचं वजन आणि एका पारड्यात शंभर ग्रॅमसुद्धा नाहीत. समजलं! खुदा हाफिज.''

## ■ २७ ऑक्टोबर - १९८७

फैसलाबादहून पुन्हा कराचीत काल आलो. गडहिंग्लज किंवा आटपाडी वगैरेहून मुंबईला आल्यावर जसं वाटेल तस वाटलं. सौदी अरेबियाच्या फैसलने

पाकिस्तानात एवढा पैसा ओतलाय की जिथे तिथे फैसलचं नाव दिसतं. फैसलाबाद म्हणजे धूळ, धुकं ह्यांच्या बुरख्यात घुसमटणारं शहर आहे. मॅच कधी संपते असं झालं होतं.

तिथे कापड फार स्वस्त मिळतं. पाकिस्तानात स्वत:चे उद्योगधंदे कमी आहेत. बहुतेक वस्तूंसाठी त्यांना परदेशाकडे डोळे लावून बसावं लागतं. पण तिथे कापड उद्योग बऱ्यापैकी आहे. तिथल्या कापड बाजारात फिरत असतानाच एका दुकानात मला तो अन्वर कुरेशी भेटला. एका दुकानाचा छोटा मालक. गोरापान, पंचवीसच्या आसपास वय असावं. कापड बघता बघता नेहमीची मेहमाननवाझी झाली. आधी चहा, मग बोतल (बोतल म्हणजे कोल्ड ड्रिंक हं! 'ते' नाही) डिस्काऊंट झालं आणि निघताना तो अन्वर कळवळून म्हणाला, "तुम्ही माझं एक छोटं काम कराल? हे माझं कार्ड. त्यावर माझा पत्ता आहे. मुंबईला तुम्ही गेल्यावर मला पत्र लिहा. त्यात तुम्ही मला भेटल्याचं, आपली दोस्ती झाल्याचं लिहा आणि मुंबईला यायचं आमंत्रण द्या. लिहाल ना पत्र?"

"पत्र मी जरूर पाठवीन. पण त्यामागचं कारण मला कळलं नाही." मी त्याला विचारलं.

"कारण एकच. मला मुंबईला यायचंय. मला मुंबई पाहायचीय. ताजमहाल पाहायचाय. माझे तिकडे कुणी नातेवाईक नाहीत. दोस्त नाहीत. त्यामुळे मला व्हिसा मिळत नाही. मला खरंच तुमचा देश पाहायची इच्छा आहे. मी तुम्हाला तिथे त्रास देणार नाही. मी हॉटेलात राहीन. तुमच्यासाठी कापडं घेऊन येतो. पाहिजे तर पैसे देतो. पण एक पत्र पाठवा. बघा विसरू नका."

त्याचं कळवळणं मनाला खरंच चाटून गेलं. आपणही व्हिसा देताना पाकिस्तानइतकेच कडक राहतो असं एकंदरीत दिसतंय.

पण ही माणसं व्यक्तिगत पातळीवर जेवढं प्रेम दाखवतात तेवढीच ती देशाचा आणि धर्माचा प्रश्न आला की कडवट होतात. हा एक मोठा विरोधाभास तिथे पाहायला मिळतो. भारताबद्दल त्यांच्या मनात कोपऱ्यात कुठे तरी द्वेष जडलाय ह्याची जाणीव मधूनच होते. दोन युद्धांनी आणि विशेषत: पराभवांनी त्यांचं मन कलुषित झालंय. अखंड हिंदुस्थान खंडित झाल्यामुळे जेवढं दु:ख आपल्याला झालं तेवढंच बांगला देश पाकिस्तानातून फुटून बाहेर पडल्यामुळे त्यांना झालंय. 'मेहमान' म्हणून आलेल्या भारतीयांना ते मनापासून आदर दाखवतात. पण म्हणून त्यांना भारताबद्दल आदर आहे असं मानण्याची गरज नाही. असेलच तर तो भीतीयुक्त आदर आहे. 'खलिस्तान'बद्दल खोदून खोदून विचारताना त्यांना गुदगुल्याच होत असतात. पाकिस्तानची खलिस्तानवाल्यांना मदत हा त्यांना बांगला देश निर्मितीवर

उगवलेला सूड वाटतो.

भारत हा आक्रमक देश आहे आणि पाकिस्तानला चिरडून टाकणे हा त्यांचा मनसुबा आहे अशी ठाम समजूत तिथल्या राज्यकर्त्यांनी आणि त्यांच्या हातातलं खेळणं बनलेल्या वर्तमानपत्रांनी आम जनतेची करून दिलीय. त्या बातम्या वाचल्या की पाकिस्तान किती पापभीरू आहे आणि भारताचा पाकिस्तानी भूमीवर कसा डोळा आहे असं आपल्यालाही वाटू लागतं. भुत्तोकन्यका त्यात भलतीच आघाडीवर आहे. तिच्या बापाने भारताशी हजार वर्षं लढण्याची घोषणा केली होती. ही तो वारसा चालवते. भारतावर आगपाखड, हे चलनी नाणं असल्यामुळे परवाच तिने झिया उल हकवर टीका करताना म्हटलं, ''देशाचे जवान सियाचेनमध्ये धारातीर्थी पडतायत. पाकिस्तानची पवित्र भूमी रक्तबंबाळ होतेय. तिथलं 'कायदे आझम पोस्ट' हिंदुस्थानने जिंकून त्याचं 'गांधी पोस्ट' असं नामकरणही केलंय आणि ह्या झियाला जयपूरमध्ये क्रिकेटची मॅच पाहणं सुचतंय. भारताला चोख उत्तर देण्याऐवजी हे महाभाग दोस्तीचा हात पुढे करतायत.''

आपल्याप्रमाणे त्यांना पाकिस्तानची भारताशी तुलना करण्याची सवय आहे. काल कराची क्रिकेट असोसिएशनने दिलेल्या पार्टीत इथल्या एका पत्रकाराने कराचीत आल्यापासून अनेकांनी विचारलेला प्रश्न विचारला, ''कसं काय वाटलं पाकिस्तान?''

मी म्हटलं, ''तुमच्या आदरातिथ्याने भारावून गेलोय. तुम्ही मुंबईला आल्यावर त्याची परतफेड करणं जमेल की नाही ह्याची मला शंका वाटते.''

मी त्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवत नव्हतो. मनापासून बोलत होतो. पण तेवढ्यात त्याने डोक्यावर बसण्याचा प्रयत्न केला.

इतक्यात पुढचा प्रश्न आला, ''कराची कसं वाटतं मुंबईच्या तुलनेत? मुंबईचे काही भाग किती गलिच्छ आहेत नाही?'' त्याने हळूच चोच मारली.

म्हटलं, ''आहेत खरे! पण मी कराची कुठे पूर्ण पाहिलंय. उद्यापासून एहसान कुरेशीच्या मोटारसायकलवरून भटकणार आहे कराची बघत.''

''पण क्लिफ्टनचा समुद्रकिनारा कसा वाटला, मरीन ड्राइव्हच्या तुलनेत?'' माणूस हटायला तयार नव्हता. पाकिस्तानातल्या कोरड्या पार्टीत 'सरबत'ही चढतं ह्याची कल्पना नव्हती.

मी म्हटलं, ''आमच्या मरीन ड्राईव्हला 'राणीचा नेकलेस' म्हणतात आणि तो अस्सल मोत्याच्या नेकलेससारखा वाटतो. क्लिफ्टनचा किनारा 'इमिटेशन'च्या मोत्यांचा नेकलेस वाटतो. खऱ्याचा आभास निर्माण करणारा. पण तरीही नकलीच.'' तो वरमला. पण दुसऱ्या सरबताच्या ग्लासाबरोबर त्याने आणखी एक प्रश्न छेडला.

हा प्रश्नसुद्धा तिथे अनेकांच्या डोक्यात उपटणारा, ''आर्थिकदृष्ट्या इथला मध्यमवर्ग तुमच्यापेक्षा जास्त सुखी आहे असं वाटत नाही?''

म्हटलं, ''नक्कीच आहे इथे साधा मध्यमवर्गीय गाड्या उडवतोय, चांगल्या फ्लॅटमध्ये राहतोय. सुबत्ता त्याच्या कपड्यातून, त्याच्यावर मारलेल्या सेंटमधूनही येतेय हे मी डोळ्याने पाहतोय. पण मी थोडंसं बोलू? राग येणार नाही?''

''जे मनात आहे ते बोलून टाक'', त्याने एका क्षणात 'अभयदान' दिलं.

मी शांतपणे त्याला ऐकवलं, ''तुमची जी आर्थिक सुबत्ता आहे ती एखाद्या सुमार मुलीने मेकअप, पॅडिंग करून आणि सुंदर कपडे घालून रूपगर्विता म्हणून मिरवण्यासारखं आहे. तो जो तिचा मेकअप आहे ना तो गल्फकडून येतो. ते पॅडिंग अमेरिकेच्या सौजन्याने तुम्हाला मिळतं आणि तुमच्याकडे जो अफू, गांजा, चरसचा व्यापार चालतो ना सरकारच्या अनधिकृत आशीर्वादाने, ते सुंदर कपडे देतात. तिचं सौंदर्य स्वयंभू नाही. आम्ही गरीब आहोत. आम्हीसुद्धा इतर देशांची मदत घेतो, पण मिंधे होत नाही. अमेरिकन किंवा रशियन एअरबस आमच्याकडे नाही.''

त्याने सरबताचा ग्लास भरला की नाही माहीत नाही, पण तो नंतर माझ्याजवळ फिरकला नाही.

## ■ ३० ऑक्टोबर १९८७

इथे धार्मिकपणा, देवभोळेपणाच्या रोज वेगळ्या छटा पाहायला मिळतात. धार्मिकपणा आपल्याकडेही आहे. अगदी काठोकाठ भरलेला. मेळे, जत्रा, देवळापुढे रांगा, नवस अशा अनेक प्रकारांतून तो ओसंडून वाहतो. पण तो जास्त वैयक्तिक पातळीवरचा असतो. क्रिकेटची मॅच आपण हरतोय म्हणून स्टेडियमवर भजनं चालली आहेत, कुणी गीता वाचतोय, वेदमंत्राचा घोष चाललाय असं दृश्य दिसत नाही. तिथे अशी धमाल पाहायला मिळते. लाहोरला वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानची परिस्थिती गंभीर झाल्यावर महिलांच्या स्टॅण्डमध्ये त्या महिलांनी चक्क दुपट्टा पसरून नमाज पढायला सुरुवात केली आणि पाकिस्तान जिंकल्यावर अल्ला-हो-अकबरच्या आरोळ्यांनी स्टेडियमच्या जाड भिंतीही शहारल्यासारख्या वाटल्या.

ती मॅच संपल्यावर मी पाक बोर्डाचे अध्यक्ष जनरल सफदर बटना काही कामासाठी भेटायला गेलो होतो. सामना जिंकल्यामुळे त्यांनी मिठाई वगैरे मागवली होती. माझ्या हातात बर्फी ठेवली आणि म्हणाले, ''अल्लाने खैर केली.'' इतपत ठीक होतं. लगेच पुढचा बॉल त्यांनी टाकला, ''अल्लानेच वॉल्शला तसा चेंडू

टाकायला मजबूर केलं असावं.'' मी उडालो. न राहवून म्हणालो, ''अल्लाला क्रेडिट द्या. पण कादिरलाही द्या. त्याने प्रसंगावधान राखून षटकार मारला.'' माझ्याकडे त्यांनी क्षणभर पाहिलं आणि पुढचा बॉल टाकला, ''पण कादिरला मारायची ताकद कुणी दिली? अल्लानेच ना?'' मी हा बॉल सोडून दिला. त्यावर कुठलाही फटका मारायची ताकद माझ्यात नव्हती. कराचीच्या मॅचच्या वेळी एक प्रेक्षक मला सांगत होता. ''पाकिस्तानचा सामना सुरू झाला की घराघरातून कुराण-वाचन सुरू होतं. माझ्या अब्बाजानना क्रिकेटमधलं काय कळतं? पण गेल्या लाहोरच्या सामन्याच्या वेळी माझा चेहरा पाहून त्यांनी विचारलं, ''काय रे पाकिस्तान हरतंय?'' मी म्हटलं बहुधा हरणार. लगेच त्यांनी कुराण उघडलं. त्यांचं वाचन संपलं आणि पाकिस्तान जिंकलं. आमची श्रद्धा ही अशी आहे.''

इथे नमाज पढण्यासाठी विमानतळावर खास मोठमोठाली दालनं उभी केली आहेत. नमाजची वेळ झाली की सुटाबुटातला माणूससुद्धा अल्लासमोर वाकतो. आपल्या टी. व्ही.वर सर्वधर्मसमभावाचे नगारे वाजतात. तिकडे इस्लामचे वाजवतात आणि तेही जास्तीत जास्त कर्कशपणे! मेंदूला मुंग्या आणणारा हा प्रचार आहे.

परवा एहसानबरोबर क्लिफटनला भुत्तोच्या स्वप्नातला कॅसिनो पाहिला. भग्नावस्थेतल्या शिल्पासारखी ती इमारत समुद्राला खेटून उभी आहे. भुत्तोला कराचीचं पॅरिस करायचं होतं. परदेशी प्रवाशी आकर्षित करण्यासाठी. पण त्याच्यावर नंतर इस्लामचा रणगाडा फिरवला गेला.

मी एहसानला म्हटलं, ''कराचीचं पॅरिस होणं जाऊ देत. पण तरुण-तरुणींना मिसळायलाही बंदी आहे तुमच्या देशात. असे मुक्तपणे फिरतायत, एकत्र बसून गप्पा मारतायत, हास्यविनोद चालले आहेत असं एक तरी दृश्य मला तुमच्या ह्या सर्वात सुधारलेल्या शहरात दाखवशील? मी तुमच्या मध्यमवर्गीयांबद्दल बोलतोय. मुलींनी अमूक कपडे घालायचे नाहीत. खेळ खेळायचे नाहीत असे निर्बंध टाकले जातात. तुमच्याकडे विद्रोहाचा आवाज उठत नाही?''

''तुझं उत्तर देण्याऐवजी मी तुला एका ठिकाणी घेऊन जातो. नाही तरी तुला कराचीचा बकाल भाग बघायचा होता ना?'' तो मला म्हणाला.

खरंच तो भाग बकाल होता. सुंदर, तलम साडीला गोणपाटाचं ठिगळ लावावं तसं कराचीला लागलेलं ते ठिगळ होतं. निग्रोसारखी दिसणारी जमात त्याने मला दाखवली. ''ती मूळची तिथल्याच मातीतली... पिढ्यान् पिढ्या तिथे राहतात. त्यांना मकराना म्हणतात. पिढीजात कामधंदा सुपारी घेऊन खून, मारामाऱ्या वगैरे! एकेकाळी भुत्तोचे एकनिष्ठ पाईक; पण ज्या दिवशी भुत्तोला सुळावर चढवण्यात आलं त्या दिवशी ह्या जमातीलाही रस्त्यावर येऊन बंड करायची हिंमत झाली नाही.



१५-प्रवास
११८५
२८७२५

झिया राजवटीविरुद्ध बंड करणं इतकं सोपं नाही. हल्ली काही क्षीण आवाज उठतात. त्यात महिलांचेही असतात. पण ते आवाज जास्त मोठे झाले की क्रूरपणे दाबले जातात. दुसरी गोष्ट आमचा मध्यमवर्गीय समाज धर्माच्या बाबतीत तसा मागासलेला आहे. प्रेमविवाह सहसा होत नाही. लग्नाअगोदर हिंडणं-फिरणं नामंजूर असतं. मात्र आमचा लग्नसोहळा बघण्यासारखा असतो. माझ्या लग्नाला ये.''

' पुढच्या दहा मिनिटात धर्म त्यांच्या अंगात मुरला आहे हे त्याने दाखवून दिलं. लघुशंका झाली म्हणून मी तिथेच आडोशाला गेलो. कारण त्या दलदलीत मूतारीपेक्षा आडोसाच स्वच्छ होता. मी एहसानला म्हटलं, ''तूही आटपून घे.'' तो म्हणाला, ''शक्य नाही. इथे कागद किंवा वीट नाही. लघवीचा एक थेंब अंगावर पडणं अपवित्र मानतो आम्ही. मला जाऊन आंघोळ करावी लागेल.''

वाटेत त्यानेच चरसचा एक अड्डा दाखवला. अगदी राजरोसपणे चाललेला. आयुष्यात पहिल्यांदा मी असा अड्डा पाहत होतो. आजूबाजूला कचऱ्याची दुर्गंधी आणि मध्ये धुंद झालेली पाकिस्तानी तरुण पिढी आणि काही मध्यमवयीन. मला शिसारी आली.

एका बाजूने धर्माची अफूची गोळी अधिकृतपणे दिली जातेय. दुसऱ्या बाजूने चरसचा सैतान गिळायला सिद्ध झालाय. परवाच 'डॉन' मध्ये रिपोर्ट वाचला. प्रत्येक सात पाकिस्तानी माणसामागे एक माणूस चरसी असतो.

कुठल्या नैराश्याला ते वाट करून देतायत? त्यांचं गुदमरलेलं यौवन? की त्यातून निर्माण होणारी विकृती? की क्वचितप्रसंगी शरीराने केलेलं बंड आणि त्यातून उद्भवणारा तथाकथित व्यभिचार आणि मग ती दगडांनी ठेचून मारण्याची क्रूर शिक्षा?

की गल्फमध्ये गेलेल्या बापाविना वाढणारी मुलं चटकन त्याकडे ओढली जातात? कारण घरी कुटुंबाची जबाबदारी आईवर येऊन पडलेली असते आणि दबल्या गेलेल्या मुस्लिम स्त्रीला ती पेलवणारी नसते.

की भाडोत्री श्रीमंती त्यांना वाकड्या वाटेवर आणून सोडते?...

की एका प्रचंड सोनेरी मध्ययुगीन पिंजऱ्यात राहिल्यामुळे येणाऱ्या वैफल्याला तिथे वाट मोकळी करून दिली जातेय?

## ■ २ नोव्हेंबर १९८७

परवा कराचीत कायदेआझम महमद अली जीनांच्या समाधीच्या पायऱ्या चढताना एहसानने मला हळूच खोचक प्रश्न केला,

"या पायऱ्या चढताना तुझे पाय जड होत असतील ना? कायदे आझमबद्दल तुमच्या मनात राग असेल ना? तुला ठाऊक आहे, ह्या कबरीसाठी आम्ही तुमच्या सरकारकडे संगमरवर मागितला होता. त्यांनी तो नाकारला."

मी एहसानला म्हटलं, "हे सुंदर स्मारक मला पाहून घेऊ दे. मग मी तुझ्या प्रश्नांची उत्तरं देतो."

विटकरी रंगाच्या उंच संगमरवरी कमानींच्या बाहुपाशात विसावलेला तो सुंदर घुमट किंचितशा उंच हिरव्यागार फुलझाडांनी नटवलेल्या टेकडीवर एखाद्या मुकुटासारखा विसावलेला वाटतो. दलपतांकडे जाताना किंवा विमानतळावर चकरा मारताना तो वारंवार खुणवत असे. खरी कबर तळघरात असली तरी त्याचं 'मॉडेल' वर आहे. आजूबाजूच्या भिंतीवर कुराणांची वचनं रेखाटली आहेत. वातावरणात एक प्रकारची शांतता, गांभीर्य मुरलेलं वाटतं.

तिथून बाहेर पडून एहसानने मोटरसायकलची किक मारायच्या आधी मी सांगितलं, "सौदर्याशी शत्रुत्व करायला आम्हाला कुणी शिकवलेलं नाही. मग ती स्त्री असो, एखादं शिल्प, मशीद किंवा स्मारक. त्याच्यावर धर्म, देश, दोस्त, दुश्मन असा कुठलाही स्टॅम्प नसतो. आणखी एक गोष्ट ऐक, आम्ही जेव्हा आमच्याकडचा शिवाजीचा प्रतापगड बघायला जातो ना, तेव्हा येताना अफझुलखानाचीही कबर बघतो. मरणानंतर वैर आमच्या संस्कृतीत बसत नाही."

"अरे, तुझी गंमत केली, एवढं काय मनावर घेतलंस?" असं म्हणत त्याने मोटरसायकल सुरू केली. एका जुनाट वाड्यासमोर त्याने मोटरसायकल थांबवली आणि म्हणाला, "हा कायदेआझमचा वाडा. पूर्वी कुणा हिंदू मारवाड्याचं घर होतं."

आता गंमत करायची पाळी माझी होती. मी म्हटलं, "शेवटी तुमचे कायदे आझमही 'मुहाजिर'च. त्यांचं स्वत:चं घर कुठे होतं? कुणा पळालेल्या हिंदूच्या घरातच आसरा घेतला."

एहसान मनापासून हसला आणि म्हणाला, "चल तुला आणखी आम्ही हिंदूंची पळवलेली घरं दाखवतो." आणि कराचीच्या एका जुन्या भागात त्याने मला फिरवलं. ती घरं गजबजलेली होती. मुलाबाळांनी भरलेली. बाहेर खाटली टाकून म्हातारी मंडळी विड्या फुंकत बसली होती. पण त्या इमारतीच्या मुक्या म्हाताऱ्या भिंतींनी त्यांच्या ऐन जवानीत मनुष्याला हिंस्र पशू होताना पाहिलं होतं. निर्जीव भिंतींनाही आक्रोश करण्यासाठी कंठ फुटावा असा रक्तपात पाहिला होता. त्यांच्यावरचे रक्ताचे डाग कधीच पुसले गेले होते. नव्या राजवटीचा चढलेला चुनाही आता उतरला होता. उरल्या होत्या फक्त आठवणी!

एहसान मला म्हणाला, "एकदम गंभीर झालास?"

"थोडासा", मी म्हटलं. त्या मुक्या जीर्ण भिंती वरच काही सांगताहेत असं वाटत होतं.

एहसान ऑफिसकडे निघून गेल्यावर मी म्युझियममध्ये गेलो तिथे काही खास नव्हतं. एका दालनात त्यांचा चित्रमय इतिहास होता. तो काय होता हे मी सांगायची गरज नाही. मोगल साम्राज्यापासून थेट सर सय्यद अहमदपर्यंत आणि तिथून जीनांपर्यंत हिंदुस्थानात 'पाकिस्तान' कसं पहिल्यापासून होतंच हे सांगण्याचा प्रयत्न होता. प्रत्येक राष्ट्र आपल्या सोयीचा इतिहास नक्कीच लिहीत असतो. पण महात्मा गांधींच्या फोटोखाली 'हिंदूंचे पुढारी' असा अपमान करण्याची गरज नव्हती. गोडसेच्या गोळ्यांपेक्षा ते शब्द मला जास्त क्रूर वाटले.

दुसऱ्या दालनात मोहेंजोदडो वसवलं होतं. ख्रिस्तपूर्व पाच हजार वर्षांपूर्वीच्या एका वैभवशाली मानवी प्रगतीच्या त्या खुणा होत्या. विटा आणि मातीपासून बनवलेली घरं. घरातली न्हाणीघरं, शहराची ड्रेनेज सिस्टीम, तेव्हाचे प्रचंड कम्युनिटी हॉल वगैरेचे फोटो तिथे लटकवलेले होतेच, पण त्याचबरोबर सुती आणि लोकरीचे कपडे, शंख-शिंपले आणि हस्तिदंतापासून बनवलेले दागिने, टेराकोटाची भांडी, वेगवेगळ्या प्राण्यांची चित्रं असलेली नाणी तिथे ठेवली होती. त्यावेळची प्रगती प्रत्यक्ष डोळ्याने पाहताना माणूस वेडावून जातो. लगेच मनात मोहेजोदडो बघायची इच्छा निर्माण झाली. कराचीपासून ते फार जवळ आहे.

तिकडून तडक मी मोहेंजोदडोच्या तिकिटाची चौकशी केली. फक्त तीनशे रुपयांत सकाळी जाऊन संध्याकाळी येता येणार होतं. इतक्यात माझ्या लक्षात आलं, की व्हिसावर मोहेंजोदडोला जाण्याची परवानगी नाही. मी आपल्या कॉन्स्युलेटमधल्या शर्मांना फोन केला. म्हटलं, "मोहेजोदडोला जाऊन येऊ शकतो का मी?" त्यांनी धोक्याचा झेंडा फडफडवला. "व्हिसावर तुम्हाला परवानगी नसेलच. ती घेतल्याशिवाय जाऊ नका. सी. आय. डी. पाठीवर असतातच. तिथे जर तुम्हाला पकडलं तर तुम्हाला सोडवणं आम्हाला कठीण जाईल. कुठलाही ठपका ते तुमच्यावर ठेवू शकतात. हेरगिरीचासुद्धा!" आपलीच संस्कृती किती परकी वाटायला लागते अशा वेळी.

मुंबईचे वेध लागायला लागले आहेतच. तडक पी. आय. ए. चं ऑफिस गाठलं. तिकडच्या एका ऑफिसरच्या दिवसभराच्या प्रयत्नांनंतर अखेर स्पेशल चार्टर केलेल्या विमानात तिकीट मिळालं. त्याचे आभार मानताना मी म्हटलं, "हे माझं कार्ड, मुंबईला आलात तर फक्त फोन करा आणि आमची मेहमाननवाझी पाहा."

तो खिन्न हसला आणि म्हणाला, "ते शक्य नाही"

मी म्हटलं, ''का?''

तो लगेच उसळून म्हणाला, ''मी अख्खं जग पाहिलंय. पण भारतात जाऊ शकत नाही. कारण पी. आय. ए. संरक्षण मंत्रालयाखाली येत असल्यामुळे मला व्हिसा मिळणं शक्य नाही. पण खरं सांगू, ह्या दोन देशांची माणसं जवळपास एकाच संस्कृतीने बांधली गेली असूनही मनाने खूप दूर गेली आहेत. इंग्लंड-जर्मनी चक्क दोन महायुद्धात एकमेकांसमोर उभे ठाकले. जर्मन देशाचंही विभाजन झालं, पण आजही इंग्लिश माणूस नुसत्या पासपोर्टवर जर्मनीत येतो आणि जर्मन माणूसही तसाच इंग्लंडमध्ये जातो. ही गोष्ट त्या दोन देशांत होऊ शकते, तर फक्त एका भौगोलिक रेषेने विभागल्या गेलेल्या दोन देशांमध्ये एवढा समझोता का असू नये? त्याने माणसं जास्त जवळ येतील. त्यामुळे तेढ वाढणार नाही. उलट ती कमी होईल. आपण एकमेकांचा नाहक द्वेष करतो हे लक्षात येईल.''

## ■ ४ नोव्हेंबर १९८७

परतीच्या विमानात बसून डायरीच्या शेवटच्या चार ओळी लिहितोय. पाणावलेले डोळे अजूनही नीटसे सुकलेले नाहीत. निघताना कराचीच्या विमानतळावर अगदी गदगदून मिठी मारून 'खुदा हाफिज' म्हणताना माझा मित्र एहसान कुरेशीच्या डोळ्यांत पाणी तरळलंच, पण माझेही डोळे पाणावले. पावलं उचलणं जड जातंय ह्याची जाणीव व्हायला लागली. पाकिस्तानहून निघताना असं काही होईल असं मुंबई सोडताना अजिबात वाटलं नव्हतं. माझ्या विमानात अख्खी विजयी ऑस्ट्रेलियन टीम होती. काही नट-नट्यांच्या हास्यविनोदाचा जल्लोष चालला होता. पण माझ्या डोळ्यांतलं पाणी सुकत नव्हतं. आणि सतत त्या पी. आय. ए.च्या ऑफिसरची वाक्यं कानात घुमत होती.

विचार करायला लावणारं तो बोलून गेला होता.

*(अक्षर दिवाळी १९८८)*

# साहेबावर सत्ता

जून महिन्यात लंडनच्या केन्सीग्टन पॅलेसमध्ये एक डीनर पार्टी होती. खाना देणारी असामी होती अर्थातच 'प्रिन्स ऑफ वेल्स' - प्रिन्स चार्लस्! लंडनमधले निवडक 'कुबेर' आपल्या श्रीमंतीची शान मिरवत पार्टीला येत होते. कुणाची रोल्स रॉईस, कुणाची पोर्शे, कुणाची फेरारी यायची. शोफर उतरून दार उघडायचा आणि त्यातून उतरणारा कुबेर त्याच्या हॅरॉड्स किंवा तत्सम उच्चभ्रू 'सुपर मार्केट'मधून घेतलेल्या कपड्यावरच्या ख्रिश्चन डियॉर किंवा शॅनेलचा सुवास वातावरणात मिसळत पॅलेसमध्ये शिरायचा.

जेवता जेवता प्रिन्सच्या 'यूथ बिझनेस ट्रस्ट'चा विषय निघाला. (हा ट्रस्ट इंग्लंडमधल्या तरुण उद्योजकांना धंद्यात पाय रोवण्यासाठी मदत करतो.) ह्या ट्रस्टसाठी पैसे उभारण्याची कल्पना कुणीतरी बोलून दाखवली. प्रिन्स ऑफ वेल्सचं एक हास्य ह्या कुबेरांना त्यांच्या चेकबुकाला हात घालायला लावायला पुरेसं होतं. कुणी पंचवीस हजार पौंडाचा चेक फाडला. कुणी चेकवर पन्नास हजाराचा आकडा घातला. ज्यांना हे आकडेसुद्धा 'बिलो डिग्निटी' वाटले त्यांनी एक लाख पौंडाचा (साधारण ३५ लाख रुपये) चेक फाडला. बघता बघता प्रिन्सच्या पायाशी पन्नास लाख पौंडाचे चेक पडले.

त्या डीनर पार्टीच्या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट अशी होती, की ते सर्व कुबेर आशियाई खंडाशी नातं सांगणारे होते आणि त्यातले बहुसंख्य भारतीय किंवा पाकिस्तानी रक्ताचे होते. तिथे हिंदुजा बंधू होते. निळ्या रंगाच्या रोल्स रॉईसमधून आलेला नजमू विरानी होता आणि माधवानीसुद्धा होते.

आजपर्यंत ह्या आशियाई कुबेरांचं खरं वैभव तसं गुपित राहिलेलं होतं. 'मॅनेजमेंट टुडे' ह्या इंग्लंडमधल्या 'बिझनेसवीकली'ने ब्रिटनमधल्या ५० श्रीमंत

एशियन कुटुंबांची नावं जाहीर करून ते गुपित फोडलं. त्यांचीही काय चूक म्हणा! त्यांचा संपादक फिलिप बेरेसफोर्ड ब्रिटनमधल्या ४०० सर्वात श्रीमंत माणसांची माहिती जमवत होता. ती जमवताना त्याच्या लक्षात आलं, की बऱ्याच आशियाई कुटुंबांची नावं त्याच्या यादीत जमा झाली आहेत. तो अवाक झाला. त्याने ब्रिटनमध्ये स्थायिक झालेल्या श्रीमंत अशियाई कुटुंबांचा रिसर्च सुरू केला आणि पन्नास श्रीमंतांची नावं जाहीर केली. त्या पन्नास कुटुंबांतली कर्ती माणसं त्या दिवशी प्रिन्स चार्लस्च्या डीनर पार्टीसाठी आली होती.

इंग्लंडमध्ये जवळजळ १५ लाख भारतीय-पाकिस्तानी रक्ताची मंडळी असतील. त्यातले तब्बल ३०० मिलीओनर्स आहेत. 'सुखवस्तू' ह्या सदरात जमा होणारे तर लाखो आहेत. इंग्लंडमध्ये जी ग्रोसरी शॉप्स आहेत, त्याला पाहिजे तर आपण वाण्याचं दुकान म्हणू. आपल्यासारखं ते दुकान कळकट्ट नसतं आणि वाणीही कळकट्ट नसतो. वर्तमानपत्रापासून चॉकलेटपर्यंत आणि सिगारेटपासून ग्रिटिंग कार्डस्पर्यंत काहीही ह्या दुकानात मिळतं. यापैकी ८०टक्के दुकानं ही भारतीय किंवा पाकिस्तान्यांच्या मालकीची आहेत.

काय म्हणालात? मराठी माणसांची दुकानं किती? मराठी माणूस इथून इंग्लंडला गेला म्हणून तो काही जसा गोरा होत नाही, तसा तो स्वभावही बदलत नाही. तो फार तर महाराष्ट्र मंडळ काढतो. नाटकं करतो, वाचन करतो, पण दुकान काढत नाही. तो डॉक्टर असतो, इंजिनीयर असतो किंवा बँकेत असतो. त्यामुळे एखादा नाडकर्णी, साठे किंवा मोरे त्या ३०० च्या यादीत नाही. पण त्यातली काही नावं आपल्या चांगल्या परिचयाची आहेत. अग्रस्थान आहे हिंदुजांना. श्रीमंतीच्या बाबतीत अख्ख्या ब्रिटनमध्ये त्यांचा अकरावा नंबर लागतो. श्वास रोखून धरा. त्यांची संपत्ती आहे जवळजवळ शंभर कोटी पौंडाची. त्यांचा व्यापार जगभर पसरलाय. बरं, उद्योगही वेगवेगळ्या प्रकारचे. क्रूड तेल, खतं, पॉवर-स्टेशन्स, गाड्या, लोखंड. . वगैरे वगैरे.

नजमू विराणीचं नाव ऐकलंय? त्याची २३ हॉटेल्स आणि ७७० पब्ज् आहेत. ब्रूअरीजचा धंदा आहेच. त्याचं वैभव आहे अकरा कोटी पौंडाचं. विजय मल्या त्याच्या थोडा पाठी आहे जास्त नाही, फक्त एक कोटी पौंडाने. फार्मास्युटिकल्स आणि ब्रुअरीमध्ये त्याची दादागिरी आहे.

मुमताजमुळे भारतात प्रसिद्ध झालेल्या वाधवानी कुटुंबाचं वैभव आहे साडेपाच कोटी पौंडाचं. त्यांना रस आहे साखर, ग्लास आणि लोखंडाच्या बिझनेसमध्ये. ह्या अशा कोट्याधीशांपासून लंडन किंवा लेस्टरच्या कोपऱ्यावरच्या दुकानदारापर्यंत त्यांची परक्या प्रांतात श्रीमंत व्हायची जिद्द पाहिली की छाती खरंच अभिमानाने भरून

येते. कारण ही श्रीमंती कुणाचं रक्त शोषून, कुणाच्या उरावर बसून मिळवलेली नसते. ती जमीनदारीसारखी एखाद्या निष्क्रिय माणसाच्या पायाशी मागच्या पिढ्यांच्या पुण्याईच्या रूपाने आलेली नसते. त्यासाठी रक्त, घाम आणि अचाट परिश्रमाचा नैवेद्य दाखवलेला असतो. बुद्धीची चमक असते. धोका पत्करायची हिंमत असते आणि त्यातल्या बऱ्याचजणांच्या बाबतीत तर ही भरारी राखेतून जन्म घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्यासारखी असते. ह्यांची भरारी ही सत्य असली तरी कल्पनेच्या पलीकडची आहे.

१८ वर्षापूर्वी २४ वर्षाचा नजमू विराणी जेव्हा आपली बायको आणि १८ महिन्याच्या मुलीला घेऊन लंडनच्या हिथ्रो विमानतळावर उतरला तेव्हा त्याच्या खिशात फुटकी कवडी नव्हती. भविष्याकडे मान वर करून पाहिल्यावर तिथेही फक्त अंधार दिसत होता. त्याला इंग्लंडमध्ये प्रवेश मिळणंही कठीण झालं होतं. कारण युगांडातून पळताना योग्य कागदपत्रंही बरोबर घ्यायचं त्याला भान नव्हतं. इदी अमिनची माणसं त्याच्या सर्वस्वाचा घास घ्यायला निघाल्यावर कसलं भान राहणार? त्याने स्वत:च्या डोळ्यासमोर त्याच्या शीख मित्राला इदी अमीनच्या सैनिकांनी गोळ्या घालून ठार मारताना पाहिलं होतं. त्या शीख मित्राचा अपराध काय होता ठाऊक आहे? त्याने कमावलेली संपत्ती युगांडाबाहेर नेता येत नाही हे पाहिल्यावर निराश होऊन स्वत:च्या गाडीत भरली आणि नैराश्याच्या झटक्यात त्याने स्वत:च्या गाडीला आग लावली. त्याच्या नोकराने चुगली केल्यावर त्या शीख तरुणाच्या शरीराची गाडीसारखी अवस्था झाली.

ताबडतोब विराणीने आपल्या बायको-पोरीला घेतलं आणि स्वत:च्या मर्सिडीजमधून तो विमानतळावर थडकला. त्याने चावीसकट ती गाडी तिथे सोडून दिली. आणि संपत्तीत लोळणारा हा तरुण निष्कांचन होऊन लंडनला रवाना होणाऱ्या विमानात बसला. युगांडाची सरहद्द ओलांडेपर्यंत त्याच्या जिवात जीव नव्हता. विमानात त्याच्या शेजारी बसलेली बाई सारखी रडत होती - कारण आयुष्याची सर्व कमाई युगांडात सोडून तीसुद्धा देशोधडीला लागली होती. विराणीने त्या बाईला समजावलं. तिला सांगितलं, "माझ्याकडे एक पेनीसुद्धा नाही. माझ्या अठरा महिन्याच्या मुलीला लंडनला उतरल्यावर दूध कसं द्यायचं हा सर्वात मोठा प्रश्न आहे." ती बाई स्वत:चं दु:ख विसरली आणि तिने विराणीला २० डॉलर्स दिले. विराणी ते कर्ज आजही विसरला नाही. सुदैवाने त्याला लंडनमध्ये प्रवेश मिळाला. आज तो इंग्लंडला माझा देश म्हणतो आणि राजाला आमचा राजा म्हणतो.

मयूर वाधवानीची आईही अशीच एका रात्रीत युगांडाहून पळाली. तिचा नवरा वारल्यावर इदी अमीनच्या एका सरदाराची नजर तिच्या सौदर्यावर आणि संपत्तीवर

पडली. त्याने निर्लज्जपणे सांगितल, ''ह्यापुढे तुझी संपत्ती आणि तू माझीच. आपण लग्न करायचं.'' त्या रात्रीच मयूरच्या आईने स्वत:च्या विमानातून पलायन केलं.

खरं तर विराणीची कहाणी काय किंवा मयूर वाधवानीच्या आईची कहाणी काय, ह्या कहाणीत आणि इदी अमिनने हाकललेल्या हजारो भारतीयांच्या कहाणीत फारसा फरक नाही. फरक होता थोडा तपशिलात. ह्या कहाण्याही आपल्या देशाच्या विभाजनाच्या वेळच्या अत्याचार आणि बलात्काराच्या कहाण्यांएवढ्याच हृदयद्रावक आहेत. अत्याचाराच्या कहाण्या हृदयाला पीळ पाडणाऱ्या असतातच. लंडनमधली मंडळी ह्या कहाण्या सांगतात तेव्हा त्या ऐकताना आपल्या अंगावर शहारे येतात. आपण दरिद्री होऊन दुसऱ्याच्या दारात पडलोय ही भावनाच माणसाला उद्ध्वस्त करायला पुरेशी असते आणि मागचं आयुष्य जर पैशात लोळण्यात गेलं असेल तर नव्या खडतर निर्वासिताच्या आयुष्याशी जुळवून घेणं फार कठीण जातं. आज हे युगांडाचे भारतीय निर्वासित एका परक्या देशात पुन्हा घट्ट पाय रोवून उभे आहेत लक्ष्मीचा वरदहस्त त्यांनी मिळवलाय. जुन्या जखमा भरल्या गेल्या आहेत. पण व्रण शिल्लक आहेत. त्यांचे इंग्लंडमधल्या निग्रोशी सलोख्याचे संबंध नाहीत. तिथला गोरा काळ्या आणि गव्हाळ रंगाच्या भारतीयांना जास्त जवळचा वाटतो. तिथल्या काळ्या माणसात ते इदी अमिनला पाहतात आणि चार हात दूर ठेवतात. कारण त्यांना त्या भूतकाळाच्या आठवणी नको आहेत.

कोण कशासाठी लक्षात ठेवील ह्या आठवणी? कारण ह्या आठवणी म्हणजे शेवटी कठोर परिश्रमाचा इतिहासच आहे. ज्या हुशार मंडळींनी आधीच इंग्लंडमध्ये पैसे पाठवले होते, ते फारसे होरपळले नाहीत. पण जे कफल्लक होऊन आले होते त्यांना फक्त बेकारीच्या खाईतून स्वत:ला बाहेर काढायचं नव्हतं, तर नवीन परिस्थितीशी मानसिकदृष्ट्याही लढायचं होतं. त्यांना युगांडामध्ये एका सुखवस्तु, आरामशीर आयुष्याची सवय झाली होती. हाताखाली नोकरांचा ताफा असायचा. तिथे इंग्लंडमध्ये सरकारने जरी त्यांना घरं दिली, बेकारी भत्ता दिला तरी सुखसोई नव्हत्या. अशा बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणं फार सोपं नसतं.

पण या भारतीयांच्यात जिगर फार मोठी होती. धंदा त्यांच्या रक्तात होता. काहीनी आधी चाकरी स्वीकारली. मग धंदा उभारला. आज त्यांच्यातले अनेकजण आपल्या युगांडातल्या आर्थिक स्तरावर पोहचले आहेत. तुम्ही लंडनच्या विम्बली विभागात फिरा किंवा लेस्टरला जा. आपण इंग्लंडमध्ये आहोत ह्याची स्वत:ला आठवण करून द्यावीशी वाटते. लेस्टरशायरचं आज गुजराथ शायर झालंय. तिथल्या मेल्टन रोडवर फिरल्यावर भुलेश्वरमध्ये फिरल्यासारखं वाटायला लागतं. गुजराथी हॉटेल्स, साडीची दुकानं, फरसाणाची दुकानं, थोडक्यात भुलेश्वरची

गुजराथ संस्कृती स्वच्छ होऊन इंग्लडमध्ये अवतरल्यासारखी वाटते. सत्तर हजार भारतीय त्या छोट्या लेस्टरमध्ये राहातात. तिथे गोरा माणूस परदेशी वाटतो. चर्चच्या घंटेऐवजी अंबामातेच्या आरत्या ऐकायला येतात. गुडमॉर्निंग, गुडनाईट, बाय-बाय, थॅंक्यूपुरती इंग्लिश संस्कृती उसनी घेतलेली वाटते. व्यवहार गुजराथीत चालतो. फक्त मुंबई, अहमदाबादेतील दुकानात हरीशभाई, रमेशभाई किंवा पोपटलाल शेठ असतात. तिथे दुकानात आरतीबेन, ताराबेन किंवा माणिकबेनसुद्धा असतात. त्याला पर्याय नाही. कठोर परिश्रम आणि थोडीशी हिंमत सामान्य माणसालाही कुठल्या कुठे घेऊन जाऊ शकते. मी १९८३ साली प्रथम इंग्लडमध्ये माझ्या गुजराथी मित्राकडे गेलो तेव्हा तो हिथ्रो विमानतळावर कामगारांवर नजर ठेवणारा मुकादम होता. युगांडातलं वैभव गमावलेला आणि इंग्लडमध्ये पोटासाठी राबणारा एक तरुण. महिन्याकाठी ३२० पौंड त्याच्या खिशात पडायचे. एक रंगीत टी. व्ही. सोडला तर खऱ्या अर्थानं चैनीची एकही वस्तू त्याच्याजवळ नव्हती. त्यावेळी तो फक्त मला म्हणाला होता, ''पुन्हा तू इंग्लंडला येशील तेव्हा माझी सांपत्तिक स्थिती जास्त चांगली दिसेल.'' १९८६ साली मी पुन्हा इंग्लडला गेलो. तेव्हा त्याच्याकडे स्वत:चं दुकान होतं, गाडी होती, स्वत:वर तो खुश होता. १९९० साली गेलो तेव्हा गाड्या एकाच्या दोन झाल्या होत्या पॉश वस्तीत त्याने आणखीन एक घर घेतलं होतं. दुकान मोठं झालेलं होतं आणि आणखी वर उडी मारायची जिद्द होती. पूर्वी त्याला खिशात १० पौंड असले तरी त्याला श्रीमंत झाल्यासारखं वाटायचं. आज त्याचा १६ वर्षाचा मुलगा खिशात २०० पौंड असल्याशिवाय घराबाहेर पाऊल ठेवत नाही. बरं, ह्या माणसाचं शिक्षण यथातथाच. इंग्रजी बोलताना भाषेला व्याकरण असतं हे त्याच्या गावीही नसतं. पण समोरचा डेव्हीड काय म्हणाला किंवा सुझन काय म्हणते ते ह्याला कळतं आणि हा काय बोलतो ह्याचा अर्थबोध त्यांना होतो. तेवढ्यावर त्याचा धंदा तेजीत। पण आता त्याच्या परिश्रमाचीही बाजू ऐका. तो सकाळी सहाला दुकान उघडतो आणि रात्री दहाला बंद करतो. फक्त ख्रिसमसला दुकान अर्धा दिवस उघडं असतं. कॅश ॲन्ड कॅरीमधून (त्यांचा होल सेल बझार) माल आणायचा आणि विकायचा. एवढंच त्याचं आयुष्य आहे. म्हणून तो म्हणतो, ''युगांडातलं धन परत मिळालं, पण तिथली सुखं मिळत नाहीत.'' माझ्या मित्राचं जे उदाहरण मी दिलं ते प्रातिनिधिक आहे. हजारो भारतीय किंवा पाकिस्तानी कुटुंबप्रमुख त्या पद्धतीने राबतायत.

अर्थात् ज्यांच्याकडे बुद्धिमत्ता होती आणि आणखीन पुढे झेप घ्यायची हिंमत होती ते फार पुढे गेले. नजमू विराणीकडेच पाहा ना, त्याने इंग्लंडमध्ये पाय रोवण्याचा श्रीगणेशा वाण्याचं दुकान टाकूनच केला. अर्थात् तेही तेवढं सोपं नव्हतं. पहिलं

दुकान लीझवर मिळण्यासाठी त्याला खूप प्रयास पडले. डिपॉझिट आणि भाडं आगाऊ देण्याची तयारी असूनही त्याला दुकान मिळत नव्हतं. डलविचमधल्या 'लॉर्डशिप' लेनमधलं दुकान मिळवण्यासाठी त्याला घरमालकाचे पाय धरावे लागले. सुरवातीला त्याला घरमालकाने धक्के मारून बाहेर घालवणंच तेवढं शिल्लक ठेवलं होतं. पण विराणीच्या सुदैवाने, बोलता बोलता त्या मालकाच्या लक्षात आलं, की त्याचा मेव्हणा युगांडात असताना ह्या विराणीच्याच कुठल्यातरी कंपनीत नोकरीला होता. उपकाराच्या ह्या छोट्या धाग्याला पकडून त्या तरुण नजमू विराणीने गोऱ्या मालकाकडून पहिलं दुकान घेतलं. अर्थात् मालकानं दोन वर्षाचं भाडं आगाऊ घेणं काही सोडलं नाही. विराणी त्या 'लॉर्डशिप' लेनला आता 'हार्डशिप' लेन म्हणतो आणि आजही प्रत्येक ख्रिसमसला तो त्या पहिल्या मालकाला शॅंपेनची बाटली आणि सिगार्स पाठवतो. त्याचे आभार मानण्यासाठी आणि कदाचित् आज मी कुठे पोहोचलोय हे दाखविण्यासाठीही असेल!

त्या दुकानात विराणीने रात्रीचा दिवस केला. पैसे जमवले आणि मग दोन भाऊ आणि वडिलांच्या मदतीनं आणखी काही दुकानं घेतली. सुरवातीला तिथल्या ब्रिटिश बँका ह्या आशियाई बिझनेसमनला मदत करायला तयार नव्हत्या. विराणीने इतर राष्ट्रांच्या बँकेशी संबंध जोडले. आज स्विस आणि जपानी बँका त्याच्यासाठी पैसे ओतायला तयार असतात. पण आता काही ब्रिटिश बँकांनीही भारतीय उद्योगपतीचा दुस्वास सोडलाय. तिथले गुजराथी आता नॅटवेस्ट बँकेला प्रेमाने 'पटेल बँक' म्हणतात.

फक्त दुकानं विकत घेण्यात विराणीचं मन रमलं नाही. त्याने जुनी हॉटेल्स आणि ब्रुअरीज विकत घ्यायचा सपाटाच लावला. त्याबाबतीत तो विलक्षण चाणाक्ष असावा. १९८४ साली त्याने एक स्कॉटिश बेल हॅवन ब्रुअरी विकत घेतली. तिचं रूप पालटलं आणि ८६ साली ती अडीच कोटी पौंडाला विकली. गंमत म्हणजे पुन्हा तीच ब्रुअरी त्याने दोन वर्षांनी दीड कोटी पौंडाला विकत घेतली. "मला आजपर्यंत मिळालेलं सर्वात सुंदर ख्रिसमस प्रेझेंट." असं ह्या डीलचं तो वर्णन करतो.

अठरा वर्षापूर्वी लंडनला येताना तो आपली मर्सिडीज, कोक पिऊन कॅन फेकावा तशी एअरपोर्टबाहेर फेकून आला होता. आज त्याच विराणीसाठी त्याची निळी रोल्स रॉईस हिथ्रोवर त्याची वाट पाहत उभी असते. त्यावेळी मुलीला दूध पाजायला त्याच्याकडे पैसे नव्हते. आज वेगवेगळी क्रेडिट कार्डस् खिशात ठेवून तो जगभर फिरत असतो.

लंडनमध्ये मोठा झालेला प्रत्येक उद्योगपती काही युगांडाहून आलेला नाही.

पण तरीही त्यांच्या जीवनकथाही तशा रोमहर्षक आहेत. हिंदुजांचं साम्राज्य आज जगभर पसरलंय. पण ह्या प्रचंड वटवृक्षाचं बीज कधीतरी १९१९ मध्ये इराणला रोवलं गेलं होतं. छोटा व्यापार आणि अभियांत्रिकी उद्योगधंद्यातून त्यांनी तेलाकडे मोर्चा वळवला आणि समृद्धीचा वटवृक्ष बघता बघता फोफावला. सत्तरीच्या दशकात लक्ष्मी त्यांच्या घरी पाणी नाही, तर चक्क तेल भरत होती. खोमेनीने १९७९ साली इराणचा ताबा घेतल्यावर त्यांनी लंडनला घर मानलं. आज जगातल्या पन्नास देशांत त्यांचं साम्राज्य पसरलंय.

ही हिंदुजा मंडळी किमान लंडनला येण्यापूर्वी तरी श्रीमंत झालेली, पण काही उद्योगपती असे आहेत ज्यांनी आपल्या साम्राज्याची पहिली वीट आपल्या छोट्या हातांनी इंग्लंडमध्ये बसवली आणि मग बघता बघता त्यांचे हात मोठे झाले आणि आज त्यांची साम्राज्यं मोठ्या दिमाखात उभी आहेत.

नरेश नावाचा एक पटेलपुत्र वयाच्या १७ व्या वर्षी लंडनमध्ये फोटोग्राफी शिकायला आला. त्याचा कॅमेरा छायाचित्र टिपत असताना त्याचा मेंदूही काही फोटोग्राफीच्या उद्योगधंद्याबद्दल माहिती टिपत होता. तो केनयाला परत गेल्यावर त्याने कलरामा स्टुडिओ काढला. तिथे पैसे कमावले आणि १५ वर्षांपूर्वी तो पुन्हा लंडनला येऊन थडकला. तिथे काय करायचं ह्याचा आराखडा त्याच्या डोक्यात तयार होता. त्याच्या एक गोष्ट लक्षात आली होती, की बरेचसे परदेशी प्रवासी त्यांचा रोल इंग्लंडमध्ये डेव्हलप न करता स्वत:च्या देशात डेव्हलप करतात. त्याला कारणं दोन होती: एक म्हणजे रोल डेव्हलप करणं महाग होतं आणि दुसरं म्हणजे रोल डेव्हलप करायला सात दिवस लागायचे. त्याने लंडनमध्ये स्टुडिओ काढला आणि रात्रंदिवस मेहनत करून रोल डेव्हलपिंग आणि प्रिंटिंगची वेळ सात दिवसावरून चोवीस तासांवर आणली. आज लंडनमध्ये रोल डेव्हलपिंग आणि प्रिंटिंग एवढं स्वस्त आहे, की १०० रुपयात रोलचं डेव्हलपिंग होतंच, पण वर एक रोल फुकट मिळतो. हा नरेश पटेल आज फक्त ४५ वर्षांचा आहे. युरोप सुपर मार्केटसचा तो प्रमुख आहे वर्षाला पासष्ट दशलक्ष पौंडाचा नफा त्याला मिळतो. त्याचबरोबर त्याचा कलरामा फोटोग्राफीचा उद्योगही जोरात चाललाय. १४ दशलक्ष पौंडाचा त्याचा तो धंदा आहे. केनयात रस्त्यावर फोटो काढून चार पैसे मिळवणारा नरेश पटेल आज रोल्स रॉईस, फेरारी आणि मर्सिडिज हा गाड्यांचा ताफा बाळगून आहे. त्याचं स्वत:च्या मर्सिडिजवर प्रेम आहे. तो कुणालाही फोन नंबर देतो आणि नम्रपणे सांगतो, ''हा नंबर तुम्हाला मिळेलच असं नाही. जवळजवळ नेहमीच तो एंगेज्ड असतो. पण हा मिळाला नाही तर मग इतर कुठलाच नंबर मिळणार नाही.''

कुठला धंदा चटकन मूळ धरील ह्याची नाडीपरीक्षा काही भारतीय उद्योगपतींना




*इंग्लंडमधील भारतीय माणसांची दुकानं*

फार चांगली जमली आहे  रश्मी ठकराल १९७२ साली युगांडाहून इंग्लंडला आला. त्याच्या लक्षात आलं, की ब्रिटिश मंडळी आता खाण्याच्या बाबतीत जास्त साहसी व्हायला लागली आहेत. जॅकेट पोटॅटो सॅलेड, थंडगार चिकन किंवा स्टीकच्या पलीकडे त्यांची मजल जायला लागली आहे. भाताची आवड ब्रिटिश माणसाला लागली आहे. ह्या गोष्टीचा फायदा घ्यायचं त्याने ठरवलं. त्याने बासमती तांदळाचा धंदा सुरू केला. आज तो इंग्लंडमधला 'राईस किंग' मानला जातो. त्याची स्वत:ची जेट्टी आहे आणि इसेक्समध्ये मिल आहे.

असाच एक दूरदृष्टी असणारा उद्योगपती मला लेस्टरला भेटला. तो लेस्टरचा साडीसम्राट आहे. त्याने स्वत:चं उत्पन्न सांगायला नकार दिला. पण तो कोट्यधीश आहे हे सांगायला लागत नाही. त्याचं नाव खंडेलवाल! १९६० साली तो नशीब काढायला इंग्लंडमध्ये आला आणि लेस्टरला मित्राकडे राहिला. एके दिवशी बायकोला साडी घ्यायला म्हणून बाहेर पडला आणि त्याच्या लक्षात आलं, की इथे साडी मिळत नाही. त्याने एका महागड्या दुकानातून तागा विकत घेतला आणि बायकोने त्याची साडी तयार केली. अचानक त्याच्या लक्षात आलं, की साडीचा धंदा काढला तर... त्या धंद्यात थोडंसं शिरल्यावर लक्षात आलं, की इथले ब्रिटिश दुकानदार ३०-४० टक्के नफा काढतात. त्याने सुरवातीला घरोघरी जाऊन साड्या विकल्या. मग लेस्टरच्या म्युनिसिपल मार्केटात एक स्टॉल घेतला आणि महागड्या ब्रिटिश दुकानांच्या निम्म्या किंमतीत त्याच दर्जाचा माल तो द्यायला लागला. बघता

बघता त्याची भरभराट झाली. त्याच्या सुदैवाने आणखी एक गोष्ट घडली, युगांडात इदी अमिनने थैमान घातल्यावर तिथून पळालेले बरेच गुजराथी लेस्टरमध्ये येऊन स्थिरावले. साहजिकच साड्यांची मागणी वाढली. पण त्याचबरोबर आणखी एक धोकाही निर्माण झाला. तिथे आलेले गुजराथीही रक्तात धंद्याच्या पेशी घेऊनच जन्मले होते. त्यांचं बस्तान बसल्यावर त्यांनीही साड्यांची दुकानं थाटली. आज लेस्टरच्या मेल्टन रोडवर ५०-६० साड्यांची दुकानं आहेत. पण तरीही ह्या खंडेलवालचं 'साडीमंदिर' सर्वांपेक्षा वेगळं आणि भव्य आहे एक अख्खं सिनेमा थिएटर विकत घेऊन त्याने ते थाटलंय. तो म्हणतो, ''युगांडाहून आलेली गुजराथी लाट मी थोपवू शकलो. कारण त्यावेळी मी फक्त साड्या विकत नव्हतो, ब्रिटिश लोकांना लागणारे कपडेही त्यावेळी विकत होतो. सुपरमार्केटपेक्षा माझ्या मालाची किंमत निम्मी होती. पण दर्जा तोच होता. आज मी जास्त साड्या विकत असलो तरी माझा माल मी भारत आणि जपानहून मागवतो. इतरांना जपानहून माल मागवणं परवडत नाही. कारण ते किरकोळीचा धंदा करतात. मी होलसेल मार्केट चालवतो. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण ब्रिटिश बायकाही माझ्याकडून साड्या घेतात. काहीजणी त्यांचा ड्रेस शिवतात. बी.बी.सी.ची मंडळीही माझ्याकडून साड्या घेतात. त्यांची नाटकं किंवा सीरियल्ससाठी वापरतात. तुम्हाला एक गंमत सांगतो, जेव्हा मी साडी विकायला सुरवात केली तेव्हा इथल्या लोकांना साडीचं स्पेलिंगसुद्धा ठाऊक नव्हतं. इथल्या लेस्टर म्युनिसिपल मार्केटचा सुपरिंटेंडंट मी काहीतरी वेगळा माल विकणार म्हणून खुषीत होता. पण मी साडी म्हणजे काय विकणार हे त्याला कळत नव्हतं. तो डिक्शनरी उघडून साडीचा अर्थ पाहायला लागला. मी त्याला विचारलं, 'तुम्ही डिक्शनरीत काय पाहताय?' त्याने मला विचारलं, 'What is a Saree?' मग मी त्याला सांगितलं, भारतीय बायका काय नेसतात ते तुम्ही पाहिलंय का? त्याला साडी म्हणतात.''

खंडेलवालची शोधक दृष्टी त्याला आणखी एका धंद्यात घेऊन गेली. तो आहे लॉकर्सचा धंदा. बँक ऑफ इंडियाच्या मदतीने त्यानं लोकांसाठी पूर्णपणे ॲटोमॅटिक आणि कॉम्प्युटराईज्ड लॉकर्सची सोय केलीय. त्याबद्दल त्याचं तत्त्वज्ञानही फार बोलकं आहे. तो म्हणतो, ''मी सुरवातीला ह्या देशात आलो तेव्हा इथे रामराज्य होतं. घरांना कुलूप लावायची जरुरी नव्हती. रात्री दोन वाजतासुद्धा किलोभर सोनं घेऊन तुम्ही जाऊ शकत होतात चोरीची भीतीच नव्हती. पण आता परिस्थिती वेगळी आहे. घराला फक्त कुलूप लावून चालत नाही Burglar Alarms लावायला लागतात. घरात किंमती वस्तू सुरक्षित राहतीलच असं नाही ब्रिटिश बँकेत लॉकर्स आहेत, पण ते पुरेसे नाहीत आणि आपल्या बायकांना

दागिन्यांचा सोस किती आहे ते तुम्हाला ठाऊकच आहे. म्हणूनच काळाची गरज ओळखून मी ह्या लॉकर्सच्या धंद्यात उतरलो. आता मी कम्युनिटी हॉलच्या उद्योगातही उतरलोय. कारण माझ्या असं लक्षात आलं की लग्नकार्य, पार्टी, साखरपुडे किंवा चर्चासत्रासाठी आपल्या मंडळींना गुरुद्वारात किंवा मंदिरात जावं लागतं. तिथे अशा गोष्टींसाठी लागणाऱ्या पूर्ण सुखसोयी नसतात. म्हणून संपूर्ण सुखसोयींनी युक्त असा हॉल मी इथे मेल्टन रोडवरच बांधलाय. माझं तेही प्रोजेक्ट यशस्वी होईल असं वाटतंय ''

ह्या सर्वांच्या यशस्वी घोडदौडीमागे आणखीही काही महत्त्वाची गुपितं आहेत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे इथल्या भारतीयांची कुटुंब-व्यवस्था चिरेबंदी आहे तुम्हाला भाऊबंदकी सापडणार नाही. एकमेकांवर विश्वास आहे. एकमेकांना मदत करायची वृत्ती आहे आणि संगनमताने निर्णय घ्यायची वृत्ती आहे. विराणी इस्त्रायली आहे आणि त्याला त्याच्या जमातीने त्याच्या पडत्या काळात सढळ हाताने मदत केली. आज त्याचे ६० टक्के शेअरहोल्डर्स भारतीय किंवा पाकिस्तानी आहेत.

हिंदुजांचं साम्राज्य तर भावाभावांच्या अतूट प्रेमावर आणि विश्वासावर टिकलंय. त्यांचे दोन भाऊ इंग्लंडमध्ये राहतात. एक स्वित्झर्लंडमध्ये राहातो. एक भारतात राहातो. पण दिवसातून २० वेळातरी ते एकमेकांशी बोलत असतात. कुठल्याही उद्योगाचा करार करण्यापूर्वी ते त्या उद्योगाचा कसून अभ्यास करतात. एकमेकांशी दीर्घ चर्चा करतात. प्रत्येकाला त्या करारातील छोटी गोष्टसुद्धा माहीत असते आणि एकदा उडी घ्यायची ठरल्यावर मग मागे वळून पाहिलं जात नाही. आपल्या धंद्यात कुणाला सामावून घ्यायचं ह्याबाबतही त्यांचे कौटुंबिक नियम ठरलेले आहेत. सर्व भावांची मुलं बिझनेसमध्ये सामावून घेतली जातात. मुलींना किंवा मुलीच्या मुलांना तिथे प्रवेश नसतो आणि हे सर्व नियम काटेकोरपणे पाळले जातात. धंद्यातील छोटीशी गोष्टसुद्धा किंवा गुपित बाहेर फोडलं जात नाही. त्याचा प्रचंड फायदा त्यांना झालाय. पन्नास वर्षांपूर्वी त्यांचे वडील परमानंद हिंदुजा इराणमध्ये असताना त्यांना कळलं, की इराणमध्ये टोपी घालणं सक्तीचं केलं जाणार. त्यांनी लगेच एक माणूस मुंबईला पाठविला. त्या माणसाने मुंबईत होत्या-नव्हत्या तेवढ्या टोप्या विकत घेऊन इराणला पाठवल्या. बघता बघता त्यानं पैसे कमावले. त्या दिवसापासून त्यांना गुप्तता पाळण्याची किंमत कळली.

बऱ्याच भारतीय उद्योगपतींच्या पदरी भारतीय किंवा पाकिस्तानी माणसं कामाला आहेत. आपल्या मंडळींना मदत करायचा त्यामागे एक हेतू असला तरी दुसरेही काही हेतू आहेत. आपली मंडळी कमी पगारावर नोकरी करायला तयार होतात आणि कसून काम करतात. ओव्हरटाइम त्यांना प्रिय असतो. 'पैसा जमवणं'

ही आपली पुरातन हौस असल्याने परक्या मुलखात आपली माणसं जीव ओतून काम करतात. ब्रिटिश माणसांची वृत्ती थोडी वेगळी असते. विशिष्ट पातळीच्या खाली त्याला पगार चालत नाही आणि कामाची वेळ संपली की ओव्हरटाइम करून चार पैसे गाठीला लावण्याचा सोस त्यांना नसतो. तिथली मोठमोठी दुकानं किंवा ऑफिसेस सहा म्हणजे सहाच्या ठोक्याला बंद होतात. मोठ्या दुकानात तुम्ही सहानंतर हजार पौंडाचा माल जरी खरेदी केलात तरी 'आजची वेळ संपली, आता उद्या या', असं नम्रपणे सांगण्यात येतं. कॉर्नरचा भारतीय दुकानदार शटर वर करून सिगरेटसुद्धा देतो. शनिवार-रविवारी ब्रिटिश माणूस ऑफिस जाऊदेत, पण घरी राहण्याच्याही मूडमधे नसतो. घरी असलाच तर शनिवारी शॉपिंग आणि रविवारी बागकाम ह्यात तो रस घेतो. त्यामुळे राबण्यासाठी सामान्य ब्रिटिश माणसापेक्षा सामान्य भारतीय किंवा पाकिस्तानी माणूसच जास्त उपयोगी असतो. अर्थात असामान्य ब्रिटिश गुणवत्ता विकत घेण्यासाठी आशियाई उद्योगपती वाट्टेल ती किंमत मोजायला तयार असतो. ह्या बाबतीत नजमू विराणीने एक फार चांगलं उदाहरण दिलं. तो म्हणतो, "भारतीय उद्योगपतीला एक हुशार ब्रिटिश मॅनेजर हवा होता. तो ब्रिटिश मॅनेजर ज्या ब्रिटिश कंपनीत नोकरीला होता ती कंपनी त्याला वर्षाला सत्तर हजार पौंड देत होतीच वर ऑफिसची वोल्वो ७४० गाडी त्याच्या दिमतीला होती आणि BUPA चा मेडिकल इन्शुरन्स त्याला देण्यात आला होता. (हा इन्शुरन्स महागडा आहे.) त्या उद्योगपतीने काय केलं असेल? त्याने ह्याला एक लाख वीस हजार पौंड पगार दिला. मर्सिडीज दिली. बायको, मुलं आणि आई-वडिलांचा BUPA इन्शुरन्स काढून दिला. तो ब्रिटिश माणूस चटकन त्याच्याकडे नोकरीला रुजू झाला."

बऱ्याच भारतीय उद्योगपतींची दुसरी पिढी आता जोमाने धंद्यात उभी आहे. त्यांनी त्यांचे प्रमुख धंदे तर वाढवलेच, पण इतर उद्योगधंद्यात शिरण्याचंही साहस दाखवलंय. मॅंचेस्टरच्या शमी अहमदचं उदाहरण ह्याबाबतीत फार बोलकं आहे. तो आज अवघा २७ वर्षांचा आहे, पण मॅंचेस्टरमधल्या 'जो ब्लॉग्ज' ह्या सुप्रसिद्ध जीन्स आणि तयार कपड्यांच्या कंपनीचा मॅनेजिंग डायरेक्टर आहे. आज त्या कंपनीचं भांडवल २५ दशलक्ष पौंडाच्या घरात आहे आणि ह्या २७ वर्षांच्या पोराने ते शून्यातून उभं केलंय. मॅंचेस्टरचं मिलान करायची त्याची महत्त्वाकांक्षा आहे इंग्लंडमधे श्रीमंतीचं दर्शन बऱ्याचदा महागड्या गाड्यांमधून दिलं जातं. हा शमी अहमद स्वत: एक लाख पौंडाची बेन्टली टर्बो चालवतो. त्याचे वडील नझीम अहमद ८० हजार पौंडाच्या सेकंडहॅण्ड रोल्स रॉईसवर समाधान मानतात आणि केवळ हौस म्हणून तो एक लाख आठ हजार पौंडाची फेरारी गॅरेजमधे कड्या-

कुलपात ठेवतो.

ह्या शमी अहमदचे वडील २७ वर्षापूर्वी कराचीहून मँचेस्टरला आले आणि त्यांनी तिथे मार्केटमधे एक छोटा स्टॉल घेऊन जीन्सचा होलसेल उद्योग सुरू केला. त्याने जीन्स स्वस्तात विकायला सुरुवात केल्याबरोबर मार्केटमधे रँगलर, लिवाय किंवा ली ब्रॅन्डच्या जीन्स विकणाऱ्या उद्योगपतींचं धाबं दणाणलं. त्यांनी या नझीम अहमदवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला, पण ते बधले नाहीत. शेवटी खाजगी डिटेक्टिव्हज् मागावर ठेवून ह्या नझीम अहमदला स्वस्तात जीन्स कोठून मिळतात ह्याचा शोध घेण्याचा असफल प्रयत्न त्यांनी केला. अहमदचा धंदा जोरात सुरूच राहिला. शमीला धंद्याची ओढ लहानपणापासून होती. तो बर्नलीला शाळेत जायचा. पण शाळा सुटल्यावर ९० मिनिटं बसने प्रवास करून वडिलांच्या दुकानात यायचा. सतराव्या वर्षी त्याने सरळ शाळा सोडून दिली. उद्योगधंदा वाढवण्यासाठी त्याला कुठल्याही पुस्तकी ज्ञानाची किंवा मॅनेजमेंटमधल्या डिग्रीची गरज नव्हती. तो उद्योगात पडल्यावर वडिलांनी त्याच्या हातात कारभार सोपवला. आज त्याच्या कंपनीचे कपडे युरोपमधे जायचे असतील तर त्याच्या कंपनीच्या लेबल्सबरोबरच मँचेस्टरचं लेबल मोठ्या गर्वानं चिकटवलं जातं. फॅशनेबल कपड्यांच्या उद्योगात शमीने जितक्या चटकन नाव आणि पैसा कमावला तेवढ्या चटकन कुणालाच जमलं नाही. शमी म्हणतो, ''यश मिळवण्यासाठी तुम्ही भुकेलं असलं पाहिजे, नाहीतर तुम्ही कधी संपून जाल कळणारही नाही.''

अर्थात मॅनेजमेंटच्या पुस्तकी शिक्षणावर विश्वास ठेवणारीही काही मंडळी आहेत. स्वराज पॉलला त्या शिक्षणाचं महत्त्व विचारा, तो सांगेल. स्वराज पॉलने अंबर आणि आकाश ह्या आपल्या दोन जुळ्या मुलांना उत्तर लंडनमधल्या 'द हॉल' ह्या सुप्रसिद्ध शाळेत घातलं. नंतर हॅरोच्या विश्वविख्यात कॉलेजात पुढचं शिक्षण घ्यायला पाठवलं आणि मग बिझनेस मॅनेजमेंटच्या अभ्यासासाठी अमेरिकेत मॅसॅच्युसेटला पाठवलं. अर्थात 'घरच्या' शिक्षणावरही त्याचा विश्वास दांडगा आहे. कारण स्वत: स्वराज पॉल मेहनतीची शिडी चढूनच वर आलाय. १९६६ साली तो कॅन्सर झालेल्या मुलीला वैद्यकीय ट्रीटमेंट देण्यासाठी लंडनला आला. दुर्दैवाने त्याची मुलगी अंबिका वाचू शकली नाही. त्याने ते दु:ख विसरण्यासाठी स्वत:ला कामात झोकून दिलं. (आज ज्या घरात तो लंडनमधे राहतो त्याला त्याने 'अंबिका हाऊस' असं नाव दिलंय.) हंटिंग्टनला त्याने एक स्टील बनवणारी कंपनी टाकली आणि मग वेल्समधे स्टील ट्यूब बनवण्याचा कारखाना टाकला. तो स्वत: मेटर्लजिस्ट आहे. ह्या कारखान्याचं उद्घाटन प्रिन्स चार्लस्ने केलं. आज त्याच्या कंपनीत पाच हजार माणसं काम करतात. त्याने आपल्या मुलांनाही फॅक्टरीत काम

करायला लावलं. बोटीच्या इंजिनरूमच्या तप्त वातावरणात उभं रहायला शिकवलं. ऐपत असूनही कुठलीही गोष्ट अगदी सहजपणे मुलांना दिली नाही. काही वर्षापूर्वी अंबरला फेरारी गाडी हवी होती. स्वराज पॉलने स्पष्ट नकार दिला. दौलत उडवायची सवय त्याला त्याच्या मुलांना लावायची नव्हती. म्हणूनच आज अंबर पॉल म्हणतो, ''आम्ही आमच्या श्रीमंतीवर जगत नाही. जो पगार आम्ही मिळवतो त्या पगारावर आम्ही जगतो.''

पण उद्योगधंद्याबाबत मात्र त्याने मुलांना बरंच स्वातंत्र्य दिलंय. त्याची क्लायस्टेडेल इंजिनीयरिंग कंपनी स्वराज पॉलने विकायची ठरवली होती. अंबरने त्याला सांगितलं, ''मला चालवायला द्या. मी प्रयत्न करतो.'' अवघ्या तीन वर्षात कंपनीचा नफा ३० हजार पौंडावरून अंबरने ५ लाख पौंडावर नेऊन ठेवला. टर्नओव्हर १.७ दशलक्ष पौंडावरून ४.१ दशलक्ष पौंडापर्यंत वाढला. तो म्हणतो, ''माझे वडील माझ्या कामात लुडबूड करीत नाहीत. फक्त त्यांना काय चाललंय ह्याची माहिती द्यावी लागते. मी त्यांचा सल्लागार म्हणून उपयोग करून घेतो.'' त्यांच्या बोर्ड मिटिंग्ज शुक्रवारी किंवा सोमवारी असतात. त्यामुळे शनिवार-रविवार त्यांना आईवडिलांबरोबर घालवता येतो.

हे सर्व पाहिलं की स्कॉटलँडच्या याकूब अलीचे शब्द आठवतात. तो म्हणतो, "New people work harder and new blood is good for business." त्याने स्वत:ही स्वत:चे शब्द खरे करून दाखवले आहेत. अडतीस वर्षापूर्वी तो इंग्लंडमधे ४ पौंड आणि १० शिलिंग घेऊन आला. आज त्याच्याकडे २० दशलक्ष पौंडाची संपत्ती आहे. मार्गारेट थॅचर त्याच्या घरी जेवायला जाते आणि सही करताना तो अभिमानाने 'Yaqub Ali OBE' अशी सही करतो.

ह्या भारतीय मंडळींचा उद्योगधंद्यातला असामान्य प्रताप पाहिला की मन भरून येतं. कारण स्वत:च्या देशात उद्योगाचं साम्राज्य उभारणं कठीण असतंच, पण परदेशात ते जास्त कठीण असतं. कारण लगेच त्या देशातल्या माणसाच्या डोळ्यात उपऱ्यांचं वैभव सलायला लागतं इंग्लंडमधे कागदोपत्री वर्णभेद नाही, पण तो तुम्हाला लोकांच्या डोळ्यात दिसतो. त्यांच्या वागणुकीतून दिसतो - आणि सुरुवातीला उद्योगाचा जम बसवताना तो जास्त जाणवतो. एकदा श्रीमंतीची कमाल मर्यादा ओलांडली की तुमच्या दौलतीच्या आड तुमच्या कातडीचा रंग लपून जातो. नजमू विराणीला पहिलं दुकान घेताना जो वर्णद्वेष जाणवला तो त्याला आज प्रिन्स चार्लस्‌च्या मांडीला मांडी लावून बसताना जाणवणार नाही. पण नव्या नजमू विराणीला तो आजही जाणवतो तुम्ही भारतीय असाल किंवा पाकिस्तानी, ते तुम्हाला 'पाकी'च म्हणतात. पण नुसतं 'पाकी' म्हणत नाहीत, त्याबरोबर एक विशेषणही

असतं. Bloody Pakis असा तुमचा उद्धार होतो. त्यांचा हा द्वेष बऱ्याचदा दारू पोटात गेल्यावर भारतीय दुकानदाराच्या काचेवर फेकलेल्या दगडातून व्यक्त होतो किंवा बेकारी बेचैन करायला लागली किंवा बेकारी-भत्ता पुरेनासा झाला की भारतीय दुकानदारावर हल्ला करून त्याच्या पोटात घुसलेल्या सुऱ्यातून व्यक्त होतो. अशा परिस्थितीत उभी राहिलेली ही उद्योगांची साम्राज्यं पाहिली की खरंच मान ताठ होते.

बरेच उद्योगपती गोऱ्यांच्या वर्तुळात वावरतात. पण तरीही ब्रिटिशांबद्दल असलेली अढी कधीतरी त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होते. कुठली तरी जुनी जखम त्यांना आठवते आणि मग ते बोलून दाखवतात. मी नाव घेत नाही कारण त्याचं नाव घेणं योग्य नाही. तिथल्या एका महत्त्वाच्या भारतीय व्यक्तीने मला सांगितलं, ''आमची एकच महत्त्वाकांक्षा आहे की इंग्लंडमधे राहून ह्या ब्रिटिशांवर राज्य करायचं. राजकीय राज्य आम्हाला शक्य होणार नाही, पण आर्थिक राज्य अशक्य नाही. हे मूठभर ब्रिटिश लोक आमच्या देशात आले आणि आम्हाला मनसोक्त लुटून गेले. त्यांच्या तुलनेत आम्हीही इथे मूठभरच आहोत. पण आज ना उद्या इंग्लंडच्या आर्थिक नाड्या आम्ही आमच्या हातात ठेवू. तो आमचा विजय असेल. ह्या गोऱ्यांवर उगवलेला तो सूड असेल. कालचक्र उलटं फिरलंय ह्याची जाणीव त्यांना व्हायला लागली आहे.''

आणि खरंच त्यांना ती व्हायला लागली आहे. आज अमेरिकेत जपान्यांना पाण्यात पाहिलं जातं, कारण अमेरिकेने अणुबॉम्ब टाकून त्यांची एक पिढी बरबाद केल्यावर आज जपानी माणसं आर्थिकदृष्ट्या त्यांच्या उरावर बसली आहेत. इंग्लंडमध्ये तीच गोष्ट भारतीयांनी केली आहे.

हिंदी आर्थिक वसाहतीची ती सुरुवात असेल.

*(श्रीदीपलक्ष्मी दिवाळी १९९०)*

# सागरा प्राण तळमळला

“तुला ब्रायटनला जायचंय? कशाला? अरे, तू मुंबईत समुद्र पाहतोस ना, तसाच समुद्र आहे. चौपाटीपेक्षा जरा स्वच्छ आणि भेळपुरीऐवजी तिकडे सँडविचेस मिळतात. बाकी काही फरक नाही.”

लंडनमधला माझा गुजराथी मित्र मला समजावत होता. पण माझा हट्ट पाहून त्याने हळूच विचारलं, “तुला तिथला न्यूडिस्ट कॅम्प वगैरे पाहायचा नाही ना? तसं असेल तर जाऊ नकोस. तिथले गोरे तुला जवळपाससुध्दा फिरकायला देणार नाहीत, त्यापेक्षा घरी बसून ‘पेंटहाऊस’ चाळ.” शेवटी मी चिडून म्हटलं, “तुझा वात्रटपणा पुरे कर. ब्रायटनला जाण्यामागे एक कारण आहे. आमच्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी एक अजरामर कविता लिहिलीय. ती त्यांना ब्रायटनच्या समुद्रकिनाऱ्यावर सुचली. खरं तर...”

“बस बस!” तो मला थांबवत म्हणाला, “कळलं मला! तू असं कर, इथून क्रॉयडनवरून ट्रेनने सरळ ब्रायटनला जा, अर्ध्या तासात पोहोचशील. कारने जायचा हट्ट धरू नकोस. तिथे गोरे भलतीच गर्दी करतात. ट्रॅफिक भयंकर असतो. आपल्याला कारने जायलाच दोन तास लागतील. बरोबर स्वेटर ठेव. हवा बदलली तर तिथे समुद्रावर कुडकुडशील.”

माझा मित्र त्याच्या दुकानात पौंड कमवत बसला आणि मी बायकोसह ब्रायटन गाठलं.

अख्खं ब्रायटन हॉलीडे मूडमध्ये होतं. मी मात्र वेगळ्याच मूडमध्ये होतो. आजूबाजूची गडबड कानात शिरत नव्हती. ती शिरण्याएवढी जागा कानात होती कुठे? ‘सागरा प्राण तळमळला...’ हे शब्दच कानात ठाण मांडून बसले होते. सतत कानात घुमत होते.

बायकोनं थोडंसं भानावर आणल्यावर मी तिथल्या रेल्वे स्टेशनवर समुद्राकडे



*पर्यटकांनी नेहमीच गजबजलेला ब्रायटनचा समुद्रकिनारा*

जायचा रस्ता विचारला. तिथला गोरा तिकीट-चेकरही हॉलीडे मूडमध्ये होता. म्हणाला, ''हॉलीडेसाठी आलायत? ह्या रस्त्यानं सरळ जा, थेट समुद्रातच शिराल.'' पाहिलं तर समोर दूरवर समुद्र दिसत होता. 'ने मजसी ने परत मातृभूमीला...' अशी सावरकरांनी ज्या समुद्राला साद घातली त्या सागराजवळ येऊन मी ठेपलो होतो. नुसत्या त्या विचारानेच मी शहारलो.

ब्रायटन हे तसं छोटंसं जुनं शहर. तिथल्या जुन्या इमारतींवर एक भारदस्तपणाची छटा आहे. मनात विचार आला, ह्याच प्रासादासारख्या इमारतीकडे पाहून सावरकर म्हणाले असतील का- 'प्रासाद इथे भव्य, परि मज भारी आईची झोपडी प्यारी.' एकेकाळी ह्या कवितेतली ही ओळ हृदय कापत जायची. आज वाटतं ती भावना सावरकरांच्या पिढीबरोबरच संपली. मी इंग्लंड-युरोपात गेल्या काही सफरीत जे पाहिलं त्याचा ह्या भावनेशी पुसटसासुद्धा संबंध नव्हता. 'प्रासादाच्या' आकर्षणाने तर कितीतरी भारतीय 'आईची झोपडी' सोडून गेले होते. त्यांना आईच्या झोपडीची अधून-मधून आठवण येते, पण तिथे परतायचं नसतं.

सावरकरांनी ह्याच ब्रायटनच्या समुद्राला काकुळतीला येऊन सांगितलं होतं, ''तिजविण नको राज्य, मज प्रिय साचा वनवास तिच्या जरी. .'' आज आम्हाला परदेशात वनवास चालतो. तिथल्या हॉटेलात खरकटं काढणं परवडतं, पण भारतात

परतायची तयारी नव्हे.

बदलत चाललेल्या भोवतालच्या भारतीयांना दूषणं देत मी समुद्रावर पोहोचलो. एखाद्या शांतपणे पहुडलेल्या अवाढव्य माणसासारखा तो समुद्र दिसत होता. सावरकरांना तो निर्दयी वाटला होता. त्याला एका आचमनात गिळणाऱ्या अगस्ती ऋषींची धमकीसुद्धा सावरकरांनी दिली होती. त्या दिवशी त्या निर्दयी हसण्याचा मागमूससुद्धा नव्हता. छोटी-छोटी मुलंसुद्धा न भीता त्याच्या कुशीत शिरत होती

मी क्षणात भानावर आलो. तो मला निर्दयी वाटणार तरी कसा?

'शुक पंजरी वा हरिण शिरावा पाशी, ही फसगत झाली तैशी...' अशी माझी थोडीच अवस्था होती. मस्तपैकी इंग्लंडला मी फिरायला आलो होतो आणि तिथे राहायची माझी इच्छा असती तरी ब्रिटिश सरकार मला थोडेच ठेवून घेणार होते? व्हिसाची मुदत संपली की लाथ बसणारच होती.

मग मी भावनेच्या भरात इतरांना दूषणं देण्याचा मूर्खपणा का करत होतो? मी सुद्धा दुकानात पौंड मोजत बसलेल्या माझ्या मित्राच्या पिढीचाच प्रतिनिधी होतो. मी इंग्लंडमध्ये स्थायिक झालो नसेन, पण संधी मिळाली की उड्या मारत इंग्लंडला जात होतो.

असे शहाण्यासारखे विचार मनात उगवायला लागले आणि माझी खात्री पटली की, भरकटलेल्या भावनात्मक जगातून व्यवहारी जगात मी व्यवस्थित पाय ठेवलाय. पण मन पुन्हा भरकटू नये म्हणून मनाला समजावलं, "महापुरुषाच्या बुटावर आदराने डोकं ठेवायचं असतं. इतरांच्या पायाला तो कसा बसतो ते पाहायचं नाही. नकळत आपलाच पाय आत जातो आणि तो मुंगीएवढा वाटायला लागतो."

दुसऱ्याच क्षणी माझं भावनात्मक विव्हळणं थांबलं आणि मी हॉलीडे मूडमध्ये शिरलो.

त्या मूडमध्ये पहिली गोष्ट माझ्या लक्षात आली की, अंगावर जरुरीपेक्षा जास्त कपडे आहेत आणि हातात बीयरकॅनऐवजी दुधाची बाटली आहे. (शिंची ॲसिडीटी आड आली होती) 'इथे स्वीमिंग कॉसच्युमव्यतिरिक्त काहीही घालण्यास मनाई आहे' असा बोर्ड त्या किनाऱ्यावर कुठे लावलाय का ते मी पाहात होतो. कारण त्यापेक्षा चिंधीभर जास्त कपडाही कुणाच्या अंगावर नव्हता. ती जवळपास विवस्त्र मंडळी माझ्यासारख्या सवस्त्र माणसाकडे कुतूहलाने पाहत होती. मी कपडे कमी करण्याचा निर्णय घेतला. उतरवून टाकलेल्या कपड्यांबरोबर थंडीच्या दुष्परिणामांच्या भीतीलाही मनातून उतरवलं. तिथल्या एका स्टॉलमधून स्वीमिंग कॉसच्युम घेतली. पाण्यात लोळायला तरंगणारी गादी घेतली. दुधाची बाटली बायकोजवळ सोपवली.

बीयरचा कॅन उघडला आणि पाण्यात शिरलो.

पाण्यात पडल्या-पडल्या मला जवळपास अख्खा ब्रायटनचा किनारा दिसत होता. त्याला नैसर्गिक सौंदर्य फारसं नव्हतंच. ब्रिटिशांनी त्याला सुंदर बनवलं होतं. एखाद्या सुमार दिसणाऱ्या मुलीला रूपरंगोटी करून रूपगर्विता म्हणून पेश करावं तसं! आपल्या देशाला तर सागराने वेढलंय. कितीतरी सुंदर समुद्र किनारे आपल्याकडे आहेत. पण ब्रिटिशांचं मेकअपचं ज्ञान आपल्याकडे नाही.

गोव्याच्या मिरामार बीचवर नुसता पाय ठेवल्यावर पायांना गुद्‌गुल्या होतात. कलंगूटच्या वाळूत अंग टाकलं की उठावंसं वाटत नाही. ती अंगाला गुद्‌गुदल्या करणारी वाळू ब्रायटनला नाही. तिथे गोटे आहेत. वाळू नाहीच मुळी. मुख्य म्हणजे ती खाडी आहे. अंगावर उसळणारा समुद्र तिथे नाहीच. अंगावर येणाऱ्या समुद्रात शिरण्यात एक वेगळीच धमाल असते. असा समुद्र नुसता पाहायलासुद्धा मस्त वाटतो. पण ते वैभव ब्रायटनकडे नाही. तो शांत असतो, ब्रिटिशांसारखा! तिथलं पाणी मात्र स्वच्छ आहे. पाण्याला निळी झाक आहे.

ब्रिटिशांनी पिकनिक स्पॉट कसा वसवावा हे तिथं दाखवलंय. पहिली गोष्ट म्हणजे सुट्टी घालवायला आलेल्या माणसाला तिथे काहीही मिळतं. नेसत्या वस्त्रानिशी तो तिथे आला तरी त्याचं काहीही अडत नाही. टॉवेल आणायला विसरलात? बिचवरच्या दुकानात मिळतो. गडबडीत वॉकमन घरी राहिला किंवा कॅमेरा हरवला? पैसे असतील तर मिळायला दहा पावलंसुद्धा खर्ची घालावी लागत नाहीत. खाणं, पिणं काय वाट्टेल ते! एवढंच काय 'सोबतीण' घरी राहिली, तरी तीही मिळण्याची सोय आहे.

पाण्यात आणि पाण्याशी खेळता येणारे बहुतेक खेळ तिथे खेळता येतात. यॉटिंग, स्किइंग करायचंय? सोय आहे यॉटिंग करायची हिंमत असेल तर यॉट भाड्याने मिळते. पाण्यात खोल जाऊन शंख शिंपले पाहायची हौसही भागवता येते. पाण्यात नुसतंच डुंबायचं असेल तर प्रश्नच नाही. पोहता येत नसेल तरी काळजी करायचं कारण नाही, लाईफ जॅकेटस् मिळतात. ती शरीराला अडकवायची आणि पाण्यात पडायचं. तिथे लहान मुलं मजेत पाण्यात डुंबत असतात. त्यांचे आई-बाप वाळूत डुंबत असतात. पाण्यात डुंबणाऱ्या त्यांच्या छोट्या डेव्हीड किंवा कॅथरीनची त्यांना काळजी करण्याची गरज नसते. लाईफ गार्डस् डोळ्यात तेल घालून तिथे नजर ठेवीत असतात आणि तरीही अगदीच काही विपरित घडलं तर दोन ॲम्ब्युलन्स तयार असतात.

तुम्हाला पाण्याचा कंटाळा आला आणि पैसे खिशात खुळखुळत असतील तर नशीब आजमावायला किनाऱ्यावर एक भव्य कॅसिनोसारखा प्रकार आहे. तो


लंडनमधल्या अस्सल कॅसिनोसारखा नाही. पण मशिन्सवर खेळणं ज्यांना आवडतं, ते तासन्तास तिथल्या मशिनशी चाळा करत असतात. त्या मशिन्समधून पैसे पडताना येणारा खाड् खाड् खाड् आवाज कानाला गोड लागतो. पण तरीही मी फारसा त्या मशिनच्या वाटेला गेलो नाही. कारण तो आवाज गोड वाटला तरी स्वत:च्या पैशाचा आवाज मला क्वचित ऐकायला मिळालाय आणि इंग्लंडमध्ये एक पौंड म्हणजे पन्नास रुपये हे गणित तुमच्या डोक्यात इतकं पक्कं बसलेलं असतं की हात मोकाट सुटतच नाही.

ब्रायटनचा समुद्र किनारा तसा मोठा आहे. लांबीच्या बाबतीत मरीन ड्राइव्हशी तुलना करता येईल. बरेचजण तो पायी तुडवत असतात. पण तसं करताना एक धोका असतो. हल्ली तिथल्या काही मंडळींना भन्नाट वेगाचं वेड लागलंय. त्यांच्या डोळ्यावर गॉगल असतो. कानावर वॉकमन असतो, अंगात लय असते आणि पायाखाली स्केट असतात. संगीताच्या तालावर ते भन्नाट वेगात फिरत असतात. तिथे अक्षरश: दोनदा मी माझं अपघाती मरण डोळ्यानं पाहिलं. पहिल्यांदा एक 'काळा पहाड' अंगावर कोसळता कोसळता मी वाचलो. तो चमत्कार झाल्यासारखा बाजूने निघून गेला. दुसऱ्यांदा एक गौरांगना नेम धरून अंगावर येतेय असं वाटलं. अंगावरचे केस उभे राहिले. दुसऱ्या कशामुळे नाही, भीतीमुळे! 'ओह नो!' म्हणत तिने स्वत:सकट मला कसं वाचवलं देव जाणे! पण त्यानंतर मी सरळ बाजूच्या छोट्या ट्रेनमध्ये उडी घेतली. ते एक चांगलं सुख आहे तिथे! किनाऱ्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकाकडे जायला पायपीट करायला नको. ती छोटी ट्रेन सेवेला असते. त्या छोट्या ट्रेनमध्ये बसल्यावर आपलंही बालपण परत आल्यासारखं वाटतं. बालपणाकडे घेऊन जाणाऱ्या आणखीन दोन-चार गोष्टी तिथे आहेत. एक छोटं डिस्नेलॅन्ड आहे. तिथं फिरलं की दिवस छोटा वाटायला लागतो.

ब्रायटनहून संध्याकाळी परतताना डोक्यात एकच विचार होता, अशी ब्रायटनं आपल्याकडे आपण का उभारू शकत नाही?

अशक्य नसावं. युरोपात कुठल्याही बीचवर किंवा पिकनिक स्पॉटला काही किमान सुखसोयी असतात. त्यातल्या काही आपल्यासारख्या गरीब देशालाही परवडण्यासारख्या आहेत. खासगी एस्सेल वर्ल्ड उभं राहू शकतं, तिथे असे पिकनिक स्पॉटस् का उभे राहू शकणार नाहीत?

थायलंड हा तसा आपल्यासारखाच गरीब देश आहे. पण तिथल्या पटाया बीचवर गेलं की पाय काढवत नाही. कृपया गैरसमज नको. मी बीचच्या आसपास फिरणाऱ्या 'भाडोत्री' जलपऱ्यांबद्दल म्हणत नाही. तिथल्या वॉटर स्पोर्टस्‌बद्दल बोलतोय. वॉटर स्कूटर घेऊन लाटांवर आरूढ होण्यात काय मजा असते, ते



ब्रायटनच्या समुद्रकिनाऱ्यावरचा एक कॅसिनो

अनुभवावंच लागतं. तुम्ही मला सांगा, आपल्यासारख्या सामान्य माणसाचा पॅरॅशूटशी संबंध येतो? पॅरॅशूटने उतरतोय असं स्वप्नसुद्धा मला पडलेलं नाही. पण पॅरॅशूटला लोंबकळण्यात काय गंमत असते, हे मी अचानक पटायाला अनुभवलं. किती सोप तंत्र होतं. पॅरॅशूटची लांब दोरी लॉचला अडकविली जाते. लॉच समुद्रात फिरायला लागली की हवा भरलेलं पॅरॅशूट वर जातं. लाईफ जॅकेट लावून आपण त्याला लोंबकळत असतो. दहा-पंधरा मिनिटं फिरवून पुन्हा लॉच किनाऱ्यावर येते आणि हातातली विशिष्ट दोरी खेचली की आपणसुद्धा अलगद वाळूवर उतरतो. महिलासुद्धा अशी मजा लुटू शकतात.

ह्या अशा गोष्टी आपल्याकडे आणणं कठीण नाही. मुंबईत तर अशक्य नाही. पण माशी कुठे शिंकते कळत नाही. मुंबईच्या जवळ शंभर-दीडशे किलोमीटर्सच्या अंतरावर काही अप्रतिम समुद्र किनारे आहेत. अलिबागजवळ किहीम आहे थोडं पुढे मुरूड-जंजिऱ्याचा समुद्र आहे. पालघरजवळ केळव्याचा समुद्र आहे. तिथे छोटं ब्रायटन वसवणं कठीण वाटतं तुम्हाला? मुळीच नाही. महाराष्ट्र टुरिझम डिपार्टमेंटला शक्य नसेल तर खाजगी उद्योगांना परवानगी द्यावी. चार तोंडं नक्की बोलतील, 'श्रीमंतांचे चोचले पुरवण्याचा हा प्रयत्न आहे.' अशा वेळी अनेकांना गरिबी आठवते. त्यांना बोलूद्यात! पण ही गोष्ट श्रीमंतांचे चोचले पुरवणारी नाही. ती

भारताला बहुमोल विदेशी मुद्रा मिळवून देऊ शकेल.

युरोपात मी पाहिलंय, उन्हाळा आला की पर्यटकांच्या झुंडीच्या झुंडी स्पेनकडे वळतात. कारण एकच, समुद्र किनारा! थंड प्रदेशातल्या गोऱ्यांचं दोन गोष्टींवर अतोनात प्रेम असतं. एक पाणी, दुसरा सूर्य! पाणी ते सहसा पीत नाहीत. तिथे हॉटेलात तुम्ही प्यायला पाणी मागितलंत तर पणशीकरांच्या उपाहारगृहात बीयर मागितल्यावर जे भाव वेटरच्या चेहऱ्यावर उमटलेले दिसतील ते तिथल्या वेटर्सच्या चेहऱ्यावर उमटतील. ते प्रेमाने पितात, बीयर किंवा कोक. पण त्यांना पाण्यात डुंबायला आवडतं आणि प्रदीर्घ हिवाळ्यानंतर सूर्यदर्शन झालं की फक्त तिथल्या झाडांनाच पालवी फुटत नाही, तर गोऱ्यांच्या मनालाही पालवी फुटते. ते टवटवीत होतात. स्वेटर्स कपाटात भिरकावले जातात आणि गोरी अंगं सूर्यकिरणांच्या स्वाधीन होतात.

त्यांचं आणखीन एक वैशिष्ट्य आहे. सुट्टी घरी झोपून किंवा टीव्ही बघत घालवणं त्यांच्या रक्तात नाही. सुट्टी मिळाली की घराबाहेर पडणं हा त्यांचा खाक्या. त्या दिवशी सूर्य तळपत असेल तर बागा-बागांतून गोरे तुम्हाला सनबाथ घेताना दिसतील. ते स्पेनला, सूर्यप्रकाश फार वेगळा आहे किंवा समुद्रात मोती मिळतात म्हणून जात नाहीत. सुट्टीचा क्षण एन्जॉय करण्याच्या सर्व सुविधा त्यांना तिथे मिळतात म्हणून ते जातात. त्या तुम्ही त्यांना भारतात द्या, ते भारतात येतील. त्यांचा पौंड, त्यांचा फ्रँक, त्यांचा मार्क आपल्या रुपयापेक्षा केवढा तरी श्रीमंत आहे. त्यांना इथे खर्च करताना हातपण आखडता घ्यावा लागणार नाही.

पाश्चात्त्य पर्यटक जाऊद्यात, तुम्हा-आम्हाला चांगल्या सुविधा मिळाल्या तर नको आहेत का? आपल्या गोव्यात काही प्रमाणात छोटे ब्रायटन आणि मॅजोरिका यशस्वीपणे उभे राहिले आहेत. महाराष्ट्र टुरिझमनेही विचार करायला हरकत नाही.

रात्री लंडनला पोहोचल्यावर माझ्या मित्राने मला विचारलं, ''काय, जीव शांत झाला? तुझ्या त्या 'सागरा प्राण तळमळला!...' कवितेचं उगमस्थान डोळे भरून पाहिलंस ना? काय वाटलं?'' मी म्हटलं, ''ब्रायटनचा समुद्र पाहून माझाही प्राण तळमळला, पण वेगळ्या कारणासाठी.''

*(लोकसत्ता १६ जून १९९१)*

# यंत्राची आधुनिक दुनिया

हिथ्रो विमानतळावरच्या इमिग्रेशनमधून मी नुकताच बाहेर पडलो होतो. उंच टेबलावर बसलेल्या सोनेरी केसाच्या एका सुंदर मुलीने फारसे प्रश्न न विचारता माझी इमिग्रेशनमधून सुटका केली होती. हायसं वाटत होतं. मुंबईहून निघताना इमिग्रेशन ऑफिसर्स कसे छळतात ह्याच्या कहाण्या अनेकांनी ऐकवल्या होत्या. 'गोऱ्या मुली तर पुरुषापेक्षा जास्त खडूस' असाही काहींनी स्वानुभव सांगितला होता. पण त्या सुंदर मुलीने गोड हसत स्वागत केलं आणि 'हॅव अ नाईस टाइम' म्हणत प्रेमाने पासपोर्टवर शिक्का मारला.

वेळ पहाटेची होती. मस्तपैकी तोंड धुवावं आणि फ्रेश होऊन लंडनमध्ये पहिलं पाऊल ठेवावं असा सुविचार मनात आला. बाजूच्या एका स्वच्छ टॉयलेटमध्ये शिरलो. तिथल्या टॉयलेटमधली स्वच्छता पाहून घरच्या टॉयलेटचीसुद्धा लाज वाटायला लागली होती. बॅगेत बायकोने ठेवलेला ब्रश आणि टूथपेस्ट बाहेर काढली आणि बायकोच्या दूरदृष्टीचं कौतुक करत दात घासत असतानाच एक गोरा माझ्या बाजूने जाऊन एका मशिनसमोर उभा राहिला. खिशातून त्याने नाणं काढलं. त्या मशिनमध्ये टाकलं. एक छोटा ब्रश बाहेर आला. बाजूच्या एका पोकळीतून छोटी पेस्ट बाहेर आली. मी चकित होऊन पाहात राहिलो. मला वाटलं, आता हा आणखीन एक नाणं सरकवणार आणि तो ब्रश आपोआप दातावरून फिरायला लागणार, पण तसं काही झालं नाही.

मी माझं तोंड धुणं संपवून 'पाम ऑलिव्ह का जवाब नही' म्हणत दाढीवरून हात फिरवला. दोन वर्षापूर्वी मनिष मार्केटमधून विकत घेतलेला इंपोर्टेड जिलेट रेझर मी दाढीवरून फिरवणार इतक्यात तो गोरा मला पुन्हा त्या मशिनशी चाळे करताना दिसला. मशिनमधून त्याने दाढीचा रेडी फोम आणि रेझर बाहेर काढला. माझा जिलेटचा तोरा क्षणात संपला. त्या माणसाने मस्त दाढी केली. शेजारच्या 'लिटर'

लिहिलेल्या पिंपात तो रेझर फेकला. बॅगेतून उंची आफ्टर शेव्ह बाहेर काढलं, चेहऱ्यावर शिंपडलं आणि पुन्हा मशिनपाशी गेला. त्या मशिनमधून जी गोष्ट बाहेर आली ती पाहून त्याच्या दूरदृष्टीने खजिल व्हायची वेळ माझ्यावर आली होती. पहाटे चक्क त्याने 'रात्रीचा' विचार केला होता. त्या मशिनमधून आलेलं कंडोमचं पाकीट शांतपणे बॅगेत ठेवून तो मुक्कामाला गेला.

मी वेडावलो होतो. आपलं टॉयलेट स्वच्छ असणं आणि नळाला पाणी असणं हीच गोष्ट क्रांतिकारी असते. एखाद्या पंचतारांकित हॉटेलात दुसऱ्याच्या पैशावर जेवायला गेल्यावर क्वचितप्रसंगी गरम हवा सोडणारं हात वाळवण्याचं मशिन फार तर आपण पाहिलेलं असतं. त्यामुळे मशिनमधून बाहेर पडणाऱ्या टूथपेस्टपासून कंडोमपर्यंतच्या वस्तू पाहिल्या की आपण चक्रावून जातो. ब्रिटिशांच्या यांत्रिकी-करणाला दाद देत मी विमानतळाच्या बाहेर पडलो. माझा मित्र वाट पाहात उभा होता. सामानाची ट्रॉली ढकलत आम्ही त्याच्या गाडीपाशी जाऊन पोहोचलो. थोड्या हवापाण्याच्या आमच्या गप्पा सुरू होत्या. पण मन मात्र त्या मशिनमध्ये गुंतलेलं होतं. आम्ही त्याच्या गाडीत सामान ठेवलं. स्वत:ला पट्ट्याने आवळून घेतलं आणि त्या प्रचंड कार पार्कमधून गाडी एका फाटकाजवळ आली. फाटक म्हणजे एक लोखंडी खांब समोर आडवा पडून रस्ता अडवत होता. 'अरे कोई है' हे इंग्रजीत कसं म्हणायचं, हे मी मनातल्या मनात जुळवत असताना माझ्या मित्राने एक छोटंसं तिकीट बाजूच्या यंत्रात टाकलं. आदबशीर गुरख्याप्रमाणे तो आडवा खांब सरळ झाला आणि आम्ही त्या कारपार्कमधून बाहेर पडलो.

ह्या गोष्टीला आज सात वर्षे झाली. त्यानंतर तीनदा मी युरोपमध्ये भटकंती केली. पण तिथल्या छोट्या छोट्या मशिनवर बसलेलं प्रेम कमी झालेलं नाही. त्या मशिनबद्दल आणि त्या मशिन बनविणाऱ्या माणसांबद्दल मला अपार कौतुक वाटतं. त्या छोट्या छोट्या यंत्रांनी माणसाचा रोजचा व्यवहार केवढा सोपा करून टाकलाय. तिथे नोकरदार माणूस महाग पडतो. म्हणून त्यांनी यंत्रालाच नोकर बनवलं. तिथे धोबी महाग पडतात म्हणून कपडे धुण्याचं यंत्र आलं. तिथे लॉन्ड्री हा प्रकार आपल्यासारखा नाही. तुमच्याकडे कपडे धुण्याचं मशिन नसेल तर सार्वजनिक मशिनवर आपले कपडे आणि साबण घेऊन जायचं आणि कपडे धुऊन घ्यायचे. स्वित्झर्लंडला मोठमोठ्या इमारतींची स्वत:ची कपडे धुण्याची यंत्रं असतात. प्रत्येकाचे कपडे धुण्याचे दिवस ठरलेले असतात. त्या दिवशी त्याने चादरीपासून खिडक्यांच्या पडद्यापर्यंत सर्व धुऊन घ्यायचं.

तिथे भांडी घासायला एखादी हेलन किंवा ॲलीस येत नसते. लोक डिशवॉशर विकत घेतात. जेवण झालं की भांडी आणि ताटं त्यात सरकवायची.




छानपैकी धुऊन, वाळून बाहेर येतात. तिथे गरीबातल्या गरीब माणसाचं घरही वेगवेगळया छोट्या मशिन्सने भरलेलं असतं. टी. व्ही.चं अप्रुप आता आपल्यालाही राहिलेलं नाही. पण युरोपमध्ये मध्यमवर्गीय कुटुंबात जो 'केबल टी. व्ही.' नावाचा प्रकार पाहिला तो अचाट होता. मुळात टी. व्ही.चा पडदा होता ९५ सेंटीमीटर्सचा आणि केबल लावल्यामुळे जवळजवळ २१ चॅनल्स त्या टी. व्ही. ला उपलब्ध झाले होते. त्यात युरो स्पोर्टस् नावाचा चॅनेल चोवीस तास सुरू असायचा. आता आपल्याकडेही बरेच चॅनल्स चोवीस तास सुरू असतात. पण तिथले काही चॅनेल्स

कसे उपयोगी असतात पहा. विमानाच्या वेळा पाहायच्या आहेत? अमुक एक विमान विमानतळावर उतरलं की नाही ते पाहायचंय? तर विमानतळावर फोन करायला नको. एक विशिष्ट चॅनेल लावला की कळतं. रेल्वेचं टाइमटेबल किंवा अगदी महत्त्वाचे टेलिफोन नंबर्ससुद्धा तुम्हाला टी. व्ही. वर शोधता येतात.

'घर राखायला गुरखा' नावाचा प्रकार तिथे फक्त अतिश्रीमंतांकडे असतो. मध्यमवर्गीयाला तो परवडत नाही. मग घराचं संरक्षण कसं करायचं? पुन्हा यंत्रालाच नोकरासारखं राबवायचं. मोठी इमारत असेल तर खालच्या दरवाजाच्या बाजूला असलेल्या मशिनमधून आवाज येतो. घाबरून जायचं नाही. ती भुताटकी नसते. वरचा माणूस 'कोण आहे?' म्हणून विचारत असतो. मी अमूक तमूक असं त्याला सांगितलं आणि त्याला तुम्हाला घरात घ्यायचं असेल, तर तो वरूनच एक बटण दाबतो आणि दरवाजा उघडतो. मग तुम्ही लिफ्टने वरती जायचं. त्याने स्वत:च्या घराचा दरवाजा त्याच्या दिवाणखान्यातून आणखीन एक बटन दाबून उघडलेला असतो.

बंगला असेल तर शहाणी मंडळी 'बर्गलर अलार्म' लावतात. (इंग्लंडमध्ये सर्वसाधारण माणसं बंगल्यातच राहतात.) कुणी दरवाजा फोडला की अलार्म जोराने वाजत राहतोच, पण तो जवळच्या पोलीस चौकीतही वाजतो आणि पोलिसांना वर्दी मिळते. तिथला 'बॉबी' प्रामाणिक, कर्तव्यदक्ष असल्यामुळे चटकन तुमच्या मदतीला येतो. बरं, तेवढ्यावरही तुमचं समाधान नसेल तर तुम्ही घरात कॅमेरा लावायचा. चोर त्या कॅमेऱ्याच्या भिंगापुढून सरकला की त्याचे धडाधड फोटो घेतले जातात. अर्थात, एवढं होऊनही चोऱ्या होतातच. माणसाची कातडी काळी असो किंवा गोरी, देशात सुबत्ता असो वा नसो, काही स्वभावधर्म सारखेच असतात. तिथे मूलभूत प्रामाणिकपणा मोठ्या प्रमाणात असला तरी एक साहस, धमाल म्हणून चोऱ्या करणारे, खून करणारेही खूप असतात. महिन्यापूर्वी मी लंडनला होतो तेव्हा एका तरुण मुलाने ९० वर्षाच्या म्हातारीचा घरात घुसून खून केला. फार काही पळवलं नाही किंवा म्हातारीशी त्याची दुष्मनी वगैरेही नव्हती. खून करायचं कारण एकच. 'थ्रिल'.

तुम्ही युरोपात फिरायला रस्त्यावर उतरलात की सर्वत्र छोटी यंत्रं तुमच्या सेवेला हजर असलेली दिसतील. टेलिफोनचं खरं सुख तिथे मिळतं. मुंबईत सार्वजनिक टेलिफोनवरून फोन करायचा म्हटलं की अंगावर काटा येतो. बऱ्याच वेळा तो बिघडलेला असतो. मग सुट्ट्या पैश्यांची मारामार! बरं, पैसे त्या पेटीत टाकले की ते जाण्याचीच भीती जास्त. तुमचं त्या दिवसाचं भविष्य चांगलं असेल तर फोन लागतो. इंग्लंड किंवा युरोपात नाक्या-नाक्यावर फोन असतात. ह्या

फोनवरून जगाच्या पाठीवर तुम्ही कुठेही फोन करू शकता सुट्ट्या पैश्यांची अडचण तिथे असत नाही. पैसे टाकायचा त्रास वाचवण्यासाठी तिथे फोन कार्डही मिळतं ते फोन कार्ड टाकून त्यावरचे युनिट संपेपर्यंत तुम्ही फोन करू शकता. तिथे फोन लागला नाही अशी थाप सहसा कुणालाही मारता येत नाही. क्रॉस कनेक्शनची गंमत ऐकायला मिळणं म्हणजे कपिलाषष्ठीचा योग आणि तुमच्या दुर्दैवाने फोन लागलाच नाही, तर मशीनमधून पैसे बाहेर पडतात. मशीनचा प्रामाणिकपणा अगदी शंभर नंबरी असतो. बऱ्याच टेलिफोन बूथमध्ये डिरेक्टरीही तुमच्या सेवेला असते. 'तिथे रद्दी'ला भाव नसल्यामुळे ती विकली जात नाही आणि अगदी तुम्ही अडचणीत असाल, खिशात एकही पेनी नाही आणि तुम्हाला लंडनहून मुबईला बोलायचंय तरीही कुठल्याही रस्त्याच्या कोपऱ्यावरून सोय आहे रिसिव्हर उचलून १५५ हा नबर फिरवला की गोड आवाजात 'मे आय हेल्प यू?' असं विचारलं जात मला 'कलेक्ट कॉल' करायचाय असं आपण सांगितलं, मुंबईचा फोन नंबर दिला आणि मुंबईतल्या माणसाची पैसे भरायची तयारी असेल तर तीन मिनिटांत फोन लागतो जास्त वेळ लागला, तर दोष 'एम टी एन [illegible] चा असं खुशाल समजायला हरकत नाही मुंबईतल्या ऑपरेटरला एक तर ब्रिटिश उच्चार समजलेले नसतात किंवा मुबईतल्या टेलिफोन लाइनचा गोधळ झालेला असतो. तिथे हायवेवरही प्रत्येक मैलावर फोन असतो तुमची गाडी बिघडली आणि तो फोन तुम्ही फिरवलात की ताबडतोब ब्रेक डाऊन व्हॅन येऊन तुमच्या सुटकेचे प्रयत्न होतात.

युरोपमध्ये बसला कंडक्टर क्वचित असतो. बहुतेक वेळा ड्रायव्हरच तिकीट देतो पण जिनेव्हात मी प्रत्येक बस स्टॉपवर बसच्या तिकिटाचं एक मशिन पाहिलं. त्यावर बस रूटचा नकाशा आणि तिकिटाचे दर लिहिले होते. आपण त्या मशीनमध्ये पैसे टाकून तिकीट घ्यायचं आणि ते ड्रायव्हरला दाखवून बसमध्ये चढायचं. अर्थात- तिकिटाची मशीन्स तिथे रेल्वे प्लॅटफॉर्मवर सर्रास असतात. पण त्यातही गंमत आहे काही मॉडर्न मशीनमध्ये हल्ली नोटासुद्धा चालतात आणि योग्य सुटे पैसे मिळतात. सुट्टे पैसे देण्याची त्या मशीनची क्षमता संपली असेल तर मशीन तसं दर्शवतं. तिथे स्टेशनवर कोकच्या कॅनसाठी, सिगारेटसाठी दुकानदाराला त्रास द्यावा लागत नाही. मशीनच तुमची सेवा करते.

लंडनमध्ये व्हिक्टोरियासारख्या प्रचंड स्टेशनात फारसे तिकीटचेकर्स लागत नसतात. तरीही तिथे 'रेल्वेचा जावई' असल्याच्या थाटात फुकट फिरता येत नाही. एक तर कुठल्याही स्टेशनवर बाहेर पळण्यासाठी पळवाटा नसतात आणि बाहेर जाण्यासाठी जे छोटे दरवाजे असतात त्या दरवाजाचा एक भाग असलेल्या

मशीनमध्ये योग्य तिकीट टाकल्याशिवाय तो दरवाजा उघडत नाही. त्या दरवाजाशी दोनदा तुम्ही झगडताना दिसलात की टी. सी. हळूच तुमचं तिकीट बघायला येतो.

तुम्ही एखाद्या अजस्र सुपरमार्केटमध्ये शिरलात आणि अगदी शंभर वस्तू खरेदी केल्यात तरी तुमचं बिल तयार व्हायला तीन मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागणार नाही. तिथे प्रत्येकाची खरेदी तशी मोठी असते. कारण 'संध्याकाळी ऑफिसमधून येताना भाजी घेऊन या' वगैरे हुकूम सौ. स्मिथ किंवा सौ. करेन मिस्टरांना देत नाहीत. पाच वाजता तिथे बहुतेक सर्व (भारतीयांची सोडून) दुकानं बंद होतात. त्यामुळे शनिवार हा त्यांचा मुख्य खरेदीचा वार. त्या दिवशी आठवड्याचं सामान एखादा स्मिथ किंवा करेन, सेफवे, सॅन्सबरी वगैरेसारख्या सुपर मार्केटमध्ये जाऊन आणत असतो. चिकनपासून साबणापर्यंत आणि बटाट्यापासून टुथपेस्टपर्यंत सर्व त्या दुकानात मिळतं. त्यामुळे मिस्टर स्मिथ किंवा मिसेस स्मिथची ट्रॉली सामानाने भरलेली असते. पण तरीही अवघ्या तीन मिनिटांत ते बिल देऊन बाहेर पडतात. तिथल्या प्रत्येक वस्तूवर कॉम्प्युटर कोड लावलेला असतो. ती वस्तूची बाजू मशिनवरून सरकवली की कॉम्प्युटरमध्ये आपोआप किमतीची बेरीज होत जाते. टेबलावर डाव्या हातातून उजव्या हाताकडे प्रत्येक वस्तू सरकवायला जेवढा वेळ लागतो तेवढा वेळ फक्त बिलाला लागतो. कारण शेवटची वस्तू सरकवल्यावर तुमचं बिल तयार असतं आणि तो कॉम्प्युटर एवढा चलाख असतो की जी वस्तू बाहेर जाते ती वस्तू त्या दुकानाच्या स्टॉकमधून कमी करण्याची नोंदही होते. त्यामुळे संध्याकाळी किती माल संपला, किती उरला त्याची तंतोतंत नोंद कॉम्प्युटर देतो.

काही यंत्रांचा प्रेमळ सहवास म्युझियम किंवा एखाद्या प्रेक्षणीय स्थळीसुद्धा लाभतो. म्युझियममध्ये समोरच्या पोर्ट्रेटची किंवा एखाद्या पुरातन वस्तूची माहिती सांगायला गाईड लागतोच असं नाही. समोरचं बटण दाबलं की टेपरेकॉर्डर सुरू होतो आणि इंग्रजी, फ्रेंच आणि जर्मन भाषेत माहिती कानावर पडायला लागते. काही ठिकाणी टेलिफोन बसवलेले असतात, ठरलेलं नाणं टाकलं की माहिती तुमच्या थेट कानात.

मध्यंतरी स्वित्झर्लंडमध्ये मी एक नवीन यंत्र पाहिलं. रविवार असल्यामुळे दुकान बंद होतं. पण तरीही लोकांची खरेदी सुरू होती. कारण माणसाचं काम अगदी इमानेइतबारे मशीन करत होतं. प्रचंड शोकेसमधून आत ठेवलेल्या वस्तू पाहता येत होत्या. प्रत्येक वस्तूखाली एक कोड नंबर आणि किंमत होती. तो कोडनंबर फिरवला आणि योग्य पैसे टाकले की त्या 'यंत्राचा हात' ती वस्तू अलगद उचलायचा आणि बाहेरच्या बास्केटमध्ये आणून ठेवायचा. ह्या यंत्रामागची भूमिका मला तिथल्या मित्रानं समजावून सागितली. तिथे मध्यंतरी वाद झाला की, दुकाने सहा वाजता बंद

करावीत की रात्री नऊला. तिथे कुठलाही कायदा पास करायचा असेल तर लोकमत घेतात. याबाबतीत लोकांनी काय मत दिलं असेल? त्यांनी दुकान सहा वाजता बंद करण्याच्या बाजूने मत दिलं. कारण दुकानात काम करणाऱ्या लोकांचा त्यांनी विचार केला. (यालाच प्रगल्भ लोकशाही म्हणतात.) पण मग इतरांचीही गैरसोय होऊ नये म्हणून हे यंत्र जन्माला आलं.

युरोपमध्ये बाहेरच्या भिंतीतल्या काऊंटरमधून कधीही पैसे काढता येतात. त्या यंत्राची जन्मकहाणी अशीच असली पाहिजे. पण आज त्याचा त्यांना केवढा प्रचंड उपयोग होतोय. इंग्लंडमध्ये त्याचा सर्व्हे केल्यावर त्यांना आढळलं की, दर मिनिटाला एक हजार माणसं त्या छोट्या कॉम्प्युटरच्या साहाय्याने पैसे काढीत असतात. २५ दशलक्ष क्रेडिट कार्डस् त्यासाठी वापरात आहेत. कॉम्प्युटरचं आगमन या युगात झाल्यापासून माणसाच्या कामाचा बराच मोठा बोजा त्या कॉम्प्युटरने उचललाय.

युरोपमधून भारतात आल्यावर एक-दोन दिवस चुकल्या-चुकल्यासारखं वाटतं. कारण ही सर्व यंत्रं तुमच्या अंगवळणी पडलेली असतात. हे 'यंत्रयुग' आता तसं भारतातही अवतरतंय. आता कपडे धुण्यासाठी गंगू मोलकरणीपेक्षा व्हिडीओकॉन जवळचं वाटतं. उपयुक्ततेबरोबरच 'स्टेटस्‌चा' विचारही आपण करतोच. हल्ली काही घरात व्हॅक्युम क्लीनरही असतात. युरोपात गरिबातल्या गरीब घरात कार्पेट असल्यामुळे त्याची गरज लागते. तसं आपलं काही नसतं. पण तरीही अजून यंत्रयुगाबाबत आपण युरोपच्या पन्नास वर्षं मागे आहोत. मनुष्यबळ हे आपलं सर्वात मोठं बळ असल्यामुळे पूर्ण यंत्रयुग इथे अवतरणार नाही. आपण 'बांधवांच्या' पोटावर पाय न देता उपयुक्त ठरणारी यंत्रं वापरात आणायला काहीच हरकत नाही. 'यंत्र, शाप की वरदान' वगैरे निबंध लहानपणी आम्ही आवेशात लिहिले. पण त्याचा वरदानाचा भाग किती मोठा आहे हे पाश्चिमात्य देशात फिरल्यावर फार चटकन कळतं.

*(लोकप्रभा ४ नोव्हेंबर १९९०)*

# पृथ्वीवरचा स्वर्ग

स्वित्झर्लंड हा देश म्हणजे माणसाला स्वर्ग कसा असतो ह्याची झलक दाखवण्याचा परमेश्वराचा प्रयत्न असावा. तिथे अप्रतिम निसर्ग आहे स्वच्छता आहे. सुबत्ता आहे. सुख आहे सुंदर माणसं आसपास वावरत असतात. स्वर्ग ह्यापेक्षा वेगळा काय असू शकणार?

जिनेव्हा शहर हे ह्या स्वर्गाचं एक दार आहे ह्या दरवाजात तुम्ही फ्रान्समधून शिरलात तर फ्रान्स हा मागासलेला देश वाटतो थेट मुंबईतून जिनेव्हात उतरलात तर झोपडपट्टीतून महालात शिरल्यासारखं वाटेल. (देशाभिमान बाजूला ठेवून प्रामाणिकपणाची कास धरून बोलतोय) मी तिथे रोमहून गेलो एका प्रचंड ऐतिहासिक वाड्यातून देखण्या आधुनिक वास्तूत आल्यासारखं वाटलं.

रोम ते जिनेव्हा हा विमानप्रवास माझ्या मनावर अक्षरशः गोदवला गेलाय. सकाळची वेळ होती आणि विमान आल्पस्वरून तरंगत होतं. विमानातून आल्पस् अक्षरशः हाकेच्या अंतरावर वाटत होतं. तो उन्हाळ्याचा मोसम होता. त्यामुळे आल्पस्वर फारसा बर्फ नव्हता, पण जिथे होता तिथे आल्पस् प्रचंड पांढरी फेल्ट हॅट चढवलेल्या बलदंड पुरुषासारखा वाटायचा जिथे बर्फ नव्हता तिथे वनराई पाहून डोळे भरायचे. हिरव्या कागदावर एखाद्या लहान पोराने आडव्या-तिरप्या पांढऱ्या रेषा माराव्यात तसे रस्ते वरून दिसत होते. खरं सांगू, ह्या निसर्गाचं सौंदर्य शब्दांत नाही पकडता येत. ते अनुभवावंच लागत आणि तो अनुभवच मी मनात टेप करून ठेवलाय पुन्हा पाहायचं असेल तर फक्त डोळे बंद करायचे आणि टेप सुरू करायची खुद्द जिनेव्हा शहरावरही निसर्ग मेहरबान आहे ते शहर वसलंय आल्पस्च्या मिठीत आणि शातपणे मैलोन्मैल पहुडलेल्या लेमान तलावाच्या काठावर

जिनेव्हा विमानतळावर उतरल्यावरही मन. पाहिलेल्या निसर्गसौंदर्यातच

रेंगाळत होतं, पण नंतर अचानक जाणवायला लागलं ते मनुष्यनिर्मित सौदर्य. तेही तितकंच वेड लावणारं होतं.

विमानतळ तसा छोटा होता, पण त्या मंडळीचा अस्वच्छतेशी साधा परिचयसुद्धा झाला असावा असं विमानतळ पाहिल्यावर वाटत नाही. तो विमानतळ पाहिल्यावर आपला सहार विमानतळ कणकवली नाही तर हातकणंगल्याचा यष्टीस्टॅन्ड वाटतो तिथे मला प्रकाश नेरुरकर भेटायला आले होते. ते माझ्या चुलत बहिणीचे यजमान इंग्लंड आणि अमेरिका सोडून इतरत्र मराठी माणूस दिसला की मला कमालीचं कौतुक वाटतं. कारण अजून तो आपल्याला मुंबईतल्या पेडर रोड, मलबार हिलच्या उंच इमारतीतही दिसत नाही. जगाच्या पाठीवर कुठेही भेटणारा भारतीय एक तर सरदारजी असतो नाही तर गुजराथी ही मंडळी मुळाक्षरंही हिशेबांच्या वहीतच गिरवत असावीत आणि अदृष्य पंख घेऊनच जन्माला येत असवीत. पंखात थोडी ताकद आली की ती स्वत:च्या घरट्यात रमतच नाहीत. पण हे नेरुरकर कुटुंबीय वीस वर्ष जिनेव्हात आहे.

जिनेव्हात बऱ्याच जागतिक संस्था आहेत. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन, युनेस्को, इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन वगैरे ह्या शहराची सुबत्ता, सौंदर्य आणि मुख्यत: राजकीय तटस्थतेमुळे ह्या संस्थांनी इथे गर्दी केली आहे. आदर्श लोकशाही ह्या देशात आहे. इथे छोट्या छोट्या प्रश्नांसाठीसुद्धा सार्वमत घेतलं जातं. नवीन मोटर वे तयार करावा का? दुकानं संध्याकाळी सहाच्या पुढे उघडी ठेवावीत का? वगैरे प्रश्नांसाठीसुद्धा सार्वमत घेतलं जातं. वीस वर्षापूर्वी ज्या देशात स्त्रियांना मतदानाचा हक्क नव्हता त्या देशाच्या लोकशाहीची ही प्रगती अफाट म्हणायला हवी. आंतरराष्ट्रीय संस्थांमुळे या शहराला कॉस्मोपॉलिटन चेहरा मिळालाय. फ्रान्सची सरहद्द ह्या शहरांपासून चार किलो-मीटरवर असेल. त्यामुळे फ्रेंच ह्या शहराची भाषा आहे. राजकीय तटस्थपणामुळे मोठमोठ्या नेत्यांनी ह्या शहरात आश्रयही घेतलाय. क्रांतीपूर्व काळात लेनीनचं वास्तव्य ह्याच शहरात होतं. इराणमध्ये खोमेनीने धुमाकूळ घातल्यावर पळालेली मंडळी इथे आल्पस्च्या कुशीतच लपली होती, पण तरीही ह्या शहरात कायमचं राहाण्यासाठी येणं सोपं नाही प्रकाश नेरुरकरांचे वडील इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियनमध्ये वरच्या पदावर दहा वर्ष असल्याने प्रकाशला इथे स्थायिक व्हायची संधी मिळाली.

विमानतळावर पाय ठेवल्यापासून स्वच्छता आणि श्रीमंती ठायी ठायी दिसायला लागते तिथे रस्ते एवढे स्वच्छ असतात की, आपल्या बुटांची धूळ लागून तर रस्ते खराब होणार नाहीत ना, अशी भावना आपल्या मनात निर्माण होते. मशीनच्या सहाय्याने तिथे रोज रस्त्याला आंघोळ घातली जाते. शहर अस्वच्छ


राहणार नाही याची प्रत्येक नागरिक काळजी घेत असतो. म्हणून ते शहर परीटघडीच्या कपड्यासारखं सदैव स्वच्छ दिसतं आणि श्रीमंती तर प्रत्येक वास्तूतून नुसती टपकतच नाही, तर ओसंडून वाहते.

तिथे पुलावरून रस्ता ओलांडताना बऱ्याच ठिकाणी पायऱ्या चढाव्या लागत नाहीत. लिफ्टची सोय असते. अर्थात लिफ्ट पुरवताना त्यांनी कडक नियमही केले आहेत. पांढऱ्या पट्ट्यावरून तुम्ही रस्ता ओलांडताना तुम्हाला अपघात झाला तर गाडीच्या ड्रायव्हरची खैर नाही. ड्रायव्हिंग लायसन्स जातंच, पण अपघातात सापडलेल्या माणसाचा हॉस्पिटलचा खर्च करावा लागतो. त्यामुळे तिथे पांढऱ्या पट्ट्यांवरून बागेत फिरल्याप्रमाणे जरी तुम्ही रस्ता ओलांडत असाल तरी वेगातली गाडी जवळ येऊन थांबते. 'मेसी' असं फ्रेंच भाषेत तो आभार मानतो आणि मगच पुढे जातो. 'बाप का रास्ता है क्या?' हे फ्रेंच भाषेत कसं म्हणतात हे ऐकायची उत्सुकता मला होती, पण ती पूर्ण झाली नाही. अर्थात ही गोष्ट युरोपमध्ये सर्वत्रच आढळते, पण जिनेव्हाचं वैशिष्ट्य हे आहे, की पांढऱ्या पट्ट्या सोडून जर तुम्ही रस्ता ओलांडत असाल आणि गाडीने तुम्हाला उडवलं तर तुमचं काही भलं बुरं होवो, गाडीचं झालेलं नुकसान तुम्हाला भरून द्यावं लागतं. म्हणूनच तिथे कुठूनही रस्ता ओलांडण्याचा मूर्खपणा कुणीही करत नाही. लिफ्ट लावलेल्या पुलाचा वापर केला जातो.

तिथे बरेचसे रस्ते एकमार्गी आहेत. त्यामुळे बऱ्याच वेळा जवळ जातानाही मोठा वळसा पडतो. पण ते तिथे अपरिहार्य आहे. प्रत्येक घरात किमान एक गाडी असते. रस्त्यावर माणसांपेक्षा गाड्या जास्त. त्यामुळे ट्रॅफिक जॅमचा प्रश्न आलाच. विस्तृत एकमार्गी रस्त्यांनी हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला गेलाय. पण तरीही ट्रॅफिक जॅम नसतो असं नाही.

परदेशी पाहुण्यांसाठी तिथे बस किंवा ट्रामचा प्रवास जास्त सुखकारक आहे. स्वस्त, मस्त आणि स्वच्छ. पण सर्वात चांगलं पायी फिरणं. शहर तसं लहान आहे. बरं, कमालीचं नीटनेटकं असल्यामुळे आणि झाडांची छाया सदैव तुम्हाला साथ देत असल्यामुळे फिरणं हा आनंददायी अनुभव असतो.

तिथे फिरण्यासाठी लेमान लेकच्या काठासारखी जागा नाही. एका बाजूला रंगीबेरंगी फुलांच्या बागा आहेत. त्या फुलांपेक्षाही सुंदर मुलं त्या बागेत खेळत असतात. चोचीत चोच घालून बसलेल्या प्रेमी युगुलांनाही ही बाग घरापेक्षा जास्त जवळची वाटते आणि हे सर्व पाहत लेमान तलाव शांतपणे पसरलेला असतो. जगात फिरण्याच्या अशा सुंदर जागा फार थोड्या आहेत. एक उत्तुंग कारंजा त्या तलावाचा शांतपणा भंग करण्याचा प्रयत्न उद्दामपणे करत असतो. अर्थात त्या आकाशाला



*स्वित्झर्लंड हा घड्याळांचा देश आहे.*

भिडू पाहणाऱ्या मोठ्या खांबाच्या जाडीच्या, पाण्याच्या उड्डाणाला कारंजा म्हणणं म्हणजे दोऱ्याला दोरखंड म्हणण्यासारखं आहे. तो तब्बल ४७० फूट वर उडतो. तिथे त्याला 'जेटडो' म्हणतात. जिनेव्हा शहराचं ते एक मानवनिर्मित वैभव आहे.

लेमान तलावाभोवती मी दोनदा फिरलोय. एकदा नेरुरकरांच्या कारमधून, दुसऱ्या वेळी ट्रेनने. अर्थात वेगवेगळ्या काठावरून. कारने फिरताना मी बंगले आणि बंगल्याभोवती फेर धरलेल्या बागा पाहिल्या होत्या. इतके अप्रतिम बंगले मी आयुष्यात प्रथम पाहात होतो. इंग्लंडमध्ये कुठेही फिरलात तर सगळी घरं जुळ्या भावंडांसारखी वाटतात. अगदी प्रत्येक घराचे पडदेसुद्धा वेगळे नसतात. इथे जिनेव्हात प्रत्येक बंगल्याचा नखरा वेगळा होता. परमेश्वराने प्रसन्न होऊन जर मला विचारलं असतं, "वत्सा, ह्यातला कुठला बंगला तुला हवाय?" तर निर्णय घेणं मला कधीच जमलं नसतं. ह्या शहरात जे सौंदर्यहीन असतं त्याची किंमत कमी असते. तुमच्या घराच्या गॅलरीतून समोर एखादी सौंदर्यहीन इमारत दिसत असेल तर तुमच्या जागेची किंमत कमी होते. तुमचा अपराध एवढाच, की तुमच्या गॅलरीतून सतत एक कंटाळवाणं दृश्य दिसतं. कुठेही पथारी पसरायची सवय असलेल्या आपल्यासारख्याला ही सौंदर्यदृष्टी म्हणजे 'श्रीमंतीचा माज' वाटतो.

त्यांच्या श्रीमंतीचे चटके आपल्यासारख्या गरीब देशातून आलेल्या माणसाला

क्षणाक्षणाला बसतात. त्या तलावाच्या प्रेमात पडल्यावर तलावाच्या काठाने मॉनत्रो ह्या नजीकच्या छोट्या शहरापर्यंत ट्रेनने जायचं मी ठरवलं. प्रवास किती? एक तासाचा. तिकीट पाचशेच्या आसपास. पण ट्रेन रुळावरून धावतेय असं वाटतच नाही ती तरंगतेय असाच भास होतो. तिथून छोट्या ट्रेनने मी 'कॉक्स' नावाच्या हिल स्टेशनवर गेलो तिथे पोचायला फक्त वीस मिनिटं लागली. पण तिकीट रुपये तीनशे वगैरे ते कॉक्स नावाचं स्टेशन कुठे संपतं आणि हॉटेल कुठे सुरू होतं हेच कळत नाही पण तिथून खाली दिसणारा लेमान लेक आल्पस्‌ची शिखरं आणि टुमदार मॉनत्रो शहराच्या दृष्याची रुपयात किंमतच मोजता येत नाही.

तिथे कशाचीही किंमत रुपयात करता येत नाही. स्वित्झर्लंड हा घड्याळांचा आणि चॉकलेटस्‌चा देश आहे जिनेव्हाच्या बाजारात फिरताना दिसणारी तऱ्हेतऱ्हेची घड्याळं डोळे अक्षरश: दिपवून टाकतात. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जपानी घड्याळांचा आज सुळसुळाट जाणवत असला तरी स्विस घड्याळांना आजही तोड नाही. पण तिथे ती काचेतून फक्त अधाशी नजरेने पाहायची असतात. आपल्या मनगटाला कुठलं शोभेल, भिंतीवर कुठलं चांगलं दिसेल ह्याचे मनातच मांडे खायचे असतात. कारण विकत घेताना आपला खिसा खूप लहान आहे ह्याची जाणीव होते. तिथली श्रीमंती अशी वारंवार आपल्या गरिबीची आठवण करून देत असते.

चॉकलेट हे त्यांचं पूर्णब्रह्म आहे. वाईनशिवाय ती माणसं जगू शकतात, पण चॉकलेटशिवाय नाही. चॉकलेटस्‌चे प्रकार तरी किती असतात? कुठलं चांगलं हे ठरवणं कठीण असतं. काही चॉकलेटस्‌ची वेस्टनं इतकी सुंदर असतात की चॉकलेटवरची चांदी काढावीशी वाटतच नाही. स्वित्झर्लंडमध्ये त्यातल्या त्यात आपल्या खिशाला परवडणारी तेवढीच गोष्ट आहे.

तिथे जेवणाच्या बाबतीत खास असं वैशिष्ट्यपूर्ण काही नाही. एखाद्या तलावासमोरच्या हॉटेलात शिरलात तर वीस मिनिटं वेटर तुमच्याकडे पाहणारसुद्धा नाही. हॉटेलात शिरलेला माणूस कानावर पडणारं संगीत ऐकायला आणि हॉटेलचं 'इंटीरियर' पाहायला आलाय असा त्यांचा समज असतो. अर्थात त्यामुळे तुमचं काही बिघडत नाही. समोरच्या तलावावरून नजर हटवावीशी तुम्हाला तरी कुठे वाटत असते? वीस मिनिटांनी त्याला तुमची आठवण झाल्यावर मात्र तुमची चांगली सरबराई होते

तिथे इटालियन खाणं छान मिळतं विशेषत: 'पिझ्झा' थोडीशी वाईन आणि पिझ्झा उदरभरणासाठी पुरेसं ठरतं मात्र पैसे विचारू नका. त्यांचे ३० फ्रँक्स, आपले मात्र ४५० रुपये त्या श्रीमंत देशात त्यापेक्षा स्वस्त जेवण मिळत नाही

तिथे घर चालवण्यासाठी नवरा आणि बायको दोघांनाही नोकरी करावी लागते.

बायकांना तिथे तासावर काम मिळू शकतं. म्हणजे ज्या बाईला जी वेळ शक्य असेल ती वेळ मागून घ्यायची. तुम्ही आठवड्यातले चार पाच ताससुद्धा काम करू शकता. कारकुनी किंवा विक्रेत्याच्या कामाला तिथे तासाला १८ ते २० फ्रँक मिळतात. नवरा-बायको मिळून ५००० फ्रॅंक्स मिळत असतील तर अगदी चैनीत राहता येतं. अर्थात खर्चही चटकन होतोच. गाडी बिघडली आणि मेकॅनिकला बोलावलं तर तोही तासाला १८ फ्रॅंक्सच घेतो. इन्कम टॅक्सही छळत असतो. पण त्या छळातून बाहेर पडायचा मार्ग गोड आहे मुलांना जन्म देत सुटायचं.

ह्या श्रीमंत देशांची दुखणी आपल्यापेक्षा वेगळी असतात. तिथे लोकसंख्या कमी होत चाललीय. त्यामुळे मुलांना फार जपलं जातं. जेवढी मुलं जास्त तेवढा टॅक्स कमी. शालेय शिक्षण तर फुकटच, पण इतर सवलतीही प्रचंड असतात. मुलं ही जवळजवळ सरकारने दत्तक घेतलेली असतात.

पण श्रीमंतीचे प्रताप त्यांना आता पाहायला मिळायला लागले आहेत. जगातल्या लक्ष्मीपुत्रांच्या संपत्तीसाठी ह्या शहराने खजिने बॅकांमध्ये राखून ठेवले आहेत. पण त्यांची 'संपत्ती' मात्र ड्रग्जच्या नशेत चूर व्हायला लागली आहे. लेमान तलावाच्या काठावर दोन तरुणांना पोलिसांनी अक्षरश: झडप घालून पकडताना मी पाहिलं.

त्यांच्याजवळ 'ड्रग्ज' सापडली. हे आता रोजचंच चाललंय, अशा रीतीने त्या घटनेकडे तिथली मंडळी पाहत असतात. जिनेव्हाच्या सौदर्याला लागलेला हा डाग दिवसेंदिवस मोठा होतोय हेच तिथल्या मंडळींचं दु:ख आहे.

जिनेव्हावरून मी लंडनला गेलो. दुसऱ्या दिवशी छोटीशी चक्कर मारून आल्यावर मी माझ्या लंडनमधल्या मित्राला म्हटलं, ''लंडन हल्ली बकाल होत चाललंय.'' त्याने डोळे विस्फारले. मुंबईकराने लंडनला बकाल म्हणणं म्हणजे देवीलालने व्ही. पी. सिंगला स्वार्थी म्हटल्यासारखं त्याला वाटलं असेल.

पण माझाही दोष नव्हता. जिनेव्हातून लंडनला गेल्यामुळे स्वच्छतेची माझी व्याख्याच बदलली होती. कदाचित 'इंद्रा'चा स्वर्गही अस्वच्छ वाटला असता.


*(लोकप्रभा १७ मार्च १९९१)*

# जेथे कालवे आरसे होतात

युरोपमधल्या बऱ्याच शहरांच्या चेहऱ्यात साम्य आहे. प्रशस्त जुन्या इमारती, ठायी ठायी प्रचंड पुतळ्यांचा सुळसुळाट, सिटी सेंटरमध्ये मोठ्ठा चौक, सर्वत्र कसं सारखं वाटतं! अगदी ह्या चौकाच्या जमिनीसुद्धा विशिष्ट प्रकारच्या दगडांनी सजवलेल्या दिसतात. रस्त्यावरून ट्रॅम धडधडत असतात आणि जपानी-जर्मन गाड्यांनी रस्ते काबीज केलेले असतात.

पण हॉलंडमधलं ॲमस्टरडॅम हे शहर युरोपियन कुटुंबात असूनही त्या कुटुंबातलं वाटत नाही. ह्या शहराचा चेहरा वेगळाच आहे. तिथे रस्त्यांच्या बरोबरीने हातात हात घालून कालवेही आहेत. तीन-चारशे वर्षापूर्वीच्या जुन्या इमारती कालव्यांच्या पाण्यात आपलं सौंदर्य न्याहाळत आजही उभ्या आहेत. काळाचा त्यांच्या सौंदर्यावर काही परिणामच होत नाही. आधुनिक मेकअपही एखाद्या एलिझाबेथ टेलरचं वय लपवू शकत नाही. पण तिथे इमारतींना केलेल्या रंगरंगोटीने त्यांना अक्षरश: चिरतारुण्य बहाल केलंय. गाईड जेव्हा सांगतो की, त्या इमारती तीनशे वर्षापूर्वीच्या आहेत, त्यावेळी वासलेला आ लवकर मिटत नाही. हे कालवे अर्थातच रहदारीसाठी आहेत. ज्यांना इमारती सामावून घेऊ शकत नाहीत अशी माणसं चक्क बोटीतही पथारी टाकतात.

इथल्या रस्त्यांवर गाड्यांपेक्षा सायकलींचा सुळसुळाट जास्त आहे. युरोपात सायकलिंग हा खेळ प्रचंड लोकप्रिय आहे पण सायकलचा वाहन म्हणून एवढा मोठा उपयोग पश्चिम युरोपात तरी मी फक्त ॲमस्टरडॅममध्येच पाहिलाय. तिथे सुटाबुटातला माणूसही सायकलवर टांग मारून ऑफिसला जातो. जोडप्यालाही प्रेम करायला सायकलच पुरते. तिथल्या जुन्या शहरात सायकलएवढं दुसरं कुठलंही वाहन थाटाने फिरू शकत नाही. ह्याचा अर्थ शहरावर आधुनिकतेचे संस्कार झालेच नाहीत असे नाही. पण नव्या युगाशी नातं ठेवणारा भाग, ह्या जुन्या शहराला जोडून



*ॲम्स्टरडॅमचे कालव्यांनी वेढलेले सौंदर्य*

वसलाय. व्हेनिसप्रमाणे पूर्ण कालव्यांनी गर्दी केलेलं हे शहर नाही. मुख्य म्हणजे जुना भाग म्हणजे बकाल, हे आपल्याकडे जे समीकरण असतं ते तिथे नसतं. म्युझियममध्ये ठेवलेल्या वस्तूंप्रमाणे हा भाग काळजीपूर्वक मांडून ठेवल्यासारखा वाटतो.

ॲमस्टरडॅम शहरात तुम्ही कुठूनही या, अर्थात ट्रेनने किंवा रस्त्यावरून, हॉलंडमध्ये शिरल्यापासून एका वेगळ्या देशात आल्याची जाणीव तुम्हाला व्हायलाच पाहिजे. युरोपात इतरत्र असा अनुभव येतोच असं नाही. अचानक पवनचक्क्या दिसतात. छोटे-मोठे बंधारे दिसतात. साधं माळरानसुद्धा हिरवं आणि स्वच्छ असतं. त्या देशात चीज आणि लोणी का चांगलं मिळतं, हे त्यांच्या गायी-म्हशी पाहिल्यावर कळतं. तिथल्या गाईना जेवढं 'बाळंतपण' मानवतं तेवढं जगात कुठेही मानवत नसेल.


त्यांची ही भूमी डच लोकांनी अक्षरश: सागराशी लढत देऊन मिळवली आहे. तो सागर थोपवण्यासाठीच त्यांनी बंधारे बांधले आणि पवनचक्क्या उभारल्या. मोठ्या मेहनतीने विध्वंसक वाटणारं पाणी त्यांनी गुलाम बनवलं आणि फोफावत सागराकडे पळणाऱ्या ॲमस्टेल नदीच्या काठावर ॲमस्टरडॅम वसवलं. शहरातले कालवे हे त्या नदीचे वेगवेगळे अवयव आहेत. तब्बल बाराशे पूल बांधून त्यांनी विस्कळित असलेले जमिनीचे तुकडे एकत्र केले. डचांच्या ह्या मेहनतीवर खूश होऊनच निसर्गाने त्यांच्या पदरात ट्यूलीप फुलांच्या बागा टाकल्या असाव्यात. ह्या फुलांपेक्षा सुंदर फुलांच्या बागा जगात अस्तित्वात नाहीत.

ॲमस्टरडॅममधल्या फुलबाजारातून फेरफटका मारला तरी जगातल्या सर्वोत्कृष्ट

बागेतून फिरल्यासारखं वाटतं त्यांचं फुलांवर इतकं प्रेम आहे की, मोठ्या घरापुढे बहरलेली बाग असतेच, पण घर छोटं असेल तर डच माणूस प्रथम फुलझाडांची व्यवस्था बघतो आणि मग स्वत:च्या बेडरूमचा विचार करतो.

तिथे नदीवरच्या पुलाएवढीच चर्चेस् दिसतात. कारण कॅथलिक आणि प्रोटेस्टंट हा वाद डच माणसाच्या रक्तात भिनलाय. इंग्लंडमध्ये बऱ्याच चर्चेसची देवळं, मशिदी आणि गुरुद्वारं होतायत. कारण ती मंडळी धर्मापासून दूर जायला लागली आहेत आणि आपण धर्माला जास्त कवटाळून बसायला लागलोय. पण त्याबाबतीत डच आपले भाऊबंद असावेत. तिथे कॅथॉलिक म्हणून जन्माला आलेला माणूस कॅथॉलिक शाळेत जातो स्पोर्टस् क्लबही त्याला तोच लागतो. प्रेम तो कॅथॉलिक पोरीवरच करतो. आयुष्यभर कॅथॉलिक वर्तमानपत्र वाचतो. कॅथॉलिक पार्टीला मत देतो कॅथॉलिक रेडिओ स्टेशनच ऐकतो ॲपेडीसायटीस उडवायचा असेल तरी कॅथॉलिक हॉस्पिटलात जातो आणि पोरांनी टाकल्यावर वृद्धाश्रमही कॅथॉलिक लोकांचा शोधतो. हे सर्व करताना शेजारच्या प्रोटेस्टंटच्या आयुष्यात तो ढुंकूनही पाहत नाही. गंमत म्हणजे तो प्रोटेस्टंटही त्याच्या प्रोटेस्टंट मार्गावरून जात असतो. आता हे वातावरण हळूहळू बदलतंय. पण बदल इंग्लंड किंवा इतर युरोपीय देशाएवढ्या वेगात होत नाहीये. त्यांच्या धार्मिक वादाचा त्रास मात्र आपल्यासारख्या परदेशी माणसाला होत नाही. ॲमस्टरडॅममध्ये हेकट, शिष्ट माणूस मला तरी भेटला नाही. शिष्टाचार त्यांच्या नसानसात भिनले आहेत. डच माणूस गाडीच्या डब्यात भेटो किंवा अगदी टॉयलेटमध्ये, 'गुड मॉर्निंग' किंवा 'गुड आफ्टरनून' हे शब्द त्याच्या तोंडातून लाळेसारखे टपकतात. अर्थात त्याच्या भाषेत. पण फ्रेंच किंवा जर्मन माणसासारखा त्यांना इंग्रजीचा द्वेष नाही. त्यामुळे भाषेची अडचण अजिबात येत नाही. तुमच्याही प्रत्युत्तराची त्यांना अपेक्षा असतेच. शेकहॅन्ड करायलाही त्याचे हात सदैव फुरफुरत असतात. त्यांच्या प्रेमळ शिष्टाचाराचा त्रास दुकानात खरेदीला गेल्यावर जास्त होतो. आपल्याकडे गिऱ्हाईकाला देव मानण्याबद्दलची वचनं भिंतीवर लटकत असतात. तिथे आपण देव असल्याची जाणीव प्रत्यक्षात करून दिली जाते. दुकानदाराने गिऱ्हाईकावर लक्ष केंद्रित केलं की आजूबाजूचं जग त्याच्या दृष्टीने शून्य असतं. ते प्रेम पाहात आपण बोअर होतो आणि आपल्या सवयीनुसार आपण मध्ये तोंड खुपसलं की देवत्व प्राप्त झालेल्या गिऱ्हाईकाचा आपल्यावर कोप होतो आणि दुकानदार नर्व्हस होतो मुळात तिथे शॉपिंग करण्याची आपली ऐपत नसते. पण ऐपत असलीच तर भरपूर वेळ ठेवून दुकानदाराकडून कोडकौतुक करून घ्यायला जावं

डच माणसाच्या अंतरंगाएवढंच ह्या शहराचं अंतरंग सुंदर आहे. हे शहर




*दर्याच्या सफरीवर निघालेल्या आपल्या नवऱ्यांना निरोप द्यायला बायका इथे जमत.*

भटकल्यावर 'काय सुंदर शहर आहे!' असे उद्‌गार उत्स्फूर्तपणे बाहेर पडतात. पण नेमकं सुंदर काय हे सांगणं कठीण जातं. तिथे शेकडो चर्च असली तरी सेंट पीटर्स किंवा नोत्रदामचा भव्यपणा आणि कलात्मकता एकाही चर्चमध्ये नाही. पण त्या छोट्या-मोठ्या चर्चच्या निमुळत्या शिखरांनी त्या शहराच्या आकाशरेषेला एक वेगळं सौंदर्य प्राप्त करून दिलंय. तिथे एक टॉवर आहे. त्याला विपिंग टॉवर म्हणतात. कारण पूर्वीच्या काळी दर्याच्या सफरीवर निघालेल्या आपल्या नवऱ्यांना निरोप द्यायला तिथे बायका जमत आज कुणीही अश्रू ढाळत नाही, पण आजुबाजूचे कालवे, त्या कालव्यात हिंदकळणाऱ्या बोटीवरचे नावाडी पाहिले की, बघता बघता आपलं मन तीन-चारशे वर्ष मागे जातं आणि त्या बायकांचे हुंदके आपल्याला स्पष्टपणे ऐकायला येतायत असं वाटायला लागतं.

पॅलेस ही मध्ययुगीन युरोपाच्या विलासी राजवटीची प्रतीकं आहेत ॲमस्टरडॅमचा पॅलेस हा व्हर्सायइतका वैभवाचं किळसवाणं रूप दाखवणारा नाही,

पण तो देखणा आहे यात काही शंका नाही. पुराणकालीन प्रचंड समुद्रपशू त्याच्या आवारात कोरलेले आहेत. ज्या वाड्यात पूर्वी नेपोलियनचा भाऊ लुई बोनापार्ट राहायचा आणि आज हॉलंडची राणी राहाते त्याच्या सौदर्याबद्दल काही सांगायची गरज नाही. पण त्या वाड्याचं वैशिष्ट्य असं, की तो चक्क १३,६४९ पाईल्सवर उभा आहे पाईल्स म्हणजे ज्या जमिनीत भुसभुशीतपणामुळे इमारतीचा पाया घालता येत नाही तिथे जमिनीच्या पृष्ठभागापासून खालच्या टणक दगडापर्यंत खांब तयार केले जातात आणि त्यावर इमारतीचा डोलारा उभा राहतो. हा पॅलेस १६५५ साली बांधला. त्यावेळी 'रिएनफोर्सड् कॉंक्रीट' हा प्रकार जन्मालासुद्धा आला नव्हता. आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नव्हतं. अशा वेळी एवढ्या पाईल्स टाकून पॅलेस कसा उभारला असेल हा विचारसुद्धा डोकं गरगरून टाकतो.

पण तिथे तर हे शहरच पाण्याला काबूत ठेवून वसवलंय, टिकवलंय. उन्हाळ्यात रोज रात्री ते नव्या नवरीसारखं सजवलं जातं. हे रात्रीचं रूप पाहण्यासाठी तर अनेक प्रवासी उन्हाळ्यात गर्दी करतात. ही नगरी तुम्ही पद्मिनीप्रमाणे तिच्या प्रतिबिंबातून पाहू शकता. त्यावेळी कालव्यातलं पाणी आरशाचं काम बजावतं. कालव्यावरचे पूल आणि आसपासच्या मध्ययुगीन इमारतींना रोज रोषणाई केली जाते. कालव्यातून तुम्हाला फिरविण्यासाठी मोठी लॉंच सज्ज असते. दिव्यांच्या प्रकाशात इमारतीचा, पुलांच्या कमानीचा दगड अन् दगड उजळलेला असतो. कालव्यातलं पाणी त्या रंगीबेरंगी दगडांतून टपकणारं सौंदर्य झेलत असतं. बोटीत तुमच्या ग्लासात वारुणी डोलत असते आणि समोरच्या प्लेटमधलं अस्सल डच चीज तुम्हाला खुणावत असतं. तासा-सव्वातासाचा हा प्रवास एक वेगळाच सौंदर्यानुभव देतो. तुम्ही मध्य प्रदेशात बेडा घाटला पौर्णिमेच्या रात्री बोटीतून फिरलायत? नर्मदेच्या डोहात उभ्या असलेल्या त्या संगमरवरी डोगराचं अलौकिक सौदर्य कितीही पाहिलं तरी मन तृप्त होत नाही. ॲमस्टरडॅमचं सौदर्य मानवनिर्मित आहे दोन डोळे अपुरे वाटणारं! बोटीतून जमिनीवर यावंसं वाटत नाही. डचांना एक वेगळीच सौंदर्यदृष्टी आहे हे बोटीतून फिरताना जाणवतं पण तिथल्या दाम स्क्वेअरच्या बाजूची सर्वात जुन्या व्यावसायिकांची वस्ती पाहिली की त्यांच्या सौदर्यदृष्टीबद्दल खात्री पटते.

ॲमस्टरडॅमला गेलात तर त्यांचा 'लालबत्ती' विभाग पाहायला विसरू नका. काळजी करू नका, मी तुम्हाला भलतं पाप आणि साहस करायला सांगत नाही. मुळात युरोपात 'तशा' विभागात फिरण्यात साहस नसतंच मुळी. त्यांची संस्कृती अशी आहे की ते, 'आमच्या इथलं चीज चाखून पाहा' असं ज्या प्रेमाने सांगतात, त्याच प्रेमाने 'आमच्या रेड लाइट डिस्ट्रिक्टला फेरी मारायला विसरू नका' असंही

सांगतात. तुम्हाला खोटं वाटेल, पण त्या बोटीत ॲमस्टरडॅमचं सौंदर्य खुलवून सांगणारी आमची महिला गाईड अचानक म्हणाली, ''समस्त पुरुषांनो, आता डाव्या बाजूला लक्ष द्या. ही आमची रेड लाईट एरिया. तिथल्याएवढ्या सुंदर मुली तुम्हाला जगात सापडणार नाहीत.'' राणीच्या पॅलेसएवढ्याच कौतुकाने ती 'त्या' एरियाबद्दल बोलली. बोटीतून उतरल्यावर समस्त पुरुषवर्ग 'त्या एरियाची' चौकशी करायला लागला. तिथल्या 'त्या' मुलींना 'कॅडललीट ब्युवटीज्' म्हणतात. काचेच्या कपाटासारख्या छोट्या केबिनमध्ये त्या खुर्ची टाकून वाचत किंवा सिगरेट ओढत बसलेल्या असतात. प्रक्षोभक अंगविक्षेप नाहीत किंवा गलिच्छ आरडाओरडही नाही. त्या काचेच्या केबिनमध्ये दिवा नसतो. मेणबत्तीचा मंद प्रकाश पडलेला असतो. मेणबत्तीच्या प्रकाशात ओळीने गोऱ्या बाहुल्या बसवल्यासारख्या त्या वाटतात. तिथे शहाणा पुरुष अर्थातच फक्त 'विंडो शॉपिंग'साठीच जातो. रेड लाइट एरियाही सुंदर दिसू शकतो हे ॲमस्टरडॅममध्ये कळतं.

युरोपमध्ये कठल्याही शहरात म्यझियमना तोटा नसतो. अर्थातच ॲमस्टरडममध्यहा नाही. पण किमान रिक्स म्युझियमला फेरी मस्टच आहे. किमान रेम्ब्राँचं 'नाईट वॉच पेंटिंग' पाहण्यासाठी तरी. त्याने ते १६४२ साली पूर्ण केलं. १४ x १२ चं ते प्रचंड पेंटिंग आहे त्याचं नाव मात्र फसवं आहे अर्थात त्याचाही त्यांना १९४७ पर्यंत पत्ता नव्हता. त्यावेळी ते जेव्हा स्वच्छ केलं आणि त्या चित्रावरचं जुनं व्हार्निश काढून टाकलं तेव्हा लक्षात आलं की, तो रात्रीचा नाही तर दिवसाचा देखावा आहे. अजून नाव मात्र तेच आहे. तिथे व्हॅन गॉग या सुप्रसिद्ध चित्रकाराची तब्बल दोनशे पेंटिंग्ज आहेत. ज्याला त्या कलेत रस आहे त्याचा पाय तिथून निघणं कठीण आहे.

तिथे आणखीन एक अशी जागा आहे जिथून पाय निघत नाही. ती म्हणजे हिऱ्याची फॅक्टरी. जगातल्या ८० टक्के हिऱ्यांना त्यांचं खरं सौंदर्य ॲमस्टरडॅममध्ये गवसतं. हिऱ्याला पैलू पाडण्याची कला तिथे शेकडो वर्षापासून आहे. आज आधुनिक तंत्रज्ञान आणि शेकडो वर्ष जोपासलेली ही कला यांचा अभूतपूर्व संगम त्या फॅक्टरीत पाहायला मिळतो. हिऱ्यावर होणारे सर्व 'संस्कार' ते खोट्या काचेच्या हिऱ्यावर आपल्याला करून दाखवितात. इथेच 'कुलीनान' या जगातल्या सर्वात मौल्यवान आणि मोठ्या हिऱ्याला (३००० कॅरेट) पैलू पाडले होते. तो हिरा मग इंग्लंडच्या सातव्या किंग एडवर्डच्या मुकुटात विसावला. इतर देशांपेक्षा तिथे हिरे स्वस्त मिळतात. जगातली इतर कितीही शहरं फिरली तरी ॲमस्टरडॅमची मनातली प्रतिमा धुसर होत नाही. तिच्या वेगळेपणातच तिचं सौंदर्य आहे.

*(लोकप्रभा २४ मार्च १९९१)*

# ‘आज म्या ब्रॅडमन पाहिले’

विमानातून ॲडलेड शहर अत्यंत सुंदर दिसत होतं! हिरवंगार आखीव-रेखीव अगदी वेगवेगळ्या रंगांनी रांगोळी काढल्यासारखं! सूर्य नुकताच उगवत असल्यामुळे ते शहर सोनेरी रंगात न्हाऊन निघालं होतं. अर्थात माझ्या डोळ्यांनी मी त्या शहराचं फक्त सौंदर्य पाहात नव्हतो, तर माझे डोळे एक घर शोधत होते. क्रिकेटमधल्या सिकंदराचं घर. सर डोनाल्ड ब्रॅडमनचं घर! मला वाटलं होतं की हा खुळेपणा आहे. जे घर ठाऊक नाही; ते शोधणार कसं? पण हा खुळेपणा मी नेहमी करतो मुंबईहून विमान उडालं की माझं घर शोधण्याचा एक मूर्ख प्रयत्न मी करतो. वाळूत सांडलेला तीळ शोधण्याएवढं ते कठीण आहे हे काय मला ठाऊक नसतं? पण एक भावनात्मक ओढ हा खुळेपणा माणसाच्या हातून करवते

ॲडलेडला पाय लागले. मी मोहरलो. निव्वळ भारत-दक्षिण आफ्रिका सामना पाहणं हे तिथे जाण्याचं उद्दिष्ट नव्हतंच. कारण वर्ल्ड कप भारताच्या दृष्टीने तोपर्यंत संपलेला होता. उलट सर डॉन ब्रॅडमनना भेटण्याची उर्मी दांडगी होती. ब्रॅडमन हे अख्ख्या क्रिकेटजगाचं दैवत आहे लहानपणी मी आमच्या भूगोलाच्या पुस्तकात ब्रॅडमनचा फोटो पाहिला होता. मला वाटतं, भूगोलाच्या पुस्तकात फोटो छापला जाणारा तो एकमेव क्रिकेटपटू असावा. का छापला होता तो फोटो ठाऊक आहे? त्या देशाची ओळख करून द्यायला! ‘ब्रॅडमन आणि कांगारूंचा देश’ अशी त्या देशाची ओळख करून दिली होती माझ्या बालमनावर तेव्हापासून ब्रॅडमनचं माहात्म्य ठसल होतं. पुढे क्रिकेटबद्दल ओढ वाढल्यावर कधी तरी ब्रॅडमनच्या पायावर डोकं ठेवायला मिळावं असं वाटायचं.

पण मुंबईहून निघताना अनेकांनी माझ्या ह्या महत्त्वाकांक्षेला सुरुंग लावायचा प्रयत्न केला होता. ‘तो कुणालाही भेटत नाही’, ‘तो एकांतप्रिय आहे’, ‘तो खडूस आहे’ पासून ‘अमेरिकेला गेलास तर एकवेळ मॅडोना किंवा मायकेल जॅक्सन चटकन



*सर डॉन ब्रॅडमनबरोबर लेखक द्वारकानाथ संझगिरी*

भेटतील. पण ऑस्ट्रेलियात ब्रॅडमन भेटणार नाही', असं ऑस्ट्रेलियाहून दोनदा हात हलवत परतणाऱ्या एका क्रिकेटप्रेमीनेही मला ऐकवलं.

सर डॉन त्या मॅचला येणार नाहीत ह्याची मला खात्री होती. सर डॉनच्या घरचा पत्ताही सहजासहजी कुणाच्या हातास लागत नाही हे मी ऐकल होतं. पण एक छोटासा आशेचा किरण मला क्वांटासच्या अनुप कर्णिकने दाखवला होता. तो मला म्हणाला, ''ॲडलेडला गेल्यावर 'राम' नावाच्या एका क्रिकेटवेड्या इसमाला भेट. तो मैदानावर असेलच. ब्रॅडमनच्या घरी त्याचा वावर असतो. तो कदाचित तुला मदत करू शकेल.''


सकाळी मॅचला गेलो. आपले खेळाडू भेटले. पाऊस पडत होता, त्यामुळे मॅच सुरू व्हायची लक्षणं नव्हती. थोड्या गप्पा-टप्पा झाल्या आणि कुणीतरी कुणाला 'राम' अशी हाक मारली. मी कान टवकारले. मला हवा असलेला राम हाच तर नसेल? हा विचार क्षणात डोक्यात आला. एक नखशिखांत दाक्षिणात्य माणूस माझ्या नजरेस पडला. मी झटकन त्याच्याकडे गेलो माझी ओळख करून दिली. तोच तो राम ह्याची खात्री केली आणि त्याला थोडं बाजूला नेऊन लहान मुलं हट्ट

धरतात तसा हट्ट धरला. 'मला ब्रॅडमनकडे घेऊन जा.'

तो हसला आणि मला म्हणाला, "हा हट्ट धरणारा तू हजारावा तरी नक्की असशील हे बघ, इथल्या सर्व पत्रकारांनी माझ्याकडे हाच हट्ट धरला. म्हणून त्यांची एकत्र भेट मिळवण्यासाठी आम्ही ब्रॅडमनना पत्र लिहिलं. त्याचं हे त्याला उत्तर!" असं म्हणून त्याने मला ब्रॅडमनचं पत्र दाखवलं. त्या पत्रात बॅडमनने वयामुळे आणि बायको आजारी असल्यामुळे आपली पत्रकारांना भेटण्याबद्दल असमर्थता व्यक्त केली होती राम मला म्हणाला. "हे असं असताना मी जर तुला त्यांच्या घरी घेऊन गेलो, तर त्यांचं दार माझ्यासाठी कायमचं बंद होईल. मला कृपया माफ कर." आणि तो निघून गेला.

पण तरीही ब्रॅडमनला भेटायचे प्रयत्न मी थांबवणार नव्हतो. पंढरपुरात जाऊन विठ्ठलाचं दर्शन घ्यायचं नाही? माझं मन ते मानायलाच तयार नव्हतं. दुसऱ्या दिवशी मी ॲडलेडच्या एका म्युझियममधे गेलो. त्यात एक अख्खं दालन ब्रॅडमननं वापरलेल्या वस्तू, त्याला मिळालेली काही बक्षिसं आणि त्याच्या संबंधीची वर्तमानपत्रांची कात्रणं वगैरेसाठी वापरलं होतं. त्यात ब्रॅडमनने विविध विक्रमांच्या वेळी वापरलेल्या बॅट्स होत्या. त्याचे ग्लोव्हज, पॅड्स, ब्लेझर, चेंडू वगैरे गोष्टी होत्या. १९३० साली लीडस्वर ब्रॅडमनने एका दिवसात ३०० धावा ठोकल्या. त्या सामन्याचं सिल्कवर प्रिंट केलेले स्कोअरकार्डही तिथे होतं. ब्रॅडमनची भाषणं, मुलाखती, यांच्या टेप्सही तिथे होत्या. त्या सर्व वस्तूंचे फोटो घ्यावेत म्हणून मी तिथल्या अधिकाऱ्यांची परवानगी घ्यायला गेलो. त्या अधिकाऱ्याने मला काय सांगितलं असेल? तो म्हणाला, "त्यासाठी मला सर डॉन ब्रॅडमनची परवानगी मागायला लागेल. तसा आमचा नियम आहे. तुम्ही समोरच्या कोचावर बसा. तोपर्यंत मी त्यांच्याशी फोनवर संपर्क साधता येतो का ते पाहातो."

"मी त्यांच्याशी फोनवर बोलू का?" मी विचारलं. त्या अधिकाऱ्याला माझा अंतस्थ हेतू कळला की नाही ते ठाऊक नाही, पण तो मला म्हणाला, "मलाही त्यांच्याशी सरळ बोलता यायचं नाही माझ्या वरचे अधिकारीच त्यांच्याशी बोलू शकतात. तुम्ही तुमचा इथला फोन नंबर द्या मी तुम्हाला कळवतो." ब्रॅडमनपर्यंत पोचायला किती कुलपं मला तोडावी लागणार ह्याची मला कल्पना आली पुन्हा त्या दालनात आलो, तर एक माणूस शांतपणे त्या वस्तूंचे फोटो घेत होता. माझ्या लक्षात आलं, की परवानगी घ्यायचा मूर्खपणा मी करायला नको होता मी कॅमेरा काढला आणि शांतपणे ते फोटो टिपले. ब्रॅडमनला भेटायचा आणखी एक प्रयत्न म्हणून मी पुन्हा रामला फोन केला. मी त्याला म्हटलं, "मला तू ब्रॅडमनचा पत्ता दे मी सरळ त्याच्या दरवाजावर जाऊन थडकतो मी नशीबवान असेन तर तो



सर डॉन ब्रॅडमन यांचं घर

मला भेटेल. तो नाही भेटला तर वाईट नक्की वाटेल, पण किमान प्रयत्न केला नाही अशी चुटपूट तरी मनाला लागणार नाही.'' होय-नाही करत त्या रामने मला ब्रॅडमनचा पत्ता दिला. पण पुन्हा पुन्हा बजावलं, ''कृपा करून मी तुम्हाला त्यांचा पत्ता दिला हे सांगू नका. ते तुम्हाला विचारतील त्यांचा पत्ता कुणी दिला, तर 'दक्षिण ऑस्ट्रेलिया क्रिकेट क्लबमधून' मिळाला असे त्यांना सांगा. नाहीतर पुन्हा मला त्यांच्याकडे जाता येणार नाही. इथे त्यांचा पत्ता अगदी गुलदस्त्यात ठेवला जातो.''

मी पत्ता उतरवून घेतला, '२-होल्डन स्ट्रीट, केंझिंग्टन पार्क, ॲडलेड ' माझ्या बाजूला त्यावेळी ॲडलेडचे डॉ. दिलीप ठाकूर उभे होते. ते लगेच म्हणाले, ''हा पत्ता माझ्या घरापासून अवघ्या ३-४ मिनिटांच्या अंतरावर दिसतोय.'' तिथली तीन-चार मिनिटं अर्थात 'ड्राईव्ह'च्या हिशोबात मोजली जातात. मी त्यांना म्हटलं, ''मग आत्ताच निघायचं. आज मंगळवार आहे आणि मी त्यांना भेट द्यायला लाकडात कोरलेली गणपतीची मूर्ती आणली आहे.'' मी, डॉक्टर ठाकूर आणि आमची सौ. असे आम्ही तिघं ब्रॅडमनच्या दर्शनासाठी निघालो. डॉ. ठाकूर मला म्हणाले, ''हा महापुरुष माझ्या घरापासून तीन-चार मिनिटाच्या अंतरावर राहतो, हे मला ठाऊकसुद्धा नव्हतं.''

ऑस्ट्रेलियात सुखवस्तूपणा तसा प्रत्येक बंगल्यातून टपकत असतो. पण त्या केंझिंग्टन पार्कमधल्या बंगल्यावरून श्रीमंती ओसंडून वाहत होती आणि सर डॉनचा बंगला पाहिल्यावर इथे एक महापुरुष राहतो हे सांगायची गरज नव्हती विटकरी

रंगाच्या त्या इमारतीला स्वतःच असं एक वेगळं सौंदर्य होतं. तिथे बंगल्याना 'इच्छापूर्ती', 'साफल्य' वगैरे थाटाची नावं ठेवायची पद्धत नाही बंगल्यांना क्रमांक असतो आणि त्या बंगल्यावर 'सर डॉन ब्रॅडमन' अशी पाटीसुद्धा नव्हती.

आमची गाडी त्यांच्या बंगल्यापुढे थांबण्याअगोदर तिथे एक गाडी थांबली होती त्यातून एक गोरा इसम फुलांची परडी घेऊन बाहेर पडला तोही सर डॉनच्या बंगल्यात शिरला. त्याच्यापाठोपाठ मी आणि डॉ ठाकूर बंगल्यात शिरलो. त्या फुलांच्या परडीवर लिहीलं होतं- 'टू जेसी ब्रॅडमन' सौ. ब्रॅडमननेच दरवाजा उघडला ती फुलांची परडी घेतली. तो गोरा कर्तव्य संपल्याप्रमाणे निघून गेला. मी लगेच पुढे सरसावलो आणि तिला म्हटलं, "मी थेट बारा हजार मैलांवरून भारतातून आलोय. मला डॉनना भेटायचंय. मी फारसा त्रास देणार नाही. मला फक्त त्यांच्या पायावर डोकं ठेवायचंय. ज्यांच्या पायावर डोकं ठेवावं असे पाय आज क्रिकेटमध्ये फार थोडे आहेत आणि सर डॉनच्या पायापेक्षा मोठे पाय तर नाहीच नाहीत. थोरामोठ्यांना आदर दाखवायची ती आमची पद्धत आहे" खरं सांगतो, जे काही बोललो ते उस्फूर्त होतं. डॉ. ठाकुरांनाही आश्चर्य वाटलं. विनवणीच्या एवढ्या पायघड्या सौ. जेसी ब्रॅडमननाही लाथाडणं कठीण होतं. त्या म्हणाल्या, "मी त्यांना विचारते, पण ते सध्या कोणालाच भेटत नाहीत." आणि ती आत गेली.

त्यापुढचे क्षण अतिशय तणावपूर्ण होते. इंतजारचे असे अनोखे क्षण मी कधीच अनुभवले नव्हते. त्या रामने मला एक गोष्ट बजावली होती, "तू ब्रॅडमनला पत्रकार आहेस असं मुळीच सांगू नकोस" त्यामुळेच मी त्यांच्या बंगल्यात शिरण्यापूर्वी माझ्यातल्या पत्रकाराला कानाला धरून बाहेर काढलं होतं. पण त्यांच्याशी काय बोलावं ह्या विचारात असताना तो फलंदाजीचा शहेनशहा बाहेर आला. माझा डोळ्यांवर विश्वास बसेना. तोंडातून नीट शब्दही फुटेना ज्याच्यासाठी केला होता अट्टाहास तो माणूस माझ्या समोर होता. मी सरळ वाकलो आणि पायाला हात लावला. त्यांनी मला उठवलं मी त्यांनाही सांगितलं की थोरांना आदर दाखवण्याची ही भारतीय पद्धत आहे त्यांचा गोरा तांबूस चेहरा मी नीट न्याहाळला. डोळ्याला चष्मा होता. अंगात निळा स्वेटर होता. राखाडी रंगाची पॅन्ट होती. पायात बूट होते. पाश्चिमात्य संस्कृतीत मुरलेला कुठलाही माणूस घरच्या कपड्यात बाहेर येत नाही. मी त्यांना गणपतीची मूर्ती दिली आणि सांगितलं, की ही आमच्या देवाची मूर्ती आहे आणि मग ते बोलले तो प्रत्येक क्षण मी कानात साठवला ते म्हणाले, "आज मी ८२ वर्षांचा आहे मला खूप मंडळी भेटायला येतात. तुमच्या भारतातून येणारेही बरेच असतात. मला त्यांचा माझ्याबद्दलचा आदर आणि प्रेम कळतं. पण त्यांना प्रत्येकाला भेटणं मला शक्य नाही मी सार्वजनिक जीवनात बराच काळ होतो मला

आता ह्या उतारवयात तरी स्वत:चं आयुष्य जगायला नको का? त्यात माझ्या बायकोची तब्येत वरी नसते.''

''आपण परवा ॲडलेड ओव्हलवर याल असं वाटलं होतं, तिथे तुम्हाला पाहायला आम्ही उत्सुक होतो'' मी म्हटलं.

ते म्हणाले, ''मी प्रत्येक सामन्याला जातोच असं नाही आणि मी दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंना भेटलो होतो तुमच्या सचिनलाही पाहिलं त्याला भेटलो. त्याचा दर्जा फारच वरचा आहे ही हॅज ब्राईट फ्युचर.''

''ऑस्ट्रेलिया वर्ल्ड कपमधून जवळजवळ बाहेर पडलीय त्याबद्दल तुम्हाला काय वाटलं?'' त्यांनी फक्त मंद स्मित केलं. भलते प्रश्न विचारू नयेत हा तो सिग्नल होता. मग मी त्यांना म्हटलं, ''मला तुमच्याबरोबर फोटो काढायला आवडेल. अर्थात आपली हरकत नसेल तर '' ते लगेच म्हणाले, ''काहीच हरकत नाही '' लगेच डॉ. ठाकूरांच्या हातात मी कॅमेरा सोपवला. एक फोटो काढला. तो नीट नाही आला तर. विचार डोक्यात चमकला मग आणखी एक फोटो झाला. तो क्षण डॉक्टर ठाकूरांनाही जतन करून ठेवायचा होता. त्यामुळे त्यांनीही फोटो काढून घेतला. फोटो काढताना उडालेला फ्लॅश बघून सर डॉन हसले. म्हणाले, ''तुमच्या कॅमेऱ्याचा फ्लॅश चालतोय.'' इतरांच्या फ्लॅशचा त्यांना वेगळा अनुभव आलेला दिसतोय. फोटोंचा समारंभ संपल्यावर माझ्या लक्षात आलं की गडबडीत आपण आपलं नावच सांगितलेलं नाही. त्यांना मी नाव सांगितलं. त्यांनी मग भारताहून म्हणजे नेमका मी कुठून आलोय वगैरे चौकशी केली. 'सुनील गावसकरच्या मुंबईहून' असं त्यांना सांगताना मी त्यांचा चेहरा न्याहाळत होतो. ते हसले. म्हणाले, ''बॉम्बे हॅज ग्रेट क्रिकेट कल्चर ''

तिथून पाय निघत नव्हते, पण माझी दोन मिनिटांची मर्यादा मी बरीच ओलांडली होती. जाताना त्यांचा तो पराक्रमी हात हातात घेताना कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. त्या वयातही त्यांच्या हाताचा तो राकटपणा जाणवत होता. ''हा माझ्या आयुष्यातला सोनेरी क्षण आहे,'', असं म्हटल्यावर त्यांनी पाठीवर हात ठेवला. पुन्हा एक स्मित मला बहाल केलं आणि अंतर्धान पावले. कितीतरी वेळ त्या बंद दरवाजाकडे पाहात मी उभा होतो.

पुन्हा सर डॉनना भेटता येईल की नाही हे मला ठाऊक नाही, पण त्यांची ती मूर्ती, त्यांचं ते बोलणं, ते घर, थोडक्यात जसं घडलं तसं, मी माझ्या मनाच्या म्युझियममध्ये फार काळजीपूर्वक जतन करून ठेवलंय क्रिकेटच्या एका फाटक्या वारकऱ्याला विठ्ठलदर्शन झालं होतं ते कसं विसरलं जाईल!

*(लोकसत्ता १२ एप्रिल १९९२)*

ग्रं-प्रवास १८८५
२८३२५

# इथे तर बालाजीचेही स्थलांतर


'परदेशात स्थायिक होणारी माणसं आपला देश सोडतात म्हणजे नेमकं काय सोडतात?'

हा प्रश्न मला पूर्वी फार सतावायचा, पण हल्ली सतावत नाही काही वर्षांच्या भ्रमंतीतून मला त्याचं उत्तर मिळालंय. ही मंडळी फक्त भूमीचा एक तुकडा मागे सोडतात. त्यांची भाषा, त्यांची संस्कृती वगैरे गोष्टी शेवटपर्यंत त्यांच्या कातडीएवढ्याच त्यांच्याबरोबर असतात.

बरं, याला अपवाद कुणीही नाही. चिनी, इटालियन, भारतीय, जपानी जवळजवळ सर्व असेच वागतात. पास्ता दिसला की इटालियन माणसाचे पाय तिथे आपोआप वळतात. चिनी माणूस स्टेक मजेत खातो, पण फ्राईड राईस दिसला की त्याचा जठराग्नी जास्त भडकतो. आपली मराठी मंडळीही पोराबाळांना घेऊन अधूनमधून मॅकडोनाल्डमध्ये जातात. पण घरात वरणभात, तुपाला पर्याय नसतो.

तसंच परदेशी गेलेला माणूस पोषाख तिथला करतो. (इंग्लंडमध्ये धोतरात फिरणारे गुजराथीही मी पाहिले आहेत.) पण भजतो मात्र स्वत:च्या देवाला. भारतीय माणूस कुठेही गेला तरी त्याच्या मनातली किवा जिभेवरची राम किंवा शिवाची जागा येशू घेत नाही. भारतीय माणूस तसा जरा जास्तच धार्मिक आहे. तो जिथे गेला तिथे तिथे तो देऊळ घेऊन गेला. उद्या तो चंद्रावर गेला तरी स्वत:ची राहायची सोय झाली की तो लगेच देवाची राहायची सोय पाहील.

त्यामुळे परदेशात कुणी 'चल देऊळ दाखवतो' म्हटलं तर फारसं आश्चर्य वाटत नाही. सिडनीतला माझा मित्र मुकुंद साठे जेव्हा मला म्हणाला, "आज हेलनबर्गच्या देवळात जाऊया" तेव्हा त्याचं मन मोडू नये एवढ्याच भावनेने मी त्याच्याबरोबर निघालो. अर्थात त्याने एका गोष्टीचं मला आमिषही दाखवलं होतं. तो म्हणाला, "वाटेत स्टॅनफोर्ड म्हणून एक गाव लागतं. इतकं सुंदर गाव तू



ऑस्ट्रेलियातील पहिले हिंदू मंदिर

आजपर्यंत पाहिलं नसशील. मुख्य म्हणजे तिथे जाण्याचा रस्ता अफलातून आहे. वाटेत खास प्रयत्न करून वाढवलेलं जंगल आहे धबधबे आहेत. तू ते पाहाशील तर वेडा होशील.''

ह्या असल्या आमिषाचा मोह मला टाळता येत नाही. अस्सल मद्यप्यासमोर स्कॉच ठेवल्यावर त्याला जो आनंद होईल तो मला झाला. काही मोह मी टाळू शकत नाही. उदा. क्रिकेटची मॅच, चांगलं पुस्तक, मधुबालाचा चित्रपट आणि खुणावणारा निसर्ग. मी म्हटलं, ''चल, पटकन जाऊया. नाही तर मग अंधार होईल.''

तो निसर्ग मुकुंदाने सांगितल्यापेक्षा जास्त सुंदर होता. केसातल्या भांगासारखा तो रस्ता होता. दोन्ही बाजूला घनदाट झाडी आणि पुढे-मागे रस्ता. सूर्याची किरणंसुद्धा त्या झाडीमध्ये दबकत दबकत चोरपावलाने शिरत होती. एखादी मोटार समोरून यायची. एरवी रस्त्यावर सामसूम होती. रस्ता संपूच नये असे वाटणारे काही रस्ते असतात. त्यापैकी हा रस्ता होता. पण अवघ्या अर्ध्या तासात रस्ता संपला आणि एका कड्यावर आम्ही उभे होतो. गाडीतून उतरून दहा पावलं चालल्यावर ते स्टॅनफोर्ड गाव दिसलं. अहाहा! खरंच ते गाव वेड लावणारं होतं. दोन डोंगरांच्या मिठीत विसावलेलं ते हिरवंगार गाव, निळ्या स्वच्छ समुद्रात पाय सोडून बसलंय असं वाटत होतं. गावातली ती टुमदार घरं आणि अंगणात उभ्या असलेल्या मोटारी

वरून खेळण्यातल्या वाटत होत्या. माझं मन मला त्या डोंगरावर सोडून कधी झपझप खाली उतरलं ते मला कळलंच नाही. ते मस्तपैकी त्या घरांमध्ये राहून आलं. गावात भटकलं. समुद्रात लोळून आलं. मुकुंदाने गदगदा हलवून ''कुठे हरवलास, काळोख पडायच्या आधी देऊळ पाहून घेऊ'' असं म्हटलं तेव्हा मी कुठे भानावर आलो. पण देवळाकडे निघतानाही मन त्या गावातच रेंगाळत होतं.

खरं सांगू, देवाच्या अस्तित्वावर माझा विश्वास आहे तरीही देवाला भेटण्यासाठी देवळातच जायला हवं असं मला वाटत नाही. मी देवळात जातो देऊळ पाहण्यासाठी. तिथे एक वेगळाच सांस्कृतिक आणि सौंदर्यानुभव मिळतो. हा अनुभव अनपेक्षितपणे त्या हेलनबर्गच्या देवळात मिळाला.

परदेशातल्या देवळाला एक परदेशी टच असतो इंग्लंडमधल्या काही देवळांत येशूला काढून रणछोडदास किंवा अंबामातेला बसवण्यात आलंय. तिथे आपली मंडळी चर्च धडाधड विकत घेत असतात. त्याला कारण आहे इंग्लिश तरुण-तरुणींचे पाय ज्या भक्तीने डिस्कोकडे वळतात त्या भक्तीने चर्चकडे वळत नाहीत. चर्च चालवण्याचा खर्च त्यामुळे त्यांना परवडत नाही लेस्टरसारख्या ठिकाणी तर चर्चच्या घंटांपेक्षा अंबेमातेच्या आरतीचा आवाज जास्त जोरात ऐकायला येतो. पण हेलनबर्गमधलं हे देऊळ तसं देऊळ नव्हतं. ते अस्सल भारतीय होतं. पारंपरिक पद्धतीने उभारलं होतं. ते मंदिर वेंकटेश्वराचं आहे

डॉक्टर जनार्दन हे त्या वेंकटेश्वर मंदिर असोसिएशनचे अध्यक्ष. ते आपल्या कुटुंबियांबरोबर पूजेसाठी आले होते. तिथून सिडनी सत्तर किलोमीटर्सवर आहे. काही भक्त मंडळी तिथून आली होती. वेंकटेश्वराच्या पायावर डोकं ठेवायला ही मंडळी तिथे वारंवार येत असतात. 'विषुववृत्ताखालचं परदेशीय भारतीयांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने उभारलेलं एकमेव देऊळ' असं डॉ. जनार्दनांनी मला अभिमानाने सांगितलं. त्या मंदिराची कूळकथाही मला त्यांनी ऐकवली. तीसुद्धा रंजक आहे

हे देऊळ म्हणजे तिरुपतीच्या बालाजीला हेलनबर्गला इमिग्रेट करण्याचा प्रयत्न आहे फक्त तिथल्या बालाजीचं रूप छोटंसं आहे. ही मूळ कल्पना न्यू साऊथ वेल्स विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या डॉक्टर भास्कररावांची. ती तिथल्या बालाजी भक्तांनी उचलून धरली. ती कल्पना राबवणं तेवढं सोपं नव्हतं. देवळासाठी प्रचंड पैसा लागणार होता, पण तिथल्या प्रत्येकाने हे घरचं कार्य मानलं आणि आपापला खारीचा वाटा उचलायला सुरुवात केली. तिरुपती संस्थानाने मग त्यात रस घेतला. त्यांनी व्याजरहित कर्ज दिलं. १९८० च्या सुमारास ३७ हजार ऑस्ट्रेलियन डॉलर्स खर्च करून हेलनबर्गची ही प्रचंड जागा विकत घेण्यात आली आज त्या जागेची किंमत सहा लाख डॉलर्स आहे

'जागा हेलनबर्गलाच का?' ह्यालाही कारण आहे हिंदू मंदिरांची एक परंपरा आहे ही बहुतेक मंदिरं नदीकाठी असतात. मग नदी पाहिजे आणि निसर्गही मेहेरबान हवा, अशी जागा पाहिजे असा प्रयत्न झाला. म्हणून ही जागा मिळवली. एखाद्या आर्किटेक्टला पकडलं, त्याच्याकडून आराखडे काढून घेतले आणि बांधलं मंदिर त्या आराखड्याप्रमाणे. असं अस्सल मंदिराचं स्वरूप नसतं देवळाचा 'वास्तुविशारद' वेगळा असतो. त्याला स्थपती म्हणतात. त्याने कुठल्याही विद्यापीठातून पदवी घेतलेली नसते. त्याच्या घराण्याचा हा धंदा असतो. जानकी रामन हा ह्या देवळाचा स्थपती. त्याला खास दक्षिण भारतातून आयात करण्यात आलं होतं आणि मग त्याच्या दिमतीला तिथलं विद्यापीठाचं ज्ञान मिळवलेले वास्तुविशारद होते.

मूर्ती अर्थात भारतातून मागवण्यात आल्या आणि मूर्तीची स्थापनाही शास्त्राप्रमाणेच झाली. मूर्तीची स्थापना करणाऱ्या माणसाला 'स्थाबकर' म्हणतात. त्याचाही मूर्तीची स्थापना हा पिढीजात उद्योग असतो. अनंतराव स्थाबकर भारतातून सिडनीत आला आणि त्याने मूर्तीची स्थापना केली. कुंभ अभिषेकही करण्यात आला.

एवढं सर्व करणारी माणसं पार्ट टाइम भटजीच्या जीवावर देवांची सेवा करणं शक्य नव्हतं. बरं, तिथे शनिवार-रविवार सोडला तर इतर वेळी देवाकडे पाहायचीसुद्धा कुणाला फुरसत नसते. शनिवार, रविवार आपसात वाटून घेऊन काही कट्टर भक्त मंडळी देवाची विनामूल्य सेवा करतात. पण मग इतर वेळी काय देवांना कड्या-कुलपात ठेवणार? त्यामुळे त्यांनी भारतातून दोन भटजी मागवले आहेत. ऑस्ट्रेलियन सरकारशी झगडून त्यांना ऑस्ट्रेलियाचं नागरिकत्व देण्यात आलंय. मंदिरांच्या आवारातच त्यांची सुंदर घरं आहेत आणि आपल्याकडे कुठल्याही देवळात सापडतात, तसे पितांबरात वावरणारे, घामाने थबथबलेले, दाढीचे खुंट वाढलेले ते भटजी आहेत. फरक फक्त दक्षिणा देताना जाणवतो. दक्षिणा कमी वाटली तरी त्यांचं तोंड वाकडं झालेलं दिसत नाही. त्यांना तशी गरजही नाही. बालाजीचा आशीर्वाद असताना त्या मंदिराला डॉलर्सची चणचण भासत नाही. त्यामुळे त्यांनी भटजीही अस्सल आणले आहेत. ऋषिकेश भट्टा हे त्या दोन भटजीत ज्येष्ठ आहेत. दुसरे भटजी आहेत रामचंद्र अत्रेय. हा माणूस बी एस्सी. झालाय आणि मग त्याने कांची मठातून 'भटजी'चा कोर्स पुरा केलाय. भटजी बनण्यासाठीही कोर्स असतो ह्याची मला कल्पना नव्हती

ह्या वेंकटेश्वराच्या देवळात बऱ्याच देवांना सामावून घेण्यात आलंय. शंकराचं तर संपूर्ण कुटुंबच तिथे वस्तीला आहे गणपतीला खास मानाची जागा दिलीय. त्याचं त्या मंदिराच्या आवारातच छोटंसं देऊळ आहे श्रीकृष्णही इथे विराजमान

झाले आहेत. आणखी इतर देवही सामावून घेण्याचा त्यांचा विचार आहे तेवढी प्रशस्त जागा त्यांच्याकडे आहे पण हे देव तिथे फक्त दर्शन देण्यापुरते सामावले जात नाहीत. धार्मिक उत्सवही तिथे उत्साहाने साजरे होतात. श्रीकृष्णाचा जन्मदिवस तिथे उत्साहात साजरा केला जातो. दसऱ्याच्या दिवशी सरस्वतीपूजनही होतं. तिथे सर्वात गाजतो गणपती उत्सव. माझा मित्र मुकुंदा मला सांगत होता, ''अरे दोन हजार माणसं जमतात सिडनीच्या कानाकोपऱ्यातून लोकं येतात. आरत्या होतात. जोरजोरात गणपती बाप्पाचा जयघोष होतो. तिथलं वातावरण गणपतीमय होतं आणि मग विसर्जनाच्या वेळी स्टॅनफोर्डच्या त्या स्वच्छ निळ्याशार समुद्राकडे गणपतीची मिरवणूक निघते. डॅटसन, होंडा, निस्सान, मर्सिडीज वगैरे गाड्यांचा तांडा मिरवणुकीत असतो. हजार-दीड हजार माणसं गणपतीला पुढल्यावर्षी लवकर येण्याचं आमंत्रण देतात. ते गाव, तो उत्साह, तो निसर्ग पाहिल्यावर आपणच रचलेलं जग पुन्हा पुन्हा पाहायचा मोह गणपतीला नक्की होत असावा.''

हे देऊळ आता तिथलं हिंदू संस्कृतीचं पीठ झालंय. दर शनिवारी-रविवारी चाळीस-पन्नास कुटुंबं त्यांच्या मुलाबाळांसह न चुकता तिथे येतात. हल्ली गोऱ्या ऑस्ट्रेलियन मंडळींनीही तिथे गर्दी करायला सुरवात केलीय. काही तिथे मन:शांतीसाठी येतात. काहींना तिथे वैदिक पद्धतीने लग्न करायला आवडतं. त्यांना वैदिक पद्धतीतलं फारसं काही कळत नाही पण ते मंत्र, ते फेरे, ते होम वगैरे गोष्टींची त्यांना गंमत वाटते. तेवढ्यासाठी ते तिथे जाऊन लग्न लावतात. वर्षाकाठी विसेक गोऱ्या जोडप्यांची लग्नं तरी सहज लावली जातात.

स्थलांतरितांची पहिली पिढी नेहमीच आपला धर्म, आपली संस्कृती जपत असते. प्रश्न पुढच्या पिढीचा असतो. ते वेगळ्या वातावरणात वाढलेले असतात. त्यांना स्वत:च्या संस्कृतीत रस असतोच असं नाही. काही वेळा घराची संस्कृती मुलाबाळांच्या रक्तात उतरते. पण बऱ्याचदा बाहेरची संस्कृती त्यांना खुणावत असते. घराबाहेर वेगळे संस्कार त्यांच्यावर होत असल्यामुळे भारतीयत्व ही अभिमान बाळगायची गोष्ट आहे असं त्यांना वाटत नाही. दोष त्यांचाही नसतो. काळ त्यांना बदलवत असतो. ह्या मुलाबाळांचं आपल्या संस्कृतीशी नातं घट्ट राहावं हे ह्या देवळाचं उद्दिष्ट असतं सिडनीत स्थलांतरित झालेला बालाजी ते कार्य चोखपणे करतोय.


*(लोकसत्ता ९ मे १९९२)*

# व्हर्साइल्सचं विलोभनीय वैभव

पॅरिसला जाऊन पॅरिसच्या प्रेमात न पडलेला माणूस मला भेटायचाय आणि पॅरिस पाहून तृप्त होऊन परतणारा महाभागही मला भेटायचाय. तिथे कितीही दिवस राहिलं तरी मनाचं समाधान होत नाही. अनेक गोष्टींची चुटपूट मनाला लागून राहते. आयफेल टॉवर डोळ्यात नीट उतरलेला नसतो. सॅक्रकरकडे पाय खेचत असतात. पिगालमधला खट्याळपणा खुणावत असतो. माझ्या बाबतीत तर मन व्हर्साइल्सच्या (फ्रेंच उच्चार व्हर्साय) महालातूनही बाहेर पडायला तयार नव्हतं.

महाल ही तशी आपल्या दृष्टीने नवलाईची गोष्ट नाही. उलट तिथले महाल आपल्या राजांच्या राजवाड्यांपुढे सौंदर्य आणि भव्यतेच्या बाबतीत फिके वाटनात. ब्रिटिशांना अपार कौतुक असलेल्या बकिंगहॅम पॅलेसपेक्षा मुंबईतल्या फोर्टातली कुठलीही जुनी इमारत जास्त सुंदर आहे. पण व्हर्साइल्सचा महाल पाहिला आणि तिथेही अपवाद असतात हे जाणवलं.

हा महाल पाहिल्यावर दोनच प्रतिक्रिया होऊ शकतात. एक तर तिथल्या वैभवाने माणूस भारावून जातो किंवा एका व्यक्तीने केवळ स्वत:च्या सुखासाठी उडवलेली अफाट संपत्ती पाहून शिसारी येते. तसा कुठलाही महाल मध्ययुगीन विलासी जीवनाचं प्रतीक असतो. पॅलेसच्या प्रत्येक दगडावर गरीबांच्या घामाचे आणि रक्ताचे डाग असतात. व्हर्साइल्स पाहिल्यावर तर फ्रेंच क्रांती का झाली हे सांगावं लागत नाही. फ्रान्समधला सामान्य माणूस पावाच्या एका तुकड्याला मोताद झाला होता. तेव्हा व्हर्साइल्सच्या महालात संपत्ती सढळ हाताने उधळली जात होती. सामान्य माणूस कोंदट खोलीत दिवस काढत होता आणि राजाचे पाळीव कुत्रे सोन्या-चांदीने सजवलेल्या स्वतंत्र बेडरूममध्ये आराम करत होते. पण तुम्ही ही पार्श्वभूमी विसरायला तयार झालात तर एक प्रचंड सौंदर्यानुभव मिळतो. तो सांगायला शब्द थिटे पडतात.



*पॅरिसच्या नावाबरोबरच आयफेल टॉवरचं नाव जोडलं गेलंय.*

पॅरिसच्या दक्षिणेला व्हर्साइल्स आहे १६२४ साली ते छोटं गाव होतं शिकारीच्या सोयीसाठी तेराव्या लुईने तिथे राजवाडा बांधला. चौदाव्या लुईने त्याला भव्य रूप दिलं आज ज्या स्थितीत तो महाल उभा आहे तो पुरा व्हायला तब्बल ६६ वर्षे लागली ल-ब्रन, ल-नॉत्र मान्सर्टसारख्या असामान्य कलावंतांनी आपल्या कलेने त्या महालाला सौंदर्य बहाल केलं. बघता बघता पॅरिसचं राजधानीपद व्हर्साइल्सनं घेतलं ६ ऑक्टोबर १७८९ पर्यंत व्हार्साइल्सचं वैभव वाढतच गेलं त्या दिवशी नागवली गेलेली जनता व्हर्साइल्सच्या दरवाजावर आपली गाऱ्हाणी घेऊन थडकली राजा आणि त्याची महत्त्वाकांक्षी राणी अंतोनुआत आपल्या सोन्याचा वर्ख दिलेल्या रथातून पॅरिसला परतली. मग फ्रेंच क्रांती झाली आणि तो महाल अडगळीत पडला. तिथली शिल्पं, कलात्मक वस्तू हलवल्या गेल्या परंतु १८३७ मध्ये लुई फिलीपने त्या महालाला जुनं वैभव प्राप्त करून दिलं तो महाल सजवला आणि आज तो फ्रान्सच्या इतिहासाचा म्युझियम बनलाय.

महाल म्हटला की प्रचंड खोल्या. जुनं अस्सल सागवानी फर्निचर, महागडी सजावट वगैरे गोष्टी आल्याच ह्या महालाचं सौंदर्य त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण सजावटीत आहे त्या इमारतीचा बाहेरचा भाग आकर्षक आहे, पण डोळ्यात तरळत राहणारा वगैरे नाही लालभडक विटा आणि पांढऱ्या दगडांचा वापर करून इमारतीचा आकर्षकपणा वाढवलाय. मात्र महालाचं ऐश्वर्य जाणवतं आत शिरल्यावर।



*महालातील डोळे दीपवणारं सौंदर्य*

आणि मग आत गेल्यावर तर डोळ्यांना सोन्याची आणि हातापायांना विविध रंगाच्या इटालियन मार्बलच्या गुळगुळीत स्पर्शाची सवय होऊन जाते. भिंतींचा किंवा जमिनीचा इंचभर तुकडासुद्धा सजावटीविना सोडणं हा आपल्या ऐश्वर्याचा आणि रसिकतेचा अपमान आहे अशी फ्रेंच राजांची प्रामाणिक समजूत असावी. जिथे भिंतीवर टेपेस्ट्री नाहीं तिथे मार्बल आहे आणि दोन्ही नाहीत तिथे चक्क अप्रतिम पेंटिंग्ज आहेत छताकडे पाहताना आपण आपोआप आ वासतो. कारण गोलाकार छतावरही अफलातून पेंटिंग्ज दिसतात. टेपेस्ट्री फक्त रेशमी नाही, तिथे राज्य सोन्याच्या जरीचं आहे राजा आणि राणीची बेडरूम तर जिथे तिथे सोनं

उधळल्यामुळे चक्क सोनेरी दिसतात. नेहमी राजे-महाराजे पैशात लोळायचे असं ऐकलं होतं. ह्या लुईचं खानदान चक्क सोन्यात लोळायचं.

ह्या महालातली तीन दालनं अद्वितीय आहेत. त्यातलं पहिलं ऑपेरा हाऊस! ह्या लुईना संगीताचा कान होता. मारी अंतोनुआतसारखी राणी स्वत: वाद्यं वाजवायची जुने ऑरगन आणि व्हॉयलिन अजूनही तिथे आहेत. पण सुरुवातीला हे ऑपेरा हाऊस त्या प्रचंड महालात नव्हतं. त्यामुळे समोरच्या अंगणात नाही तर मागच्या नयनरम्य बगिच्यात संगीताच्या मैफली व्हायच्या. १७६२ साली लुईने ठरवलं की महालात ऑपेरा हाऊस उभारायचं. त्याची इच्छा म्हणजे वज्रलेप. पैशाला तोटा नव्हता. तज्ज्ञ, कलावंत खिशात होते. लगेच मानसर्टने आराखडा काढला. गॅब्रियलने त्याला वास्तव रूप दिलं. एक अंडाकृती ऑपेरा हाऊस उभं राहिलं. त्याची आतली सजावट लाकडाची आहे त्यामुळे कुठल्याही कोपऱ्यात चांगलं ऐकायला येतं आणि बसायची जागा जॅक्सवर उभारली असल्यामुळे कधीही त्या ऑपेरा हाऊसचं रूपांतर बॉलरूम किंवा बॅन्क्वेट हॉलमध्ये करता येतं. अन्यत्र आढळणारा सोनेरी लखलखाट, लोंबकळणारी प्रचंड झुंबरं आणि आरशांची लयलूट येथेही आहेच आणि जवळजवळ चाळीस फुटावर असलेलं छत, छत वाटत नाही. एक प्रचंड पेंटिंग डोक्यावर लटकतंय असा भास होतो.

महालातलं चॅपेल हेही मानसर्टच्या बुद्धीचं अपत्य आहे. त्याची तुलना त्यानेच उभारलेल्या सॅक्रकरशी नाही करता येणार. पण ते छोटेखानी असलं तरी सौंदर्याचा वरदहस्त मोठा आहे जमिनीची शोभा पॉलीक्रोम मार्बलने वाढवलीय आणि त्यावर फ्रान्सच्या राजाची शस्त्रं कोरली आहेत. भिंती आणि छतावर चक्क रंगीत चित्रमय जुनं आणि नवं टेस्टामेंट आहे.

पण त्या महालातली मानसर्टची सर्वोत्तम कलाकृती म्हणजे हॉल ऑफ मिरर्स. तिथे पाय गोंदाने चिकटवल्यासारखे चिकटून राहतात. १६७८ साली तो बांधला. तब्बल २४६ फूट लांब आहे आणि ३३फूट रुंद आहे. छतावर ल-बुनची पेंटिंग्ज आहेत. फ्रान्सच्या वेगवेगळ्या विजयांची चित्रं त्याने रेखाटली आहेत. पण त्या दालनाचं सौंदर्य त्याच्या सतरा प्रचंड खिडक्या आणि त्या खिडक्यांसमोर असलेल्या प्रचंड आरशांत आहे बाहेरच्या बागेचं प्रतिबिंब त्या प्रचंड आरशात पडतं आणि दालनातच हिरवीगार बाग उभारली आहे'असा भास होतो. त्या दालनातली १७७० काचेची झुंबरं दालनाचं सौंदर्य आणखीनच खुलवतात.

हा महाल पाहताना आपण पेंटींगचा म्युझियम पाहतोय असं वाटत राहतं कारण भिंतींवर किंवा छतावर पेंटिंग नाही असं महालात दालन नाही कुत्र्यांच्या बेडरूममध्येही कुत्र्यांची पेंटिंग्ज आहेत पेंटिंग्ज पाहताना चित्रकलेतले जाणकार तर

भारावून जातातच, पण सामान्य माणसालाही प्रत्येक पेंटिंगवरून नजर हटवताना कष्ट पडतात. त्यातल्या व्यक्ती जिवंत वाटतात. मग ती देवांना शरण आणणारी लावण्यवती व्हिनस असो, युद्धावर निघालेला ज्युलियस सिझर असो किंवा ज्युपिटरकडून त्याच्या मुलीचा हात हातात घेणारा हर्क्युलस असो. कुठल्याही क्षणी चित्रातून उतरून आपल्याला भेटतील असं वाटतं.

चौदावा लुई चित्रकला-मूर्तीकलेतला दर्दी होता. एखादं शिल्प किंवा चित्र आवडलं की कुठलीही किंमत त्याला त्या कलाकृतीपुढे छोटी वाटायची. रोममधली अजरामर शिल्पं त्याला मिळणं शक्य नव्हतं  म्हणून त्याने आपल्या सर्वोत्कृष्ट कलाकारांना रोमला पाठवलं आणि त्यांच्याकडून त्या शिल्पाची, पेंटिंग्जची नक्कल करवली  म्हणूनच तो महाल समृद्ध झाला. पुढे कला जोपासण्याचं काम मादाम-द-पॉम्पेद्यू आणि मादाम-द-बार्टनेही केलं.

महालातून बाहेर पडलो की आपण एका प्रचंड बागेत शिरतो. चुकलंच! ती बाग कसली, ते वन आहे  तब्बल २३५ एकर त्याची व्याप्ती आहे  'नंदनवन' कुणी पाहिलेलं नाही, पण असलंच तर असंच असलं पाहिजे. निसर्ग इथे मनसोक्त रंगपंचमी खेळलाय. किंबहुना, ल-ब्रन, ल-नॉत्रसारख्या महान कलावंतांनी निसर्गाला सर्व रंग उधळायला भाग पाडलंय. अमूक एका रंगाच्या फुलाचा ताटवा पाहिला नाही, असं झालं नाही. माणसाचे हातही निसर्गाच्या तोडीस तोड सौंदर्य निर्माण करू शकतात हे तिथली शिल्पं आणि विविध प्रकारचे कारंजेच सांगतात. हे वन हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. पण दिग्मुढ करणाऱ्या 'फौटन ऑफ अपोलो'बद्दल सांगितलंच पाहिजे. त्या कारंज्यातून उडणाऱ्या पाण्याचा जोश आणि सोन्याचा मुलामा दिलेला अपोलोचा पुतळा माझ्या मनावर गोंदवला गेलाय. अपॉलो म्हणजे सूर्यदेव! तो आपल्या चार भरधाव पळू पाहणाऱ्या घोड्याच्या रथावर बसलाय. त्याचे सेवक त्याच्या आगमनाची दवंडी पिटवतात असा तो देखावा आहे. पहाटेचे शांत भाव सूर्यदेवाच्या चेहऱ्यावर आहेत. घोड्याचा जोश मात्र कारंज्यातून उधळणाऱ्या पाण्यासाखा आहे  रोमच्या अनेक महालांत रंगवलेल्या ह्या चित्रांचं शिल्प एका रोमन शिल्पकारानेच तयार केलंय.

सौंदर्यानुभव हा नुसता सांगून चारचौघांमध्ये वाटता येत नाही. तो अनुभवावाच लागतो. अर्थात प्रत्येकजण तेवढा नशीबवान नसतो. पण नशीब तुम्हाला कधी पॅरिसला घेऊन गेलं तर व्हर्साइल्स विसरू नका. फ्रेंच इतिहास, वैभव, संस्कृती, कला ह्यांचा इतका सुरेख संगम दुसऱ्या वास्तूत सापडणार नाही. शॅपेनइतकीच त्याची चव रेंगाळणारी आहे.

*(लोकसत्ता २६ ऑक्टोबर १९९१)*

# विलायती तारुण्य

लंडनच्या हिथ्रो विमानतळावर मला उतरून पूर्ण तासही झाला नव्हता. साऊथ हॉलमधल्या माझ्या दोस्ताबरोबर पाय मोकळे करायला बाहेर पडलो. पंधरा-वीस पावलं चाललो नसेन तोच शाळेतल्या मुलीचा घोळका समोरून आला. मुली शाळेच्या युनिफॉर्ममध्ये होत्या. चौदा-पंधरा वर्षांच्या असाव्यात तिथे यौवनाचा मोहर आपल्यापेक्षा लवकर येतो. तो त्यांच्या शाळेच्या युनिफॉर्ममधूनही जाणवत होता. जवळ आल्यावर त्यांनी काही कॉमेंटस् पास केल्या. काय बोलल्या ते नीटसं कळलं नाही. त्यांचे इंग्लिश उच्चार पटकन कळत नाहीत. त्या खळाळून हसल्या. मी मागे वळून पाहिलं. त्या घोळक्यातल्या दोन निग्रो मुली आमच्याकडे पहात होत्या. एकीने चटकन डोळा मारला. दुसरीने फ्लाइंग किस दिला. मी शहारलो आणि भांबावलोसुद्धा. माझा मित्र माझ्याकडे पाहून हसला आणि म्हणाला, ''ही सुरुवात आहे. अजून तू काहीच पाहिलेलं नाहीस.''

''मुंबईला दादर-गिरगावला हे दृष्य कदाचित दिसणार नाही. पण हाय, हॅलो संस्कृतीत मी असं पाहिलंय,'' मी म्हटलं.

''त्याच्या 'पलीकडच्या' संस्कृतीबद्दल तू फक्त वाचलं असशील. आता डोळे उघडे ठेवून बघ'', तो म्हणाला.

आणि त्यानंतर मी डोळे आणि मनाची कवाडं उघडी ठेवून लंडनमध्ये फिरायला लागलो.

दुसऱ्या दिवशीचीच गोष्ट, साऊथ हॉलहून एका नातेवाईकाकडे क्रॉयडनला चाललो होतो. प्रवास चांगला दोन-अडीच तासांचा. तिकडे प्रवास करताना एका गोष्टीचा वैताग येतो. शेजारचा साहेब ढीम्म तोंड उघडत नाही. त्यामुळे कुणाशी बोलणं वगैरे ह्याचा प्रश्नच नाही खिडकीच्या बाहेर डोकावून शहर पाहाणं किंवा वर्तमानपत्रात नाही तर पुस्तकात डोकं खुपसून बसणं एवढाच उद्योग असतो. पण




त्या दिवशी अडीच तासाच्या प्रवासात माझ्या डोळ्यांना एक वेगळाच उद्योग मिळाला.

एका मधल्या कुठल्या तरी बस स्टॉपवर एक तरुण गोरं गोमटं जोडपं बसमध्ये शिरलं. त्यांची एन्ट्रीच ग्रेट होती. दोघांचाही एकमेकांच्या कमरेला विळखा होता. आणि कपडे? आपल्याकडे आदिवासी जमातसुद्धा त्यांच्यापेक्षा जास्त कपडे घालते. त्या तरुण मुलाने दीड वीत पँट घातली होती. वरती पूर्णपणे उघडा. डोळ्यावर गॉगल आणि पायात बूट. बरोबरच्या तरुणीचा ड्रेसही भन्नाट होता. वीतभर पँट आणि वरती ब्रेसियरची सुधारलेली आवृती, पायात सँडल्स्. बस एवढंच. आपल्याकडे घरातसुद्धा अशा कपड्यात कोण वावरणार नाही. ते जोडपं बसच्या मध्यावर आलं आणि थांबलं. त्या तरुणाने तिला मिठीत घेतलं आणि संपूर्ण बसला ऐकू जाईल एवढा 'चक्' आवाज झाला. माझे डोळे तर विस्फारलेच होते. मी इतरांकडे पाहिलं. काहीही घडलेलं नाही असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर होते. मख्खपणे सर्व मंडळी समोर बघत होती. थोड्या वेळाने ते जोडपं माझ्या मागच्या सीटवर स्थानापन्न झालं. तिथंही त्यांचा रोमान्स जोरदार सुरू होता. मला राहावेना. मी अधूनमधून मागे वळून बघत होतो. आमच्या मुंबईत शेजारी मुलगी येऊन बसली तरी ती असं अंग चोरून बसते, की कारण नसताना आपल्यालाच अपराधी वाटायला लागतं. इथे मी सोडून बसमधला एकही माणूस मागे वळून बघत नव्हता.

काही तरी बोलावं म्हणून मी त्याला मागे वळून विचारलं, ''क्रॉयडन अजून किती लांब आहे?''

तरी बरं त्यांची रोमान्सची धुंदी काही ऐकू न येण्याएवढी नव्हती. तिच्या ओठावर टेकलेले त्याचे ओठ त्याने बाजूला केले. मिटलेले डोळे उघडले. अंगाभोवती हात मात्र तसाच होता आणि मला म्हणाला, ''डॉन्ट वरी. स्टिल हाफ ॲन अवर.'' आणि लगेच पुन्हा आपल्या विश्वात मश्गूल झाला.

त्यानंतर मलाही त्या गोष्टीचं काही वाटेनासं झालं. कारण रोज सकाळ-संध्याकाळ कधी बसमध्ये, कधी ट्यूबमध्ये, तर कधी एक्सलेटरवर, तर कधी भररस्त्यात प्रेमी युगुलं बिनधास्तपणे मूडमध्ये येताना पाहायचो. त्यामुळे नंतर मीही साहेबासारखा झालो. मख्ख चेहेऱ्याचा माणूस. अधूनमधून तिथे स्थायिक झालेल्या भारतीय युगुलांना मूड आलेला पाहिल्यावर कौतुक वाटायचं. नंतर त्याचीही सवय झाली.

पण इंग्लंड किंवा युरोपात हा 'स्वैर प्रणय' मी चाळे ह्या सदरात जमा करणार नाही. तो पाहताना काही घृणास्पद आहे, ह्यात दिखाऊपणा आहे असं मला वाटलंच नाही. चालता चालता एखादं युगुल अचानक थांबायचं, एकमेकांना मिठी मारायचं मग चुंबनांचा वर्षाव व्हायचा आणि भावनांचा उन्माद ओसरला, की पुन्हा चालू लागायचं. हे सर्व अक्षरश: नैसर्गिक वाटायचं आणि म्हणूनच मला ते कधी दिखाऊ, घृणास्पद वाटलं नाही.

कपड्यांच्या बाबतीत तर ही लोकं भलतीच काटकसरी. अर्थात उन्हाळ्याच्या दिवसात डोक्यावर सूर्य आला की इंग्लंडमधल्या लोकांच्या अंगावरचे कपडे गळायला लागतात. शरीर टॅन करणं हा त्यांचा आवडता छंद आहे. पण चावणाऱ्या उन्हात मुलींनाही अंगावर फारसे कपडे सहन होत नाहीत.

भारतात पदर पडला तरी मुली कावऱ्याबावऱ्या होतात. इंग्लंडमध्ये अर्थातच पदर नसतो. पण बऱ्याच वेळा ब्रा-सुद्धा नसते. असते फक्त झिरझिरीत कंचुकी आणि कमरेभोवती बरमुडा पॅंट. पूर्वी युरोपमध्ये या वेषात मुली प्रवासाला जाताना किंवा समुद्रावर वाळूत लोळताना दिसायच्या. हल्ली त्या अशा वेषात कुठेही दिसतात. सुपर मार्केटमध्ये, रेल्वे स्टेशनात अगदी कुठेही. मी रोमला पवित्र व्हॅटिकन सिटीत गेलो होतो. तेव्हा ज्यांच्या अंगावर पुरेसे कपडे नाहीत त्यांना सेंट पीटर्स चर्चमध्ये प्रवेश दिला नाही. आत शिरताना असं लक्षात आलं, की फक्त पन्नाशीच्या पुढचीच मंडळी माझ्याबरोबर आहेत. तरुण मुला-मुलींना त्या चर्चमध्ये पाय ठेवायला मिळाला नाही.

कपड्यांप्रमाणे सेक्सबद्दलसुद्धा ही मंडळी किती उदारमतवादी आहेत हे

जागोजागी लक्षात येतं. निव्वळ ही पिढी नाही, तर मागची पिढीसुद्धा हाच दृष्टिकोन बाळगून आहे. तिथे एकदा वर्तमानपत्रात वाचलेली बातमी सांगतो - १६ वर्षांची केरी रुस्टन नावाची मुलगी ३१ वर्षांच्या लग्न झालेल्या मुलाबरोबर पळून गेली. हे काय कुठेही घडतं असं तुम्ही म्हणाल. खरंच, आपल्याकडेही घडतं. पण पुढचं वाचा. ती १० महिन्यांनंतर ६ महिन्यांच्या मुलीला घेऊन परतली. घरी परतल्यावर "कार्टे, कुठे शेण खायला गेली होतीस. आमच्या तोंडाला काळं फासलंस" वगैरे शब्दगुच्छ तिच्यावर उधळले गेले नाहीत. उलट तिच्या वडिलांची आपण 'आजोबा' झाल्याबद्दल छाती अभिमानाने आणि आनंदाने तट्ट फुगली आणि वर्तमानपत्रात त्यांनी सरळ मुलाखत दिली. तिचे वडील म्हणाले, "आजचा दिवस खरोखरच फॅन्टास्टिक आहे. मला माझी मुलगी तर सापडलीच, पण नातसुद्धा मिळाली. मला कळत नव्हतं, आधी मुलीला मिठी मारावी की नातीला हृदयापाशी घ्यावं. आकाश मला ठेंगणं वाटायला लागलंय."

कल्पना करा. पार्ल्यातल्या कुण्या कुलकर्ण्यांची शिल्पा अशी पळून गेलीय आणि मुलीला घेऊन परत आल्यावर मिस्टर कुलकर्णी अत्यानंदाने 'म. टा.'ला किंवा 'लोकसत्ते'ला मुलाखत देतायत. अक्षरश: हलकल्लोळ माजेल.

तिथे अनोळखी तरुण-तरुणी तुमच्याशी सेक्सवर चर्चा करायला अजिबात घाबरत नाहीत किंवा लाजतही नाहीत. मी फ्रॅन्कफर्टहून म्युनिकला चाललो होतो. गाडीत कंपार्टमेंटमध्ये एक मुलगी येऊन बसली. जिन्स आणि पिवळा टी शर्ट. पाठीला हॅवरसॅक असा तिचा वेश. हाय, हॅलो वगैरे झालं आणि मग ती इंग्लिशमध्ये बोलायला लागली. मला बरं वाटलं. तिकडे जर्मनीत इंग्लिश शब्द मुष्किलीने ऐकायला मिळतात. जर्मन मंडळी इंग्लिशचं ज्ञान असूनही इंग्लिशमध्ये बोलायच्या भानगडीत पडत नाहीत. ती मुलगी अमेरिकन होती. कुठेतरी ऑर्लिंग्टनला राहणारी. तिने अठरावं नुकतंच ओलांडलं होतं आणि एकटी युरोपच्या सफरीवर निघाली होती.

मी तिला विचारलं, "तू एकटीच?"

ती म्हणाली, "का, काय झालं? मी आता ॲडल्ट आहे."

मी म्हटलं, "तसं नाही. तुला भीती वगैरे वाटत नाही? माझी बायको दिवसाढवळ्यासुद्धा टॅक्सीत बसायला घाबरते."

ती हसली आणि म्हणाली, "कसली भीती? वाटेत कोण ना कोण तरी बॉयफ्रेंड भेटतोच."

आणि मग ती चिमुरडी पोरगी वेगवेगळ्या विषयांबद्दल मोकळेपणाने बोलली. विशेषत: सेक्सबद्दल तर तिचं सरळ सोपं तत्त्वज्ञान होतं. आवडलेल्या मुलाबरोबर सेक्स करण्यात तिला कसलीही नैतिक भीती वाटत नव्हती. मॅकडोनाल्डमध्ये जाऊन

हॅम्बर्गर खावा त्या सहजतेने ती म्हणे आवडलेल्या मुलाबरोबर सेक्स करत होती. ''पोटाची भूक शमवताना आपल्यावर नैतिक बंधनं नसतात. मग शरीराची भूक भागवताना का असावीत?'' हा तिचा खुल्लमखुल्ला सवाल होता.

''पण भावनात्मक गुंतागुंतीशिवाय नुसतं सेक्स विचित्र नाही का वाटत?'' मी विचारलं.

ती म्हणाली, ''माणूस आवडला की थोडीफार भावनात्मक गुंतागुंत होतेच. तेवढी पुरेशी असते आणि पूर्णपणे गुंतून पडावं असा मुलगा मला अजून भेटलेला नाही.''

त्या मुलीचं कौमार्य वयाच्या १५ व्या वर्षी संपलं होतं. म्हणजे तिने संपवलं होतं आणि अशा मुली तिथे पोत्याने असतात.

मी तिथे अशा १८-२० वर्षाच्या मुलामुलींचे अनेक घोळके पाहिले. रंगीबेरंगी कपडे आणि पाठीवर हॅवरसॅक. एकत्र राहणं, एकत्र फिरणं आणि उन्हाळा एन्जॉय करणं. ते बघताना माझं रुईया कॉलेज प्रकर्षानं आठवायचं. पहिल्या वर्षी पिकनिकला येता का विचारलं (ते पण सकाळी जाऊन संध्याकाळी यायचं) तर त्यात उभा खो खो खेळणार नाही, साखळी खेळणार नाही वगैरे अटी मुलींनी घातल्या. (आता आपल्याकडची मुलं-मुलीसुद्धा सुधारल्यात म्हणा) तर काय सांगत होतो... हं. ही मुलं-मुली वेगवेगळ्या देशातून युरोपात येतात आणि एकमेकांत मिसळून जातात. आपल्यासारखे बसमधून शहर पाहात नाहीत. हातात नकाशा घेऊन भटकतात. एखाद्या चौकात गिटार वाजवत धुंदपणे नाचतात. बीच असेल तर बाथ घेत पडतात. असं मस्त स्वैर जीवन ही मंडळी जगत असतात.

ज्या मोकळेपणाने ही तरुण मंडळी जीवन जगतात त्याच मोकळेपणाने ही मुलं-मुली टीव्हीवर सेक्सवर चर्चा करतात. एकदा इंग्लंडमध्ये 'चॅनल फोर' ने प्रस्तुत केलेला 'सेक्स टॉक' हा कार्यक्रम पाहिला होता. तीन-चार मुली आणि तीन-चार मुलं टीव्हीवर 'सेक्स'वर चर्चा करत होते. विषय होता 'ऑरगॅझम' म्हणजे प्रणयसुखातला परमोच्च बिंदू. त्या मुलींची काही वक्तव्यं ऐकल्यावर ज्या संस्कृतीच्या भिंतीआड आपण वावरत असतो त्या भिंती धरणीकंप झाल्याप्रमाणे गदागदा हलल्यासारख्या वाटल्या. माझं एकोणिसाव्या वर्षापर्यंत कुणी चुंबनही नाही घेतलं, असं सांगताना एक मुलगी कमालीची शरमली होती. आपल्यात काही तरी कमतरता आहे असं तिला वाटायला लागलं होतं.

एका मुलीने स्पष्टपणे सांगितलं, ''मी ऑरगॅझमचा पहिला अनुभव घोड्यावर बसल्यावर घेतला. तोपर्यंत मित्रांशी संभोग करूनही मला तसा अनुभव मिळाला नव्हता.''

काही मुलांनी तर कबूल केलं की, संभोग सुखातला मुलींचा परमोच्च बिंदू कधी येतो हे आपल्याला ठाऊक नाही. मनात विचार आला, मोकळ्या वातावरणात वावरणाऱ्या या मुलांना जर या गोष्टी माहीत नसतील तर बंदिस्त समाजात वावरणाऱ्या आपल्या मुलांचं अज्ञान केवढं असेल? वात्स्यायन आमच्या देशात जन्मला असला तरी त्याने सांगितलेली रहस्यं मोकळेपणाने बोलायची परवानगी आम्हाला आमच्यावरच्या संस्कारांनी कुठे दिलीय? टीव्हीवर एक साधी कुटुंब नियोजनाची जाहिरात मुलाबाळांबरोबर पाहताना आम्ही कावरेबावरे होतो.

आपण ज्याला अश्लीलता म्हणतो, त्याला बऱ्याच वेळा युरोपच्या मोकळ्या समाजात रसिकता म्हणून संबोधतात. या 'रसिकतेचा' एक अजब नमुना मी मँचेस्टरला पाहिला. तेही एका 'पब'मध्ये. 'इंग्लंडला पब' हीच एक अजब चीज आहे. या पबला दारूचा गुत्ता म्हणणं म्हणजे ताजमहालला मुमताजची कबर म्हणण्यासारखं आहे. तिथे मद्य मिळत असलं तरी पब हा केवळ गुत्ता नसतो. तिथलं वातावरण विलक्षण वेगळं असतं. डार्ट, स्नूकरसारखे खेळ तेथे असतात. मुख्य म्हणजे ते एक संध्याकाळी भेटण्याचं ठिकाण असतं. ब्रिटिश माणसं शुक्रवारी आठवड्याचा शीण मद्यात बुडवायला 'पब'मध्ये येतात. पण ते फक्त एकाच पबमध्ये ठाण मांडून बसत नाहीत. तिथल्या मद्याची चव घेतली की पुढच्या पबमध्ये जातात. तेथे मैफल भरते. मग त्याच्या पुढचा राऊंड आणखीन तिसऱ्या पबमध्ये. पण मँचेस्टरमधल्या त्या पबची खासियत वेगळी होती. तेथे पाय ठेवल्यावर पुढच्या पबमध्ये जायचा विचार तरुण-तरुणी फार क्वचित करायचे. तिथून पाय हलणंच कठीण होतं. कारण? ऐकलंत तर गार व्हाल. त्या पबचं नाव आहे 'टॉमी डक' पण तो निकर पब म्हणून ओळखला जायचा. कारण त्या पबच्या छतावर 'निकर' लटकवलेल्या होत्या.

बरं, बाजारातून विकत घेऊन निकर (चड्डी) लटकवण्याचा तो प्रकार नव्हता. तेथे येणाऱ्या मुली आनंदाने स्वत:ची निकर काढून लटकवायच्या. तेथे आकार, वय, रंग मुलीचा आणि निकरचा, यात भेदाभेद नव्हता. कुणीही यावं आणि निकर बहाल करावी. त्या पबचा म्हातारा मालक केन रिंग्ज मला म्हणाला, "१९७३ साली एका रविवारी सहज मित्रमैत्रिणीबरोबर गप्पा मारत असताना ही कल्पना डोक्यात उगवली. माझ्या एका मैत्रिणीने तिची निळ्या आणि पांढऱ्या पट्ट्यांची चड्डी काढली आणि छतावर भिरकावली. आमच्या निकर क्लबचं ते उद्घाटन होतं आणि त्यानंतर एकही आठवडा असा गेला नाही, जेव्हा एखादी चड्डी छतावर जाऊन बसली नाही. मुलींनी सर्वांसमोर चड्डी काढायची आणि छतावर भिरकवायची ही आमची खरी कल्पना होती. पण काही मुली लाजायच्या आणि मग बाथरूममध्ये

जाऊन चड्डी काढून आणून छतावर भिरकवायच्या.''

आता त्याने हा निकर क्लब थांबवलाय. छतावर मागच्या वैभवाच्या खुणासुद्धा नाहीत. पण आठवण म्हणून काही रंगीबेरंगी चड्ड्या त्याने शोकेसमधे जपून ठेवल्या आहेत आणि तिथे लिहिलंय ''काळजी करू नका, आता या पबमध्ये पाय ठेवल्यावर तुम्हाला तुमची चड्डी उतरवावी लागणार नाही. ती पद्धत आम्ही इतिहासजमा केली आहे. तुम्हाला दाखवण्यापुरते अवशेष मात्र ठेवले आहेत.''

पण त्या अवशेषांकडे पाहून आठवणीत रमणारा त्या निकर पबचा मालक केन रिंग्ज म्हणाला, ''या प्रत्येक चड्डीमागे एक इतिहास आहे. ऑस्ट्रेलिया, अमेरिकेहून आलेल्या काही मुलींनी त्यांच्या चड्ड्या बहाल केल्या आहेत. काही मुली लग्न झाल्यावरसुद्धा या क्लबला विसरल्या नाहीत.''

त्यांची पुढची महत्त्वाकांक्षा ठाऊक आहे? 'ब्रा क्लब' काढायचा. त्या पबच्या छताचा मला हेवा वाटायला लागलाय.

युरोपच्या लोकांची आणखी एक आवडती गोष्ट म्हणजे नाईट लाईफ. नाईट लाईफ म्हणजे बाई आणि बाटलीशी केलेलं उद्योग एवढाच अर्थ नाही. लोकं कॅब्रेत रमतात. ब्ल्यू फिल्म्स पाहतात. डिस्कोत जाऊन नाचतात. माडीही चढतात आणि कॅसिनोमध्ये जाऊन पैसे उधळून येतात. या सर्व क्रिया नाईट लाईफ या शब्दात सामावलेल्या असतात. तिथे माणूस पॅरिसला गेला आणि पिगालकडे फिरकला नाही की अरसिक समजला जातो. ॲम्स्टरडॅम सेंट्रल स्टेशनसमोरच्या दाम स्ट्रिटवरून न फिरणारा माणूस सज्जन मानला जातोच असं नाही. मला आठवतंय, फ्रँकफर्टला त्या शहराची माहिती देणाऱ्या सरकारी माहितीपत्रावर कॉलगर्लस्च्या जाहिराती आणि टेलिफोन क्रमांक दिलेले होते. त्यांना त्यात विचित्र, घाणेरडं, घृणास्पद काहीही वाटत नाही. फ्रँकफर्टच्या अजस्त्र विमानतळावर ड्युटीफ्री शॉप्सच्या संकुलात सेक्स शॉपसुद्धा असतं आणि विमानतळातल्या थेटरमध्ये ब्ल्यू फिल्मसुद्धा दाखवल्या जातात.

युरोपमध्ये नाईट लाईफला राजमान्यता आणि लोकमान्यता जरी असली तरी तो वासनेचा डोह नक्कीच असतो. त्यात गोऱ्यांबरोबर अरब खांद्याला खांदा लावून पोहोत असतात. तिथे भारतीय मंडळी दिसत नाहीत असं नाही, पण बहुतेक सर्व बघेच असतात. मनावरचे संस्कार. आणि खिसा त्यांना त्या डोहात यथेच्छ डुंबण्यापासून परावृत्त करत असतो. तिथे नाईट क्लब्ज, लाईव्ह शोज आणि इतर गोष्टीही फार मोठ्या प्रमाणावर चालतात. कॅब्रे डान्सरनं सर्व कपडे काढणं आणि केळ्याची साल काढणं या गोष्टी तेवढ्याच नॅचरल वाटतात. स्टेजवर संभोग दाखवणं, समलिंगी संभोग दाखवणं किंवा एकाच वेळी तीन-चार जणांना रतिक्रीडा

करताना दाखवणं या गोष्टी निषिद्ध नाहीत. पण ते कसं असतं, की रात्र जसजशी चढत जाते तसतशा या गोष्टी जास्त भडकपणे दाखवल्या जातात. फ्रॅंकफर्टला एका ठिकाणी मी विचित्र प्रकार पाहिला. तिथे संध्याकाळी नाईट क्लबची फी वेगळी होती. रात्री नऊ वाजता वेगळी होती. आणि रात्री अकरा वाजता सर्वांत जास्त होती. स्टेजवर जेवढा शृंगार भडक तेवढी फी आणि मद्याचे दर जास्त.

तुम्ही भडक दृश्य पाहून गुपचूप आपापल्या हॉटेलवर परत जावं एवढा साधा सोज्वळ हेतू त्यांचा नसतो. तुमच्या भडकलेल्या वासनांवर त्यांना त्यांची पोळी भाजून घ्यायची असते. त्यासाठी त्यांनी नाईट क्लबमध्ये पोरी पेरलेल्या असतात. तुमच्याशी लगट करणं हा त्यांचा उद्योग असतो. तुम्हाला गळाला लावणं हा त्यांचा अंतिम हेतू असला तरी त्या लगट फुकट करत नाहीत. कंपनीसाठी पैसे हा तिथे प्रकार आहे. तुमच्याकडे एखाद्या मुलीनं मादक हास्य फेकलं आणि तुम्ही तिला ड्रिंक्ससाठी बोलवलंत की तुम्ही फसलात. त्यांच्या प्रत्येक ड्रिंकची किंमत मोठी असते. बऱ्याच वेळा त्यात खरं मद्य नसल्यामुळे ती मदनिका पाण्यासारखी मद्य पिते. आणि तोपर्यंत तुमच्या खिशाला भोक पडलेलं असतं. लंडनच्या एका नाईट क्लबमध्ये माझ्या एका मित्राला हा नाजूक सहवास शंभर पौंडाला पडला. (पाच हजार रुपये) आणि एखाददोन हस्तस्पर्श आणि ओझरतं चुंबन सोडलं तर त्याच्या हातालाही काही लागलं नाही. अशा वेळी फसल्यावर वाद घालण्यातही अर्थ नसतो. कारण वाद तिथे पोलीस येऊन सोडवत नाहीत. पाळलेल्या दोन निग्रो गुंडांची नजरच तुम्हाला गलितगात्र करायला पुरेशी असते.

काही गमतीदार प्रसंगही घडतात. लक्झेंबर्गच्या नाईट क्लबमध्ये मी वाईन पीत बसलो असताना एक टंच गौरांगना मांडीवर येऊन बसली. अगदी अचानक. मी टिपिकल मध्यमवर्गिय. बायको मांडीवर येऊन बसली तरी दचकणारा. तर परस्त्री मांडीवर येऊन बसल्यावर अंगावर रोमांच उठण्याऐवजी दरदरून घाम फुटला. बरं ती काय माशी नव्हती, की आपली झटकून टाकली. प्रसंगावधान राखून मी खिशावर हात ठेवला. तिने छानपैकी तिचे सोनेरी केस माझ्या चेहऱ्यावरून फेकले आणि कानात कुजबुजली, "तू इंडियन आहेस ना?"

कातडीच्या रंगापेक्षा पाकिटावरचा माझा हात आणि सुटलेला घाम यावरून तिने तर्क केला असावा.

"येस्." असा शब्द कसाबसा माझ्या तोंडातून फुटला.

तिने लगेच म्हटलं, "कामक्रीडेत भारतीय पुरुष फार चांगले असतात असं ऐकलंय. वात्सायन तुमचाच ना?"

त्या गुदमरलेल्या अवस्थेतही तिथल्या वेश्या शिकलेल्या असतात, याची मी

नोंद घेतली. ''मला रस नाही'' असं मी कसंबसं म्हटलं आणि माझी सुटका झाली. कारण तिलाही वेळ घालवण्यात रस नसावा. त्यानंतर तिने माझ्या समोरच्या टेबलवर बसलेल्या एका मेक्सिकन माणसाला पकडलं. डायलॉगबाजी साधारण तीच होती, पण तो मेक्सिकन माझ्यासारखा थिजून गेला नव्हता. उलट शहारलाच असावा. कारण तो तिला घेऊन मागच्या बाजूला एका कोचावर बसायला गेला. समोरच्या आरशातून मला त्यांचा रंगेलपणा स्पष्टपणे दिसत होता. मी घाम पुसला. वाईन संपवली आणि निघालो. नाईट लाईफच्या अनुभवानी थोडा हादरलो होतो. दरवाजावर जाणार एवढ्यात ''यू इंडियन जंटलमन'' अशी हाक ऐकू आली. मी थबकलो मागे वळून पाहिलं तर तीच महामाया मला हात करत होती. पण तेवढंच करून ती थांबली नाही. बायबाय म्हणाली. आणि थोडंसं थांबून ''गुडबाय डॅडी'' असं म्हणाली. तिची डॅडी ही उपाधी ऐकल्यावर मी हॉटेलवर जाईपर्यंत हसत होतो.

ज्या डॅडींना लांबून नाईट लाईफ पाहायचंय, खिसे सांभाळून पहायचंय त्यासाठी तिथे 'पीप शो' आहेत. एक छोटीशी केबिन असते. त्यात एक छोटासा नाणं टाकायला बॉक्स असतो. नाणं टाकलं की तुमच्या डोळ्यासमोरच्या खिडकीवरचं आवरण दूर होतं. दीड फूट बाय दीड फूट काचेच्या खिडकीतून आत एक नग्न बाई नाचताना दिसते. तिनेक मिनिटांत तुमच्या खिडकीजवळ येते. थोडेसे अंगविक्षेप करते. एखादा फ्लाईंग किस देते. आणि आतून हळूच कळ दाबते. खिडकी बंद होते. पुन्हा तिला पाहण्यासाठी एक नाणं टाकावं लागतं.

सेक्स शॉप ही आणखिन एक विचित्र चीज तिथे आहे अठरा वर्षाखालील मुला-मुलींना तिथे शिरायला मज्जाव आहे. त्या दुकानाबाहेर पाटी लिहिलेली असते- ''तुम्हाला जर आपल्या हातून गुन्हा होतोय असं वाटत असेल तर कृपया आत येऊ नका.''

मला आपण काही गुन्हा वगैरे करतोय असं कधीच वाटलं नाही. त्यामुळे काहीवेळा मी दुकानात आत शिरलोय. तिथे सेक्सविषयी सर्व असतं. सेक्स करायचे कृत्रिम अवयव. वासना चेतवणारी औषधं. विविध आसनांची छायाचित्रं. ब्ल्यू फिल्मस्च्या व्हिडीयो कॅसेटस् वगैरे! छोट्या-छोट्या वस्तू विकायला मुली असतात पण तुम्ही त्यांना काही माहिती विचारलीत तर त्या गंगावन किंवा रिबिनीबद्दल माहिती सांगावी त्या मोकळेपणाने ते कृत्रिम पुरुषी अवयव किंवा स्पॅनिशफ्लायबद्दल माहिती सांगतात. तिथे रबराची पूर्ण बाईच्या आकाराची बाहुली मिळते. तिचा उपयोग संभोगासाठी करायचा असतो. मला कधी कधी प्रश्न पडतो, ते जग एव्हढं मोकळं आहे की वयाच्या चौदाव्या-पंधराव्या वर्षी कौमार्य भंग ही कोकाकोलाच्या टीनचे

बूच फोडण्याएव्हढी साधी गोष्ट वाटते. मग तरीही ती रबराची बाई का लागते?

ब्ल्यू फिल्मला आपल्याकडे कायद्याने बंदी आहे. तिथे नाही. छोटसं थिएटर असतं आणि सोळा मि.मी.च्या फिल्म्स असतात. तिकीट काढून आत शिरलं की कितीही तास आत बसा. सतत फिल्म सुरू असते. अर्थात फिल्म तीन-चारच असतात, पण त्या पुन्हा पुन्हा दाखवल्या जातात. ह्या थिएटरमध्ये म्हातारी मंडळी जास्त सापडतात. पण तरुण मुलांवरही ह्या ब्ल्यू फिल्मस्‌चा परिणाम होत असावा. एकदा लंडनमध्ये मी असताना मला एक बातमी वाचायला मिळाली.

मार्टिन ऑस्टीन नावाचा अठरा वर्षाचा एक मुलगा व्हिडीओवर ब्ल्यू फिल्मस् बघायचा. ह्या ब्ल्यू फिल्मस्‌मध्ये काहीवेळा असं दाखवलं जातं की एक माणूस बायकांवर बलात्कार करतो. प्रथम बायका विरोध करतात, पण नंतर त्यांच्या वासना जागृत होतात आणि त्या विरोध करायच्या ऐवजी त्या माणसाला वश होतात. ही गोष्ट त्या मुलाच्या डोक्यात पक्की बसली. त्याने पहिला प्रयोग एका गृहिणीवर केला. ती बाथरूममधून बाहेर येत असताना त्याने तिच्यावर झडप घातली. त्याच रात्री त्याने एका हॉटेलमध्ये तरुणीवर बलात्कार केला. तिथे तो पोलीसांना सापडला. त्याने दिलेलं कारण एकून सर्व अवाक् झाली. त्याला सहा वर्षाची शिक्षा झाली.

त्यावेळी त्याच्या आईने मार्गारेट थॅचरला पत्र लिहून कळवलं होतं- ''तूसुद्धा आई आहेस. तू माझं दु:ख समजू शकतेस. माझा मुलगा विकृत ब्ल्यू फिल्मस्‌मुळे बिघडला. ह्या फिल्मस्‌वर जर बंदी आणली नाहीस तर अनेक आयांची माझ्यासारखी अवस्था होऊ शकेल.''

तर अशी ती युरोपमधली रंगीबेरंगी दुनिया. आपण आपल्या संस्कृतीच्या चष्म्यातून पाहिलं तर उत्तान, बीभत्स वाटणारच.

पण आपला चष्मा तरी कुठे स्वच्छ आहे? तो आपल्याला प्रथम स्वच्छ करायला हवा. आपल्याकडे युरोपचा उदारमतवाद चटकन येऊन आपल्या मध्यमवर्गात झिरपणार नाही. कारण इथला सामाजिक गुंता सहजासहजी सुटणारा नाही. पण तो मोकळेपणा यायला काय हरकत आहे? किमान दोन संस्कृतीतला सुवर्णमध्य तरी.

*(श्रीदीपलक्ष्मी दिवाळी १९८४ आणि आज दिनांक)*


# पर्यटकांना खुणावणारी नगरी : बँकॉक

राम मनोहर लोहियांनी दिल्लीला 'अंग उघडे टाकून झोपलेली वारांगना' म्हटलं होतं. लोहियांची कल्पना उसनी घेऊन फक्त बँकॉककडे नजर टाका. ती नगरीही वारांगना वाटायला लागेल. पण तिला जिंकण्यासाठी नेहमीच शस्त्रं लागत नाहीत. तलवार, बंदूक, बॉम्ब असलं कुठलंही रक्त सांडणारं 'हिंस्त्र' शस्त्र तिला जिंकण्यासाठी वापरायची गरज नाही. डॉलरची नोट तुम्ही फडकवली, की कुणाच्याही रात्रीची ती राणी बनते. तुमच्या कातडीच्या रंगाची तिला पर्वा नसते. काळा, गोरा, गव्हाळ, पिवळा... कुठल्याही रंगाची तिला ॲलर्जी नाही. ती 'सर्वधर्मसमभावी' आहे ती फक्त पैशाचा धर्म मानते. डॉलरच्या नोटांचे रंग ओळखते. सकाळी ती धार्मिक कुटुंबातील साध्वी वाटते. पण सूर्य मावळायला लागल्यावर ती रंग बदलते. ढंग बदलते. नखरेलपणात ती पॅरिसशी स्पर्धा करायला लागते. पण पॅरिस जिंकायला 'दौलतजादा' मोठा लागतो. ही नगरी गरिबांच्या कुशीतही शिरते.

बँकॉकला वासनेच्या बाजारात नेऊन बसवलं अमेरिकेनं. व्हिएतनाम युद्धाच्या वेळी अमेरिकन सैनिकाना 'विरंगुळ्या' साठी कुठलंतरी ठिकाण हवं होतं. त्यांनी डॉलर्सच्या जोरावर बँकॉकला वश केलं. विरंगुळ्याच्या त्यांच्या कल्पना आपल्यासारख्या सोज्वळ नसतात. कॅब्रे, कॅसिनो, मदिरा, मदिराक्षी ह्या त्यांच्या 'विरंगुळ्याच्या' गोष्टी केंटुकी चिकनएवढ्या त्यांच्या अंगवळणी पडलेल्या आहेत.

अमेरिकन संस्कृती कुठल्याही शहराच्या चटकन अंगात भिनते. तिची चटक गर्दसारखी असते, न सुटणारी! ती त्या शहराचं सामाजिक जीवन पोखरून टाकते बॅकॉकचंही तेच झालंय.

बँकॉकच्या डॉन मुआँग विमानतळावर उतरल्यापासून हे शहर रंगेलपणाची झलक दाखवायला सुरुवात करतं कुठल्याही मोठ्या शहराच्या विमानतळावर



बॅकॉकमधील एक मंदिर

हॉटेल्सच्या दलालांचा सुळसुळाट नेहमीच असतो. बॅंकॉकमध्ये तुमच्या रंगेलपणाची तार छेडणारे दलालही फिरत असतात. तुम्हाला विमानतळावरून शहरात घेऊन जाणारा टॅक्सीवाला तुमची रसिकता जोखण्याचा प्रयत्न करतो. हॉटेलातला वेटर तुमच्यातल्या कामपुरुषाला आव्हान देणं जन्मसिद्ध हक्क मानत असतो.

तिथे सुरी, वॉग्ज, सिलॉम या प्रचंड हमरस्त्यांवर दीपोत्सव असतो. कॅब्रेज, लाईव्ह शोज, मसाज केंद्र, वेश्यांचे अड्डे वगैरे रोषणाईने झळाळून निघालेले असतात. 'लालबत्ती' विभागाच्या आपल्या कल्पनेत 'कुबट वास', 'अस्वच्छता', 'दुर्गंधी', 'चोरटेपणा' वगैरे गोष्टी सामावलेल्या असतात. तिथे त्या अजिबात सापडत नाहीत. त्याबाबतीत त्यांनी युरोप-अमेरिकेला आदर्श मानलयं. 'विकृती' मिरवण्याचा आणखीन एक गुण त्यांनी आपल्या युरोपीय-अमेरिकन मित्रांकडून उचललाय. बॅकॉकमधल्या समलिंगी क्लब्जना त्यांच्या अस्तित्वाचा 'अभिमान' आहे की नाही मला ठाऊक नाही, पण त्यांच्या अस्तित्वाच्या जाहिराती तिथं इंग्रजी वर्तमानपत्रात आणि हॉटेल्सच्या ब्रोशर्सवर तरुण सुंदर मुलांच्या फोटोसकट रुबाबात झळकत असतात.

काही बाबतीत आपल्या पाश्चात्त्य दोस्तांपेक्षा बॅंकॉकने पाऊल पुढं टाकलंय. बॅंकॉकमध्ये 'लाईव्ह शोज' पाहिले की युरोप कामशास्त्रात मागासलेलं राष्ट्र वाटतं. तिथल्या कॅब्रेना पॅरिसमधल्या कॅब्रेची भव्यता नसते. ते कॅब्रे म्हणजे कामक्रीडेची सर्कस असते. तिथे भव्यता दिसते मसाज केंद्रात. खरं तर मसाज ही त्यांची पूर्वापार

चालत आलेली कला आहे. तिथे त्यांच्या सरकारतर्फे चालवली गेलेली मसाजसंस्था आहे. त्याचा तीन वर्षांचा अभ्यासक्रम आहे. तिथे मसाज शिकणाऱ्या मुला-मुलींना नंतर हॉस्पिटलात नोकऱ्या मिळतात. परदेशातून अनेक रोगी शास्त्रशुद्ध मसाज करून घेण्यासाठी बँकॉकला येतात. मसाजमध्ये आंघोळही अंतर्भूत असते. म्हणूनच तिथल्या मसाज केंद्रावर मिल्क बाथ, मिनरल बाथ, टर्किश बाथ, हर्बल बाथ वगैरे पाट्या झळकतात. पण डॉलर्स नाचवणाऱ्या रंगेल पर्यटकांना ह्या शास्त्रशुद्ध मसाजात रस नसतो. त्यांचं 'अभ्यंगस्नान' वेगळं असतं.


अमेरिकन सैनिकांनी डॉलर्स वाजवून बँकॉकची संस्कृती बदलली असली तरी त्या बदलाला आणखीनही काही कारणं आहेत. निव्वळ पैशासाठी कुणीही शरीर कुणाच्याही स्वाधीन करत नाही. पोटाला चिमटा बसला की सर्व सुविचार संपतात तिथे दारिद्र्यही आहेच. स्वच्छ, पुसलेल्या स्टेनलेस स्टीलच्या भांड्याप्रमाणे चकाकणाऱ्या त्या शहरात हे दारिद्र्याचे जग फारसे दिसत नाही. नाही म्हणायला पटायाकडून डॉन मुआंग विमानतळावर जाणाऱ्या रस्त्यावर दिसणारी झोपडपट्टी नितळ कांतीच्या शरीरावर उगवलेल्या खरजेच्या छोट्या पुळीसारखी वाटते. पण ही दारिद्र्याची खरूज तिथे गावागावात पसरलेली आहे. आजही माझ्या डोळ्यासमोर बॅकॉकमधला एक नाईट क्लब आहे. तिथल्या एका छोट्याशा डान्सिंग फ्लोअरवर अक्षरश: दहा-बारा वर्षांच्या मुली मी नाचताना पाहिल्या. बीअर घेत कोपऱ्यातून हा प्रकार न्याहाळत असताना एक वेटर येऊन म्हणाला, "तू का नाचत नाहीस?" तो नाईट क्लब म्हणजे वासनेचा डोह होता. माझ्या तोंडातून शब्द फुटेना आणि शब्द फुटण्याची वाट पाहाण्याएवढा त्या वेटरकडे वेळही नव्हता. एक पन्नाशीकडे झुकलेला, अर्ध्या चड्डीतला गोरा कामदेव भिरभिरत्या नजरेने तिथे फिरत होता. त्याने फुलं उचलावीत तशा बारा वर्षांच्या दोन मुली उचलल्या. मी शहारलो. ती बँकॉकमधली माझी पहिली रात्र होती. त्यानंतर अशी दगडी मनं आणि आंधळी वासना मी तिथे वारंवार पाहिली. त्याचं कारण आहे. पर्यटनामधून त्यांच्या देशाला प्रचंड विदेशी मुद्रा मिळते. जगाच्या बाजारात त्यांच्या चलनाची म्हणजेच 'बाथ' या चलनाची किंमत फार लहान आहे त्यामुळे पौंड-डॉलर्सच काय, पण भारतीय पर्यटकांनाही बँकॉक परवडू शकतं. अरबांच्या दृष्टीने तर बँकॉक नंदनवनच आहे बँकॉक विकत घ्यायची ताकद असल्याच्या आविर्भावात अरब फिरत असतात. पूर्वी थायलंड अर्ध्या जगाला तांदूळ पुरवायचं, आता जगाच्या वासनापूर्तीचा विडा त्यांनी उचललाय.

पण रात्र सरली की बॅकॉंकची काळी बाजू सरते आणि मग उभं राहातं ते स्वच्छ, मॉडर्न शहर रूढीप्रियतेच्या खुणा, धर्मावरची निष्ठा दाखवणारं शहर. प्रचंड रस्ते,

भली मोठी शॉपिंग सेंटर्स आणि भव्य बुद्धमंदिरांनी नटलेलं शहर. मध्यम बांध्याच्या, काळ्याभोर केसाच्या, किंचित चपट्या नाकाच्या, पण गौर कांतीच्या चटपटीत स्त्री-पुरुषांचं शहर. तिथे पुरुषांपेक्षा स्त्रियाच जास्त असाव्यात. स्त्रियांचा संचार तिथे सर्वत्र आहे. ऑफिसात, बँकांत, हॉटेलात, दुकानात आणि कंडक्टरच्या रूपात अगदी बसमध्येसुद्धा! पण त्यांचं खरं राज्य दिसतं फळाफुलांच्या किंवा भाजी बाजारात. नाजूक रंगीबेरंगी फुलपाखरांनी मानवी रूप घेऊन बाजारात गर्दी केली आहे असा भास होतो. त्यांचा तो सयामी भाषेतला चिवचिवाटही कानाला गोड लागतो. बँकॉकमध्ये पुरुष स्वखुशीने बाजारहाट करत असावेत. बाजारहाट हा प्रकार रम्य असू शकतो हे फक्त तिथेच जाणवतं. तिथल्या स्त्रिया पँट-शर्ट किंवा स्कर्ट-ब्लाऊजमध्येच जास्त दिसतात. त्यांचा पारंपारिक वेष त्या फक्त सणासुदीला वापरत असाव्यात. तिथली माणसं आईच्या पोटातून अदब शिकून येतात. मान तुकवणं हा त्यांच्या शिष्टाचाराचा भाग आहे ते स्वागत करताना आपल्याप्रमाणेच नमस्कार करतात, पण नमस्कार करताना डोळे मिटून मान तुकवायची त्यांना सवय आहे. 'मोडेन पण वाकणार नाही' वगैरे तत्त्वांच्या ही मंडळी वाटेला गेलेली दिसत नाहीत. गंमत म्हणजे विलासी पाश्चात्त्य संस्कृतीच्या आक्रमणानंतरही रूढीपरंपरेला ते चिकटून बसले आहेत. तिथे नव्वद टक्के प्रजा धर्मानं बौद्ध आहे, बौद्ध हा त्यांचा स्पष्टपणे राष्ट्रीय धर्म आहे. शाळा-कॉलेजात धर्माचं शिक्षण देणं, ते प्रतिगामित्वाचं लक्षण मानत नाहीत. त्यांचा धर्मगुरू हा राष्ट्रगुरू असतो आणि त्याचं बरंवाईट झालं तर त्यांचा राजा त्याचं क्रियाकर्म करतो.

काही बाबतीत त्यांची रूढीप्रियता अजब वाटते. तिथे प्रत्येक बुद्धधर्मीय सयामी, किमान एक वर्ष तरी भिक्षू होतो. राजाचीही त्याच्यातून सुटका नाही. त्या काळात राजाच्या हातातही भिक्षापात्र येतेच. पंधरा-सोळा वर्षाच्या मुलीही मुंडन करून बुद्धाच्या पायाशी बसतात. काही काळापुरतं त्यांना डिस्को संस्कृतीपासून दूर राहावंच लागतं. गंमत म्हणजे त्या काळात कुणालाही 'माणसाचा' कायदा लागू नसतो. त्याचा फायदा उठवणारी मंडळीही तिथे आहेत. बुद्धधर्माची दीक्षा त्यांना आपणच दिली. अशोकाच्या काळात दोन भिक्षूंनी बँकॉकच्या पश्चिमेला बौद्ध धर्माचं बी रोवलं आणि बघता बघता हा धर्म दक्षिण-पूर्व आशियात फोफावला. सयामी लोकांनी बौद्ध धर्माबरोबरच थोडी भारतीय संस्कृतीही आत्मसात केली. बुद्धाबरोबरच ब्रह्मा, विष्णू, गणपती, लक्ष्मी वगैरे हिंदू देवांनाही त्यांनी हृदयात स्थान दिलं. त्यांची देवळंही बांधली.

तिथे जवळजवळ प्रत्येक इमारतीच्या आवारात एक छोटं देऊळ असतं. त्याला थायी भाषेत 'संप्रफुम' म्हणतात. त्या छोट्या देवळाच्या देव्हाऱ्यात क्षेत्रदेवता



*संपूर्ण सोन्याने बनवलेली बुद्धाची मूर्ती*

असते. ती घर राखायला असली की, भूत-पिशाच्यांना घरात पाय टाकायची हिंमत होत नाही अशी त्यांची श्रद्धा आहे. बरं, तिथेही देवापुढे मग तो बुद्ध असो किंवा आपल्या तेहतीस कोटीपैकी एखादा, धूप, दीप, उदबत्त्या, प्रसाद ठेवायचा प्रकार आपल्यासारखाच आहे. पण मेणबत्त्या देवासमोर ठेवायचा वारसा येशूच्या लेकरांकडून घेतलेला दिसतोय. त्यांचे देव आपल्या देवाप्रमाणे नेवैद्य खात नसले तरी नुसत्या वासाने प्रसन्न होत असावेत. कारण नेवैद्यात बर्फीपासून अंडं, भात, भाजी आणि भाज्यांपर्यंत सर्व असतं. अगदी छोटी देवळेही प्रसादाने तुडुंब भरलेली असतात.

बँकॉकचं खरं सौंदर्य त्यांच्या प्रेक्षणीय बुद्धमंदिरात आणि राजवाड्यात आहे. तिथला राजा आज नामधारी असला तरी त्याचा थाटमाट अस्सल आहे. तिथले राजे स्वत:ला 'राम' म्हणवून घेतात. सध्या नवव्या 'रामा'चं तिथे राज्य आहे बॅकॉकमधला तो सौंदर्यशाली राजवाडा पहिल्या रामाने १७८३ साली बांधला. प्रत्येक राजवाड्याचं एक स्वत:चं वैभव असतं, कलाकुसर असते गौरवाच्या इतिहासाच्या तो खाणाखुणा मिरवत असतो पण त्याचबरोबर प्रत्येक राजवाडा गरिबांच्या पोटावर नांगर फिरवून उधळेल्या अफाट संपत्तीचा इतिहासही सांगत असतो.

थायलंडची राजेशाहीही त्याला अपवाद नव्हती. म्हणूनच त्या राजवाड्याचे

सुवर्णवरखाने सजवलेले खांब, नक्षीकाम केलेल्या भिंती आणि रत्नजडित सिंहासन पहाताना त्यावरचे रक्ताचे डाग मला स्पष्ट दिसत होते. त्या कलेपुढे मी नतमस्तक होतो, पण संपत्तीचं नागडं दर्शन बीभत्स वाटत होतं. त्या राजवाड्यात पाचूच्या बुद्धाचं मंदिर आहे ध्यानस्थ बुद्ध एकसंधी पाचूवर कोरलाय. त्या कोरलेल्या मूर्तीची उंची ६६ सेंटीमीटर्स आणि रूंदी ५० सेंटीमीटर्स आहे, म्हणजे तो पाचू केव्हढा मोठा असेल ह्याची कल्पना करा. बरं इथे बुद्ध विसावलाय राज दरबारी, म्हणजे त्याचा इतर थाटही मोठाच आहे. बसायलाच सोन्याची बैठक आहे अलंकार आणि वस्त्रांची नुसती चैन आहे. ऋतुमानाप्रमाणे त्या बुद्धाचे वर्षातून तीनदा कपडे बदलले जातात. ज्या वास्तूत भगवान बुद्ध विराजमान आहेत, तिथे भिंतीवर ठिकठिकाणी बुद्धचरित्र आणि रामायणाचे प्रसंग रेखाटले आहेत.

पण आपले डोळे खऱ्या अर्थाने दीपतात 'वात त्रिमित' पाहताना. वात म्हणजे मंदिर. बॅकॉक शहराच्या मध्यभागी असलेल्या या मंदिरात साडेपाच टनी निखळ सोन्याची बुद्ध मूर्ती आहे. आपण सोन्याचा तोळ्यात हिशेब करणारी माणसं, ती भव्य मूर्ती पाहताना वेडावून जातो. त्या मूर्तीचा इतिहासही गमतीदार आहे. बँकॉक बंदराच्या बांधकामाच्या वेळी आसनस्थ बुद्धासारखी एक शिळा सापडली. ती तशीच उचलून मंदिरात ठेवायचं ठरलं, पण ती उचलताना पडली आणि मूर्तीचे काही टवके उडाले. त्या ठिकाणी ती चमकायला लागली. ताबडतोब वरचं मातीच कवच काळजीपूर्वक तोडण्यात आलं. आतमध्ये पूर्ण सोन्याची मूर्ती होती. सतराव्या शतकात थायलंडवर ब्रम्हदेशाच्या स्वाऱ्या होत. त्यावेळी मूर्ती पळवली जाऊ नये म्हणून तिला 'शिळारूप' देण्यात आलं होतं.

पुण्यात जसा मारुतीच्या मंदिरांना तोटा नाही, तसा बॅकॉकमध्ये बुद्धमंदिरांना तोटा नाही. बुद्धाने स्वत:चा राजवाडा सोडला आणि संन्यासी बनला. पण बँकॉकमध्ये संन्यासी बुद्धाला प्रासादतुल्य मंदिरात, त्याच्या भक्तांनी मोठ्या ऐषआरामात ठेवलंय. प्रत्येक मंदिराचं वैभव वेगळं असलं, तरी ती मंदिरं पहाणं कठीण असतं, पण किमान 'वात पो' म्हणजे निद्रिस्त बुद्धाचं मंदिर तरी पहायलाच हवं. मुख्य म्हणजे तिथे मंदिर पाहताना बौद्ध बडव्यांचा' त्रास नसतो. दक्षिणेसाठी हपापलेले हात आणि तोंडे आपल्याला सतावत नाहीत. ह्या मंदिरात बुद्धाला चक्क झोपवून ठेवलंय. भगवानाला विश्रांती द्यायची कल्पना रम्य आहे, पण तरीही तो 'जागृत' आहे, अशी तिथे नवस करणाऱ्यांची श्रद्धा आहे. पण ह्या बुद्धाचा आकार केव्हढा आहे ठाऊक आहे? चक्क ४६ मिटर्स लांब आणि १५ मिटर्स उंच! सुवर्णपत्रांनी त्या मूर्तीला नटवलंय आणि मूर्तीच्या तळपायावर मोत्याचे जडावकाम केलंय. मूर्तीच्या निव्वळ विशालतेनेच आपण आश्चर्यचकित होतो.

बौद्धमय वातावरणातून बाहेर पडून तिथल्या तरंगत्या बाजाराला एक चक्कर मारायलाच हवी. एकेकाळी बँकॉक शहरात, रस्त्यांऐवजी फक्त कालवेच होते. हा तरंगता बाजारही त्या तरंगत्या बॅकॉकची झलक आहे. तिथे दुकाने सर्व होड्यांवर आहेत. फळा-फुलांपासून तांदूळ-डाळींपर्यंत आणि केरसुणीपासून रॉकेलपर्यंत तिथे सर्व काही मिळतं. फक्त मिळवायला वल्हवत मात्र जावं लागतं. एखादा माल खराब मिळाला, तर तिथे पैसे अक्षरश: 'पाण्यात' जाऊ शकतात.

बॅकॉकला निव्वळ खरेदीला जाणारीही बरीच मंडळी असतात. अर्थात त्यांच्यासाठी 'तरंगता बाजार' हे काही खरेदीचे ठिकाण नाही. ही मंडळी 'इंद्रा मार्केट' आणि 'फौराद' ह्या मार्केटात रमलेली दिसतील. कपडे, बूट, कागदी फुलं वगैरे गोष्टी सोडल्या तर तिथे फारसं काही स्वस्त मिळत नाही. पूर्वी तिथल्या स्वस्ताईलाही एक कारण होतं. त्यांच्या बाथच्या तुलनेत आपल्या रुपयाची ताकद त्यावेळी जास्त असल्यामुळे आपण तिथे राजासारखे फिरू शकत होतो. पुढे रुपयाचं अवमूल्यन झाल्यानंतर ऊलट बाथच श्रीमंत झाला.

बऱ्याच सरदारजी मंडळींनी तिथे हॉटेल्स, कपड्यांची दुकानं आणि टेलरिंग शॉप्स थाटली आहेत. ही मंडळी अक्षरश: एका दिवसात सफारी किंवा थ्रीपिस सूट शिवून देतात. ह्या सरदारजींचा आणखीन एक उद्योग सांगून ठेवतो. बँकेपेक्षा डॉलरचा भाव ते चांगला देतात. तिथल्या एका सरदारजीला मी त्याचं रहस्य विचारलं होतं. त्याने त्यांचा दूरदर्शीपणा दाखवणारं उत्तर दिलं. तो म्हणाला, 'मी संपत्ती इथे डॉलर्समध्ये जमा करतो. कारण डॉलर्सची वट ह्या जगात कायम राहणार उद्या चंबूगबाळं घेऊन ह्या देशाबाहेर पळायची वेळ आलीच तर जगात थायलंडच्या 'बाथ'ला विचारणार कोण? डॉलर्सचा मान जगात सर्वत्र राखला जातो.'

खरंय. 'श्रीमंत' म्हणून मिरवणारा कुएती दिनार एका क्षणात कंगाल झाला होता. त्याला फाटक्या कागदाची किंमतही उरलेली नव्हती. युद्धानंतर तो सावरला ही गोष्ट वेगळी आहे पण अमेरिकन डॉलरवर ही पाळी कधीही आलेली नाही.

ही तिथली भारतीय मंडळी, त्यांच्या मुली वयात आल्या की त्यांना तिथल्या अमेरिकन संस्कृतीची संगत लागायच्या आधीच भारतात पाठवून एखाद्या 'पगडी'शी जन्मगाठ बांधून टाकतात. मुलं वडिलांच्या धंद्यात उतरतात आणि येणाऱ्या पर्यटकाला 'गिऱ्हाईक' मानून तिथल्या रंगेल दुनियेची चटक लावतात.

एकूण या नगरीने बुद्ध मिरवला तरी बुद्धाचा वारसा कधीच सोडून दिलाय. आणि जगासाठी ती आज शरीर उघडं टाकलेली वारांगनाच झालीय.

*(लोकप्रभा १४ एप्रिल १९९१)*

REFBK-0028125